# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ

# पुणे

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्विक आणि सामाजिकशास्त्रे विद्याशाखेअंतर्गत पीएच्.डी. (इतिहास) पदवी करिता सादर केलेला शोध प्रबंध

## जागतिकीकरणामुळे आगरी आणि कोळी समाजावर पडलेल्या प्रभावांचा तौलनिक अभ्यास (१९९० – २०१०)


मार्गदर्शक
श्रध्दा कुंभोजकर

अभ्यासक
प्रगती मनोज पाटील


फेब्रुवारी २०१४

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, प्रगती मनोज पाटील यांनी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या इतिहास विषयातील विद्यावाचस्पती (पीएच्.डी.) पदवीसाठी **‘जागतिकीकरणामुळे आगरी आणि कोळी समाजावर पडलेल्या प्रभावांचा तौलनिक अभ्यास (१९९०—२०१०)’** या विषयावरील शोधप्रबंध माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेला आहे. सदर संशोधन हे स्वतंत्र व नवे असून या पूर्वी ते कोणत्याही पदवीसाठी सादर करण्यात आलेले नाही.

सदर प्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे येथे इतिहास विषयातील विद्यावाचस्पती (पीएच्. डी.) पदवीसाठी सादर करण्यास माझी अनुमती आहे.

मार्गदर्शक

श्रद्‌धा कुंभोजकर

स्थळ — पुणे

दिनांक— १४/०२/२०१४

# प्रतिज्ञापत्र

मी सौ. प्रगती मनोज पाटील प्रतिज्ञापूर्वक लिहून देते की, **'जागतिकीकरणामुळे आगरी आणि कोळी समाजावर पडलेल्या प्रभावांचा तौलनिक अभ्यास (१९९०—२०१०)'** या विषयावरील शोध प्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या इतिहास विषयातील विद्यावाचस्पती (पीएच्.डी.) पदवीसाठी सादर केलेला आहे.

या प्रबंधातील निष्कर्ष संशोधिकेचे असून जी माहिती प्राथमिक व दुय्यम साधनांमधून संकलित केलेली असेल तिचा योग्य तो निर्देश केलेला आहे. तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या ( यु. जी. सी.) २००९ च्या नवीन नियमाला अनुसरुन सदर प्रबंधाचे काम पूर्ण केलेले आहे.

संशोधक

प्रगती मनोज पाटील

स्थळ — पुणे

दिनांक— १४/०२/२०१४

# ऋणनिर्देश

पीएच्. डी. प्रबंधाचे काम चालू असतांना एका गोष्टीचे महत्त्व प्रकर्षाने जाणवले ते म्हणजे टीमवर्क. माझ्यासाठी पीएच. डी. प्रबंधाचे काम पूर्णत्वास जाणे म्हणजे सर्वांच्याच श्रमाचे फलित असल्याने त्यांच्या ऋणांचा निर्देश करणे क्रमप्राप्त ठरते.

सर्वप्रथम मी माझ्या मार्गदर्शक डॉ. श्रद्‌धा कुंभोजकरांचे आभार मानते कारण त्यांच्या प्रेरणेनेच मी या पदवीसाठी प्रवेश घेतला. त्यांचे सहकार्यपूर्ण वागणे, मित्रत्वाच्या नात्याने समजावणे व गुरुपदी राहून चुका दुरुस्त करणे हे सर्व इतके छान होते की या पदवीचा त्रास न वाटता आनंदच झाला. इतका की यानंतर काय करायचे हाच प्रश्न सतत पडतो आहे. संशोधना सारख्या किचकट, अवघड व रटाळ वाटणाऱ्या विषया प्रती मानसिक आवड व आदर निर्माण केल्याबद्‌दल त्यांचे मनापासून आभार. हे ऋण न फिटणारे.

त्यानंतर मला आभार मानायचेत ते माझ्या आई बाबांचे. केवळ त्यांच्या इच्छेपोटीच माझ्या मनात शिकण्याची आवड निर्माण झाली. शिवाय माझ्या सासूबाई, छोटया जाऊबाई, दोन बहिणी व मुलगी आर्या यांच्या निस्वार्थ मदतीमुळेच मी नि:शंक मनाने घरकामाच्या व्यापातून मुक्त होऊन या कामात गुंतू शकले. सगळयात महत्त्वाचे व अवर्णनीय प्रोत्साहन मिळाले ते माझ्या पतींकडून. मला कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ न देण्यासाठीची त्यांची ती धडपड माझ्यासाठी अमूल्य अशीच आहे.

या प्रबंधासाठी योग्य ती माहिती देऊन अनमोल सहकार्य करणारे सर्व मुलाखतदार व प्रश्नावलीदारांचीही मी ऋणी आहे. त्यांनी मनापासून मदत केल्यानेच हे संकलन शक्य झाले. सदर कामाच्या तथ्य संकलनासाठी विशेष करुन मदत करणारे माझे सहाय्यक विद्यार्थी म्हणजे अमोल, सागर, विनायक, अक्षय, मंदार, सुयोग, महेश, छायाचित्रकार अमोल नाईक तर तांत्रिक व संगणकीय कामासाठी मदत करणारे संकल्प, जयेश, अमित, निलेश, शलाका व प्रतीक यांची मदत केवळ शब्दांपलीकडील. या व्यतिरिक्त माझे प्रेरणास्थान

असलेले व सतत मला कार्यमग्न राहण्यासाठी प्रोत्साहन देणारे माझे मित्र दत्ता व ओमकार तसेच वेळी किंबहुना अवेळी सुद्‌धा मागितलेली मदत मनापासून करणारे माझे स्नेही व गुरू श्री. मनोज थळे, डॉ. व्ही. एन. गुम्मा , श्री. आर. एस. पाटील , डॉ. उत्तरा खाडीलकर, डॉ. सुभाष म्हात्रे, कु. स्मिता सहस्रबुध्दे, डॉ. श्रीशैल भैरगुंडे, डॉ. अनिल बांगर, डॉ. विश्वास चव्हाण, श्री. अनंत खाडीलकर या सर्वांचीच मी खरंच ऋणी आहे.

या सर्वांसोबतच मला सहकार्य करणाऱ्या माझ्या पी. एन. पी. संस्थेतील माझे सहकारी, प्राचार्य, उपप्राचार्या व संस्थाप्रमुखांचीही मी मनापासून ऋणी आहे. त्यांच्या व टिळक महाराष्ट्र विदयापीठाच्या परवानगीने मी हे शिवधनुष्य पेलण्याचे धाडस करु शकले. तसेच यांच्या सारख्याच अनेक ज्ञात व अज्ञात मदतनीसांची मी मनापासून ऋणी आहे कारण उपरोक्त दिलेली नावे ही फक्त नमुना दाखल अथवा प्रातिनिधिक स्वरूपाचीच आहेत. मी अत्यंत कमी वेळात व कमी त्रासात हे सर्व पूर्ण करू शकले ते केवळ या सर्वांच्याच मदतीमुळे. या सर्वांचेच कित्येक वेळा आभार मानले तरी त्यांच्या ऋणातून उतराई होणे केवळ अशक्यच. नव्हे तर मला त्यांच्या उपकाराखालीच आयुष्य भर रहायला निश्चितच आवडेल.

अखेर ज्या ईश्वरी प्रेरणेने माझ्याकडून हे कार्य पूर्ण करून घेतले तीस माझे विनम्र अभिवादन.

सौ. प्रगती मनोज पाटील.

स्थळ — पुणे

दिनांक— १४/०२/२०१४

# जागतिकीकरणामुळे आगरी आणि कोळी समाजावर पडलेल्या प्रभावांचा तौलनिक अभ्यास ( १९९० – २०१० )

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | शीर्षक | पृ.क्र. |
|---|---|---|
| १. | प्रस्तावना | १ |
| २. | सैध्दांतिक पार्श्वभूमी | ५६ |
| ३. | आगरी समाज आणि जागतिकीकरण | ८२ |
| ४. | कोळी समाज आणि जागतिकीकरण | १५४ |
| ५. | उपसंहार | २१० |
| | संदर्भ सूची | २२५ |
| | परिशिष्टे | २३७ |
| | आगळे हितबोध पत्रिका – १९०६ | २३९ |
| | शब्दसूची | २६४ |
| | छायाचित्रे | २८४ |

# कोष्टक सूची


| अ.क्र | शीर्षक | पृ.क्र. |
|---|---|---|
| १. | कोष्टक क्र. १ | १२६ |
| २. | कोष्टक क्र. २ | १२६ |
| ३. | कोष्टक क्र. ३ | १२७ |
| ४. | कोष्टक क्र. ४ | १२७ |
| ५. | कोष्टक क्र. ५ | १२८ |
| ६. | कोष्टक क्र. ६ | १२८ |
| ७. | कोष्टक क्र. ७ | १२९ |
| ८. | कोष्टक क्र. ८ | १२९ |
| ९. | कोष्टक क्र. ९ | १३० |
| १०. | कोष्टक क्र. १० | १३० |
| ११. | कोष्टक क्र. ११ | १३१ |
| १२. | कोष्टक क्र. १२ | १३१ |
| १३. | कोष्टक क्र. १३ | १३२ |
| १४. | कोष्टक क्र. १४ | १३२ |
| १५. | कोष्टक क्र. १५ | १३३ |
| १६. | कोष्टक क्र. १६ | १३३ |
| १७. | कोष्टक क्र. १७ | १३४ |
| १८. | कोष्टक क्र. १८ | १३४ |
| १९. | कोष्टक क्र. १९ | १३५ |
| २०. | कोष्टक क्र. २० | १३५ |
| २१. | कोष्टक क्र. २१ | १३६ |
| २२. | कोष्टक क्र. २२ | १३६ |
| २३. | कोष्टक क्र. २३ | १३७ |
| २४. | कोष्टक क्र. २४ | १३७ |
| २५. | कोष्टक क्र. २५ | १३८ |
| २६. | कोष्टक क्र. २६ | १३८ |
| २७. | कोष्टक क्र. २७ | १३९ |
| २८. | कोष्टक क्र. २८ | १३९ |
| २९. | कोष्टक क्र. २९ | १४० |
| ३०. | कोष्टक क्र. ३० | १४० |
| ३१. | कोष्टक क्र. ३१ | १४१ |
| ३२. | कोष्टक क्र. ३२ | १४१ |
| ३३. | कोष्टक क्र. ३३ | १४२ |
| ३४. | कोष्टक क्र. ३४ | १४२ |

| अ.क्र | शीर्षक | पृ.क्र |
|---|---|---|
| ३५. | कोष्टक क्र. ३५ | १४३ |
| ३६. | कोष्टक क्र. ३६ | १४३ |
| ३७. | कोष्टक क्र. ३७ | १४४ |
| ३८. | कोष्टक क्र. ३८ | १४४ |
| ३९. | कोष्टक क्र. ३९ | १४५ |
| ४०. | कोष्टक क्र. ४० | १४५ |
| ४१. | कोष्टक क्र. ४१ | १४६ |
| ४२. | कोष्टक क्र. ४२ | १४६ |
| ४३. | कोष्टक क्र. ४३ | १४७ |
| ४४. | कोष्टक क्र. ४४ | १८२ |
| ४५. | कोष्टक क्र. ४५ | १८२ |
| ४६. | कोष्टक क्र. ४६ | १८३ |
| ४७. | कोष्टक क्र. ४७ | १८३ |
| ४८. | कोष्टक क्र. ४८ | १८४ |
| ४९. | कोष्टक क्र. ४९ | १८४ |
| ५०. | कोष्टक क्र. ५० | १८५ |
| ५१. | कोष्टक क्र. ५१ | १८५ |
| ५२. | कोष्टक क्र. ५२ | १८६ |
| ५३. | कोष्टक क्र. ५३ | १८६ |
| ५४. | कोष्टक क्र. ५४ | १८७ |
| ५५. | कोष्टक क्र. ५५ | १८७ |
| ५६. | कोष्टक क्र. ५६ | १८८ |
| ५७. | कोष्टक क्र. ५७ | १८८ |
| ५८. | कोष्टक क्र. ५८ | १८९ |
| ५९. | कोष्टक क्र. ५९ | १८९ |
| ६०. | कोष्टक क्र. ६० | १९० |
| ६१. | कोष्टक क्र. ६१ | १९० |
| ६२. | कोष्टक क्र. ६२ | १९१ |
| ६३. | कोष्टक क्र. ६३ | १९१ |
| ६४. | कोष्टक क्र. ६४ | १९२ |
| ६५. | कोष्टक क्र. ६५ | १९२ |
| ६६. | कोष्टक क्र. ६६ | १९३ |
| ६७. | कोष्टक क्र. ६७ | १९३ |
| ६८. | कोष्टक क्र. ६८ | १९४ |
| ६९. | कोष्टक क्र. ६९ | १९४ |

७०. कोष्टक क्र. ७० १९५
७१. कोष्टक क्र. ७१ १९५
७३. कोष्टक क्र. ७३ १९६
७५. कोष्टक क्र. ७५ १९७
७६. कोष्टक क्र. ७६ १९८
७७. कोष्टक क्र. ७७ १९९
७८. कोष्टक क्र. ७८ १९९
७९. कोष्टक क्र. ७९ २००
८०. कोष्टक क्र. ८० २००
७२. कोष्टक क्र. ७२ १९६
७४. कोष्टक क्र. ७४ १९७
८१. कोष्टक क्र. ८१ २०१
८२. कोष्टक क्र. ८२ २०१
८३. कोष्टक क्र. ८३ २०२
८४. कोष्टक क्र. ८४ २०२
८५. कोष्टक क्र. ८५ २०३
८६. कोष्टक क्र. ८६ २०३

# छायाचित्र सूची


| अ.क्र. | शीर्षक | पृ.क्र. |
|---|---|---|
| १. | संशोधन क्षेत्र | २८५ |
| २. | आगरी समाजाचा पारंपरिक पोशाख | २८६ |
| ३. | कोळी समाजाचा पारंपरिक पोशाख | २८७ |
| ४. | आगरी आणि कोळी समाजाचा बदललेला पोशाख | २८८ |
| ५. | आगरी आणि कोळी समाजाची दैनंदिन पारंपरिक साधने | २८९ |
| ६. | आगरी आणि कोळी समाजाची मच्छीमारीची पारंपरिक साधने | २९० |
| ७. | आगरी समाजाचे पारंपरिक व्यवसाय | २९१ |
| ८. | कोळी समाजाचे पारंपरिक व्यवसाय | २९२ |
| ९. | आगरी समाजाचे बदललेले व्यवसाय (अ) | २९३ |
| १०. | आगरी समाजाचे बदललेले व्यवसाय (ब) | २९४ |
| ११. | कोळी समाजाचे बदललेले व्यवसाय (अ) | २९५ |
| १२. | कोळी समाजाचे बदललेले व्यवसाय (ब) | २९६ |
| १३. | अलंकारातील मत्स्यप्रेम | २९७ |
| १४. | आगरी आणि कोळी समाजाचे पारंपरिक अलंकार | २९८ |
| १५. | अलंकारातील परिवर्तन | २९९ |
| १६. | घरांच्या रचनेतील परिवर्तन | ३०० |
| १७. | मनोरंजनाची साधने | ३०१ |
| १८. | खेळ | ३०२ |
| १९. | संशोधन क्षेत्रातील औद्योगिकीकरण | ३०३ |
| २०. | जागतिकीकरण, औद्योगिकीकरण, पारंपरिक व्यवसाय व झालेले परिवर्तन | ३०४ |

# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्विक आणि सामाजिकशास्त्रे विद्याशाखेअंतर्गत पीएच्.डी. (इतिहास) पदवी करिता सादर केलेल्या शोध प्रबंधाचा गोषवारा

## जागतिकीकरणामुळे आगरी आणि कोळी समाजावर पडलेल्या प्रभावांचा तौलनिक अभ्यास (१९९० – २०१०)

फेब्रुवारी २०१४

# जागतिकीकरणामुळे आगरी आणि कोळी समाजावर पडलेल्या प्रभावांचा तौलनिक अभ्यास (१९९० – २०१०)

**प्रस्तावना**

रायगड जिल्ह्यातील विविध समाजाच्या स्थानिक इतिहासाचा धांडोळा घेत असताना संशोधिकेच्या हे लक्षात आले की रायगड जिल्ह्यात अनेक समाजांचे वास्तव्य असतानाही त्यांच्यावर परिपूर्ण संशोधन झालेले नाही. मागील २०० ते ४०० वर्षांच्या रायगड जिल्ह्याच्या प्रभावशाली इतिहासात येथील विविध जाती, जमातींच्या लोकांचा सहभाग निश्चितच उल्लेखनीय आहे. मात्र तरीही हे समाज संशोधनाच्या दृष्टीने दुर्लक्षित असलेले दिसतात. त्यामुळे संशोधिकेने तिच्या परिसरातील म्हणजेच अलिबाग तालुक्यातील विविध समाजावर संशोधन करण्याचे निश्चित केले. त्यातही संशोधिका स्वत: आगरी व कोळी या दोन्ही समाजाचे प्रतिनिधित्व करत असल्याने प्रामुख्याने या समाजांची निवड केली.

संशोधनासाठी निवडलेला अलिबाग तालुका हा बेटाप्रमाणे असल्याने पूर्वी सर्वांपासून भौगोलिक दृष्ट्या तुटलेला असा होता. मात्र वर्ष १९५८ मध्ये धरमतर खाडीवर व वर्ष १९८६ मध्ये रेवदंडा खाडीवर पूल झाल्याने हा भाग इतर गावांशी जोडला गेला. तसेच अलिबागमध्ये स्थापन झालेल्या चुंबकीय वेधशाळेमुळे १९६१ पर्यंत येथे वीजेचा वापर सुरू करण्यात आलेला नव्हता. या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे येथे राहणारा समाज सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक दृष्ट्या अप्रगत होता. स्वातंत्र्योत्तर काळातील पहिल्या दशकातही अलिबाग येथील आजारी व्यक्तीला उत्तम उपचाराच्या सोयी उपलब्ध होत नसत. वाहतुकीसाठी अत्यल्प

प्रमाणात सुविधा उपलब्ध होत्या. मात्र १९६० ते १९९०या काळात अलिबागचा झपाट्याने विकास झाला. अलिबाग हे जिल्ह्याच्या राजधानीचे ठिकाण बनले. इ.स. १९८४ मध्ये राष्ट्रीय केमिकल्स आणि फर्टिलायझर्सचा प्रकल्प थळ येथे कार्यान्वित झाला. यांसारख्या अनेक घटनांच्या माध्यमातून अलिबागचे परिवर्तन घडून येण्यास मदत झाली असली तरी याचा वेग कमी होता.

१९९० साली आंतरराष्ट्रीय दबावामुळे, जागतिक सत्तास्पर्धेत टिकून राहाण्यासाठी व अंतर्गत शासनव्यवस्थेच्या आवश्यकतेपोटी भारताने नवे आर्थिक धोरण स्वीकारले. त्यातूनच पुढे खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण म्हणजेच ‘खाउजा’ या संकल्पना मूळ धरू लागल्या. या सर्वांमागे जग एका वैश्विक खेड्यामध्ये परिवर्तित होणे हा उद्देश होता. ही संकल्पना पाश्चिमात्य देशांनी आपल्या फायद्यासाठी सर्वत्र अनिवार्य केली असल्याने त्याचा अनुकूल व प्रतिकूल असा दोन्ही प्रकारचा प्रभाव हा समाजावर पडलेला दिसतो. अगदी अलिबाग तालुक्यातील आगरी आणि कोळी समाजातील लोकही या झंझावातात अंतर्बाह्य ढवळून निघाले. या जागतिकीकरणामुळे त्यांच्यात सामाजिक व शैक्षणिक परिवर्तन तर घडलेच परंतु विशेष भूसंपादन प्रक्रियेमुळे ते आपल्या पारंपरिक व्यवसायांपासूनही दुरावले. याचा परिणाम त्यांच्या राजकीय व आर्थिक स्थितीवरही झाला.

थोडक्यात जागतिकीकरणाचे ग्रामसंस्कृतीवर झालेले आक्रमण आणि त्यामुळे अंतर्बाह्य बदललेला परंपरावादी समाज हा या संशोधनाचा मूळ गाभा ठरतो. त्यामुळे देशाच्या समृद्ध इतिहासाचे ज्ञान अवगत होण्यासाठी अशा समाजांवर सातत्याने संशोधन चालू राहिले पाहिजे तेव्हाच त्यांचे अप्रकाशित अथवा मौखिक स्वरूपातील साहित्य, त्यांचे प्रश्न, समस्या व त्यांची सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक, राजकीय व शैक्षणिक अशी सर्वच परिस्थिती समजून त्यावर उपाययोजना करता येईल अथवा सुचविता येईल. एकंदरीतच २१ व्या शतकात

आधुनिकीकरणाचा प्रभाव असतांनाही पारंपरिक संस्कृतीचे बदलत्या स्वरुपात संवर्धन करणाऱ्या आगरी आणि कोळी समाजांमध्ये होणाऱ्या बदलांची सर्वांगीण माहीती उपलब्ध करून देण्याचा संशोधिकेचा प्रयत्न आहे.

## १.संशोधन समस्या

१९९० ते २०१० या काळात जागतिकीकरणामुळे आगरी आणि कोळी समाजावर पडलेल्या प्रभावांचा तौलनिक अभ्यास करणे.

## २. संशोधनाची उद्दिष्टे

- १९९० ते २०१० या वीस वर्षातील अलिबाग तालुक्यातील आगरी आणि कोळी समाजाच्या सामाजिक व आर्थिक जीवनातील परिवर्तनाचा आढावा घेणे.
- या समाजांमध्ये झालेल्या बदलास जागतिकीकरण कसे कारणीभूत ठरले याचा मागोवा घेणे.
- आगरी आणि कोळी समाजाची सद्यस्थिती अभ्यासणे.
- अलिबाग तालुक्याच्या सर्वांगीण विकासातील आगरी आणि कोळी समाजाचे योगदान अधोरेखित करणे.

## ३. संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा

➢ **संशोधनाची व्याप्ती**

- सदर संशोधन हे रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील आगरी आणि कोळी समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय स्थितीचा अभ्यास करणारे आहे.
- आगरी आणि कोळी समाजावर १९९० ते २०१० या काळात जागतिकीकरणामुळे पडलेल्या प्रभावांचा अभ्यास या संशोधनात केला आहे.

➢ **संशोधनाच्या मर्यादा**

- प्रस्तुत संशोधन हे महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यापुरतेच मर्यादित आहे.
- सदर संशोधनात फक्त आगरी आणि कोळी या दोन समाजांचाच अभ्यास अपेक्षित आहे.
- या दोन्ही समाजात १९९० ते २०१० या कालावधीत जागतिकीकरणामुळे झालेल्या बदलांचाच येथे अभ्यास करण्यात आला आहे.
- आगरी आणि कोळी समाजाच्या फक्त सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक स्थितीचाच मागोवा घेतला आहे.

## ४. उपलब्ध संदर्भ साहित्य

सदर प्रबंधाच्या तथ्य संकलनासाठी उपलब्ध असलेली प्राथमिक व दुय्यम स्वरूपाची साधने अतिशय महत्त्वपूर्ण आहेत. त्यातही प्रकाशित व अप्रकाशित अशी दोन प्रकारची साधने आहेत. आगरी आणि कोळी हे दोन्ही समाज अलिबाग येथील स्थानिक समाज आहेत. मात्र यातील लोक हे अशिक्षित असल्याने त्यांच्या बाबतचे समकालीन प्रकाशित साहित्य तुलनेने अत्यंत कमी आहे. मात्र ब्रिटीशकाळात वेगवेगळ्या अधिकाऱ्यांमार्फत संकलित केलेले अहवाल व विविध गॅझेटिअरच्या माध्यमातून तत्कालीन समाजाची माहीती मिळण्यास मदत होते. त्या दृष्टीकोनातून गॅझेटिअर ऑफ दि बॉम्बे प्रेसिडेन्सी, कुलाबा एन्ड जंजिरा, गॅझेटिअर ऑफ महाराष्ट्र स्टेट, कुलाबा डिस्ट्रीक्ट, रायगड जिल्हा गॅझेटिअर यांसारख्या गॅझेटिअर मधून आगरी व कोळी या दोन्ही समाजाची प्राथमिक माहीती मिळण्यास मदत होते. तसेच महाराष्ट्रीय ज्ञानकोश, विश्वकोश व भारतीय संस्कृतीकोशातूनही समाजाच्या विविध पैलूंबाबत माहीती मिळण्यास मदत झाली.

याचबरोबर दुय्यम प्रकाशित साधनांचा विचार केल्यास संशोधनासाठी उपयुक्त ठरलेली पुस्तके म्हणजे डॉ. प्रभाकर देव यांचे 'इतिहास शास्त्र : संशोधन अध्यापन आणि लेखनपरंपरा', डॉ. शांता कोठेकर यांचे 'इतिहास : तंत्र आणि

तत्वज्ञान', डॉ. विवेक पाटकर यांचे 'संशोधन मार्गावरील प्रवास', डॉ. सुनील मायी यांचे 'सामाजिक संशोधन पद्धती' तर डॉ. बी. एम. कऱ्हाडे यांचे 'शास्त्रीय संशोधन पद्धती' ही होय. या सर्व पुस्तकांच्या मदतीने सदर प्रबंधास संशोधकीय स्वरूपाची दिशा मिळण्यास मदत झाली शिवाय त्यात योग्य पद्धतीची मांडणी करून मुद्देसूदपणा आणता आला.

या सर्व साधनां व्यतीरिक्त सदर प्रबंधास अत्यंत उपयुक्त ठरलेली प्राथमिक अप्रकाशित साधने म्हणजे प्रश्नावली व मुलाखतींना मिळालेले प्रतिसाद. विविध विद्यापीठात पदवीसाठी सादर केलेले प्रबंध हे देखील दुय्यम साधन म्हणून खूप उपयुक्त ठरले. प्रस्तुत प्रबंधासाठी निवडलेले आगरी आणि कोळी हे येथील स्थानिक व संख्येने अधिक असलेले समाज आहेत. त्यामुळे त्यांच्यातील परिवर्तन जाणून घेण्यासाठी आगरी समाजाकडून आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक अशा स्वरूपात ९७२ तर कोळी समाजाच्या ४२८ अशा एकूण १४०० प्रश्नावल्या भरून घेतल्या. तसेच  आगरी समाजातील २०० व कोळी समाजातील १०० अशा एकूण ३०० लोकांच्या मुलाखती घेतल्या.

## ५. सैध्दांतिक पार्श्वभूमी

याशिवाय ज्या प्रबंधांमुळे सदर संशोधनास दिशा मिळाली ते पुढील प्रमाणे सांगता येतील.

डॉ. काळे डी. एन. यांच्या 'आगरीज – सोशिओ इकॉनॉमिक सर्वे' या १९५० मध्ये मुंबई विद्यापीठास सादर केलेल्या प्रबंधातून तत्कालीन आगरी समाजाची आर्थिक व सामाजिक माहीती मिळण्यास मदत झाली. मात्र यातील माहीती तत्कालापुरतीच मर्यादित आहे. तर डॉ. ठाकूर सई यांच्या 'दि आगरीज ऑफ नॉर्थ वेस्ट महाराष्ट्र – ॲन इथनोग्राफिक स्टडी' या २००७ मध्ये मुंबई विद्यापीठात सादर केलेल्या पीएच. डी. प्रबंधात प्रामुख्याने उरण तालुक्यातील आगरी समाजाचा विचार केलेला दिसतो डॉ. बांगर अनिल यांनी 'रायगड

जिल्ह्यातील आगरी समाजाच्या लोकसाहित्याचा वाङ्मयीन व भाषिक अभ्यास' या मराठवाडा विद्यापीठात २०१० मध्ये सादर केलेल्या पीएच. डी प्रबंधात व डॉ. अष्टपुत्रे पूर्वा यांनी 'आगरी बोलीचा भाषा वैज्ञानिक अभ्यास' या मुंबई विद्यापीठात सादर केलेल्या पीएच. डी. प्रबंधात अनुक्रमे आगरी समाजाच्या लोकसाहित्याचा व आगरी बोलीभाषेचा अभ्यास केलेला आहे तर डॉ. भैरगुंडे श्रीशैल यांनी 'आदिवासी (कोळी) लोकसाहित्यातील स्त्री पुरूष चित्रण' या २००६ मध्ये मराठवाडा विद्यापीठात सादर केलेल्या पीएच. डी. प्रबंधात व डॉ. महाडीक उज्ज्वला यांनी 'कोळी बोलीचा अभ्यास' या मुंबई विद्यापीठात सादर केलेल्या पीएच. डी. प्रबंधात अनुक्रमे कोळी समाजाच्या लोकसाहित्याचा व कोळी भाषेचा अभ्यास केलेला आहे. या सर्व प्रबंधांच्या माध्यमातून आगरी आणि कोळी समाजाच्या विविध पैलूंचा वेगवेगळ्या दृष्टीकोनातून मराठी, समाजशास्त्र व वाणिज्य विभागाद्वारे अभ्यास करण्यात आलेला आढळतो.

वरील सर्व प्रबंधातून महत्त्वपूर्ण माहीती उपलब्ध होत असली तरी प्रत्येक प्रबंधात आगरी आणि कोळी यापैकी कोणत्यातरी एकाच समाजाच्या एकाच घटकाचा अभ्यास प्रामुख्याने करण्यात आलेला आहे. मात्र सदर संशोधन हे या सर्वांहून भिन्न आहे. प्रस्तुत प्रबंधात आगरी आणि कोळी या दोन्ही समाजाच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक पैलूंचा अभ्यास ऐतिहासिक दृष्टीने करण्यात आलेला आहे. त्यांच्यातील परिवर्तन व जागतिकीकरण यांचा सहसंबंध तपासून दोन्ही समाजाचा तौलनिक अभ्यास यात सविस्तरपणे मांडण्यात आलेला आहे.

## ६. गृहीतके (Assumptions)

१. आगरी आणि कोळी हे दोन्ही समाज सामान्यपणे ग्रामीण भागात राहणारे आहेत.

२. आगरी समाजाचा प्रमुख व्यवसाय शेती तर कोळी समाजाचा मासेमारी हा आहे.

३. स्वातंत्र्यपूर्व काळापासून हे दोन्ही समाज मागास व इतर मागासवर्गीय म्हणून गणले जातात.
४. आगरी आणि कोळी समाज हा अलिबाग तालुक्यातील स्थानिक समाज आहे.
५. आगरी आणि कोळी समाजातील व्यवसाय, नृत्य, गायन, धर्मसंस्कार, लग्नपध्दती, मनोरंजन, बोलीभाषा यांसारख्या गोष्टींमध्ये साम्य आढळते.
६. गेल्या २० वर्षांच्या कालावधीत आगरी व कोळी समाजावर जागतिकीकरणाचा प्रभाव पडलेला आहे.
७. जागतिकीकरणामुळे आगरी आणि कोळी समाजाचा आर्थिक स्तर उंचावलेला आहे.
८. प्रश्नावली व मुलाखतींतून प्राप्त झालेली उत्तरे सत्य असल्यामुळे ग्राह्य आहेत.

## ७. संशोधनाच्या परिकल्पना (Hypotheses)

सदर संशोधनाद्वारे पुढील परिकल्पना यथातथ्य ठरतात किंवा नाही हे तपासले जाईल.

१. जागतिकीकरणामुळे आगरी व कोळी या दोन्ही समाजात परिवर्तन घडून आले.
२. आगरी समाजात शिक्षणाचा विकास मोठया प्रमाणात झाल्याने त्यांच्यात सर्वांगीण बदल झाले.
३. कोळी समाजात त्या तुलनेत शैक्षणिक विकास झाला नाही. मात्र आर्थिकदृष्ट्या हा समाज समर्थ बनला.
४. कोळी समाज आगरी समाजातील लोकांचे अनुकरण करताना दिसतो.
५. दोन्ही समाजातील पारंपरिक व्यवसायात मूलभूत बदल झाले.

६. प्रामुख्याने कोळी समाजाला जागतिकीकरणामुळे अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

## ८. ऐतिहासिक संशोधन पध्दती

आगरी आणि कोळी समाजाच्या भूतकाळातील व वर्तमान काळातील स्थितिगतीचा अभ्यास करण्याच्या हेतूने येथे ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे. त्यानुसार सर्वप्रथम संशोधनाच्या विषयाची म्हणजेच समस्येची निश्चिती करुन घेतली. या समस्यासूत्रणानंतर विषयानुरुप परिकल्पना मांडल्या. परिकल्पनेनंतर संशोधनाचा आराखडा तयार करुन कामाचे नियोजन केले. त्यानंतर विषयाच्या आवश्यकतेनुसार माहितीचे संकलन करण्यासाठी वेगवेगळ्या तंत्रांचा वापर केला. मग संकलित झालेल्या तथ्यांची पडताळणी करुन तिचे वर्गीकरण व विश्लेषण केले. नंतर या विश्लेषित माहितीचा अन्वयार्थ काढून त्यातून सिद्धांत मांडला. या सिद्धांताला केंद्रीभूत मानून मग या प्रबंधाचे लेखन केले. एकंदरीत या सर्व प्रक्रियांच्या अभ्यासातूनच पुढील काम पूर्ण करु शकले.

प्रस्तुत अध्ययनासाठी पुढील तंत्राचा वापर केला गेला आहे.

### ८.१ सर्वेक्षणः—

प्रस्तुत संशोधन हे आगरी व कोळी समाजाच्या १९९० ते २०१२ या गेल्या २० वर्षातील बदलत्या परिस्थितीवर आधारित आहे. या समाजांच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक स्थितींच्या विविध पैलूंचे मूल्यमापन याद्वारे अभ्यासले जाणार आहे. त्यामुळे येथे सर्वेक्षणाचा वापर तथ्य संकलनासाठी केलेला आहे. त्यानुसार अलिबाग तालुक्यातील २५ गावांमधील आगरी आणि कोळी या दोन्ही समाजातील लोकांचे निरीक्षण केले. प्रत्यक्ष गावात जाऊन लोकांच्या भेटी घेतल्या. गावांची पाहणी केली. त्यांचे समाज जीवन, रुढी, चालीरीती, परंपरा, सण, उत्सव, अथार्जनाचे व्यवसाय, गाणी, नृत्य इ. बाबत स्वत: माहिती मिळवली. त्यांच्याशी संवाद साधून त्यांची बोलीभाषा, त्यातील उच्चार, यांचीही माहिती करून घेतली.

शिवाय त्यांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेली स्थळे, मंदिरे, खाडीलगतचा भूभाग, शेत व होडी येथेही प्रत्यक्ष जाऊन सर्वेक्षण केले.

**८.२ निरीक्षण** :—

सदर प्रबंधासाठी संशोधिकेने दोन्ही समाजातील विविध सण, उत्सव, यात्रा, पाचवी, लग्न, हळद, साखरपुडा, वरात अशा अनेकविध कार्यक्रमांना उपस्थिती दर्शविली. या स्वनिरीक्षण व स्वानुभवातून मिळालेल्या माहीतीचा प्रबंध लेखनासाठी खूप उपयोग झाला.

**८.३ व्यष्टी अध्ययन** :—

व्यष्टी अध्ययनात एका व्यक्तीचे तिच्या कुटुंब, जात, गावकरी, समव्यावसायिक यांच्याशी असलेले सहसंबंध अभ्यासले जातात. आगरी आणि कोळी समाजातील बदल नोंदवतांना या समाजातील विशिष्ट व्यक्तींच्या आयुष्यांच्या नोंदींची मदत झाली. उदा. आगरी समाजातील हरिभाऊ पाटील, मुरलीधर म्हात्रे, शंकर सखाराम, दिनेश पाटील, मालती पाटील तर कोळी समाजातील विजय आवास्कर, रंजिता वरसोलकर, भगत बाबा, किस्नी कोळीण इत्यादी.

**८.४ नमुना निवड :—**

अलिबाग तालुक्यातील आगरी व कोळी समाजातील सर्व लोकांचे सर्वेक्षण करणे व्यावहारिक दृष्टया कठीण असल्याने सदर प्रबंधात नमुना निवड पध्दतीचा वापर कलेला आहे. आगरी व कोळी समाजाच्या वास्तव्याच्या दृष्टीने उपलब्ध गावांचा विचार करून नमुना निवडलेला आहे. त्यातही यादृच्छिक (Random) पध्दतीने २५ गावांची निवड केलेली आहे. अलिबाग तालुक्यात एकूण २१६ गावांचा समावेश होतो. त्या गावांच्या एकूण ६५ ग्रामपंचायती आहेत. २०११ च्या जनगणनेनुसार अलिबाग तालुक्याची एकूण लोकसंख्या २,१०,३३१ आहे.[४] १९३१ नंतर महाराष्ट्र शासनातर्फे जातीनिहाय जनगणना न झाल्याने आगरी व कोळी

लोकांची अलिबाग तालुक्यातील सध्याची अचूक लोकसंख्या सांगणे अवघड आहे. मात्र नमुना निवडीतील गावांच्या एकूण संख्येतील त्यांची लोकसंख्या तेथील ग्रामसेवकांच्या मदतीने अंदाजित स्वरूपात समजली. त्यावरुन परिशिष्टामध्ये आगरी व कोळी समाजाचे आधिक्य असणाऱ्या गावांबाबतची यादी देण्यात आलेली आहे. त्यानुसार अधिकाधिक आगरी व कोळी लोकांपर्यत पोहोचविण्याच्या दृष्टीने २५ गावांची यादृच्छिक नमुना निवड केली आहे.

### ८.५ प्रश्नावली :—

सदर प्रबंधाच्या तथ्यसंकलनासाठी निवडलेल्या गावांमधील आगरी व कोळी समाजातील सर्व लोकांकडून सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक बदलांसंबंधी माहीती देणाऱ्या प्रश्नावली भरुन घेऊन प्राथमिक माहीती गोळा केलेली आहे. त्यानुसार नमुना निवड केलेल्या गावातून आगरी लोकांकडून सामाजिक प्रश्नावली ३८०, आर्थिक प्रश्नावली ३८० व शैक्षणिक प्रश्नावली २१२ अशा एकूण ९७२ प्रश्नावली तर कोळी लोकांकडून सामाजिक प्रश्नावली १५७, आर्थिक प्रश्नावली १३०, व शैक्षणिक प्रश्नावली १४१ अशा एकूण ४२८ प्रश्नावली भरुन घेतल्या.

### ८.६ मुलाखत :—

एकूण १४०० प्रश्नावलींच्या माहीतीतून प्राथमिक स्वरूपाची अप्रकाशित माहीती उपलब्ध झाली असली तरी ह्या प्रश्नावलींचे स्वरूप बंदिस्त असल्याने काही महत्त्वाच्या माहीतीच्या उपलब्धतेसाठी मुलाखत पद्धतीचा अवलंब करावा लागला. त्यासाठी प्रत्यक्ष मुलाखत व फोनवरून घेतलेली मुलाखत अशा दोन्हींचा वापर केला. प्रश्नावलींच्या उत्तराचे स्वरूप होय किंवा नाही असे असल्याने अधिक माहीतीसाठी तसेच या समाजातील लोकांचे विचार, भावना व अनुभव कळण्यासाठी मुलाखतींचा उपयोग झाला. यात शिक्षित, अशिक्षित, गरीब, श्रीमंत, नोकरदार, व्यावसायिक व घरी असणारे, मजुरी करणारे अशा वेगवेगळ्या स्तरातील व वयोगटातील लोकांच्या मुलाखती घेण्यात आल्या. यात पूर्वनियोजित क्षेत्रावर

जाऊन आगरी समाजातील २०० व कोळी समाजातील १०० लोकांच्या अशा एकूण ३०० मुलाखती घेतल्या.

### ८.७ सांख्यिकी विश्लेषण :—

तथ्य संकलनाच्या आधारे सांख्यिकीय विश्लेषण करण्याचा प्रयत्न या प्रबंधात करण्यात आलेला आहे. यासाठी MS Excel चा वापर करण्यात आला. यामुळे मुलाखती व प्रश्नावलींच्या आधारे मिळालेल्या माहितीचे सांख्यिकीय वर्गीकरण करण्यास मदत झाली. त्याआधारे विविध प्रश्नांसाठी आपला होकार व नकार सांगणाऱ्या उत्तरकर्त्यांचे वर्गीकरण करून त्यांची टक्केवारी काढली गेली. त्यानंतर त्यांचे कोष्टक बनवून त्याच माहितीच्या आधारे आलेख काढण्यात आले. या सर्वांमुळे अपेक्षित माहितीचे विश्लेषण करणे सोपे झाले. तसेच शिकागो स्टाइल मॅन्युअल, युनिव्हर्सिटी ऑफ शिकागो २००३ यानुसार टीपा व संदर्भसूची लिहिण्यात आलेली आहे.

## ९. संशोधनाचे महत्त्व

जागतिकीकरण ही प्रक्रिया वरवर पाहता आर्थिक स्वरूपाची असली तरीही तिच्यामुळे आपापली स्थानिक व प्रादेशिक वैशिष्टये राखून असणाऱ्या छोट्या छोट्या समुदायांवर सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातही मूलभूत स्वरुपाचे प्रभाव पडतात. पूर्वापार मासेमारी किंवा मीठ उत्पादन करण्याच्या व्यवसायात असणाऱ्या कोळी व आगरी समाजाच्या उत्पादनाची पद्धत, बाजारपेठ व गरजा जागतिकीकरणामुळे पूर्णत: बदलल्या. यातून या दोन्ही समाजांवर अनेक परिणाम झाले. या प्रक्रियेतून केवळ या दोनच जातींत बदल घडले असे नाही. ब्राझील असो चीन असो वा आफ्रिकेतील लोक असोत पारंपरिक व्यवसायात मूलगामी बदल झाले की त्याचे परिणाम सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात घडतातच. जागतिकीकरणामुळे पारंपरिक व्यवसायांना मोठी बाजारपेठ मिळाली का? पारंपरिक तंत्रे कालबाह्य होऊन नष्ट झाली की ती उलट अधिक दुर्मिळ झाल्याने मूल्यवान

झाली? यातून आर्थिक उध्द्वस्तीकरण झाले की सबलीकरणाची प्रक्रिया वेग घेते आहे? अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा व सोडवण्याचा प्रयत्न आगरी व कोळी समाजाचा प्रातिनिधिक स्वरूपात अभ्यास करून या प्रबंधाद्वारे केला आहे. त्यांची उत्तरे या समाजाच्या अभ्यासातून मिळाली तरी ती पारंपरिक उद्योग करणाऱ्या इतर समाजांचे प्रतिनिधी म्हणून अभ्यासनीय ठरतात.

प्रस्तुत प्रबंध हा रायगड जिल्ह्यामधील अलिबाग तालुक्यातील आगरी आणि कोळी या दोन समाजावर आधारित आहे. आगरी आणि कोळी हे दोन्ही समाज अलिबागमध्ये मोठ्या संख्येने वास्तव्य करतांना दिसतात. त्यामुळे आगरी आणि कोळी या दोन्ही समाजात होणाऱ्या परिवर्तनाचा अलिबागच्या इतिहासावर निश्चितच प्रभाव पडताना दिसतो. या प्रबंधाच्या माध्यमाने अलिबागच्या इतिहासाची स्थानिक पातळीवर माहीती मिळण्यास मदत होईल. तसेच आगरी आणि कोळी हे दोन्ही समाज शेती व मासेमारी या दोन व्यवसांयाशी निगडीत असल्याने दोन्ही पारंपरिक व्यवसायांचीही माहीती उपलब्ध होईल. सदर संशोधनामुळे आगरी आणि कोळी हे दोन्ही समाज त्यांच्या गुणवैशिष्ट्यांसह कळण्यास मदत होईल. शिवाय या समाजातील लोकांची सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व शैक्षणिक स्थिती तपासून घेता येईल.

सद्य:स्थितीत जागतिकीकरणाचा प्रभाव समाजाच्या प्रत्येक घटकावर निश्चितच पडलेला आहे. आगरी आणि कोळी समाजावर या जागतिकीकरणाचा नेमका काय परिणाम झालेला आहे याचीही माहीती उपलब्ध संशोधनातून होईल. या समाजातील लोकांची बदलती मानसिक स्थिती, विचारसरणी या सर्व बाबींचा तुलनात्मक अभ्यास आपणास या संशोधनाच्या माध्यमातून प्राप्त होईल. तसेच सदर संशोधनाच्या अभ्यासातून जागतिकीकरणामुळे आगरी आणि कोळी समाजात निर्माण झालेल्या समस्या लक्षात येऊन त्यावर उपाययोजना सांगता येतील. या दोन्ही समाजात झालेल्या अनुकूल अथवा प्रतिकूल बदलांप्रमाणेच इतर समाजावर

अथवा घटकांवर झालेल्या जागतिकीकरणाचा परिणाम अभ्यासण्यास संशोधनासाठी प्रेरणा मिळेल. भारतातील आगरी आणि कोळी या जातींप्रमाणेच अन्य जाती जमातींवर सखोल संशोधन करणे आत्यंतिक आवश्यक आहे हे संशोधकांच्या लक्षात येईल व भारतातील आगरी आणि कोळी या जातींप्रमाणेच अन्य जाती जमातींवर सखोल संशोधन करण्यासाठी प्रेरणा मिळेल. प्रादेशिक व स्थानिक इतिहासाच्या संशोधनामुळे समाजातील विविध घटकांचा नव्याने अभ्यास होण्यास मदत होईल.

## १०. प्रकरण नियोजन

सदर प्रबंधात प्रकरणांची विभागणी पुढील प्रमाणे करण्यात आलेली आहे.

### ❖ प्रकरण पहिले — प्रस्तावना

या प्रकरणात संशोधनाचे स्वरूप स्पष्ट केलेले आहे. त्यात संशोधनाची उद्दिष्टे, गृहीतके, महत्त्व व विषय निवडी मागील भूमिका मांडलेली आहे. तसेच प्रबंधासाठी उपलब्ध व उपयुक्त असलेल्या सैध्दांतिक पार्श्वभूमीसह, संदर्भ साधने, संशोधन पध्दती व प्रकरण नियोजन याचेही विश्लेषण केलेले आहे.

दुसऱ्या टप्प्यात प्रामुख्याने आगरी व कोळी समाजाचे पारंपरिक स्वरूप उध्दृत केलेले आहे. त्यात या दोन्ही समाजाची उत्पत्ती, वास्तव्य, पेहराव, मनोरंजनाची साधने, सामाजातील उपप्रकार, बोलीभाषा, जातपंचायत, व्यवसाय, संघटना, प्रमुख व्यक्ती, त्यांची वैशिष्टड्ढे इ. बाबत सविस्तर चर्चा केलेली आहे. तर तिसऱ्या टप्प्यात प्रामुख्याने आगरी आणि कोळी समाजातील साधर्म्य स्थळांबाबत चर्चा केलेली आहे.

### ❖ प्रकरण दुसरे — सैध्दांतिक मांडणी

या प्रकरणात प्रामुख्याने व प्रबंधाच्या अनुषंगाने सैध्दांतिक मांडणीवर भर देण्यात आलेला आहे. त्यानुसार जागतिकीकरण, खाजगीकरण व उदारीकरण या

तीन मुद्द्यांचा आढावा घेण्यात आलेला आहे. त्यासंबंधित व्याख्या, संकल्पना त्यांचे अर्थ, स्वरूपासह स्पष्ट करण्यात आलेले आहेत.

### ❖ प्रकरण तिसरे – आगरी समाज व जागतिकीकरण

या प्रकरणात आगरी समाजाची पूर्वीची स्थिती आणि सद्यस्थिती यांचा तौलनिक अभ्यास मांडलेला आहे. प्रामुख्याने जागतिकीकरणामुळे या समाजाच्या राजकीय, आर्थिक व सामाजिक परिस्थितीवर पडलेल्या प्रभावांचा ऊहापोह करण्यात आलेला आहे.

### ❖ प्रकरण चौथे – कोळी समाज व जागतिकीकरण

या प्रकरणात कोळी समाजाची पूर्वीची स्थिती आणि सद्यस्थिती याचा तौलनिक अभ्यास मांडलेला आहे. प्रामुख्याने जागतिकीकरणामुळे या समाजातील आर्थिक, राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक परिस्थितीवर झालेल्या परिणामांचे सविस्तर विश्लेषण यात अभ्यासले आहे.

### ❖ प्रकरण पाचवे – निष्कर्ष व शिफारशी

सदर प्रकरणात संपूर्ण प्रबंधात मांडलेल्या तथ्यांची सत्यासत्यता पडताळून त्यावरून काढण्यात आलेले निष्कर्षांची चर्चा करण्यात आली आहे. तसेच त्या अनुषंगाने काही शिफारशी व पुढील संशोधनासाठी विषयही नमूद केलेले आहे.

### परिशिष्टे

प्रबंधाच्या अखेर विविध संदर्भांची सूची देण्यात आलेली आहे. सोबत प्रातिनिधीक स्वरुपात मुलाखतदारांची व प्रश्नावली भरुन देणाऱ्यांची यादीही दिलेली आहे. या व्यतिरिक्त यात अलिबाग तालुक्यातील आगरी आणि कोळी समाजाचे आधिक्य असणाऱ्या गावांची नावे व आगरी आणि कोळी समाजाची पारंपरिक गाणी, संबंधित छायाचित्रे देण्यात आलेली आहेत.

## ❖ — ठळक निष्कर्ष —

१. आगरी व कोळी समाजावर जागतिकीकरणाचा फार मोठा प्रभाव पडलेला आहे.
२. दोन्ही समाजातील शैक्षणिक प्रगती उल्लेखनीय आहे. त्यातही स्त्री शिक्षणास विशेष प्राधान्य दिले गेले आहे.

३. जागतिकीकरणामुळे येथे औद्योगिकरण, आधुनिकीकरण व शहरीकरण वेगाने वाढले.
४. औद्योगिकीकरणामुळे सहज स्वरूपात तृतीय व चतुर्थ श्रेणीची कामे मिळत असल्याने आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत झाली मात्र शेती व मासेमारीचे प्रचंड नुकसान झाले.

५. पूर्वीच्या तुलनेत सद्यस्थितीत आर्थिक सुबत्ता चांगली झाल्यामुळे राहणीमानाचा दर्जा उंचावला आहे. शिवाय भौतिक सुधारणाचा व सुविधांचा वापर वाढला आहे.
६. पारंपरिक व्यवसायात आधुनिकीकरण व यांत्रिकीकरणाचा वापर वाढीस लागला.
७. समाजामध्ये असलेल्या पोटजाती नष्ट होऊन एकत्र वहिवाटीचे प्रमाण वाढले.
८. आंतरजातीय विवाह संबंधांना मान्यता मिळाली.
९) आरोग्यविषयक जागृती निर्माण होऊन अंधश्रद्धांचे प्रमाण कमी झाले.
१०. आरोग्यविषयक जागृती निर्माण होऊन अंधश्रद्धांचे प्रमाण कमी झाले .
११. ग्रामीण संस्कृती नष्ट होऊन समाज आत्मकेंद्री व व्यक्तीकेंद्री होऊ लागला आहे. पारंपरिक कृषी व मस्त्य संस्कृतिचा लोप होत चालला आहे.

१२. दोन्ही समाजाची मुख्य ओळख असलेला त्यांचा पेहराव व बोली भाषेत अमुलाग्र बदल घडून आलेला आहे.
१३. श्रीमंती, एकमेकांशी तुलना, वरचढपणा यासाठी चुकीच्या मार्गांचा वापर वाढला आहे.

१४. आगरी समाज बऱ्यापैकी संघटीत असल्याने त्यांच्या सामाजिक संस्था आढळतात. त्या तुलनेत कोळी समाजाच्या सामाजिक संघटना आढळत नाहीत.

१५. आगरी समाजाला खंबीर असे राजकीय व सामाजिक नेतृत्व उपलब्ध आहे त्या तुलनेत कोळी समाजाला राजकीय अथवा सामाजिक पातळीवरील सक्षम नेतृत्व आलिबाग मध्ये उपलब्ध असलेले दिसत नाही.

१६. जमीन व मासे या नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन करण्याऱ्या आगरी आणि कोळी समाजापुढे त्यांचे संरक्षण करण्याऐवजी त्यांची विक्री करणे हाच पर्याय उरल्याने त्यांची परिस्थिती वाईट झाली आहे.

१७. अनेक कारणांमुळे आगरी व कोळी या दोन्ही समाजांनी आपल्या पारंपरिक व्यवसायाकडे पाठ फिरवली आहे.

## शिफारशी

सदर संशोधनाद्वारे मिळालेल्या माहितीच्या आधारे वरील निष्कर्ष काढण्यात आले. या निष्कर्षावरून समाज, शासन व इतरांना काही सुचना देऊन काही शिफारशी करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्या पुढील प्रमाणे

१. आगरी व कोळी समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी शासनातर्फे विशेष प्रयत्न केले जावेत. हे प्रयत्न फक्त कागदोपत्री न राहता त्याची वारंवार पुनर्तपासणी व्हावी.

२. या दोन्ही समाजात शैक्षणिक प्रगती झाली असली तरी उच्च शिक्षणाच्या गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी प्रयत्न करावेत.

३. समाजिक संघटना निर्माण करून कोळी समाजास हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून दयावे.

४. आरक्षण प्रक्रियेत अडकलेल्या, जातीचे दाखले नसलेल्या कोळी समाजाच्या तत्सम समस्या सोडविण्यासाठी विशेष प्रयत्न करणे.

५. पारंपरिक शेती व मत्स्य व्यवसायाला नवसंजिवनी मिळण्यासाठी तत्सम अनुदान व सोयी उपलब्ध करून देणे.

६. औद्योगिकीकरण व पारंपरिक व्यवसाय यांचा सुवर्ण मध्य काढण्यासाठी सम पातळीवर विचार करणे.

७. जागतिक स्तरावर टिकण्यासाठी या दोन्ही समाजांना व्यावसायिक दृष्टीने प्रशिक्षित करणे अथवा तशा प्रकारचे अभ्यासक्रम उपलब्ध करून देणे.

८. सेझसारख्या प्रकल्पांसाठी येथील सुपिक अथवा पिकती खार जमीनी न वापरता त्यावर अनुषंगाने इतर प्रकल्प राबविणे.

९. कांदळवन— तिवरे— खारफुटी यांची कत्तल, मत्स्यनाश यांसारख्या समस्यांवर ठोस उपाय योजना करणे.

१०. सामाजिक ऐक्य निर्माण होण्यासाठी पुरक कार्यक्रमांची आखणी करणे.

११. पारंपरिक बोलीभाषेचा, वस्तुंचा अभ्यास करण्यासाठी प्रोत्साहन देणे.

१२. परंपरागत सण, उत्सव, रूढी, परंपरा यांमधून निर्माण होणाऱ्या संस्कृतीच्या संवर्धनासाठी प्रयत्न करणे.

## ❖ पुढील संशोधनासाठी दिशा :—

सदर संशोधन हे आगरी आणि कोळी समाजांवर जागतिकीकरणाचा पडलेला प्रभाव अभ्यासणारे आहे पण तरीही या क्षेत्रात अत्याधिक संशोधन होण्यास निश्चितच वाव आहे म्हणूनच भावी संशोधकांना पुढील मुद्द्यांतून नवी दिशा मिळू शकेल असे वाटते.

- **प्रत्येक समाजाचा स्वतंत्र अभ्यास —**

प्रस्तुत संशोधनात फक्त आगरी आणि कोळी या दोनच समाजांचा अभ्यास करण्यात आलेला आहे. जागतिकीकरणाचा प्रभाव हा प्रत्येक समाजावर वेगवेगळ्या पद्धतीने पडलेला असल्याने अशा सर्वच समाजांचा स्वतंत्ररित्या अभ्यास करणे.

- **कोळी समाजाच्या प्रत्येक उपप्रकारचा स्वतंत्र अभ्यास —**

प्रामुख्याने कोळी म्हटल्यानंतर महादेव कोळी समाजावर फार अभ्यास करण्यात आलेला आहे मात्र या व्यतिरिक्त असणाऱ्या कोळी समाजातील इतर उपप्रकारांवर सखोल अभ्यास करणे उपयुक्त ठरेल.

- **आगरी आणि कोळी समाजातील शैक्षणिक स्थितीचा अभ्यास —**

या दोन्ही समाजातील परिवर्तनामध्ये त्यांची आर्थिक व शैक्षणिक स्थिती कारणीभूत ठरलेली दिसते. त्यामुळे या दोन्ही समाजातील शैक्षणिक परिवर्तनाच्या सर्वच पैलूंचा सविस्तर अभ्यास करणे गरजेचे आहे.

- **आगरी आणि कोळी समाजाच्या संघर्षाचा अभ्यास —**

कोळी समाजाच्या तुलनेत आगरी समाजाचा संघर्षातील सहभाग अधिक आहे हे या प्रबंधात उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे लक्षात येते मात्र हे दोन्ही समाज गेली कित्येक वर्षे येथील निसर्गाशी एकरूप झालेली दिसतात. त्यामुळे निश्चितच परकीय अथवा स्वकियांशी यांचा संघर्ष झाला असणार. त्यामुळे याबाबतही प्रामुख्याने संशोधन होणे आवश्यक ठरते.

- **स्थानिक इतिहास वृद्धिंगत व्हावा —**

आगरी व कोळी हे दोन्ही समाज स्थानिक समाजात मोडत असल्याने त्यांच्या विविध घटकांचा अभ्यास सविस्तर व सखोलपणे केल्यास त्यातून स्थानिक इतिहास वृद्धिंगत होण्यास मदत होईल.

एकंदरीतच जागतिकीकरणाचा आगरी आणि कोळी अशा दोन्ही समाजावर परिणाम पडलेला दिसतो. कमी उत्पन्न भरपूर कष्ट, अस्थिर जीवन, जास्त गुंतवणुकीचे भांडवल, अत्याधुनिक तंत्रज्ञान व यांत्रिकीकरणाची माहीती नसणे, परप्रांतीयांचे त्यांच्या व्यवसायामध्ये होणारे अतिक्रमण दैनंदिन पातळीवर निर्माण होणाऱ्या समस्या या सारख्या अनेक करणांमुळे हे दोन्ही समाज आपल्या मुळच्या कृषी व मत्स्य संस्कृतीपासून लांब चालले आहेत.त्यातही आगरी आणि कोळी समाजाचा तौलनिक अभ्यास करता हे लक्षात येते की आगरी समाज हा कोळी लोकांपेक्षा अधिक प्रगतीशील असून त्यांच्यात परिवर्तन स्विकारण्याची वृत्ती अधिक आहे. तुलनेने कोळी समाज हा अधिक रूढी व परंपरावादी आहे. परंतु परिवर्तन हे त्यांनीही स्विकारले आहेच. दोन्ही समाजाला आपल्या पारंपरिक व्यवसायाला मुकावे लागून नव्या पद्धतीचे दैनंदिन जीवन स्विकारावे लागले.

थोडक्यात जागतिकीकरणाने जरी ज्ञान व विज्ञानात प्रगती झालेली असली, समाजाच्या विकासाला हातभार लागलेला असला तरी या प्रवाहात विशिष्ट समाजांची असलेली मुळ ओळख कुठेतरी हरवतांना दिसते आहे. त्यामुळे दोन्ही समाजावर जागतिकीकरणाचे अनुकूल व प्रतिकूल परिणाम झालेले दिसतात.

# प्रकरण पहिले

# प्रस्तावना

# १.प्रस्तावना

इतिहासाचा अभ्यास करताना असे लक्षात आले की इतिहास म्हणजे गतकाळात घडून गेलेल्या घटनांची साद्यंत हकीकत होय. मात्र पूर्वीच्या काळी राजे, महाराजे अथवा शासनकर्ते यांच्याशी संबंधित अभ्यास हाच इतिहासाचा गाभा ठरत होता. हळूहळू संशोधकांच्या व इतिहासतज्ञांच्या  हे लक्षात आले की देशाचा इतिहास केवळ राज्यकर्ते व शासनकर्त्यांचाच अभ्यास नसून समाजातील दुर्लक्षित, उपेक्षित घटकांच्या स्थितीगतीचाही अभ्यास असतो. त्यामुळे उत्तरोत्तर त्यादृष्टीने समाजातील वंचित घटकांचा अभ्यास करण्यास प्रारंभ झाला. या सर्व अभ्यासामुळे स्थानिक इतिहासाची व्याप्ती वाढून त्या त्या देशाचा इतिहास आणखी समृध्द होण्यास मदत झाली. भारत हा देश निसर्गसौंदर्याने जितका अलंकृत आहे तेवढाच तो विविधतेने नटलेलाही आहे. ही विविधता केवळ भौगोलिक नाही तर सांस्कृतिकही आहे. अनेक जाती, धर्म व पंथाचे लोक येथे एकत्र राहतात. त्यांच्यातील गुणवैशिष्ट्यांमुळे ते एकमेकांपेक्षा वेगळे ठरत असले तरी यातील काही समाज एकमेकांच्या सहवासात राहून बऱ्याच अंशी समान आचरण करायला लागले आहेत.

याच अनुषंगाने रायगड जिल्ह्यातील विविध समाजाच्या स्थानिक इतिहासाचा धांडोळा घेत असताना संशोधिकेच्या हे लक्षात आले की रायगड जिल्ह्यात अनेक समाजांचे वास्तव्य असतानाही त्यांच्यावर परिपूर्ण संशोधन झालेले नाही. मागील २०० ते ४०० वर्षांच्या रायगड जिल्ह्याच्या प्रभावशाली इतिहासात येथील विविध जाती, जमातींच्या लोकांचा सहभाग निश्चितच उल्लेखनीय आहे. मात्र तरीही हे समाज संशोधनाच्या दृष्टीने दुर्लक्षित असलेले दिसतात. त्यामुळे संशोधिकेने तिच्या परिसरातील म्हणजेच अलिबाग तालुक्यातील विविध समाजावर संशोधन करण्याचे निश्चित केले. त्यातही संशोधिका स्वत: आगरी व कोळी या दोन्ही समाजाचे प्रतिनिधित्व करत असल्याने प्रामुख्याने या समाजांची निवड केली.

संशोधनासाठी निवडलेला अलिबाग तालुका हा बेटाप्रमाणे असल्याने पूर्वी सर्वांपासून भौगोलिकदृष्ट्या तुटलेला असा होता. मात्र वर्ष १९५८ मध्ये धरमतर खाडीवर व वर्ष १९८६ मध्ये रेवदंडा खाडीवर पूल झाल्याने हा भाग इतर गावांशी जोडला गेला. तसेच अलिबागमध्ये स्थापन झालेल्या चुंबकीय वेधशाळेमुळे १९६१ पर्यंत येथे वीजेचा वापर सुरू करण्यात आलेला नव्हता. या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे येथे राहणारा समाज सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक दृष्ट्या अप्रगत होता. स्वातंत्र्योत्तर काळातील पहिल्या दशकातही अलिबाग येथील आजारी व्यक्तीला उत्तम उपचाराच्या सोयी उपलब्ध होत नसत. वाहतुकीसाठी अत्यल्प प्रमाणात सुविधा उपलब्ध होत्या. मात्र १९६० ते १९९०या काळात अलिबागचा झपाट्याने विकास झाला. अलिबाग हे जिल्ह्याच्या राजधानीचे ठिकाण बनले. इ.स. १९८४ मध्ये राष्ट्रीय केमिकल्स आणि फर्टिलायझर्सचा प्रकल्प थळ येथे कार्यान्वित झाला. यांसारख्या अनेक घटनांच्या माध्यमातून अलिबागचे परिवर्तन घडून येण्यास मदत झाली असली तरी याचा वेग कमी होता.

१९९० साली आंतरराष्ट्रीय दबावामुळे, जागतिक सत्तास्पर्धेत टिकून राहाण्यासाठी व अंतर्गत शासनव्यवस्थेच्या आवश्यकतेपोटी भारताने नवे आर्थिक धोरण स्वीकारले. त्यातूनच पुढे खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण म्हणजेच ‘खाउजा’ या संकल्पना मूळ धरू लागल्या. या सर्वांमागे जग एका वैश्विक खेड्यामध्ये परिवर्तित होणे हा उद्देश होता. ही संकल्पना पाश्चिमात्य देशांनी आपल्या फायद्यासाठी सर्वत्र अनिवार्य केली असल्याने त्याचा अनुकूल व प्रतिकूल असा दोन्ही प्रकारचा प्रभाव हा समाजावर पडलेला दिसतो. अगदी अलिबाग तालुक्यातील आगरी आणि कोळी समाजातील लोकही या झंझावातात अंतर्बाह्य ढवळून निघाले. या जागतिकीकरणामुळे त्यांच्यात सामाजिक व शैक्षणिक परिवर्तन तर घडलेच परंतु विशेष भूसंपादन प्रक्रियेमुळे ते आपल्या पारंपरिक व्यवसायांपासूनही दुरावले. याचा परिणाम त्यांच्या राजकीय व आर्थिक स्थितीवरही झाला.

थोडक्यात जागतिकीकरणाचे ग्रामसंस्कृतीवर झालेले आक्रमण आणि त्यामुळे अंतर्बाह्य बदललेला परंपरावादी समाज हा या संशोधनाचा मूळ गाभा ठरतो. त्यामुळे देशाच्या समृध्द इतिहासाचे ज्ञान अवगत होण्यासाठी अशा समाजांवर सातत्याने संशोधन चालू राहिले पाहिजे तेव्हाच त्यांचे अप्रकाशित अथवा मौखिक स्वरूपातील साहित्य, त्यांचे प्रश्न, समस्या व त्यांची सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक, राजकीय व शैक्षणिक अशी सर्वच परिस्थिती समजून त्यावर उपाययोजना करता येईल अथवा सुचविता येईल. एकंदरीतच २१ व्या शतकात आधुनिकीकरणाचा प्रभाव असतांनाही पारंपरिक संस्कृतीचे बदलत्या स्वरुपात संवर्धन करणाऱ्या आगरी आणि कोळी समाजांमध्ये होणाऱ्या बदलांची सर्वांगीण माहिती उपलब्ध करून देण्याचा संशोधिकेचा प्रयत्न आहे.

## अ. संशोधनाचे स्वरूप

### १. संशोधन समस्या

१९९० ते २०१० या काळात जागतिकीकरणामुळे आगरी आणि कोळी समाजावर पडलेल्या प्रभावांचा तौलनिक अभ्यास करणे.

### २. संशोधनाची उद्‌दिष्ट्ये

- १९९० ते २०१० या वीस वर्षातील अलिबाग तालुक्यातील आगरी आणि कोळी समाजाच्या सामाजिक व आर्थिक जीवनातील परिवर्तनाचा आढावा घेणे.
- या समाजांमध्ये झालेल्या बदलास जागतिकीकरण कसे कारणीभूत ठरले याचा मागोवा घेणे.
- आगरी आणि कोळी समाजाची सद्यस्थिती अभ्यासणे.
- अलिबाग तालुक्याच्या सर्वांगीण विकासातील आगरी आणि कोळी समाजाचे योगदान अधोरेखित करणे.

### ३. संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा

➢ **संशोधनाची व्याप्ती**

- सदर संशोधन हे रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील आगरी आणि कोळी समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय स्थितीचा अभ्यास करणारे आहे.
- आगरी आणि कोळी समाजावर १९९० ते २०१० या काळात जागतिकीकरणामुळे पडलेल्या प्रभावांचा अभ्यास या संशोधनात केला आहे.

➢ **संशोधनाच्या मर्यादा**

- प्रस्तुत संशोधन हे महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यापुरतेच मर्यादित आहे.
- सदर संशोधनात फक्त आगरी आणि कोळी या दोन समाजांचाच अभ्यास अपेक्षित आहे.
- या दोन्ही समाजात १९९० ते २०१० या कालावधीत जागतिकीकरणामुळे झालेल्या बदलांचाच येथे अभ्यास करण्यात आला आहे.
- आगरी आणि कोळी समाजाच्या फक्त सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक स्थितीचाच मागोवा घेतला आहे.

## ४. उपलब्ध संदर्भ साहित्य

सदर प्रबंधाच्या तथ्य संकलनासाठी उपलब्ध असलेली प्राथमिक व दुय्यम स्वरूपाची साधने अतिशय महत्त्वपूर्ण आहेत. त्यातही प्रकाशित व अप्रकाशित अशी दोन प्रकारची साधने आहेत. आगरी आणि कोळी हे दोन्ही समाज अलिबाग येथील स्थानिक समाज आहेत. मात्र यातील लोक हे अशिक्षित असल्याने त्यांच्या बाबतचे समकालीन प्रकाशित साहित्य तुलनेने अत्यंत कमी आहे. मात्र ब्रिटीशकाळात वेगवेगळ्या अधिकाऱ्यांमार्फत संकलित केलेले अहवाल व विविध गॅझेटिअरच्या माध्यमातून तत्कालीन समाजाची माहिती मिळण्यास मदत होते. त्या दृष्टीकोनातून गॅझेटिअर ऑफ दि बॉम्बे प्रेसिडेन्सी, कुलाबा एन्ड जंजिरा, गॅझेटिअर ऑफ महाराष्ट्र स्टेट, कुलाबा डिस्ट्रीक्ट, रायगड

जिल्हा गॅझेटिअर यांसारख्या गॅझेटिअर मधून आगरी व कोळी या दोन्ही समाजाची प्राथमिक माहिती मिळण्यास मदत होते. तसेच महाराष्ट्रीय ज्ञानकोश, विश्वकोश व भारतीय संस्कृतीकोशातूनही समाजाच्या विविध पैलूंबाबत माहिती मिळण्यास मदत झाली.

वरील प्राथमिक प्रकाशित साधनांबरोबरच दुय्यम प्रकाशित साधनांचा विचार केल्यास संशोधनासाठी उपयुक्त ठरलेली पुस्तके म्हणजे डॉ. प्रभाकर देव यांचे 'इतिहास शास्त्र : संशोधन अध्यापन आणि लेखनपरंपरा', डॉ. शांता कोठेकर यांचे 'इतिहास : तंत्र आणि तत्वज्ञान', डॉ. विवेक पाटकर यांचे 'संशोधन मार्गावरील प्रवास', डॉ. सुनील मायी यांचे 'सामाजिक संशोधन पध्दती' तर डॉ. बी. एम. कराडे यांचे 'शास्त्रीय संशोधन पध्दती' ही होय. या सर्व पुस्तकांच्या मदतीने सदर प्रबंधास संशोधकीय स्वरूपाची दिशा मिळण्यास मदत झाली शिवाय त्यात योग्य पध्दतीची मांडणी करून मुद्देसूदपणा आणता आला.

या सर्व साधनांव्यतीरिक्त सदर प्रबंधास अत्यंत उपयुक्त ठरलेली प्राथमिक अप्रकाशित साधने म्हणजे प्रश्नावली व मुलाखतींना मिळालेले प्रतिसाद. विविध विद्यापीठात पदवीसाठी सादर केलेले प्रबंध हे देखील दुय्यम अप्रकाशित साधन म्हणून खूप उपयुक्त ठरले. प्रस्तुत प्रबंधासाठी निवडलेले आगरी आणि कोळी हे येथील स्थानिक व संख्येने अधिक असलेले समाज आहेत. त्यामुळे त्यांच्यातील परिवर्तन जाणून घेण्यासाठी आगरी समाजाकडून आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक अशा स्वरूपात ९७२ तर कोळी समाजाच्या ४२८ अशा एकूण १४०० प्रश्नावल्या भरून घेतल्या. तसेच आगरी समाजातील २०० व कोळी समाजातील १०० अशा एकूण ३०० लोकांच्या मुलाखती घेतल्या. याशिवाय ज्या प्रबंधांमुळे सदर संशोधनास दिशा मिळाली ते पुढील प्रमाणे सांगता येतील.

डॉ. काळे डी. एन. यांच्या 'आगरीज — सोशिओ इकॉनॉमिक सर्वे' या १९५० मध्ये मुंबई विद्यापीठास सादर केलेल्या प्रबंधातून तत्कालीन आगरी

समाजाची आर्थिक व सामाजिक माहिती मिळण्यास मदत झाली. मात्र यातील माहिती तत्कालापुरतीच मर्यादित आहे. तर डॉ. ठाकूर सई यांच्या 'दि आगरीज ऑफ नॉर्थ वेस्ट महाराष्ट्र – ॲन इथनोग्राफिक स्टडी' या २००७ मध्ये मुंबई विद्यापीठात सादर केलेल्या पीएच. डी. प्रबंधात प्रामुख्याने उरण तालुक्यातील आगरी समाजाचा विचार केलेला दिसतो डॉ. बांगर अनिल यांनी 'रायगड जिल्ह्यातील आगरी समाजाच्या लोकसाहित्याचा वाङ्मयीन व भाषिक अभ्यास' या मराठवाडा विद्यापीठात २०१० मध्ये सादर केलेल्या पीएच. डी प्रबंधात व डॉ. अष्टपुत्रे पुर्वा यांनी 'आगरी बोलीचा भाषा वैज्ञानिक अभ्यास' या मुंबई विद्यापीठात सादर केलेल्या पीएच. डी. प्रबंधात अनुक्रमे आगरी समाजाच्या लोकसाहित्याचा व आगरी बोलीभाषेचा अभ्यास केलेला आहे तर डॉ. भैरगुंडे श्रीशैल यांनी 'आदिवासी (कोळी) लोकसाहित्यातील स्त्री पुरूष चित्रण' या २००६ मध्ये मराठवाडा विद्यापीठात सादर केलेल्या पीएच. डी. प्रबंधात व डॉ. महाडीक उज्ज्वला यांनी 'कोळी बोलीचा अभ्यास' या मुंबई विद्यापीठात सादर केलेल्या पीएच. डी. प्रबंधात अनुक्रमे कोळी समाजाच्या लोकसाहित्याचा व कोळी भाषेचा अभ्यास केलेला आहे. या सर्व प्रबंधांच्या माध्यमातून आगरी आणि कोळी समाजाच्या विविध पैलूंचा वेगवेगळ्या दृष्टीकोनातून मराठी, समाजशास्त्र व वाणिज्य विभागाद्वारे अभ्यास करण्यात आलेला आढळतो. दुय्यम अप्रकाशित साधने म्हणून त्यांची या अभ्यासाला मदत झाली आहे.

वरील सर्व प्रबंधातून महत्त्वपूर्ण माहिती उपलब्ध होत असली तरी प्रत्येक प्रबंधात आगरी आणि कोळी यापैकी कोणत्यातरी एकाच समाजाच्या एकाच घटकाचा अभ्यास प्रामुख्याने करण्यात आलेला आहे. मात्र सदर संशोधन हे या सर्वांहून भिन्न आहे. प्रस्तुत प्रबंधात आगरी आणि कोळी या दोन्ही समाजाच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक पैलूंचा अभ्यास ऐतिहासिक दृष्टीने करण्यात आलेला आहे. त्यांच्यातील परिवर्तन व जागतिकीकरण यांचा सहसंबंध तपासून दोन्ही समाजाचा तौलनिक अभ्यास यात सविस्तरपणे मांडण्यात आलेला आहे.

## ५. गृहीतके (Assumptions)

१. आगरी आणि कोळी हे दोन्ही समाज सामान्यपणे ग्रामीण भागात राहणारे आहेत.

२. आगरी समाजाचा प्रमुख व्यवसाय शेती तर कोळी समाजाचा मासेमारी हा आहे.

३. स्वातंत्र्यपूर्व काळापासून हे दोन्ही समाज मागास व इतर मागासवर्गीय म्हणून गणले जातात.

४. आगरी आणि कोळी समाज हा अलिबाग तालुक्यातील स्थानिक समाज आहे.

५. आगरी आणि कोळी समाजातील व्यवसाय, नृत्य, गायन, धर्मसंस्कार, लग्नपध्दती, मनोरंजन, बोलीभाषा यांसारख्या गोष्टींमध्ये साम्य आढळते.

६. गेल्या २० वर्षांच्या कालावधीत आगरी व कोळी समाजावर जागतिकीकरणाचा प्रभाव पडलेला आहे.

७. जागतिकीकरणामुळे आगरी आणि कोळी समाजाचा आर्थिक स्तर उंचावलेला आहे.

८. प्रश्नावली व मुलाखतींतून प्राप्त झालेली उत्तरे सत्य असल्यामुळे ग्राह्य आहेत.

## ६. संशोधनाच्या परिकल्पना (Hypotheses)

सदर संशोधनाद्वारे पुढील परिकल्पना यथातथ्य ठरतात किंवा नाही हे तपासले जाईल.

१. जागतिकीकरणामुळे आगरी व कोळी या दोन्ही समाजात परिवर्तन घडून आले.

२. आगरी समाजात शिक्षणाचा विकास मोठया प्रमाणात झाल्याने त्यांच्यात सर्वांगीण बदल झाले.

३. कोळी समाजात त्या तुलनेत शैक्षणिक विकास झाला नाही. मात्र आर्थिकदृष्ट्या हा समाज समर्थ बनला.

४. कोळी समाज आगरी समाजातील लोकांचे अनुकरण करताना दिसतो.
५. दोन्ही समाजातील पारंपरिक व्यवसायात मूलभूत बदल झाले.
६. प्रामुख्याने कोळी समाजाला जागतिकीकरणामुळे अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

## ७. ऐतिहासिक संशोधन पध्दती

भूतकाळात सामाजिक शक्ती व प्रभावांनी रूपांतरण घडवीत वर्तमानाला जो आकृतिबंध दिला त्यास कारणीभूत ठरलेल्या नियमांचा शोध घेण्यासाठी ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा उपयोग केला जातो. यानुसार आगरी आणि कोळी समाजाच्या भूतकाळातील व वर्तमान काळातील स्थितिगतीचा अभ्यास करण्याच्या हेतूने येथे ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे. त्यानुसार सर्वप्रथम संशोधनाच्या विषयाची म्हणजेच समस्येची निश्चिती करुन घेतली. या समस्यासूत्रणानंतर विषयानुरुप परिकल्पना मांडल्या. परिकल्पनेनंतर संशोधनाचा आराखडा तयार करुन कामाचे नियोजन केले. त्यानंतर विषयाच्या आवश्यकतेनुसार माहितीचे संकलन करण्यासाठी वेगवेगळ्या तंत्रांचा वापर केला. मग संकलित झालेल्या तथ्यांची पडताळणी करुन तिचे वर्गीकरण व विश्लेषण केले. नंतर या विश्लेषित माहितीचा अन्वयार्थ काढून त्यातून सिध्दांत मांडला. या सिध्दांताला केंद्रीभूत मानून मग या प्रबंधाचे लेखन केले. एकंदरीत या सर्व प्रक्रियांच्या अभ्यासातूनच पुढील काम पूर्ण करु शकले.

प्रस्तुत अध्ययनासाठी पुढील तंत्राचा वापर केला गेला आहे.

### ७.१ सर्वेक्षण :—

इ. एस. बोगार्डस् यांनी केलेल्या व्याख्येनुसार, लोकांची कामाची व जीवन जगण्याची स्थिती या विषयी म्हणजेच एखाद्या सामाजिक लोकांविषयी मिळविलेली माहिती म्हणजेच सामाजिक सर्वेक्षण होय.[१] प्रस्तुत संशोधन हे आगरी व कोळी समाजाच्या १९९० ते २०१२ या गेल्या २० वर्षातील बदलत्या परिस्थितीवर आधारित आहे. या समाजांच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक स्थितींच्या विविध पैलूंचे मूल्यमापन याद्वारे अभ्यासले जाणार आहे.

त्यामुळे येथे सर्वेक्षणाचा वापर तथ्य संकलनासाठी केलेला आहे. त्यानुसार अलिबाग तालुक्यातील २५ गावांमधील आगरी आणि कोळी या दोन्ही समाजातील लोकांचे निरीक्षण केले. प्रत्यक्ष गावात जाऊन लोकांच्या भेटी घेतल्या. गावांची पाहणी केली. त्यांचे समाज जीवन, रुढी, चालीरीती, परंपरा, सण, उत्सव, अथार्जनाचे व्यवसाय, गाणी, नृत्य इ. बाबत स्वतः माहिती मिळवली. त्यांच्याशी संवाद साधून त्यांची बोलीभाषा, त्यातील उच्चार, यांचीही माहिती करून घेतली. शिवाय त्यांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेली स्थळे, मंदिरे, खाडीलगतचा भूभाग, शेत व होडी येथेही प्रत्यक्ष जाऊन सर्वेक्षण केले.

### ७.२ निरीक्षण :—

सेल्टीज जहोडा, ड्वॉईश व कुक यांनी लिहिले आहे की, निरीक्षण ही आपल्या जीवनातील केवळ एक महत्त्वाची व्यापक क्रियाच नाही तर ती एक वैज्ञानिक चौकशीचे प्राथमिक साधन आहे. व्यक्ती किंवा व्यक्ती समूहाला प्रत्यक्ष पाहून त्यांच्या वर्तनाचे विश्लेषण व नोंदी करण्याची व्यवस्थित पध्दती म्हणजे निरीक्षण होय. निरीक्षण या साधनाचा वापर एखादी कृती कशी घडत जाते याची नोंद करण्यासाठी होतो.[२] या अनुषंगाने सदर प्रबंधासाठी संशोधिकेने दोन्ही समाजातील विविध सण, उत्सव, यात्रा, पाचवी, लग्न, हळद, साखरपुडा, वरात अशा अनेकविध कार्यक्रमांना उपस्थिती दर्शविली. या स्वनिरीक्षण व स्वानुभवातून मिळालेल्या माहितीचा प्रबंध लेखनासाठी खूप उपयोग झाला.

### ७.३ व्यष्टी अध्ययन :—

"सामाजिक एककाच्या किंवा घटकाच्या जीवनाचे अन्वेषण व विश्लेषण करण्याच्या पध्दती म्हणजे विशिष्टाभ्यास होय. हा एकक किंवा घटक म्हणजे एखादी व्यक्तीही असू शकतो." — पी. व्ही. यंग [३]

व्यष्टी अध्ययनात एका व्यक्तीचे तिच्या कुटुंब, जात, गावकरी, समव्यावसायिक यांच्याशी असलेले सहसंबंध अभ्यासले जातात. आगरी आणि कोळी समाजातील बदल नोंदवतांना या समाजातील विशिष्ट व्यक्तींच्या आयुष्यांच्या नोंदींची मदत झाली. उदा. आगरी समाजातील हरिभाऊ पाटील,

मुरलीधर म्हात्रे, शंकर सखाराम, दिनेश पाटील, मालती पाटील तर कोळी समाजातील विजय आवास्कर, रंजिता वरसोलकर, भगत बाबा, किस्नी कोळीण इत्यादी.

### ७.४ नमुना निवड :—

अलिबाग तालुक्यातील आगरी व कोळी समाजातील सर्व लोकांचे सर्वेक्षण करणे व्यावहारिक दृष्टद्वञौ कठीण असल्याने सदर प्रबंधात नमुना निवड पध्दतीचा वापर कलेला आहे. आगरी व कोळी समाजाच्या वास्तव्याच्या दृष्टीने उपलब्ध गावांचा विचार करून नमुना निवडलेला आहे. त्यातही यादृच्छिक (Random) पध्दतीने २५ गावांची निवड केलेली आहे. अलिबाग तालुक्यात एकूण २१६ गावांचा समावेश होतो. त्या गावांच्या एकूण ६५ ग्रामपंचायती आहेत. २०११ च्या जनगणनेनुसार अलिबाग तालुक्याची एकूण लोकसंख्या २,१०,३३१ आहे.[४] १९३१ नंतर महाराष्ट्र शासनातर्फे जातीनिहाय जनगणना न झाल्याने आगरी व कोळी लोकांची अलिबाग तालुक्यातील सध्याची अचूक लोकसंख्या सांगणे अवघड आहे. मात्र नमुना निवडीतील गावांच्या एकूण संख्येतील त्यांची लोकसंख्या तेथील ग्रामसेवकांच्या मदतीने अंदाजित स्वरूपात समजली. त्यावरुन परिशिष्टामध्ये आगरी व कोळी समाजाचे आधिक्य असणाऱ्या गावांबाबतची यादी देण्यात आलेली आहे. त्यानुसार अधिकाधिक आगरी व कोळी लोकांपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने २५ गावांची यादृच्छिक नमुना निवड केली आहे.

### ७.५ प्रश्नावली :—

विल्सन गी यांनी केलेल्या व्याख्येनुसार, विस्तृत क्षेत्रात पसरलेल्या लहान समुहाकडून किंवा मोठ्या संख्येत लोकांकडून सीमित मात्रेत प्राथमिक तथ्य संकलित करण्याची एक सुविधाजनक प्रणाली म्हणजे प्रश्नावली होय.[५] सदर प्रबंधाच्या तथ्यसंकलनासाठी निवडलेल्या गावांमधील आगरी व कोळी समाजातील सर्व लोकांकडून सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक बदलांसंबंधी माहिती देणाऱ्या प्रश्नावली भरुन घेऊन प्राथमिक माहिती गोळा केलेली आहे.

त्यानुसार नमुना निवड केलेल्या गावातून आगरी लोकांकडून सामाजिक प्रश्नावली ३८०, आर्थिक प्रश्नावली ३८० व शैक्षणिक प्रश्नावली २१२ अशा एकूण ९७२ प्रश्नावली तर कोळी लोकांकडून सामाजिक प्रश्नावली १५७, आर्थिक प्रश्नावली १३०, व शैक्षणिक प्रश्नावली १४१ अशा एकूण ४२८ प्रश्नावली भरुन घेतल्या.

## ७.६ मुलाखत :–

एकूण १४०० प्रश्नावलींच्या माहितीतून प्राथमिक स्वरूपाची अप्रकाशित माहिती उपलब्ध झाली असली तरी ह्या प्रश्नावलींचे स्वरूप बंदिस्त असल्याने काही महत्त्वाच्या माहितीच्या उपलब्धतेसाठी मुलाखत पध्दतीचा अवलंब करावा लागला. त्यासाठी प्रत्यक्ष मुलाखत व फोनवरून घेतलेली मुलाखत अशा दोन्हींचा वापर केला. प्रश्नावलींच्या उत्तराचे स्वरूप होय किंवा नाही असे असल्याने अधिक माहितीसाठी तसेच या समाजातील लोकांचे विचार, भावना व अनुभव कळण्यासाठी मुलाखतींचा उपयोग झाला. यात शिक्षित, अशिक्षित, गरीब, श्रीमंत, नोकरदार, व्यावसायिक व घरी असणारे, मजुरी करणारे अशा वेगवेगळ्या स्तरातील व वयोगटातील लोकांच्या मुलाखती घेण्यात आल्या. यात पूर्वनियोजित क्षेत्रावर जाऊन आगरी समाजातील २०० व कोळी समाजातील १०० लोकांच्या अशा एकूण ३०० मुलाखती घेतल्या.

## ७.७ सांख्यिकी विश्लेषण :–

तथ्य संकलनाच्या आधारे सांख्यिकीय विश्लेषण करण्याचा प्रयत्न या प्रबंधात करण्यात आलेला आहे. यासाठी MS Excel चा वापर करण्यात आला. यामुळे मुलाखती व प्रश्नावलींच्या आधारे मिळालेल्या माहितीचे सांख्यिकीय वर्गीकरण करण्यास मदत झाली. त्याआधारे विविध प्रश्नांसाठी आपला होकार व नकार सांगणाऱ्या उत्तरकर्त्यांचे वर्गीकरण करून त्यांची टक्केवारी काढली गेली. त्यानंतर त्यांचे कोष्टक बनवून त्याच माहितीच्या आधारे आलेख काढण्यात आले. या सर्वांमुळे अपेक्षित माहितीचे विश्लेषण करणे सोपे झाले.

तसेच शिकागो स्टाइल मॅन्युअल, युनिव्हर्सिटी ऑफ शिकागो २००३ यानुसार टीपा व संदर्भसूची लिहिण्यात आलेली आहे.

## ८. संशोधनाचे महत्त्व

जागतिकीकरण ही प्रक्रिया वरवर पाहता आर्थिक स्वरूपाची असली तरीही तिच्यामुळे आपापली स्थानिक व प्रादेशिक वैशिष्ट्ये राखून असणाऱ्या छोट्या छोट्या समुदायांवर सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातही मूलभूत स्वरुपाचे प्रभाव पडतात. पूर्वापार मासेमारी किंवा मीठ उत्पादन करण्याच्या व्यवसायात असणाऱ्या कोळी व आगरी समाजाच्या उत्पादनाची पध्दत, बाजारपेठ व गरजा जागतिकीकरणामुळे पूर्णत: बदलल्या. यातून या दोन्ही समाजांवर अनेक परिणाम झाले. या प्रक्रियेतून केवळ या दोनच जातींत बदल घडले असे नाही. ब्राझील असो चीन असो वा आफ्रिकेतील लोक असोत पारंपरिक व्यवसायात मूलगामी बदल झाले की त्याचे परिणाम सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात घडतातच. जागतिकीकरणामुळे पारंपरिक व्यवसायांना मोठी बाजारपेठ मिळाली का? पारंपरिक तंत्रे कालबाह्य होऊन नष्ट झाली की ती उलट अधिक दुर्मिळ झाल्याने मूल्यवान झाली? यातून आर्थिक उध्द्वस्तीकरण झाले की सबलीकरणाची प्रक्रिया वेग घेते आहे? अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा व सोडवण्याचा प्रयत्न आगरी व कोळी समाजाचा प्रातिनिधिक स्वरूपात अभ्यास करून या प्रबंधाद्वारे केला आहे. त्यांची उत्तरे या समाजाच्या अभ्यासातून मिळाली तरी ती पारंपरिक उद्योग करणाऱ्या इतर समाजांचे प्रतिनिधी म्हणून अभ्यासनीय ठरतात.

प्रस्तुत प्रबंध हा रायगड जिल्ह्यामधील अलिबाग तालुक्यातील आगरी आणि कोळी या दोन समाजावर आधारित आहे. आगरी आणि कोळी हे दोन्ही समाज अलिबागमध्ये मोठ्या संख्येने वास्तव्य करतांना दिसतात. त्यामुळे आगरी आणि कोळी या दोन्ही समाजात होणाऱ्या परिवर्तनाचा अलिबागच्या इतिहासावर निश्चितच प्रभाव पडताना दिसतो. या प्रबंधाच्या माध्यमाने अलिबागच्या इतिहासाची स्थानिक पातळीवर माहिती मिळण्यास मदत होईल. तसेच आगरी

आणि कोळी हे दोन्ही समाज शेती व मासेमारी या दोन व्यवसांयाशी निगडीत असल्याने दोन्ही पारंपरिक व्यवसायांचीही माहिती उपलब्ध होईल. सदर संशोधनामुळे आगरी आणि कोळी हे दोन्ही समाज त्यांच्या गुणवैशिष्ट्यांसह कळण्यास मदत होईल. शिवाय या समाजातील लोकांची सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व शैक्षणिक स्थिती तपासून घेता येईल.

सद्य:स्थितीत जागतिकीकरणाचा प्रभाव समाजाच्या प्रत्येक घटकावर निश्चितच पडलेला आहे. आगरी आणि कोळी समाजावर या जागतिकीकरणाचा नेमका काय परिणाम झालेला आहे याचीही माहिती उपलब्ध संशोधनातून होईल. या समाजातील लोकांची बदलती मानसिक स्थिती, विचारसरणी या सर्व बाबींचा तुलनात्मक अभ्यास आपणास या संशोधनाच्या माध्यमातून प्राप्त होईल. तसेच सदर संशोधनाच्या अभ्यासातून जागतिकीकरणामुळे आगरी आणि कोळी समाजात निर्माण झालेल्या समस्या लक्षात येऊन त्यावर उपाययोजना सांगता येतील. या दोन्ही समाजात झालेल्या अनुकूल अथवा प्रतिकूल बदलांप्रमाणेच इतर समाजावर अथवा घटकांवर झालेल्या जागतिकीकरणाचा परिणाम अभ्यासण्यास संशोधनासाठी प्रेरणा मिळेल. भारतातील आगरी आणि कोळी या जातींप्रमाणेच अन्य जाती जमातींवर सखोल संशोधन करणे आत्यंतिक आवश्यक आहे हे संशोधकांच्या लक्षात येईल व भारतातील आगरी आणि कोळी या जातींप्रमाणेच अन्य जाती जमातींवर सखोल संशोधन करण्यासाठी प्रेरणा मिळेल. प्रादेशिक व स्थानिक इतिहासाच्या संशोधनामुळे समाजातील विविध घटकांचा नव्याने अभ्यास होण्यास मदत होईल.

## ०९. प्रकरण नियोजन

सदर प्रबंधात प्रकरणांची विभागणी पुढील प्रमाणे करण्यात आलेली आहे.

### ❖ प्रकरण पहिले — प्रस्तावना

या प्रकरणात संशोधनाचे स्वरूप स्पष्ट केलेले आहे. त्यात संशोधनाची उद्दिष्टे, गृहीतके, महत्त्व व विषय निवडी मागील भूमिका मांडलेली आहे.

तसेच प्रबंधासाठी उपलब्ध व उपयुक्त असलेल्या सैध्दांतिक पार्श्वभूमीसह, संदर्भ साधने, संशोधन पध्दती व प्रकरण नियोजन याचेही विश्लेषण केलेले आहे.

दुसऱ्या टप्प्यात प्रामुख्याने आगरी व कोळी समाजाचे पारंपरिक स्वरूप उध्दृत केलेले आहे. त्यात या दोन्ही समाजाची उत्पत्ती, वास्तव्य, पेहराव, मनोरंजनाची साधने, सामाजातील उपप्रकार, बोलीभाषा, जातपंचायत, व्यवसाय, संघटना, प्रमुख व्यक्ती, त्यांची वैशिष्टङ्घ्ने इ. बाबत सविस्तर चर्चा केलेली आहे. तर तिसऱ्या टप्प्यात प्रामुख्याने आगरी आणि कोळी समाजातील साधर्म्य स्थळांबाबत चर्चा केलेली आहे.

## ❖ प्रकरण दुसरे — सैध्दांतिक मांडणी

या प्रकरणात प्रामुख्याने व प्रबंधाच्या अनुषंगाने सैध्दांतिक मांडणीवर भर देण्यात आलेला आहे. त्यानुसार जागतिकीकरण, खाजगीकरण व उदारीकरण या तीन मुद्द्यांचा आढावा घेण्यात आलेला आहे. त्यासंबंधित व्याख्या, संकल्पना त्यांचे अर्थ, स्वरूपासह स्पष्ट करण्यात आलेले आहेत.

## ❖ प्रकरण तिसरे — आगरी समाज व जागतिकीकरण

या प्रकरणात आगरी समाजाची पूर्वीची स्थिती आणि सद्यस्थिती यांचा तौलनिक अभ्यास मांडलेला आहे. प्रामुख्याने जागतिकीकरणामुळे या समाजाच्या राजकीय, आर्थिक व सामाजिक परिस्थितीवर पडलेल्या प्रभावांचा ऊहापोह करण्यात आलेला आहे.

## ❖ प्रकरण चौथे — कोळी समाज व जागतिकीकरण

या प्रकरणात कोळी समाजाची पूर्वीची स्थिती आणि सद्यस्थिती याचा तौलनिक अभ्यास मांडलेला आहे. प्रामुख्याने जागतिकीकरणामुळे या समाजातील आर्थिक, राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक परिस्थितीवर झालेल्या परिणामांचे सविस्तर विश्लेषण यात अभ्यासले आहे.

## ❖ प्रकरण पाचवे — निष्कर्ष व शिफारशी

सदर प्रकरणात संपूर्ण प्रबंधात मांडलेल्या तथ्यांची सत्यासत्यता पडताळून त्यावरून काढण्यात आलेले निष्कर्षांची चर्चा करण्यात आली आहे. तसेच त्या अनुषंगाने काही शिफारशी व पुढील संशोधनासाठी विषयही नमूद केलेले आहे.

## परिशिष्टे

प्रबंधाच्या अखेर विविध संदर्भांची सूची देण्यात आलेली आहे. सोबत प्रातिनिधीक स्वरुपात मुलाखतदारांची व प्रश्नावली भरुन देणाऱ्यांची यादीही दिलेली आहे. या व्यतिरिक्त यात अलिबाग तालुक्यातील आगरी आणि कोळी समाजाचे आधिक्य असणाऱ्या गावांची नावे व आगरी आणि कोळी समाजाची पारंपरिक गाणी, संबंधित छायाचित्रे देण्यात आलेली आहेत.

## ब. आगरी आणि कोळी समाजाचे पारंपरिक स्वरूप

### १. प्रास्ताविक :—

भारतीय समाज हा जगातील एक प्राचीन समाज आहे. भारतीय समाज प्राचीन असला तरीही काळानुसार त्यात बदल झालेले दिसून येतात म्हणून भारतीय समाज व संस्कृती उत्क्रांतिशील आहे असे म्हणता येते. भारतीय समाजातील विविधता वंश, जाती—जमाती, भाषा व प्रदेश या अंगांनी प्रतिबिंबित झाली आहे. याशिवाय भारतामध्ये लोककला, पोशाख, चालीरिती, आहार इत्यादी बाबतीतही प्रादेशिक विविधता असल्याचे दिसून येते.

सदर प्रबंधात आगरी व कोळी समाजातील लोकांचा अभ्यास करण्यात आलेला आहे. त्यामुळे सर्वप्रथम समाज व जात या संकल्पना जाणून घेणे आवश्यक ठरते. त्यानंतर आगरी व कोळी समाजाचे पारंपरिक रूप विश्लेषित केलेले आहे.

➢ **समाज:—**

- **मॉरिस गिन्सबर्ग**

‘‘नातेसंबंधाने अथवा वागणुकीच्या पध्दतीने बांधलेल्या व्यक्तींचा समूह म्हणजे समाज होय.’’[६]

- **मॅक आयव्हर आणि पेज**

‘‘समाज म्हणजे सामाजिक संबंधाचे जाळेच होय.’’ [७]

- **राइट**

‘‘समाज म्हणजे काही व्यक्तींचा समूह नव्हे, तर त्या समूहातील व्यक्तींमध्ये जे परस्पर संबंध असतात त्यांची विशेष पध्दती म्हणजे समाज होय.’’ [८]

- **गिलीन**

‘‘सारख्या अभिरूचीचे एकाच भूभागात वास्तव्य करणारे, सारख्या जीवन पध्दतीचा स्वीकार करणारे आणि एकत्वाची भावना असणाऱ्या व्यक्ती एकत्र येऊन बराच काळ सहजीवन घालवू लागले व आपल्या वैशिष्ट्यांमुळे इतरांपासून अलग ओळखण्यात येऊ लागले म्हणजे त्या व्यक्तींच्या समूहास समाज असे म्हणतात.’’ [९]

मानव सामुहिक जीवन जगतो याचा अर्थ तो इतरांशी सामाजिक संबंध प्रस्थापित करतो. दोन व्यक्ती, व्यक्ती समूह, समूह—समूह यांच्यात प्रत्यक्ष—अप्रत्यक्ष स्वरूपात संबंध निर्माण होत असतात. अशा सामाजिक संबंधात परस्परांवर कोणता ना कोणता तरी परिणाम करण्याची अन्योन्य क्रिया घडत असते. परस्परांवर परिणाम करण्याची आंतरक्रिया त्यांच्यात चालूच असते. अर्थातच सामाजिक संबांधातील आंतरक्रिया एकाच प्रकारच्या असत नाहीत. प्रेम, द्वेष, सुख — दुःख, सहकार — संघर्ष, मदत — विरोध, जवळीक — दुरावा अशा अनेक भावनांचा अविष्कार त्यात दिसून येतो. अशा सामाजिक संबंधाची एक निश्चित व्यवस्था, एक जाळेच तयार झालेले असते त्यालाच आपण समाज म्हणतो. समाजशास्त्रात अभ्यास विषय म्हणून केंद्रिभूत असणारा समाज हा एक मानवी समूह असून त्याला विशिष्ट संस्कृतीचा वारसा लाभलेला

असतो. संस्कृती म्हणजे संस्कारांचा आकृतिबंध. संस्कृती हा शब्द 'सं' आणि 'कृ' या दोन अक्षरापासून तयार झालेला आहे. 'सं' म्हणजे सम्यक अथवा चांगले आणि 'कृ' म्हणजे करणे असा अर्थ होतो. यावरून संस्कृती म्हणजे चांगले करणे अथवा चांगली कृती करणे असा त्याचा अर्थ होतो.[१०] संस्कृती हा शब्द इंग्रजीतील Culture या शब्दासाठी वापरण्यात येतो. काही तज्ञांनी संस्कृतीच्या पुढीलप्रमाणे व्याख्या केलेल्या आहेत.

- **मॉरिस**

"ज्या वैशिष्ट्यपूर्ण मार्गांनी व्यक्तीच्या मूळ गरजा गरजांचे समाजात समाधान करण्यात येते त्यात त्या समाजाची संस्कृती असते असे म्हणता येते"[११]

- **एडवर्ड टायलर**

"व्यक्तीने समाजाचा एक घटक म्हणून प्राप्त केलेले ज्ञान, विश्वास, कला, नैतिकता, कायदा, रीतिरिवाज आणि इतर क्षमता व सवयी यांचे गुंतागुंतीचे सर्व समावेशकत्व म्हणजे संस्कृती होय."[१२]

वरील सर्व व्याख्यांवरून संस्कृती ही संकल्पना व्यापक व सर्वसमावेशक असल्याची दिसून येते तसेच ही निरंतर चालणारी प्रक्रिया असून त्यातूनच समाज समृध्द होत जातो.

या संस्कृतीप्राप्त समाजातच पुढे जात, जमात, वर्ग अशी विभागणी झाली. यापैकी जात या शब्दाचा विचार करता ' जन' या धातू पासून 'जात' हा मराठी शब्द बनला आहे. जन या धातूचा अर्थ 'जन्म'असा होतो. एक प्रकारे जन्माने प्राप्त होणारा समूह म्हणजे जात होय. हे समूह म्हणजेच भारतीय भाषांमध्ये जाती आणि मानववंशशास्त्रामध्ये कास्ट म्हणून ओळखले जातात.[१३] जातीला इंग्रजीमध्ये Caste असे म्हणतात. Caste या पोर्तुगीज शब्दाची उत्पत्ती Caste या लॅटीन शब्दापासून झाली. Caste या शब्दाचा अर्थ वंशाची शुध्दता असा आहे. Caste हा शब्द पोर्तुगीजांनी वंशशुध्दतेला उद्देशून १५६७ मध्ये

गोवा मंडळाच्या हूकूमनाम्यात प्रथम वापरला पण जात हे वंशशुध्दतेचे निदर्शक नाही तसेच जातीचा व वांशिक समुहाचा कोणताच संबंध यात असू शकत नाही. विविध तज्ञांनी जातीच्या केलेल्या व्याख्या पुढील प्रमाणे —

- **सर हर्बट रिस्ले**

''एकच सामान्य नाव धारण केलेल्या, विवक्षित मानवी अगर दैवी अशा काल्पनिक मूळ पूर्वजापासून आपल्या संतान परंपरेला सुरूवात होते असे मानणाऱ्या, पिढीजात व्यवसाय करणाऱ्या व जे आपले मत व्यक्त करण्यास समर्थ आहेत अशा लोकांकडून तो एक एकजिनसी समुदाय आहे अशी मान्यता पावलेल्या कुटुंबाचा समुच्चय म्हणजे जात होय.'' [१४]

- **डॉ. केतकर**

यांनी आपल्या 'History of Caste in India' या ग्रंथात जातीची व्याख्या केली आहे.[१५] ते म्हणतात, जात या सामाजिक समूहाची दोन वैशिष्ट्ये आहेत.

१. विशिष्ट जातीतील सभासदांच्या पोटी जन्मास आलेल्यांनाच त्या जातीचे सदस्यत्व प्राप्त होते. असा प्रकारे जन्मलेल्या सर्वांचा समावेश त्या जातीत केला जातो.

२. आपल्या सदस्यांना आपल्या जातीबाहेरील व्यक्तींशी लग्न करण्यास कडक सामाजिक नियमाद्वारे प्रतिबंध असतो.

- **डॉ. बी. आर. आंबेडकर**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी जाती व्यवस्थेचे अध्ययन करून ९ मे १९१६ रोजी Caste in India- It's Mechanism Genesis and Develpement या विषयावरील आपला संशोधन पेपर मानववंशशास्त्र परिषदेत सादर केला. त्यानुसार दिलेली मूळ व्याख्या—

''बहिर्गत विवाह बंधनावर अंतर्गत विवाह बंधनाचे वर्चस्व प्रस्थापित होणे म्हणजे जात होय. जात हा एक बंद वर्ग होय.'' [१६]

ह्या अनुषंगाने अलिबाग तालुक्यातील जाती ह्या विशिष्ट परंपरागत व्यवसायाशी निगडीत होत्या मात्र प्रत्येक जातीतील काही वैशिष्ट्यांमुळे त्या

भिन्न असल्याचे लक्षात येते. या सर्वांचा विचार करता अलिबागमध्ये ब्राह्मण, आगरी, कोळी, माळी, कुणबी, मराठा, पारसी, बेने इस्त्राइली, मारवाडी यांसारखे विविध समाज वास्तव्य करताना दिसतात. त्यात आगरी समाजाच्या लोकांची संख्या सर्वाधिक असल्याचे दिसते. त्यानुसार प्रबंधाच्या अनुषंगाने आगरी व कोळी या दोन्ही समाजाचे पारंपरिक स्वरूप लक्षात घेणे क्रमप्राप्त ठरते.

## २. आगरी समाजाची ओळख :—

आगर म्हणजे नारळी, पोफळी, भात, भाजीपाला, फुले अथवा मीठ पिकविण्याची जागा होय. यावरूनच आगर पिकविणारा तो आगरी असा अर्थ रूढ झाला.[१७] मिठागरे व शेती हे या समाजाचे उदरनिर्वाहाचे साधन. वि.का. राजवाडे संपादित 'महिकावतीची बखर' या ग्रंथातील संदर्भानुसार शके १०६० ते १०६३ असा त्यांचा कालखंड ठरतो.[१८] याबाबत संशोधकांमध्ये मतभिन्नता आढळते. मात्र अलिबाग तालुक्यातील नागाव येथील भीमेश्वराच्या मंदिराच्या पायरीवरील शिलालेखातील १२ व्या ओळीतील आगरी लोक, आगरी समाज या स्पष्ट शब्दोल्लेखावरून हा समाज किमान शके १२८९ म्हणजेच १३६७ – १३६८ या कालखंडापूर्वीपासून येथे वास्तव्य करत असल्याचे दिसते.[१९] शेती, मिठागरे व नारळी पोफळीच्या बागा पिकवणे यामध्ये आगरी समाज अग्रेसर आहे.[२०] या व्यतिरिक्त आगरी शब्द एका वेगळ्या अर्थानेही घेतला जातो. आकर म्हणजे खाण. खाणीत काम करणारे म्हणजे आगरी. पाथरवट जमात ही खाणीत काम करणारी म्हणून स्वत:ला आगळे आगरी असे म्हणवून घेतात. नाशिकचे काळाराम मंदिर, त्र्यंबकेश्वरचे कुशावर्ताजवळील देवीचे मंदिर, घारापुरी व वेरूळ येथील लेणींचे बांधकाम आगरी पाथरवटांनी केलेले आहे. [२१]

## ३. आगरी समाजाचे वास्तव्य :—

आगरी जातीचा समाज प्रामुख्याने उत्तर कोकणात ठाणे जिल्ह्याच्या पालघर तालुक्यापासून रायगड जिल्ह्याच्या म्हसळा – श्रीवर्धन खाडीपर्यंत साधारणत: खारजमिनीवर व त्यास लागून असलेल्या जमिनीवर म्हणजे सपाट

भातशेतीच्या जमिनीवर वास्तव्य करून आहे.[२२] काही तुरळक प्रमाणात महाराष्ट्रातील नाशिक जिल्हा, ठाणे जिल्हा, मुंबई, उपनगरे, इगतपूरी, पुणे जिल्हा अशा ठिकाणी तर महाराष्ट्राबाहेर गुजरातमधील अहमदाबाद, बडोदा, जंबुसर, भडोज, सुरत, करंजगाव, गायस, वरई, संजाण, वाघळीपा, बलसाड येथेही आढळतो. मात्र हा समाज तेथे सूर्यवंशी, मराठा, रजपुत मराठा खानदेशी आगळे आगरी या नावाने ओळखला जातो. त्या शिवाय शैक्षणिक व सांपत्तीक प्रगतीच्या जोरावर हा समाज आता थोड्या फार प्रमाणात परदेशातही वास्तव्य करू लागला आहे.[२३] इ. स. १९११ च्या जनगणनेनुसार या समाजाची एकूण लोकसंख्या २,३३,५५५३ इतकी होती.[२४] इ.स. १९३१ च्या जनगणनेनुसार ही संख्या २,६५,२८५ इतकी होती.[२५] मात्र आता मिळालेल्या माहितीनुसार सद्यस्थितीत ही संख्या सुमारे ४० लाखांच्या वर गेली आहे.[२६]

## ४. आगरी समाजाची उत्पत्ती:—

आगरी समाजाच्या उत्पत्तीबाबत पुढील मते असलेली दिसतात.

१) सुमारे ६०० वर्षांपूर्वी रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यात तीन लहान राज्ये अस्तित्वात होती: १) चौल २) आवास — सासवणे ३) सागरगड. पैकी पहिल्या दोन ठिकाणी हिंदू राज्ये होती तर सागरगडावर दिल्लीच्या बादशहाच्या वतीने एक सरदार राज्य करीत होता. दिल्ली बादशहाच्या वतीने हा सरदार त्या दोन्ही हिंदू राजांकडून करभार गोळा करून दिल्लीस पाठवी. पण पुढे हा सरदार बलाढ्य झाल्याने दिल्लीस करभार पाठविनासा झाला. त्याला धडा शिकविण्यासाठी बादशहाने पाठविलेल्या मुसलमान सरदाराचा त्याने पराभव केला. त्यामुळे संतप्त बादशहाने त्याचा पुरता बंदोबस्त करण्यासाठी दुसरा मातब्बर सरदार पाठविला व सोबत मुंगीपैठणच्या बिंबराजाला पत्राद्वारे मदतीची याचना केली. बादशहाच्या विनंतीला मान देवून राजाने सर्व सैन्यानिशी सरदाराला मदत केली. दोघांच्या संयुक्त ताकदीने त्या सरदाराचा पराभव झाला. त्याला पकडून सरदारासह त्याने दिल्लीला पाठवले. मात्र स्वत: बिंबराजा तो परिसर आवडल्याने तेथेच राहू लागला. राज्यकारभाराबरोबरच त्याने आसपासची

चौल, आवास व सासवणे ही हिंदू राज्येही जिंकून घेतली. पुढे शांततेच्या काळात बिंब राजाला इतक्या मोठ्या सेन्याची गरज नसल्याने पुरेसे लोक पदरी ठेवून बाकीच्यांना त्याने आसपासचा प्रदेश व मिठागरे बांधून दिली. सोबत गावठाणे वसवून मीठ पिकविण्याचा हक्क दिला. अशाप्रकारे या नवीन आलेल्या लोकांचा मुख्य धंदा हा आगराचा होऊन राहिल्याने तेथील मुळचे रहिवासी यांना आगरी या नावाने संबोधू लागले.[२७]

२) या जातीची उत्पत्ती आगल ऋषीपासून झाली आहे. सोमवंशी राजा नहुषाचा नातू ययाती याचा बलिभ्रद नावाचा वंशज होता. त्यास आगलिका नावाची पत्नी होती. तिला आगला नावाचा पुत्र झाला. त्याचे वंशज म्हणजे ही आगरी जमात होय.[२८]

३) आगरी लोक रावणाचे गायकवादक होते. रावण हा शिवभक्त होता. आगरी लोक त्यांच्या गाण्यांतून शिवाची स्तुती करीत. या त्यांच्या कामगिरीबद्दल बक्षिस म्हणून रावणाने त्यांना पश्चिम किनाऱ्यावरील जमीन दिली. त्यांचे वंशज म्हणजे हल्लीचे आगरी होय.[२९]

४) आगरी लोकांना पैठणहून कोकणात आणणारा राजा म्हणजे महिबिंब. ह्या महिबिंबाने शक १०६९ पासून ११३४ शक पर्यंत पासष्ट वर्ष राज्य केले. त्याच्या मृत्यूनंतर त्याचा पाच वर्षाचा पुत्र केशवदेव राजा झाला. त्याची आई कामाई हिच्या मदतीसाठी माहीमचा हरदपुरोस आला. विश्वासाचे राऊत घेऊन त्याने कामाई राणीवर पापवासना ठेवणाऱ्या प्रधानास ठार मारले. विजय मिळाल्यानंतर देसायांना वाणे देण्यात आली. त्यात म्हातरे नावाने दोन वृत्ती दिलेल्या दिसतात. १) म्हातरे ४०० फद्यांची वृत्ती २) म्हातरे ६०० फद्यांची वृत्ती. हा काळ म्हणजे रामदेवराव यादवाचा काळ.[३०]

## ५. आगरी जातीचे उपप्रकारः—

आगरी लोकांना आगळे, कुणबी, खारकी, खारपाटे अशा विविध नावांनी

ओळखले जाते. मीठ पिकविणाऱ्यास खारवा म्हणतात. अलिबाग तालुक्यात जे लोक खारेपाटात राहतात त्यांना खारकी किंवा खारपाटे म्हणतात. उलट खारेपाट (खाडी) सोडून जे लोक दूर उंचावर, शहराजवळ पास राहतात त्यांना उथळी म्हणतात. याच अनुषंगाने या समाजात तीन प्रमुख प्रकार मानले जातात.

१) शुध्द आगरी  २) दास आगरी  ३) वरप आगरी

### ५.१ शुध्द आगरी:—

शुध्द आगरी म्हणजे मुळचे आगरी लोक होय. यांचे व्यवसायानुसार पुढे तीन उपप्रकार पडले.

❖ **मीठ आगरी** :—

मीठाचे आगर पिकविणारे ते मीठ आगरी. या लोकांची पूर्वीपासून स्वत:ची मिठागरे होती. शुध्द मीठ पिकविण्याची कला यांच्या व्यतिरिक्त इतरांना तितक्या चांगल्या पध्दतीने येत नाही असे म्हटले जाते.

❖ **ढोल आगरी** :—

पूर्वीपासून ढोल वादन करणारे, नृत्य गायन करणारे ते ढोल आगरी. कालांतराने त्यांचा अपभ्रंश ढोर आगरी असा झाला. ढोर आगरी म्हणजे भरपूर मेहनत करणारा असा दुसरा अर्थ ही पुढे रूढ झाला. यातही पुढे ढोर आगरी व सोन आगरी असे दोन पोटप्रकार निर्माण झाले. यातील ढोर आगरी म्हणजे खारकी, खारपाटे म्हणजेच खाडीलगत व सोन आगरी म्हणजे उथळी म्हणजेच समुद्रापासून दूर उथळ भागावर राहणारे.

❖ **जस आगरी** :—

बाग बगीचे करणारे ते जस आगरी. मात्र पूर्वी ताड किंवा माड या झाडांपासून ताडी किंवा माडी बनवणारा हा समाज फळांचा ज्यूस बनविणारा म्हणून ज्यूस आगरी असाही ओळखला जाई. पुढे या शब्दाचा अपभ्रंश जस आगरी झाला असावा असे मानतात.

**५.२ दास आगरी :—**

या आगरी समाजाचे लोक प्रामूख्याने पालघर तालुक्यात आढळतात. त्यांना कराड आगरी या नावांनी संबोधिले जाते. परंतु शुध्द आगरी लोक ह्या दास आगरी लोकांशी रोटी — बेटी व्यवहार करत नाहीत.

**५.३ वरप / उरप आगरी :—**

हे लोक मुळचे आगरीच. पण धर्मांतराच्या काळात ते ख्रिस्ती झाले. नंतरच्या काळात (इ.स.१८२० ते १८२८) रामचंद्रबाबा जोशी, भाई मुकुंद जोशी व विठ्ठल हरी नाईक वैद्य या ब्राह्मणांकरवी त्यांनी पुन्हा धर्मांतर करून आगरी समाज स्विकारला. त्यामुळे त्यांना नवमराठे या नावाने ओळखले जाते. मात्र शुध्द आगरी व दास आगरी हे दोन्ही लोक या नव मराठ्यांना हलके मानतात. प्रामुख्याने हे लोक वसई, मणीपूर, अलिबाग या तालुक्यात आढळतात.

पूर्वी उपरोक्त प्रकारानेच या समाजाची वहिवाट चालत होती. मात्र स्वातंत्र्यप्राप्तीनंतर झालेल्या शैक्षणिक विकास व आधुनिक बदलांमुळे हा समाजही बदलला. आता असे पोटप्रकार त्यांच्यातील समाज पाळतांना दिसत नाहीत. उलट त्यांच्यातील विभागणी विविध स्तरानुसार केली जाते. हे स्तर ज्येष्ठ आगरी साहित्यिक शंकर सखाराम यांनी आपल्या साहित्यामधून समाजापुढे मांडले.[३१]

**१) पहिला स्तर :—**

अज्ञान, अंधश्रध्दा, दारिद्र्य यांत बुडालेला, खेड्यात राहणारा व शिक्षणास प्रतिकूल परिस्थिती असणारा, भातशेती व मिठागरे पिकविणारा गरीब आगरी समाज.

**२) दुसरा स्तर :—**

या समाजातील शिक्षीत होऊन मुळ समाजापासून दूर शहरात राहणारा समाज.

**३) तिसरा स्तर :—**

या स्तरात या जातीतील बडे उद्योगधंदे वाले यांचा समावेश होतो.

४) **चौथा स्तर :—**

या स्तरात समाजातून निर्माण होऊन उच्चपदावर पोहोचलेल्या राजकारण्यांचा समावेश होताना दिसतो.

## ६. आगरी जीवन पध्दती :—

### ❖ गावांची रचना :—

साधारणपणे भातशेतीच्या मध्यभागी उंचवटा असेल तेथे आगरी खेडे वसलेले असते. सर्वसाधारणपणे गावाचे लहान भाग पाडले जातात. त्याला पाडा असे म्हणतात. पूर्वी एका पाड्यात एकाच आडनावाची बरीच कुटुंब राहत असत. यांची घरे चौकोनी असतात. पुढे उघडी ओटी, नंतर मधली खोली, तिच्या बाजूला स्वंयपाकघर, अन दुसऱ्या बाजूला भात साठविण्यासाठी कोठी असते. शक्यतो शेतातून उपलब्ध साहित्यातूनच घरे बांधण्याची पध्दती पूर्वी होती. आता या पध्दतीत थोडे बदल झालेले दिसतात.

### ❖ पेहराव :—

आगरी समाजातील पुरूषाचा पोशाख एक धोतर किंवा रूमाल, सदरा, एक कब्जा किंवा गंजी असा असतो तर स्त्रिया आडवे पातळ म्हणजेच नऊवारी साडी नेसून खांद्यावरून पदर मागे सोडतात. काही गुडघ्यांपर्यंत आडवे नेसतात तर काही त्याच्या खाली नेसतात. घराबाहेर पडतांना अथवा समाजात वावरतांना खोंडा (घोंगडी) वापरतात. काही ठिकाणी या ऐवजी पांढरी फडकीही वापरतांना दिसतात. ह्या पारंपरिक पेहरावात आधुनिकीकरणामुळे बदल झालेला दिसतो. आत्ताची पिढी शर्ट—पॅन्ट व ६ वारी साडी अथवा ड्रेस यांना प्राधान्य देतांना दिसतात.

### ❖ आहार :—

आगरी लोकांच्या आहारात मुख्यत: मांसाहार आढळतो. हा समाज आगराशी संबंधीत असल्याने भात, मासे व तांदळाची भाकरी हे त्यांचे मुख्य अन्न आहे. या व्यतिरिक्त मटण, डाळ नागलीची (नाचणीची) भाकरी यांचाही

जेवणात समावेश असतो. आषाढी अमावस्या (गटारी) मांसाहाराचे भोजन करून साजरी करतात. तर गणेश चतुर्थी, गौरी, दिवाळी, होळी या सणांना मोदक, वडे, पुरणपोळी, तांदुळाच्या पिठाचे लाडू इ. पक्वान्ने केली जातात. आंबवलेल्या तांदळाच्या पिठाचा पोळे हा पदार्थ या समाजात विशेष प्रिय आहे. भातमळणीच्या हंगामात बऱ्याच ठिकाणी मान देण्याची म्हणजे कोंबडा किंवा बोकडाचा बळी देण्याची पध्दत आहे. जिताड्याची मासळी हा त्यांचा आवडता अन्न पदार्थ मानला जातो. जेवणाचा कल तिखट खाण्याकडे जास्त दिसतो. तर पोळी किंवा चपाती पेक्षा भाताला जास्त प्राधान्य दिले जाते.

### ❖ मनोरंजन :—

नृत्य, गायन, विविध खेळ व सण उत्सवातील सहभाग ही आगरी समाजाची मनोरंजनाची पारंपरिक साधने होती. यात बैलगाडीच्या शर्यती, कोंबड्यांच्या झुंजी, भजने, नाटके, नाच, कुस्ती, कबड्डी, मल्लखांब इ. चा समावेश होता मात्र आता अभिजन वर्गाच्या पध्दती नुसार त्यांची ही मनोरंजनाची साधने बदलली आहेत. सद्यस्थितीत हा समाज सुध्दा प्रामुख्याने टी. व्ही., सिनेमा, व्हिडिओ गेम्स यांसारख्या गोष्टींद्वारे मनोरंजन करण्यास प्राधान्य देताना दिसतो.

### ❖ उत्पन्नाची साधने:—

आगर पिकविणारा तो आगरी या अर्थान्वये भाजीपाला पिकविणे, भातशेती करणे, बागा पिकविणे, मीठ तयार करणे हे या समाजाचे मुळ उद्योग. याशिवाय मोलमजुरी करणे, गुरे चारणे, बैलगाडी हाकणे, मच्छी विकणे, कोंबड्या पाळणे यांसारखे उद्योगही ते पोट भरण्यासाठी करतात. तसेच बहुतांशी स्वत:ला लागणाऱ्या कामांसाठी ते परखेल (परतफेड) जाऊन होणारा खर्च वाचवितात. आपल्याच घरातील काम स्वत: करून अतिरिक्त खर्चास मज्जाव करतात

सद्य:स्थितीचा विचार करता शैक्षणिक प्रगतीमुळे नोकरी करणे, उद्योगधंदा, व्यवसाय करणे यांकडे हा समाज जास्त आकर्षित झालेला दिसतो.

### ❖ सण — उत्सव :—

होळी हा सण आगरी समाजात पारंपरिक पध्दतीने साजरा केला जातो. आगरी भाषेत होळीला हावलूबाय असे म्हटले जाते. या सणाला सासुरवाशिणी माहेरी येतात व आनंद व्यक्त करतात.

यांचा दुसरा प्रमुख सण म्हणजे गौरी गणपती. ५ ते १० दिवस हा सण मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. या दिवसात सासुरवाशीण स्त्रीला माहेरी आणून ववसा दिला जातो. व घरी जातांना सासरच्या लोकांसाठी गोड सण (पदार्थ) पाठविला जातो. या दिवसांत ढोलकीच्या तालावर स्त्रिया फेर धरतात. तर पुरूष भजनाचा आस्वाद घेतात. शिक्षण व नोकरी निमित्ताने बाहेर गेलेला समाज गौरी गणपतीच्या सणासाठी आवर्जून गावाकडे परतताना दिसतो.

या व्यतिरिक्त दहीहंडी, नवरात्र व दिवाळी हे सणही फार आनंदात साजरे केले जातात. परंतु या वेळेत त्यांची शेतीची कामे असल्याने फक्त उपवास करून नवरात्र तर पणती लावून व करंज्या करून दिवाळी साजरी केली जाते. सद्य:स्थितित या सणांना आधुनिकतेची जोड मिळाली असून ३१ डिसेंबर सारखे दिवसही सणांसारखे साजरे केले जातांना दिसतात.

## ७. आगरी समाजाची वैशिष्ट्ये :—

आगरी समाजचा इतिहास या मुरलीधर म्हात्रे संपादित पुस्तकामध्ये आगरी साहित्यिकांनी आपल्या साहित्याच्या माध्यामातून विविध लेखांमधून आगरी समाजाची विविध वैशिष्ट्ये सांगितली आहेत. यात प्रामुख्याने ए. टी. पाटील, शंकर सखाराम व मुरलीधर म्हात्रे यांचा समावेश होतो.[३२]

- **खोंडा पध्दत:—**

आगरी जातीतील स्त्रिया आपल्या संस्कृतीचे प्रतिक म्हणून खोंडा वापरतांना दिसतात. खोंडा म्हणजे काळ्या रंगाची लोकरीची घडी केलेली एक पातळ चादर. कुठेही घराबाहेर जातांना हा खोंडा परिधान करणे अनिवार्य असे. या मुळे स्त्री शरीराचे ऊन, वारा, पाऊस यांच्यापासून संरक्षण होते. तर

बसण्यासाठी आसन व संस्कृती रक्षणासाठीही याचा वापर केला जातो. आधुनिकीकरणामुळे आता ही प्रथा बंद होत चालली आहे.

- **जात पंचायतः—**

परस्परातील भांडणे व तंटे मिटविण्यासाठी जातपंचायत मांडली जाते. ही जातपंचायत नियमबाह्य वर्तन करणाऱ्यास प्रसंगी शासन करून शांतता प्रस्थापित करण्याचे काम करते. काडीमोड, पुनर्विवाह, वाळीत टाकणे अशा प्रकारच्या गोष्टीसाठीही न्यायदान केले जाते. काही ठिकाणी ५ ते १० गावांत मिळून पंचायती असतात.

- **सांघिक भावना :—**

आगरी समाजामध्ये एकत्रीत येवून काम करण्याची वृत्ती विशेष उल्लेखनीय वाटते. ७ ते ८ लोक एकत्र येवून गटाने काम करणे म्हणजे हंदापद्धती होय. स्त्रियांच्या गटाला हंदा म्हणतात. तर पुरूषाच्या गटाला मदत म्हणतात. अशा प्रकारे शेतीतील कापणी, मळणी, कांडवणी यासारखी बरीच महत्त्वाची कामे सांघिक बळाच्या आधारे हे सहज पूर्ण करतात.

- **शुध्दीकरणः—**

इ. स. १५०० च्या सुमारास पोर्तुगीजांनी जबरदस्तीने धर्मांतर घडवून आणलेल्या आगरी बांधवांना ब्राह्मणांच्या मदतीने शुध्दीकरण करून पुन्हा समाजात घेण्यात आले. त्यांचा नवीन वर्ग म्हणजे नव मराठे. अशाप्रकारे शुध्दीकरण करून समाजात घेण्याची वृत्ती या माणसांना सन्माननीय ठरवते.

- **स्वाभिमानीः—**

आपल्या समाजाचा सार्थ अभिमान यातील पिढीला असल्याने ते गुन्हेगारी वृत्तीकडे सहसा आकर्षित होताना दिसत नाहीत. मुख्यत्वे त्यांच्यात समाजाचे मिळून गाव बनलेले असल्याने व्याभिचाराचा फैलाव तितकासा झालेला दिसत नाही.

- **पुनर्विवाहः—**

आगरी समाजात पूर्वीपासून पुनर्विवाहास मान्यता असल्याचे दिसते. त्यामुळे स्त्रियांना हालाखीचे जीवन भोगावे लागत नाही. वाईट वृत्ती, प्रवृत्तींना आळा बसल्याचे दिसते.

- **हुंडा :—**

आगरी समाजात त्रास देण्याच्या हेतूने निर्माण केलेली हुंडा देण्याघेण्याची प्रथा पूर्वीपासूनच अस्तित्वात नाही. उलट स्त्रीला लग्न करून घरी आणत असल्याने तिला शृंगारून तिच्या घरच्यांना मानाचा देज देण्याची प्रथा पूर्वी होती.

- **धवलारीण :—**[३३]

आगरी समाजातील लग्नविधी धवलारणी शिवाय पूर्ण होऊ शकत नाहीत. आगरी समाजात स्त्री पौराहित्य करणाऱ्या व लग्न प्रसंगी गाणी गाणाऱ्या महिलांना धवलारीण म्हणतात.[३४] आपल्या सुमधुर आवाजाने आणि अर्थपूर्ण गाण्याने या धवळारीणी लग्न समारंभातील आनंद द्विगुणीत करुन लग्न विधीची पूर्तता करतात. धवळे हा एक गीत प्रकार आहे. धवळे हा मूळ संस्कृत जोडशब्द आहे. या शब्दाचे दोन भाग पडतात. धव + ळे. यात धव म्हणजे वर (नवरा किंवा श्रेष्ठपुरूष) तर ळे म्हणजे स्वार्थ. थोडक्यात वरविषयक गायलेले विवाहगीत म्हणजे धवळे. पूर्वी ग्रंथकार हेमचंद्रांनी धवळ गीतांची व्याख्या पुढील प्रमाणे केली. 'सुपुरिसो वण्णिज्जह जेण तेण सो धवलो' ज्या गीतात सुपुरूषाचे वर्णन केले जाते. त्याला धवळेगीत म्हणतात. धवळे गीतांना धवळमंगळ असेही म्हटले जाते. या धवळगीतांना संत एकनाथ व संत दासोपंत यांनी हळदुली असे म्हटले आहे. पैठण परिसरातील आगरी लोक मुंगीपैठणच्या बिंब राजाच्या सोबत कोकणात सैन्य स्वरूपात येवून स्थायिक झाले. पुढे त्यांच्याच स्त्रियांनी या धवळ्यांची परंपरा सर्वदूर पसरविली असावी.[३५] यावरुन हा तत्कालातील महत्त्वाचा प्रकार असलेला दिसतो. मात्र 'उत्तर कोकणातील आगरी गोत्रगंगा' या काशिनाथ मढवी यांच्या पुस्तकातुन हे धवळे त्यापूर्वीचे असल्याचे दाखले देण्यात आलेले आहेत.[३६]

* **आगरी समाजातील लग्नपध्दती**:—

प्रत्येक व्यक्तीच्या जीवनातला अत्यंत महत्त्वाचा व आनंदाचा सोहळा म्हणजे लग्न. इतर समाजांच्या रितीरिवाजाप्रमाणे आगरी समाजातही लग्नप्रसंगी विविध धार्मिक व पारंपरिक विधी होत असतात. गेल्या सुमारे शंभर वर्षाचा लग्नपध्दतींचा आढावा घेतला तर या समाजातील लग्नपध्दती अत्यंत सामान्य असलेली दिसते. मात्र आता ही लग्ने अत्यंत साधेपणाने साजरी न होता प्रचंड खर्चासह व झगमगाटात केली जातात. पूर्वी लग्नाचा सोहळा एकूण सहा दिवस चालत असे. तो पुढीलप्रमाणे:—

१) पहिला दिवस — मांडव स्थापनेचा व चून दळण्याचा

२) दुसरा दिवस— हळदीचा व अन्य लग्नविधींच्या पूर्ततेचा

३)तिसरा दिवस— लग्नाचा ४) चौथा दिवस— वरातीचा

५)पाचवा दिवस— सुपल्यांचा ६)सहावा दिवस— देव उठविण्याचा

उपरोक्त सहा दिवस मिळून एकूण ४० लग्नविधी केले जातात. यापैकी फक्त दोनच विधी म्हणजे मांडव स्थापना व प्रत्यक्ष मंगलाष्टके म्हणून लग्नविधींची पूर्तता करणे हे ब्राह्मण पुरोहितामार्फत केले जातात तर उर्वरीत ३८ विधींची पूर्तता धवलारीणीकडून म्हणजेच आगरी महिला पुरोहिताकडून केली जाते.

**१) मांडव स्थापना व चून धुणे — दळणे, तांबेरा** :—

लग्न म्हटले की मांडव आलाच. आपापल्या ऐपती प्रमाणे लग्नघरात मांडव घातला जातो. मांडव स्थापना ब्राह्मण पुरोहिताकडून करून घेतली जाते. त्यासाठी घरातील मुहूर्ते (मुहूर्त करणारे जोडपे) निवडले जातात. त्यांच्या हस्ते आंबा, जांभूळ, वड, पिंपळ व उंबराच्या झाडाच्या लहान फांद्या आणून मांडवाच्या मुख्य खांबाला बांधून विधीयुक्त पुजा केली जाते. तर काही ठिकाणी दुसऱ्या दिवशी म्हणजे हळदीच्या दिवशी मांडव स्थापना केली जाते. त्यानंतर तांबेरा म्हणजे लग्न आहे हे देवाला सांगण्यासाठी दोन्ही हाताचे पंजे बोटासह लाल मातीत बुडवून ते घराच्या भिंतीवर शुभसूचक म्हणून लावतात.[३७] यानंतर

खऱ्या अर्थाने लग्नाचा पहिला दिवस म्हणजे चुनाचा दिवस होय. 'चून' म्हणजे घाऱ्या किंवा वडे करण्याकरिता लागणारे दळण. आगरी लोकांना शेतात पिकणाऱ्या तांदळाच्या पिठापासून वडे, फेण्या व पापड करणे सहज शक्य असल्याने ही प्रथा पडली असावी. त्यासाठी यजमान घरात इतर महिला जावून तेथून तळ्यावर वा विहीरीवर जावून चूनाचे तांदूळ धुतात. नंतर हे तांदूळ वाळवून जात्यावर दळण काढले जाते. त्यानंतर मुलीला पाटावर बसविण्याचा म्हणजेच 'चौके बसविणे' हा विधी केला जातो.[३८]

### २) हळदीचा दिवसः—

दुसरा दिवस हा हळदीचा दिवस असतो. त्यासाठी आदल्या दिवशी हळद भिजत घालून ती पाट्यांवर वाटून नवरा नवरीला खालुन वर अशा पध्दतीने लावली जाते. सकाळपासून रात्रीपर्यंत हा विधी सुरू असतो. हळदीच्या दिवशी या व्यतिरिक्त पाटा उजवणे, गौरत खेळवणे, तेलवाना करणे, चून मळणे/रासणे, चून भरणे, आहिरी बसविणे, देव बसविणे, तवा चढविणे व देवांना नैवेद्य दाखविणे असे विधी ही केले जातात. प्रत्येक विधी करतांना धवळे गायले जाते.

### ३) लग्नाचा दिवसः—

विवाह सोहळ्यातला हा तिसरा दिवस अत्यंत महत्त्वाचा असतो. या वेळी मामा बसणे, नवरा मव्हा बसणे, उमतारा तासणे, न्हाव घालणे, आहेरपट्टी लिहिणे, साड्यांचे आहेर देणे, वाणा वाटणे, कानचिंबळणी करणे, रूखवत नेणे, ओटी भरण करणे, लग्न लावणे, कन्यादान करणे यांसारखे विधी केले जातात. या दिवशी मामांना विशेष महत्त्व असते. लोकांना जेवणावळ असते.

### ४) वरातीचा दिवसः—

या दिवशी फारसे काही विधी नसतात फक्त नवरा नवरीची मंडपात अंघोळ घालतात. पूर्वी बरेच अंतर पायी चालावे लागल्याने लग्नाच्या दुसऱ्या दिवशी वरात काढीत. हल्ली प्रवासाची सोय झाल्याने वरात लग्नाच्या दिवशीच काढतात. त्यानंतर सोयऱ्यांचा मानपान केला जातो.

### ५) सुपल्यांचा दिवसः—

पाचव्या दिवशी नवरीकडील पाच सवाष्णी मुलीच्या सासरी नेण्यासाठी सुपं, टोपल्या, ठुरडी, कुरकुल, रोवळी, डाली अशा बांबूच्या वस्तू घेऊन जातात. त्यामध्ये खाण्याच्या वस्तू झाकून ठेवून भेटीदाखल दिल्या जातात. त्यानंतर पाटा भरून सुपल्याभोवती व पाट्याभोवती प्रदक्षिणा घालावयास लावतात. तेव्हाही धवळे गायिले जाते. अशाप्रकारे नवरीच्या घरी हा कार्यक्रम यथासांग पार पाडला जातो. त्यानंतर तेथील देव उठविण्याचा कार्यक्रम पूर्ण केला जातो.

### ६) देव उठविण्याचा दिवसः—

नवऱ्याच्या घरी लग्नकार्य निर्विघ्नपणे पार पडावे म्हणून मानाने बसविलेले देव मानाने उठविण्याचा कार्यक्रम या दिवशी केला जातो. देवाना नारळ फोडून वडे, फेण्या व गोडाचा नैवेद्य दाखवतात. त्यातही देव तिखट असतील तर त्यांना मानाचा मांसाहारी नैवेद्य दिला जातो व देव उठवितात. त्यावेळी खिडकी बाहेर उभ्या असलेल्या लहान मुलांकडे पानाचा विडा, सुपारी, खोबऱ्याचे तुकडे, पापड घाऱ्या व पैसे देवांना मान म्हणून भिरकावले जाते व त्यांच्या अंगावर पाणी शिंपडले जाते . अशा प्रकारे देव उठविण्याचा कार्यक्रम होतो. त्यानंतर ऐपतीप्रमाणे अथवा इच्छेप्रमाणे सत्यनारायणाची लग्नपुजा घालतात. तसेच कुलरीतीप्रमाणे गोंधळ घालण्याचा विधी होतो. काही ठिकाणी हळदीच्या दिवशी गोंधळ घातला जातो.

## ८. कोळी समाजाची ओळख :—

कोळी समाज हा आदिवासी समाजात गणला जातो त्यामुळे आदिवासी समाजाच्या काही व्याख्या समजावून घेणे क्रमप्राप्त ठरते. आदिवासी याचा शब्दशः अर्थ विशिष्ट प्रदेशात आदिकालापासून वास करणारे. म्हणजेच त्या प्रदेशाचे ते मुळचे रहिवासी होत. आदिवासी हा शब्द इंग्रजीतील aborigines या शब्दाला रूढ झालेला मराठीतला पर्याय आहे.[३९] १९६२ मध्ये शिलॉगमध्ये

आदिवासींची एक परिषद भरली होती. या परिषदेत आदिवासींची व्याख्या खालील प्रमाणे केलेली आढळते —

"एका समान भाषेचा वापर करणाऱ्या, एकाच पूर्वजापासून उत्पत्ती सांगणाऱ्या, एकाच भूप्रदेशात वास्तव्य करणाऱ्या, तंत्रज्ञानाच्या दृष्टीने मागसलेल्या, फारशी अक्षर ओळख नसलेल्या, रक्त संबंधावर आधारीत व सामाजिक राजकीय रितीरिवाजांचे प्रामाणिकपणे पालन करणाऱ्या एकजिनसी गटाला आदिवासी समाज म्हणतात."[४०] महाराष्ट्रामध्ये एकूण अनुसूचित जाती ५९, विमुक्त जाती १४०, भटक्या जमाती ६५, इतर मागास वर्गीय ३४१ व विशेष मागास संवर्ग ४१ आहे.[४१] पैकी आदिवासी समाजातील एक उपजात म्हणजे कोळी.

## ९. कोळी समाजाचे वास्तव्य :—

कोळी या समाजाचे लोक महाराष्ट्र, मध्यप्रदेश, गुजरातचे काही भाग आणि आंध्र प्रदेशाच्या सीमावर्ती भागात आढळतात. कोळी जातीचे लोक मध्यप्रदेशाप्रमाणेच दक्षिण गुजरात आणि कोकण विभागातही आढळतात. प्राचीन काळी त्यांचे वास्तव्य सातपुडा पर्वतरांगावर होते आणि नंतर अजंठाजवळील पर्वतावर ते गस्त घालण्याचे काम करीत असत अशी नोंद आहे.[४२] कोळी समाज हा मुंबई बेटावरील मूळ वसाहत मानली जाते. मुंबई बेटाचा ताबा इ.स. १५३० मध्ये मुसलमानांकडून पोर्तुगीजांकडे आला. त्यावेळी मुंबई बेटावर कोळी, भंडारी, पाचकळशी या जमातीची वस्ती होती. मुसलमानी अंमलापूर्वी म्हणजे १४ व्या शतकाच्या आरंभापासून मुंबई बेटावर कोळी वस्ती असल्याचे आढळते. चंपावती, चेऊल, अलिबाग इत्यादी ठिकाणाहून स्थलांतर करुन मुंबई बेटावर कोळी वस्ती झाली आहे असे इतिहास सांगतो. मुंबईत कोळ्यांचा उल्लेख इ. स. १००० पूर्वीच्या वाङ्मयात सापडतो. इतिहासकार श्री. वि. का. राजवाडे ह्यांनी प्रकाशित केलेल्या महिकावतीच्या बखरीत मुंबई बेटावर कोळ्यांची वस्ती असल्याचा उल्लेख आहे.[४३] तर मुंबईच्या शिक्षण विभागा तर्फे करण्यात आलेल्या भाषा विकास प्रकल्पानुसार कोकणाला

समुद्रकिनारपट्टीचे वैभव लाभल्याने कोळी लोकांचे तेथे प्राबल्य असलेले आढळते.[४४]

इ. स. १८०४ मध्ये तत्कालीन बॉम्बे प्रेसिडेंसित सुमारे दीडलाख कोळ्यांची वस्ती होती असे कर्नल वॉकर यांनी लिहून ठेवलेले आहे. प्रोफेसर घुर्ये ह्यांच्या मते तत्कालिन मुंबई राज्यातील कोळी ही संख्येने सर्वात मोठी जमात होती आणि इ.स. १८८१ मध्ये त्यांची संख्या २१ लाखाच्या जवळपास होती.[४५]

## १०.कोळी समाजाची उत्पत्ती :—

१. भागवत पुराणातील दंतकथेनुसार व्हेना नावाच्या राजाच्या मृत्युनंतर त्याच्या प्रत्येक अवयवापासून एकेक जमात जन्माला आली. कोळी लोकांची उत्पत्ती राजाच्या पायापासून झाली.[४६]
२. कोला म्हणजे होडी, बोट. कोला चालविणारे ते कोळी अशीही उत्पत्ती मानली जाते.
३. कुली या फारसी शब्दाचा अर्थ आहे श्रम करणारा, मजुरी करणारा. याचपासून मोलमजुरी करणारा तो कोळी असा अर्थ रूढ झाला.[४७]
४. आंध्रातून आलेल्या लोकांना कोमटी म्हणण्याची प्रथा महाराष्ट्रात आहे. मोगली काळात याच लोकांना कोळी म्हणत असल्याचा संभव कॅ. मॉकिनटॉशने व्यक्त केला आहे.[४८]
५. सोनकोळी या नावाबद्दल शिवनिबंध ग्रंथात पुढील प्रमाणे कथा आहे. परमेश्वराच्या सोहम् या ध्वनीपासून सोहं, सोम किंवा मयात या नावांनी ओळखला जाणारा एक मुलगा झाला. त्याच्या अचिंता नावाच्या मुलीचा कश्यप ऋषीबरोबर विवाह झाला होता. तिचा मार्धन नावाचा मुलगा हिंसेकडे वळला म्हणून मयातने त्याला मासे मारून उदरनिर्वाह करण्यास सांगितले. त्याप्रमाणे तो मासेमारी करू लागल्यावर त्याला व त्याच्या वंशजांना सोन किंवा सोनकोळी हे नाव मिळाले.[४९]

## ११. कोळी जातीचे उपप्रकार

महाराष्ट्रामध्ये कोळ्यांचे दोन प्रमुख वर्ग सापडतात. कोळी व डोंगर कोळी होत. त्यात उपविभाग पडून त्यामध्ये सोनकोळी व महादेवकोळी हे दोन उपविभाग पडतात.[५०] तसेच मराठेकोळी, मराठेखार कोळी असेही प्रकार पडतात. नाशिक जिल्ह्यात मल्हार, ढोर व राज या तीन जाती आहेत. ठाणे जिल्ह्यात मुख्यत: महादेव कोळी हे प्रमुख आहेत. तेथे यांचे एकूण १२ उपप्रकार आहेत. ते पुढीलप्रमाणे (१)आगरी कोळी (२) सोनकोळी (३) बांड (४) चांची (५) ढोर किंवा टोळरे (६) डोंगरी (७) खार (८) महादेव (९) मल्हारी किंवा चुंबळी उर्फ कुनम अथवा पानभरी (१०) मारवी (११) डोंगरी किंवा मेटा (१२) राज अथवा थेन (१३) सोलेसी उर्फ बाळा किंवा काष्टी, लाललंगुटी (१४) ठाणकर.[५१] जव्हार संस्थानचा राजा महादेव कोळी होता. त्यामुळे महादेव कोळ्यांनाच राजकोळी असे म्हणण्याची प्रथा पडली.[५२]

थोडक्यात महाराष्ट्रातील कोळी ही एकच जमात असून तिच्या अंतर्गत डोंगर कोळी, सोनकोळी, मल्हार कोळी, महादेव कोळी, तसेच पानभरी किंवा चुंबळी कोळी हे समाज प्रकार आढळतात. त्यांतील काही महत्त्वपूर्ण उपप्रकारांची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे –

### ११.१. मल्हार कोळी :–

मल्हार कोळ्यांना पानभरी किंवा चुंबळी कोळी असेही नाव पडले आहे कारण ते डोक्यावर कपड्यांची चुंबळी ठेऊन त्यावर पाण्याचे घडे ठेवीत आणि पाणी भरीत असत. तसेच त्यांच्याकडे गड म्हणजेच किल्ल्यांची देखरेख करण्याचे काम असल्याने त्यांना गडकरी कोळी असेही म्हणत.[५३] यांच्यात जाधव, भोईर लांग, केरव, पोवार, होलार, वेखंडे अशी आडनावे आढळतात.[५४] मल्हार कोळी हे खानदेशात म्हणजे प्रामुख्याने धुळे आणि जळगाव जिल्ह्यात तसेच अहमदनगरमध्ये सापडतात. तसेच मुंबईच्या समुद्रकिनारी दिसतात. शिवाजींच्या सैन्यात मल्हार कोळी मोठ्या प्रमाणात होते. आणि त्यांनी पुरंदर, सिंहगड तसेच तोरणा, रायगड इ. ठिकाणी किल्यांच्या रक्षणाचे काम केले. [५५]

सन १९८१ मध्ये यांची लोकसंख्या जिल्ह्यात ३४७ होती हे मल्हारीचे भक्त असल्यामुळे त्यांना मल्हारी कोळी हे नाव पडले असावे.[५६]

### ११.२. ढोर कोळी :—

ढोर कोळी ही कोलचा या नावाने ओळखली जाणारी अनुसूचित जमात आहे. या जमातीचे लोक जंगलात मरून पडलेल्या जनावरांचे मांस खात असल्यामुळे त्यांना ढोरकोळी असे नाव पडले. ढोरकोळी सोडून इतर कोळी गोमांस खात नाही.[५७] या जमातीची वस्ती ठाणे नाशिक, धुळे, जळगाव, कोल्हापूर येथे आढळते अलिबागमध्ये ही जमात आढळत नाही. कोळ्यांमध्ये ती सर्वात कनिष्ठ समजण्यात येते. या जमातीची लोकसंख्या १९६१, १९७१ व १९८१ च्या जनगणनेनुसार अनुक्रमे ६३२ व ६६२ होती.[५८]

### ११.३ महादेव कोळी :—

महाराष्ट्राच्या राजकारणात अगदी यादव काळापासून महादेव कोळी जमातीचा उल्लेख हा इ.स. १३०० च्या सुमारास आढळतो.[५९] रायगड जिल्ह्यातील डोंगर भागात महादेव कोळी अथवा डोंगर कोळी आढळतात.[६०] १९६१, १९७१ आणि १९८१ च्या जनगणनेनुसार त्यांची लोकसंख्या अनुक्रमे ४,४१९, ७,४२४ व ६०,९०३ होती. सन १९८१ च्या जनगणनेत सोनकोळींची संख्या यांच्यात समाविष्ट केल्याने महादेव कोळींची संख्या वाढलेली दिसते, पण ते सोनकोळ्यांहून वेगळे आहेत. यांचे मूळस्थान बालघाट तथा महादेव डोंगरात होते व तेथून ते नाशिक, पूणे, अहमदनगर व ठाणे जिल्ह्यामध्ये आले असावे, कॅप्टन मॅकिन्टोशच्या मते महादेव कोळी जमातीत २४ कुळे आणि २१८ पोटकुळे असावीत, त्यांच्यात बारा कुटुंबांचा एक गट असे अनेक गट आहेत. या गटांना गोत्रीभाऊ म्हणतात. ऐतिहासिक काळात महादेव कोळी हे लिंगायत पंथी होते विवाह व अत्यसंस्काराच्या वेळी पुरोहीत म्हणत ते रावळ गोसाव्यांना बोलावित असत. पेशवाईत महादेव कोळ्यांनी वैदिक हिंदू धर्माचा स्वीकार केला.[६१] महादेव कोळी हे महादेवाचे भक्त असून सह्याद्रीपर्वतात आणि प्रामुख्याने पुणे ते मुळशी आणि पुणे ते त्र्यंबकेश्वर ह्या भागात वास्तव्य

करतात. महादेव कोळी मोठ्या प्रमाणात ठाणे जिल्ह्यात असून अहमदनगर जिल्ह्यातही थोड्या प्रमाणात पसरले आहेत.[६२]

### ११.४. सोनकोळी :—

संशोधनासाठी निवडलेले क्षेत्र अलिबाग तालुका असून अलिबाग तालुक्यात प्रामुख्याने सोनकोळी जातीचे लोक आढळतात. त्यामुळे त्यांच्या बाबत सविस्तर माहिती घेणे आवश्यक ठरते.

कोकणात समुद्रकिनारी राहणाऱ्या कोळ्यांना समुद्रकोळी किंवा सोनकोळी असे म्हणतात. रायगड जिल्ह्यात सोनकोळ्यांची संख्या अधिक प्रमाणात आढळते. याव्यतिरिक्त पूर्वीपासून या समाजाचे लोक अंगावर जास्त प्रमाणात सोने वापरतात म्हणूनदेखील त्यांना सोनकोळी असे म्हणत असावेत. हल्ली ते स्वत:ला थळकर सोनकोळी म्हणवितात.[६३] जातीव्यवस्थे प्रमाणे सोनकोळी हे उच्चवर्णीय समजले जातात. ते जातीतील सर्वांचे नेतृत्व करताना दिसतात. या जातीचे मुख्य ठिकाण चंपावती (चेऊल) चौल हे होय. यांची वस्ती रत्नागिरी, कुलाबा, ठाणे व मुंबईबेट या चार भागातील समुद्रकाठच्या सुमारे दीडशे गावी आहे. यांची लोकसंख्या ३५ हजार आहे. यांची प्रथम वस्ती कुलाबा जिल्ह्यात होती. नंतर तेथून ते ठाणे व रत्नागिरी जिल्ह्यात पसरले. ज्यावेळी आंगऱ्यांचे प्राबल्य कोकणात होते, त्यावेळी त्यांनी सोनकोळ्यांच्या बायकांवर जोबनपट्टी किंवा चोळीपट्टी बसविली. कोळी बायकांनी अंगात चोळ्या न घालता अंगावरून लुगड्याचा पदरच घ्यावा व ज्यांना चोळ्या घालावयाच्या असतील त्यांनी काही ठराविक कर आंग्रे सरकारात भरावा असा या कराचा अर्थ होता. त्यामुळे कुलाबा जिल्ह्यातील थळ वगैरे गावातील सोनकोळ्यांची वस्ती उठून मुंबई, ठाणे, वेसावे इकडे येऊन राहिली.[६४]

### ११.५. इतर कोळी समाज :—

टोकरे किंवा टवकरी कोळी हे बांबूचे काम करणारे कोळी असून पेण ह्या कोकणातील विभागात आढळतात. तर राजकोळी हे नाशिक जिल्ह्यातील वणी, दिंडोरी भागात आणि ठाणे जिल्ह्याच्या जव्हार भागात आढळतात. तसेच भिल्ल

व कोळी ह्यांच्यातील विवाहातून निर्माण झालेल्या समाजाला भिल्ल कोळी म्हणून ओळखले जाते. यांनाही समाजात कनिष्ठ स्थान आहे.[६५]

## १२. कोळी जीवनपध्द्ती :—

### ❖ गावांची रचना :—

कोळी समाज प्रामुख्याने समुद्रकिनारी खाडी काठी वस्ती करतो. त्यांची घरे मातीच्या भिंती, मातीची जमीन व झावळीची छप्परे अशी असत. प्रत्येक घराच्या दारात ओटा असतो. गावात ते एकाच ठिकाणी राहतात. त्याला 'वाडा' असे म्हणतात. अतिशय साध्या पध्दतीची यांची घरे असत. मात्र आता आधुनिक गृहरचनेवर त्यांचा भर असतो.

### ❖ पोशाख :—

पुरूष कमरेभोवती पुढच्या बाजूस टोक सोडलेला मोठा रंगीत पंचा/ रूमाल किंवा लंगोट गुंडाळतात. हा रूमाल साधारण २.३ फुट लांबीचा असतो. अंगात कुडता किंवा पैरण किंवा शर्ट घातला जातो. गळ्याभोवती किंवा खांद्यावर एक रंगीत रूमाल टाकतात. डोक्यावर गांधी टोपी प्रमाणे पण उंचीला जास्त व मध्यभागी गोंडा असणारी टोपी घालतात. तर स्त्रिया आडवे म्हणजेच नऊवारी किंवा बारावारी साड्या नेसतात. काही गुडघ्यापर्यंत तर काही पायाच्या अंगठ्यापर्यंत आडवे अंगाशी घट्ट असे लुगडे नेसतात. लुगड्याचे एक टोक उजव्या खांद्यावरून पाठीमागून घेऊन डाव्या अंगास कमरेला खोवतात. गावात मृत्यू झााल्यास या स्त्रिया अंगावर (पांढरी ओढणी) फडकी घेतात.

ह्या पारंपरिक पेहरावात आधुनिकीकरणामुळे बदल झाल्याने आता स्त्री व पुरूष दोघेही अत्याधुनिक वस्त्रे वापरताना दिसतात.

### ❖ आहार :—

कोळी समाज समुद्रकिनाऱ्याशी म्हणजेच मासेमारी व्यवसायाशी संबधित असल्याने भात, तांदळाची भाकरी व मासे हे त्यांचे मुख्य अन्न आहे. यांच्या आहारात मुख्यत: मांसाहार आढळतो. या व्यतिरिक्त मटण, सुकी मच्छी व

भाजीचाही समावेश असतो. आषाढी आमावस्या (गटारी) मांसाहाराचे भोजन करूनच साजरी केली जाते मद्यपान व मांसाहार हा या समाजास अतिशय प्रिय असा घटक आहे. मात्र गणपती, गौरी, होळी, दिवाळी यांसारख्या सणांना ते प्रामुख्याने शाकाहार घेतात. चपाती पेक्षा तांदुळाची भाकरी खाणे ते जास्त पसंत करतात तसेच यांचे जेवण तिखट असते. सद्य:स्थितीत आधुनिक पध्दतीच्या आहाराप्रती त्यांचा कल वाढलेला दिसून येतो. सद्य:स्थितीत आधुनिक पध्दतीच्या आहार घेण्याकडे त्यांचा कल वाढलेला दिसून येतो.

### ❖ मनोरंजन :—

बैलगाडीच्या व घोडागाडीच्या शर्यती, नाच, कुस्ती, कबड्डी, पोहणे, इ. त्यांच्या मनोरंजनाची साधने होती त्यातही प्रामुख्याने पत्ते म्हणजेच जुगार खेळणे त्यांचा आवडता खेळ असतो. कोणत्याही कारणास्तव ते हा खेळ खेळतांना सर्रास आढळतात. सद्य:स्थितीत मात्र इतर जाती प्रवर्गांच्या अनुषंगाने त्यांनी आपल्या मनोरंजनाच्या साधनांमध्ये बदल केला आहे. प्रामुख्याने टी. व्ही. व मोबाईल यांचा वापर आपल्या मनोरंजनासाठी करतांना ते दिसतात. प्रामुख्याने टी. व्ही. व मोबाईलचा वापर आपल्या मनोरंजनासाठी करतांना ते दिसतात.

### ❖ उत्पन्नाची साधने :—

मासेमारी करणारा तो कोळी या अर्थान्वये येथील कोळी समाज प्रामुख्याने मासेमारी हा व्यवसाय करताना दिसतो. पूर्वी हा समाज मासेमारी व्यतिरिक्त सैनिक किल्लेदार व लढाऊ जहाजांवर नाविक म्हणून काम करीत असे. आता समुद्रातील मासे पकडून त्यातील निवडक मासे वरसोली, थळ, मांडवा व रेवसमार्गे मुंबईस नेऊन विकणे हा व्यवसाय ते करतात. पूर्वी शार्क मासे समुद्रात सापडले तर त्यांच्या पोटाचा काही भाग वाळवून ते चीनला निर्यात करीत असत. याव्यतिरिक्त मच्छी पकडण्यासाठीची जाळी विणणे व ती विकणे, माशांचे खत बनवून विकणे, शेती करणे, मच्छी वाळवून ती सुकी मच्छी स्वरूपात विकणे यांसारखे इतर व्यवसायही ते पोट भरण्यासाठी करतात. शक्यतो घरातील कामे स्वत: करून घर चालवितात.

सद्यस्थितीचा विचार करता नोकरी, उद्योग व व्यवसाय याकडे हे लोक आकर्षित होताना दिसतात.

## ❖ सण — उत्सव :—

नारळी पौर्णिमा हा सण कोळी समाजात प्रामुख्याने व पारंपरिक पध्दतीने साजरा केला जातो. कोळी भाषेत या सणाला नारली पूनवेचा सन असे म्हटले जाते. त्यांचा मासेमारीचा व्सवसाय सर्वस्वी समुद्रावर अवलंबून असल्याने ते समुद्राला देव मानतात. साधारणपणे पावसाळ्याच्या दिवसात दर्या खवळलेला असल्याने मासेमारी बंद ठेवावी लागते त्यामुळे त्यांच्या पोटापाण्याचा प्रश्न निर्माण होतो. म्हणून नारळी पौर्णिमेच्या दिवशी प्रतिरूपी सोन्याचा नारळ सजवून त्याची दिमाखात मिरवणूक काढली जाते व कोळ्यांचा प्रमुख म्हणजे नाखव्याच्या हस्ते तो समुद्राला पुजा अर्चा करून अर्पण केला जातो. त्यानंतर समुद्र शांत होऊन यांचा व्यवसाय पुन्हा सुरू होतो असा या समाजाचा समज आहे. त्यामुळे या दिवशी ते अत्यानंदाने नाचत — गात व वाजत — गाजत जल्लोषाने हा सण साजरा करतात. यांचा दुसरा प्रमुख सण म्हणजे गौरी—गणपती. $१^{१}/_{२}$ , ५ ते १० दिवस हा सण मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. रोशनाई किंवा सुशोभिकरण या लोकांना फार प्रिय आहे. तसेच सणासुदीच्या दिवशी त्यांना आप्त स्वकीयांना जेवायला घालायला फार आवडते. या दिवसात नृत्य गायन करून त्यांचा सण साजरा केला जातो. याशिवाय त्यांचा प्रमुख व आवडता सण म्हणजे होळी. त्यांच्या भाषेत या सणाला हावलूबायचा सन असे म्हणतात. होळीभोवती रांगोळी व भरपूर पदार्थांच्या नैवेद्याचा घाट ते घालतात व संपूर्ण रात्रभर त्याच्या भोवतीने पारंपरिक गाणी म्हणून नृत्य करतात. या सर्व सणांना ते आनंदाने साजरे करतात तसेच सर्व सणांच्या दिवशी भरपूर शृंगार करून मोठ्या प्रमाणात सोन्याचे अलंकार घालून मिरवण्याकडे त्यांचा कल असतो.

याव्यतिरिक्त सद्यस्थितीत नवरात्र, दिवाळी, मकरसंक्रांती व गोकुळाष्टमी असे सणही ते फार आनंदात व उत्साहात साजरे करताना दिसतात.

## १३. कोळी समाजाची वैशिष्ट्ये :—

### १३.१ जातपंचायत :—

सोनकोळी जातीत पंचायतीसंघ आहेत. गावात एक किंवा अनेक तट किंवा थळे किंवा जमाती असतात. त्या प्रत्येकास गावपंचायत म्हणतात. कित्येक गाव मिळून एक संघ होतो. खाजगी निवाडे म्हणजेच परस्परातील भांडणे किंवा तंटे मिटवण्यासाठी जातपंचायत भरवली जाते. गावच्या कोळी पाटलाच्या अध्यक्षतेखाली सभेत सर्वमताने सामाजिक तंटेबखेडे सोडवित तर सार्वजनिक निवाडे संघाच्या पंचायतीपूढे निवडले जात. खाजगी निवाड्यांचा निकाल मान्य झाला नाही तर सरपाटलाकडे अपील करीत किंवा कोकणातील चार भागांची मिळून निर्माण झालेल्या सोनकोळी सार्वजनिक परिषदेत मांडले जात. वादाचा निकाल बहुमताने दिला जातो. प्रत्येक पंचायतीकडे थोडी स्थावर मालमत्ता व पैसे असून खर्चासाठी प्रत्येक घरातून दरवर्षी काही रक्कम वसूल करतात. पूर्वी बाल वाघ पाटील हा सरपाटील अलिबागला राहत असे व तो ठाणे जिल्ह्यापासून रत्नागिरी जिल्ह्यातील हर्णेपर्यंतच्या सोनकोळयांचा प्रमुख होता. त्यांच्या आजोबांचा भाऊ लई (लाय)पाटील आंगरे आरमारात प्रमुख पदावर होता.

### १३.२. पुनर्विवाह :—

या समाजात पूर्वीपासून पुनर्विवाहास मान्यता असल्याचे दिसते. पुरूष अथवा स्त्रिया या दोन्ही वर्गांना लग्नाबाबत स्वतंत्र निर्णयाची मुभा असलेली दिसते. त्यामुळे या समाजातील स्त्रियांना विवाहाशी संबंधीत अन्यायाला फार मोठ्या प्रमाणात सामोरे जावे लागत नाही. प्रामुख्याने विधवेचा विधुरासोबतच पुनर्विवाह केला जातो.

### १३.३. स्त्री वर्गाला प्राधान्य :—

या समाजातील पुरूष मासेमारी या व्यवसायासाठी बराच काळ घरापासून लांब समुद्रावर जात असल्याने संसाराची सर्व जबाबदारी या समाजातील

स्त्रियाच सांभाळतात. त्यामुळे या समाजाचे नेतृत्व येथील स्त्रियांच्या हाती असल्याचे दिसते. या समाजात स्त्रियांना मानाचे स्थान असल्याचेही दिसते.

### १३.४. साहसी वृत्ती:—

कोळी समाजातील पुरुषांना व्यवसायाच्या निमित्ताने सतत अमर्याद व खवळलेल्या समुद्राच्या सानिध्यात रहावे लागते तर स्त्रियांना पुरुषांच्या अनुपस्थीतीत एकटीला स्वबळावर घराची जबाबदारी उचलावी लागते. त्यामुळे कोळी समाजातील पुरुष व स्त्रिया या दोघातही साहसी वृत्ती प्रचंड प्रमाणात आढळते. कोणत्याही गोष्टीची जबाबदारी सहजपणे ते घेतात.

### १३.५. दैववादी :—

हे लोक दैववादी आहेत. विज्ञान व तंत्रज्ञानापेक्षा व्रत, वैकल्ये, नवस यावर त्यांचा भर असतो. तसेच भूतप्रेतांवर त्यांचा विश्वास असतो. त्यामुळे ते थोडे अंधश्रध्दाळू असल्याचे दिसतात.

### १३.६. सौंदर्य, शृंगार व अलंकार प्रिय :—

कोळी समाजातील लोकांना नटण्या सजण्याची प्रचंड आवड आहे. फक्त सणासुदीलाच नव्हे तर सर्वसामान्यपणे दैंनदिन जीवनातही ते सुंदर दिसण्याचा प्रयत्न करतात. त्यासाठी प्रसंगी ते उसनवारीही करतात. सौंदर्य, शृंगार व अलंकार या तीनही त्यांच्या आवडत्या गोष्टी. कोळी समाजात सोन्याचे दागिने वापरण्याकडे विशेष कल असलेला दिसतो. यात प्रामुख्याने कर्णभूषणे, गळ्यातले दागिने व बांगड्या या स्त्रियांचे तर चेन, साखळी, कडे व अंगठी हे पुरूषांचे आवडते दागिने असलेले दिसतात. दागिना भारदस्त असण्याकडे त्यांचा ओढा असल्याने आकाराने, वजनाने व उंचीने हे दागिने मोठे असतात. त्यातही त्यांचे मत्स्यप्रेम अतिशय विशेषत्वाने दिसते कारण कोळंबी, पापलेट, खेकडे अथवा साधारण माशांचा आकार असलेले दागिने अंगावर परिधान करण्यास त्यांना फार आवडते. नाकात सुध्दा चमकी मोठी व शक्यतो माशाच्या आकाराची घालणे त्या पसंत करतात. पायात पैंजण व बोटात फेरवी घालण्याचे प्रस्थ यांच्यात दिसत नाही. आजही त्यात प्रचंड प्रमाणात फरक पडलेला दिसत

नाही. उदाहरणादाखल प्रबंधात त्यांचे छायाचित्र दिलेले आहे. कपाळावर अथवा हातावर गोंदवून घ्यायला त्यांना आवडते. कपाळावर स्त्रिया मोठ्या आकाराचे कुंकू लावतात. जेवढे कुंकू मोठे तेवढे नवऱ्याचे आयुष्य जास्त असा पूर्वीपासून त्यांचा समज आहे.

## क. आगरी व कोळी समाजातील साधर्म्य स्थळे

अशाप्रकारे दोन्ही समाजाचाबाबातची पारंपरिक माहिती अभ्यासल्यानंतर सर्वेक्षणाअंती या दोन्ही समाजाबाबत जी साधर्म्ये आढळली ती नमूद करणे आवश्यक वाटते. आगरी समाजाचा मुख्य व्यवसाय शेती असून आवश्यकतेनुसार ते मासेमारी करतात. तर कोळी समाजाचा प्रमुख व्यवसाय मासेमारी असून ते आवडीनुसार शेतीही करतांना आढळतात. एकंदरीतच या मासेमारीमुळे त्यांच्यात बऱ्याच अंशी समानता आढळते तसेच त्यांच्या दैनंदिन जीवनातील वस्तू, साधने भांडी यांच्यातही साम्य आढळते. त्यातूनच त्यांच्यात ऐक्य निर्माण होऊन त्यांच्या संस्कार व रूढी, परंपरा, चालीरिती यांच्यात संमिश्रण घडून आले. आता तर त्यांच्या लग्नपध्दती मनोरंजनाची साधने व नृत्य, गायन यातही समानता आढळून येते. या साधनांव्यतिरिक्त जेवण करतांना अथवा दैनंदिन वापरातील त्यांच्या पारंपरिक वस्तूही वैशिष्ट्यपूर्ण होत्या. पूर्वी हे लोक मातीची भांडी वापरत आता धातूची भांडी वापरत असली तरी मडके, विळी, यांसारख्या वस्तू अजूनही वापरात आहेत. याबाबत सौ. सुचिता थळे यांनी आपल्या चूल या पुस्तकात तर साहित्यीक श्री. शंकर सखाराम यांनी दै. कृषीवल मधील सांदिकोपरा या लेखमालेत या वस्तूंबाबत चर्चा केलेली आहे.[६६]

### १. मासेमारीची साधने

- **पाग :**

पाग म्हणजे ५ ते ६ फुट लांबी, रूंदीचे गोल निमुळते होत गेलेले जाळे हा पाग बांबूच्या लहान पट्टीने विणतात. पाग पाण्यावर समांतर पसरलेला रहावा म्हणून पागाच्या सभोवती शिशाच्या गोल किंवा चौकोनी गोळ्या

गोलाकाररित्या बांधल्या जातात. पागाच्या खालचा थोडा भाग उलट्या पध्दतीने बांधलेला असतो. त्यामुळे त्यात मासे अडकून राहतात.

- **येन्डी :**

साधारणपणे १५ ते २० फुट लांबीची आयताकृती आकाराची मजबूत धाग्याने विणलेली येन्डी असते. हिच्या दोन्ही बाजूला जडत्वासाठी लहान बांबूची काठी बांधलेली असते.

- **घोळवा :**

याचे दोन प्रकार असतात. १. घोळवा २. हातघोळवा. बांबूच्या चीपांना बेचकी सारखा आकार देऊन त्यावर त्रिकोणी आकाराचे जाळे बसवितात. हे जाळे दोरीने चिपांना बांधून घेतात . घोळण्याचा पुढील पसरट भाग मोकळा अर्धवर्तुळाकार असतो. याचा मध्यभाग खोलगट असून तो पाण्यावर तरंगू नये म्हणून जडत्वासाठी शिशाच्या गोळ्या बसवितात. घोळवा मोठा असल्याने २ ते ४ व्यक्ती मिळून मासे पकडतात. तर हात घोळवा लहान असल्याने एका व्यक्तीला तो हाताळता येतो.

- **आखा / आसू :**

बांबूला किंवा लोखंडी सळईला गोल आकार देऊन त्यावर हाताने विणलेले जाळे पसरवितात. ते जाळे मजबूत पणे वर्तुळाकार आख्याला बांधून घेतात. समोरून याचा आकार पसरट असून खाली थोडा निमुळता होत जातो.

- **झिला :**

आखा किंवा आसू सारखीच झिल्याची रचना असते. फक्त याला जे जाळे वापरतात ते पूर्वी कापडाचे असे. आता त्यात अतिशय तलम व बारीक विण असलेले जाळे वापरतात. हे खाली टोकाला खूप निमुळते होत जाते. याचा वापर प्रामुख्याने रेपा (कोलंबीची नुकतीच जन्मलेली पिल्ले) ही मच्छी पकडण्यासाठी केला जातो.

* **पगोली :**

यालाच पगोट्या किंवा झांजा असेही म्हणतात. ह्याला आख्यांसारखे गोल परंतु दोन फूट खोलगट अशी जाळी विणतात. बांबू किंवा लोखंडी गाडा घेऊन त्या गाड्याला चारी बाजूंनी मजबूत दोऱ्याने जाळे बांधतात. या गोलाला तीन बाजूला दगड बांधून त्याच्यावर मध्यभागी लांब दोरी बांधतात. याचा वापर प्रामुख्याने खेकडे किंवा चिंबोरी पकडण्यासाठी केला जातो.

* **आगटा:**

आगटा हा साधारण आसूप्रमाणेच अडीच मीटर लांब विणलेला हा असतो. समुद्रात मासे पकडण्यासाठी वापरतात तो आगटा आकाराने मोठा असतो. तर खाडीतील मासे पकडण्यासाठी उपयोगात आणतात. तो आगटा लहान असतो.

* **बोसकी :**

खाडीच्या पाण्यात उघडीवर यांचा वापर मासे पकडण्यासाठी केला जातो. चौकोनी आकाराचे लांब असे हे जाळे विणलेले असते. टोकाला याचा आकार निमुळता होत जातो.

* **बगळी :**

बोसकीतील मच्छी बगळी मध्ये एकत्रित केली जाते. त्यामुळे निमुळत्या होत गेलेल्या जाळ्याला गोल तार बांधून बांबूच्या चिपांची बगळी विणतात. याचा आकार दोन्ही टोकाला निमुळता होत जाऊन मध्यभागी फुगीर ठेवलेला असतो.

* **गळ :**

गळ पोलाद किंवा लोखंडापासून बनवितात. हुकाच्या आकाराचा धारदार टोकाचा गळ तंगूसाला घट्ट बांधला जातो. हा तंगूस बांबूच्या किंवा इतर झाडाच्या मजबूत काठीला बांधला जातो. किरकोळ मासेमारीसाठी याचा वापर केला जातो.

- **मुरलूका / मुरलूकी :**

पकडलेली मच्छी ठेवण्यासाठी याचा वापर केला जातो. बांबूच्या चिपांचा वापर करून साधारण लहान मडक्याच्या आकाराचे हे साधन बनविले जाते. यात पकडलेली मच्छी ठेवल्यास ती खूप वेळ जिवंत राहते. आकाराने मोठे असते त्यास मुरलूका तर लहान असते त्यास मुरलूकी असे म्हणतात. याला दोरीने बांधून हातात पकडता येईल अथवा कमरेला बांधता येईल अशा पध्दतीची रचना केली जाते.

## २.**दैनंदिन वापरातील पारंपरिक वस्तू**

- **१.२४.१ तवी —**

मातीच्या खोलगट आकाराच्या पातेल्याला तवी म्हणत. यात मच्छीचे कालवण केले जाई.

- **जोगली —**

मातीची लहान परातीच्या आकाराची गोल वस्तू म्हणजे जोगली. याचा वापर ताटासारखा जेवणासाठी करीत. लहान जोगलीला नातू म्हणत.

- **खापरी / ठिकरा —**

खापरी / ठिकरा म्हणजे मातीचा तवा. गोल खोलगट ताटाच्या परिघाएवढी खापरी असायची. याचा वापर भाकरी अथवा खाद्यपदार्थ भाजण्यासाठी केला जाई.

- **ढापणी—**

तवीला झाकण म्हणून ढापणीचा उपयोग करीत. गोलाकार ढापणीच्या कडांना सुंदर नक्षी काढलेली असे.ढापणीच्या मध्यभागी नक्षीदार लहान असा चपटा गोल असे.

- **सरोवर —**

हे पूर्ण वर्तुळाकार परातीच्या आकारासारखे मात्र परातीपेक्षा खोलगट असे

मातीचे भांडे असते. याचा उपयोग पीठ मळून भाकरी करण्यासाठी तसेच मसाल्याचे पदार्थ भाजण्यासाठी केला जाई.

- **भानवली —**

सरोवरापेक्षा लहान असलेले मातीचे भांडे म्हणजे भानवली. याचा उपयोग घावण व पोळे हे तांदुळाचे पीठाचे खाद्यपदार्थ बनविण्यासाठी केला जाई.

- **मुंडा—**

मातीच्या लहान मडक्याला मुंडा म्हणत. यात भात किंवा भाताची पेज केली जाई. मोठ्या मुंड्यात कैरी, आवळे, आंबाडे यांसारखी फळे मीठामध्ये खारवून ठेवली जात.

- **डाव—**

ही करवंटीची बनवलेली असायची. तिचा आकार खोलगट पळीसारखा असून ही अर्ध्या फूट बांबूच्या काठीला बांधलेली असते. डावेपेक्षा मोठ्या आकाराचा डवला असतो. तो लग्नप्रसंगी केल्या जाणाऱ्या जेवणात वापरला जातो.

- **शेवट किंवा सवाटण—**

एक फूट लांबी रूंदीच्या साग किंवा शिसव या लाकडाच्या तुकड्याला शेवट किंवा सवाटण असे म्हणतात. मासे अगर मटण, चिकनचे तुकडे करण्यासाठी सवाटणाचा वापर केला जातो.

- **रांजण—**

मडक्याच्या आकाराचे वर खाली निमुळते होत गेलेले, मध्यभागी घेर असलेले मातीचे भांडे म्हणजे रांजण. याचा वापर प्रामुख्याने घरातील वर्षभराचे तांदूळ साठविण्यासाठी केला जाई.

- **उतव—**

काथ्याच्या दोऱ्याने बांधलेल्या २ फुट लांबी रूंदीच्या बांबूच्या चिपांच्या

चौकोनाला उतव म्हणतात. हे स्वयंपाक खोलीत चुलीच्या वर बांधून ठेवत. याचा वापर खाद्यपदार्थ वाळवण्यासाठी किंवा ठेवण्यासाठी केला जाई.

- **पाटका—**

वेळू / बांबूच्या चिपांची गोल आकाराची मध्यम अशी टोपली म्हणजे पाटका. भाकरी, घावण, पोळे इ. खाद्यपदार्थ ठेवण्यासाठी याचा उपयोग केला जाई.

- **सुप — सुपली —**

सुप — सुपली हे बांबूच्या पट्ट्यांनी बनवले जाई. सुप मोठे असते तर सूपली लहान असते. यांचा वापर तांदूळ, भात, कडधान्ये इ.गोष्टी पाखडण्यासाठी केला जातो.

- **कणगा — कणगी —**

बांबूच्या चिपांचा आठ ते दहा मीटर लांब व तीन मीटर रूंदीचा विणलेला तरट म्हणजे कणगा. कणगा आकाराने मोठा तर कणगी आकाराने लहान असते. यामध्ये शेतातून आणलेला भात अथवा तांदूळ साठवला जाई.

- **मोरली — मोरवी— विळी —**

दोन फूटाच्या आयताकृती फळीला लोखंड किंवा पोलादाचे पाते वापरुन मोरली बनविली जाई. या पात्याच्या वरती गोलाकार आटे पाडलेले असत. त्याचा उपयोग नारळ खोवण्यासाठी खवणी म्हणून तर विळीचा उपयोग मासे व भाजी कापण्यासाठी केला जाई.

- **मातीची चूल —**

जेवण बनविण्यासाठी प्रामुख्याने चुलीचा वापर केला जाई. चूल बनविण्यासाठी शेतातील विशिष्ट प्रकारची राबलेली माती वापरत. चूल दोन आखी किंवा तीन आखी असत. लाकडे जाळण्यासाठी चुलीच्या मध्यभागी

बाजूला छिद्र ठेवत याला वऊल म्हणत तर चुलीवरच्या सपाट भागाला भानस म्हणत.

- **शिका—**

काथ्याच्या दोरीची गोल आकाराने विणून ठेवलेली वस्तू म्हणजे शिका. हा शिका चुलीवर टांगून ठेवत. यात शिल्लक राहिलेले अन्न ठेवले जाई.

- **पाटा आणि वरवंटा —**

पाटा आणि वरवंटा ह्या वस्तू दगडी असत. पाट्याचा आकार लांबट असे. यांचा वापर वाटण वाटण्यासाठी केला जाई. तसेच बारश्याच्या दिवशी बाळाच्या आधी पाळण्यात वरवंट्याला ठेवतात. तर लग्नात पाट्याचे पुजन केले जाते.

- **जाते — जातीण —**

जाते — जातीण हे दगडाचे बनवलेले असे. भात, तांदूळ व कडधान्य इ. गोष्टी दळण्यासाठी याचा वापर केला जाई.

- **उखळ — मुसळ —**

उखळ म्हणजे दगडाचा खोलगट भाग अंगणात खोल पुरून ठेवत. यात जेवणासाठी लागणाऱ्या साहित्याचे तुकडे करण्यात येई. त्यानंतर लाकडाची उखळ करून वापरण्यात येवू लागली. यात धान्य कांडण्याचे काम केले जाई.

- **रोवली — रवली —**

रोवली म्हणजे बांबूच्या चिपांचे किंवा पत्र्याचे भोक पाडलेले लांबट भांडे असते. याचा वापर तांदळाच्या कण्या किंवा धान्य धुण्यासाठी केला जातो.

## ३. साधर्म्यस्थळे —

मासेमारी व दैनंदिन व्यवहारोपयोगी साधने या व्यतिरिक्त अनेक गोष्टींमध्ये त्यांच्यात बहुतांशी साम्य आढळते. यात त्यांचे मत्स्यप्रेम आहे. दोन्ही

समाजातील आहारात भात, भाकरी व मासे हे अत्यावश्यक घटक आहेत. पोशाखाच्या बाबतीत विचार करताना लक्षात येते की या दोन्ही समाजाचा पारंपरिक पोशाख हा त्यांच्या व्यवसायानुरूप असल्याने तोही सारखाच दिसतो. स्त्रियांचे लुगडे नेसण्याची पध्दती सारखी असून आगरी स्त्रिया बहुतांशी गुडघ्यापर्यंत तर कोळी स्त्रिया गुडघ्याखाली लांब अशी साडी नेसतात. तर पुरूष लंगोट व पैरण असाच पोशाख करत असत. मनोरंजनाच्या बाबतीतही पत्ते खेळणे, बैलगाड्यांच्या शर्यती  इतर खेळ ह्यात साधर्म्य आढळते. याशिवाय एकविरा, खंडोबा, ग्रामदेवता, गणपती या देवतांचे हे दोन्ही समाज भक्ती करून उत्सव साजरे करतात. त्यांच्या लग्नपध्दतीतही साम्य आढळते. प्रामुख्याने हळदीची रात्र व विधी हे बहुतांशी सारखेच असतात.

थोडक्यात पारंपरिकतेच्या दृष्टीकोनातून आढावा घेतल्यास अलिबाग तालुक्यातील राहणाऱ्या आगरी व कोळी समाजाच्या जीवनपध्दतीत बरेच साम्य आढळून येते.

## टीपा


१. बी. एम. कऱ्हाडे, *शास्त्रीय संशोधन पध्दती,* पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, २००७, पृ. ५०३.

२. बाबाजी विश्वास चव्हाण, *रायगड जिल्ह्यातील मच्छिमार सहकारी सोसायट्यांच्या कार्यांचा विश्लेषक अभ्यास,* पीएच. डी. प्रबंध, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, २०११, पृ. २१.

३. सुनिल मायी, *सामाजिक संशोधन प्ध्दती,* डायमण्ड पब्लीकेशन, २००८, पृ. १६२.

४. जी. आर. १०/२००६/प्र. क्र. ५, मावक ५, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, मुंबई, महाराष्ट्र शासन, २५ मे २००६.

५. कऱ्हाडे, पूर्वोक्त, पृ. २५३.

६. प्रदीप आगलावे, *समाजशास्त्र – संकल्पना आणि सिध्दांत,* श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००९, पृ. ८१.

७. के. यु. घोरमोडे, क. कृ. घोरमोडे, *शैक्षणिक समाजशास्त्र,* विद्या प्रकाशन, नागपूर, २०१०, पृ. ३४.

८. कित्ता, पृ. ३५.

९. आगलावे, पूर्वोक्त, पृ. ८२.

१०. म. बा. कुंडले, *शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र,* विद्या प्रकाशन, पुणे, २००३, पृ. ६४३.

११. घोरमोडे, पूर्वोक्त पृ. ७०.

१२. आगलावे, पूर्वोक्त, पृ. १४७.

१३. Iravati Karve, *Maharashtra state gazetteer – Land and its People,* Bombay, 1986, p.n. 83.

१४. रा. ज. लोटे, *भारतीय सामाजिक सरंचना आणि सामाजिक समस्या,* पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, पृ. ४.

१५. घोरमोडे, पूर्वोक्त, पृ. ७०.

१६. प्रदिप आगलावे, *आदिवासी समाजाचे समाजशास्त्र,* साईनाथ प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती, जुलै २००३, पृ. ७६.

१७. कि. का. चौधरी (संपा), *महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर (रायगड जिल्हा),* महाराष्ट्र राज्य शासन, मुंबई, १९९३, पृ. २३७.

१८. मुरलीधर म्हात्रे, *आगरी समाजाचा इतिहास,* सुयोग प्रकाशन, पेण, २००५, पृ. २१.

१९. प्र. के. घाणेकर, *भटकंती रायगड जिल्ह्याची,* स्नेहल प्रकाशन, पुणे, एप्रिल २००७, पृ. ३४.

२०. मिलिंद बोकील, भरती ओहोटी, *जनाचे अनुभव पुसतां,* मौज प्रकाशन, मुंबई, २००२, पृ. १४०.

२१. गोपीनाथ बालाजी मोकल, *आगरी समाज शोध आणि बोध,* काशिबाई गोपीनाथ मोकल, जुलै १९९६, पृ. १०.

२२. श्री. व्यं. केतकर, *महाराष्ट्रीय ज्ञानकोष,* विभाग ७, महाराष्ट्रीय ज्ञानकोष मंडळ, पुणे, पृ. ५०.

२३. दीपक म्हात्रे, महाराष्ट्राबाहेरील आगरी समाज, *साप्ताहिक विवेक,* आगरी विशेषांक, मुंबई, मार्च २००३, पृ. १२३.

२४. D. N. Kale, *Agri – Sosio Economic Survey*, Ph.d. Thesis, Bombay University, 1950, p.n. 13.

२५. चौधरी (संपा), पूर्वोक्त, पृ. २३९.

२६. का. ध. पाटील, आगरी संस्कृतीतील एक अमूल्य ठेवा अर्थात धवळे, *मासिक आगरी दर्पण,* जे. डी. तांडेल, मुंबई, मार्च—एप्रिल २०१२, पृ. ३.

२७. केतकर, पूर्वोक्त, पृ. ५१.

२८. मोकल, पूर्वोक्त, पृ. १६.

२९. शंकर पाटील, *आगरी समाजाचा उगम आणि विकास,* (समा.), मुरलीधर म्हात्रे, पूर्वोक्त, पृ. ६३.

३०. पूर्वा अष्टपुत्रे, *आगरी बोलीचा भाषा—वैज्ञानिक अभ्यास,* पीएच. डी. प्रबंध, मुंबई विद्यापीठ, २००६, पृ. २.

३१. शंकर सखाराम, आगरी समाज, (समा.), पूर्वोक्त, पृ. १२७.

३२. ए. टी. पाटील, (समा.), आगरी जातीची जडणघडण, म्हात्रे, पूर्वोक्त पृ. २१.

३३. पहा : प्रगती पाटील, आगरी लग्नपध्दतीतील धवळ्यांची परंपरा, *संशोधन,* सातारा संशोधन मंडळ, सातारा, २०१३.

३४. दीपक म्हात्रे, अवीट गोडीची धवळे, *मासिक आगरी दर्पण,* जे. डी. तांडेल, मुंबई, मार्च —एप्रिल २०१२, पृ. २.

३५. का. ध. पाटील, *मासिक आगरी दर्पण,* पूर्वोक्त पृ. ३—५.

३६. काशिनाथ मढवी, *उत्तर कोकणातील आगरी गोत्र गंगा,* जाणिव प्रकाशन, मुंबई, २०१३, पृ. २१३.

३७. वासंती ठाकूर, *पारंपरिक आगरी गीतातील भावसौंदर्य,* श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, पनवेल, २००८, पृ. ३.

३८. मुलाखत — गंगाधर जोमा पाटील — ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, दिनांक १४ नोव्हेंबर २०१२.

३९. लक्ष्मणशास्त्री जोशी (संपा), *मराठी विश्वकोष खंड २,* भारतीय संस्कृती मंडळ, मुंबई, १९७६, पृ. २८.

४०. गुरुनाथ नाडगोंडे, *भारतीय आदिवासी,* कॉन्टीनेंटल प्रकाशन, पुणे, १९७९, पृ. ८.

४१. *शिक्षण संक्रमण,* महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे, २०१०,पृ. क्र. ३३.

४२. एस. जी. देवगांवकर, *महाराष्ट्रातील निवडक जाती—जमाती,* श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००९, पृ. २३७.

४३. महादेवशास्त्री जोशी (संपा.), *भारतीय संस्कृतीकोश,* खंड दुसरा, अनमोल प्रकाशन, पुणे, १९९९, पृ. ५९०.

४४. *कोळी बोली – एक शैक्षणिक प्रश्न व उकल,* भाषा विकास प्रकल्प, शिक्षण विभाग, बृहन्मुंबई, महानगरपालिका, १९८३, पृ. ६.

४५. देवगांवकर, पूर्वोक्त, पृ. २३८.

४६. गोविंद गारे, *सह्याद्रीतील आदीवासी – महादेव कोळी,* सहाध्ययन प्रकाशन, मुंबई, १९७४, पृ. २९.

४७. नलिनी पिचड, *महादेव कोळी समाजाच्या शैक्षणिक प्रगतीवर त्यांच्या आर्थिक, सामाजिक स्थितीचा होणारा परिणाम,* पीएच. डी. प्रबंध, पुणे विद्यापीठ, २००६, पृ. १६.

४८. गारे, पूर्वोक्त, पृ. ३१.

४९. चौधरी ( संपा.) पूर्वोक्त, पृ. २३४.

५०. देसगांवकर पूर्वोक्त, पृ. २३७.

५१. केतकर, पूर्वोक्त, पृ. ८३१ – ८३२.

५२. *कोळी बोली – एक शैक्षणिक प्रश्न व उकल,* पूर्वोक्त पृ. १७.

५३. देसगांवकर, पूर्वोक्त, पृ. २३७.

५४. भालचंद्र आकलेकर, *कोकणचा सांस्कृतिक इतिहास,* नवभारत प्रकाशन, मुंबई, २००३, पृ. १८१.

५५. देसगांवकर पूर्वोक्त, पृ. २३८.

५६. चौधरी, पूर्वोक्त, पृ. २३७.

५७. देसगांवकर, पूर्वोक्त , पृ. २३९.

५८. चौधरी, पूर्वोक्त, पृ. २३९.

५९. एस. जी. घुर्ये, *दि महादेव कोळी,* पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६३, पृ. १०.

६०. मिलींद बोकील, *कातकरी –विकास की व्यवस्थापन,* मौज प्रकाशन, मुंबई, २००६, पृ. ६३.

६१. चौधरी, पूर्वोक्त, पृ. २३६.

६२. देसगांवकर, पूर्वोक्त, पृ. २३८.

६३. चौधरी, पूर्वोक्त पृ. २३४.

६४. केतकर, पूर्वोक्त, पृ. ८३५.

६५. देसगांवकर पूर्वोक्त , पृ. २३७.

६६. अधिक माहितीसाठी पहा:

१.सुचिता थळे, चूल, राहूल थळे, अलिबाग, २०१२.

२.सांदिकोपरा, दै. कृषीवल, २००२.

# प्रकरण दुसरे

# सैध्दांतिक पार्श्वभूमी

# २.सैध्दांतिक पार्श्वभूमी

## २.१ प्रस्तावना

पहिल्या प्रकरणामध्ये आगरी व कोळी समाजाच्या पारंपरिक स्वरुपाबद्दल अभ्यास करण्यात आलेला आहे. त्यामुळे प्रबंधाच्या शीर्षकानुसार जागतिकीकरण या संकल्पनेबाबत सविस्तर चर्चा करणे आवश्यक ठरते. तेव्हाच जागतिकीकरणाचा आगरी आणि कोळी समाजावर झालेल्या परिणामांचा तौलानिक अभ्यास मांडणे शक्य होईल. त्यामुळे सदर प्रकरणात जागतिकीकरण ही संकल्पना त्याच्या गुण दोषांसह स्पष्ट करण्यात आलेली आहे.

जागतिकीकरण ही संकल्पना खाजगीकरण व उदारीकरण या संकल्पनांसहित स्पष्ट करणे सयुक्तिक ठरेल कारण या गोष्टी एकमेकांशी सहसंबंध असणाऱ्या आहेत. विसाव्या शतकाच्या अखेरीची आणि एकविसाव्या शतकातील एक अतिशय महत्त्व पूर्ण संकल्पना म्हणजे खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण होय. या संकल्पनेस जगाच्या आर्थिक उत्क्रांतीची परमावधी असे मानले जाते. अलीकडे जागतिक स्तरावर अनेक देशांच्या अर्थव्यवस्थेत खाजगीकरण (Privatisation), उदारीकरण (Liberalisation) व जागतिकीकरण (Globalisation) या तीनही संकल्पना एकत्रित अंमलात आणण्याचा प्रयत्न केला जातो.

## २.२ नवीन आर्थिक धोरण

सन १९८० नंतर अनेक देशांनी खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण या संकल्पनांच्या आधारावर आपल्या देशाचा आर्थिक विकासही घडवून आणला आहे. भारत हा लोकशाहीप्रणित शासनप्रणालीचा देश असला तरी १९९० पर्यंत येथे समाजवादी दृष्टीकोनातून आर्थिक विकास साधण्याचा प्रयत्न केला गेला. सामाजिक क्षेत्रावर लक्ष केंद्रित करुन विकासाचा वेग वाढविण्याचाही प्रयत्न करण्यात आला परंतु याच कालावधीत रशियांत घडून आलेल्या घटनांमुळे समाजवादाच्या विचारसरणीची पिछेहाट झाली. त्याचवेळी

आंतरराष्ट्रीय संस्था, अमेरिका, पाश्चिमात्य देश, भांडवलदारांच्या प्रबळ शक्तीचा प्रभाव, देशावर आलेल आर्थिक संकट, देशातील सार्वजनिक उद्योगांचे अपयश, राज्यकर्त्यांची व्यावहारिक लवचिकता व देशांतर्गत परिस्थितीचा रेटा या सर्व कारणांमुळे देशात १९९१ पासून अर्थव्यवस्थेमध्ये रचनात्मक बदल करण्याच्या उद्देशाने नवीन आर्थिक सुधारणांचा कार्यक्रम सुरु करण्यात आला. २४ जुलै १९९१ रोजी केंद्रसरकारने नवीन औद्योगिक धोरणाची घोषणा केली. या धोरणाचे मुख्य ध्येय भारतीय उद्योग क्षेत्राचे उदारीकरण करणे हे होते. या धोरणाची महत्त्वाची उद्दिष्टे व वैशिष्ट्ये प्रा. ठक्कर के. एच व प्रा. भोसले के. एम, प्रा. काटे के. बी., यांनी आपल्या अनुक्रमे 'भारतीय अर्थशास्त्र' व 'भारतीय अर्थव्यवस्था' या पुस्तकांमध्ये पुढील प्रमाणे सांगितली आहेत.[१]

## २.२.१ नवीन आर्थिक धोरणाची उद्दिष्ट्ये —

१. आंतरराष्ट्रीय स्पर्धेला तोंड देणे
२. आर्थिकदृष्टट्या मागास विभागाचा विकास करणे.
३. भारतीय उद्योगांना पाश्चात्त्य देशातील उद्योगांशी स्पर्धा करु शकण्याइतपत सक्षम करणे.
४. उत्पादनाच्या साधनसामुग्रीचा पर्याप्त वापर करणे.
५. उत्पादक रोजगारामध्ये वाढ करणे.
६. औद्योगिक विकासाचा वेग वाढविणे.
७. औद्योगिक संरचनेमधील अनिष्ट प्रवृत्तींचे निर्मूलन करणे.

## २.२.२ नवीन आर्थिक धोरणाची वैशिष्ट्ये —

१. सार्वजनिक क्षेत्रांचा संकोच होणे.
२. परवाना पध्दतीत अमूलाग्र बदल होणे.
३. विदेशी भांडवलाची गुंतवणूक होणे.
४. विदेशी तंत्रज्ञान उपलब्ध होणे.
५. सार्वजनिक क्षेत्राचे निर्गुंतवणूकीकरण होणे.
६. मक्तेदारी नियमन कायद्यामध्ये सुधारणा करणे.

७. नवीन उद्योगांसाठी परवाना देणे.

८. कर्ज भागभांडवलामध्ये परिवर्तित करण्याची तरतुद रद्द होणे.

९. उत्पादन प्रक्रिया वाढणे.

थोडक्यात परकीय चलनाचे कमी होणारे प्रमाण वाढवणे व हाताबाहेर जाऊ पाहणारी सरकराची वित्तीय तूट आटोक्यात आणणे ही दोन मुख्य आणि तात्कालीक उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून आर्थिक पुनर्रचनेचा कार्यक्रम १९९१ मध्ये अंमलात आणण्यात आला.

## २.३ ‘खाजगीकरण’

जगामध्ये खाजगीकरणाची लाट निर्माण झाल्यानंतर त्याचा परिणाम भारतातही निर्माण झाला. जगातील जागतिकीकरणाशी तुलना करता भारतात खाजगिकरणाची प्रक्रिया सुरू होऊन अगदी अल्पकाळ लोटला आहे. स्व श्री. राजीव गांधींनी १९८० मध्ये पंतप्रधान पदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर भारतात खाजगीकरणाची निर्मिती झाली. त्यावेळी म्हणजे १९९१ साली भारतात दिवंगत पंतप्रधान श्री. पी. व्ही. नरसिंहराव व तत्कालीन अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांनी नवीन आर्थिक धोरण या नावे एक मसूदा तयार करुन त्याला संसदेकडून मान्यता मिळवून दिली. त्या अनुषंगााने देशाच्या अंतर्गत प्रगतीसाठी १९९१ पासून भारतात नवीन आर्थिक सुधारणांचा कार्यक्रम राबविण्यात आला. या धोरणामध्ये उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण या ३ प्रमुख गोष्टींचा अंतर्भाव होता. नवीन आर्थिक धोरणात खाजगीकरणाला महत्त्वाचे स्थान आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशाचा जलद आर्थिक विकास साध्य करण्यासाठी व सामाजिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सार्वजनिक क्षेत्राला महत्त्व देण्यात आले. परंतु १९४७ ते १९९० पर्यत या क्षेत्रातील उद्योगांची कामगिरी निराशाजनक झाली. त्यामुळे सरकारला सार्वजनिक क्षेत्राचा संकोच करण्यासाठी विशेष उपाययोजना करणे जरुरीचे झाले. ह्या उपाययोजनेलाच खाजगीकरण असे म्हणतात. थोडक्यात सार्वजनिक क्षेत्रामधील उद्योगांकरिता राखून ठेवलेले क्षेत्र

खाजगी क्षेत्रामधील उद्योगांना खुले करण्याच्या प्रक्रियेला खाजगीकरण म्हणता येईल.

लोकप्रशासन, अर्थकारण व सरकारी धोरण या मध्ये सध्या 'खाजगीकरण' हा परवलीचा शब्द झाला आहे. खाजगीकरण म्हणजे अर्थव्यवस्थेचे खाजगीकरण. १९७० नंतर खाजगीकरणाच्या प्रक्रियेला वेग येऊन जगातील अनेक देशांना खाजगीकरणाचे धोरण जागतिक बॅंक, नाणेनिधी व अमेरिका या त्रिसुत्रींच्या दबावामुळे स्वीकारावे लागले आहे.[२] सन १९६९ मध्ये पीटर ड्रकर या व्यवस्थापन तज्ञाने त्याच्या The Age of Discontinuty या प्रसिध्द ग्रंथात प्रथमतः 'पुनर्खाजगीकरण' (Re – Privatisation ) हा शब्द वापरला पण सन १९७६ मध्ये रॉबर्ट पूल यांनी त्यालाच 'खाजगीकरण' हा सुटसुटीत शब्द वापरला. प्रा. इ. एस. सव्हास यांच्या सन १९८९मधील Privatisation – the Leey of Better Government या पुस्तकाने खाजगीकरणाच्या विचारांच्या सर्वांगिण विकासाला चांगलाच फायदा झाला. तसेच फेब्रुवारी, १९८६ मध्ये 'युनायटेड स्टेट्स फॉर इंटरनॅशनल डेव्हलपमेंट' या संस्थेने वॉशिंग्टन मधील सिक्योआ इन्स्टिट्यूट येथे एक आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित केली होती. तेथे मांडण्यात आलेल्या खाजगीकरणाच्या निबंधावरुन प्रसिध्द करण्यात आलेल्या ग्रंथामध्ये लेखकांनी खाजगीकरणाची संकल्पना विस्तृतपणे मांडली. विशेषतः १९८०ते १९९०या काळात खाजगीकरणाच्या प्रक्रियेने देशामधील वेगवेगळ्या अर्थव्यवस्थेत कसा बदल झाला याची चर्चा करण्यात आली आहे.[३] भारतासारख्या मिश्र अर्थव्यवस्था स्वीकारलेल्या देशातील सरकारी उद्योगात प्रचंड गुंतवणूक झाली आहे. मात्र या उद्योगांच्या अपयशाने भारतात खाजगीकरणाच्या संकल्पनेवर चर्चा सुरू झाली. पुढे आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांच्या दबावाने भारताला खाजगीकरणाचा स्वीकार करावाच लागल्याने भारताने अनेक मार्गांनी खाजगीकरणाचे धोरण राबविण्यास सुरूवात केली आहे.

## २.३.१ खाजगीकरणाच्या व्याख्या

सार्वजनिक क्षेत्रामधील उद्योगांची मालकी, त्यांचे व्यवस्थापन व नियंत्रण

खाजगी क्षेत्रातील उद्योजकांना हस्तांतरित करण्याची प्रक्रिया म्हणजे खाजगीकरण होय.

देशाच्या अर्थव्यवस्थेत खाजगी क्षेत्राला आर्थिक उपक्रम संपूर्णपणे किंवा मोठ्या प्रमाणात करण्यास मुभा देणे म्हणजे अर्थव्यवस्थेचे खाजगीकरण करणे होय.[४]

संकुचित अर्थाने खाजगीकरण म्हणजे सार्वजानिक क्षेत्रातील उद्योगांच्या मालकीवर खाजगी मालकी प्रस्थापित करणे होय. तथापी, विस्तृत अर्थाने खाजगी मालकीशिवाय खाजगी व्यवस्थापन प्रस्थापित करणे आणि सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांवर नियंत्रण ठेवणे हा अर्थ सूचित होतो.

खाजगीकरण म्हणजे विशेषकरून मालकी अगर नियंत्रण सरकारी स्वरूपातून खाजगी पातळीवर आणणे. यात सरकारी क्षेत्राची भूमिका टप्याटप्प्याने कमी करून खाजगी क्षेत्राला अधिक महत्त्व देणे अभिप्रेत असते.

**बार्बरा ली व जॉन नेलीस :**

खाजगीकरण म्हणजे मालकीमध्ये खाजगी क्षेत्र गुंतविण्याची सर्वसाधारण प्रक्रिया होय अगर सरकारी मालकीच्या उद्योगांची व्यवस्था पाहणे होय. म्हणून या शब्दाचा संदर्भ सर्व कंपनी खाजगी विकत घेण्याशी वा अंशत: विकत घेण्याशी आहे. या मध्ये उद्योग ताब्यात घेण्याचा अणि व्यवस्थापनाचे खाजगीकरण याचाही समावेश होतो. हे संपादन व्यवस्थापन करार, भाडेपट्टीने चालविण्यास देणे, अगर मुक्त व्यवस्था या माध्यमात असते.[५]

१९९१ च्या आर्थिक उदारीकरणाचा भाग म्हणून सरकारने सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगातील आपली हिस्सेदारी खाजगी क्षेत्राला विकण्याचा जो निर्णय घेतला त्याला निर्गुंतवणूक धोरण म्हणतात. जे उद्योग सुरू ठेवल्यास फक्त तोटाच होऊ शकेल अशा उद्योगांना बंद करून त्यातून मिळालेल्या पैशाचा वापर करून अंदाजपत्रकाची तूट कमी करणे, केंद्र व राज्य सरकारला शिक्षण, आरोग्य, औषधे, पाणीपुरवठा, वीजपुरवठा यांसारख्या महत्त्वाच्या सेवांसाठी

निधी उपलब्ध करून देणे हा उद्देश निर्गुंतवणुकीकरण व खाजगीकरणात ठेवण्यात आला होता. शिवाय निर्गुंतवणूक धोरणातून मिळालेल्या पैशाचा वापर सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचे आधुनिकीकरण करणे व कामगारांची कार्यक्षमता वाढविणे यासाठी केला जाणार होता. सरकारने वेळोवेळी खाजगीकरण निर्गुंतवणूक प्रक्रिया गतिशील करण्याचा प्रयत्न केला. मात्र काही वेळेस काही राजकीय पक्षांतर्फे या धोरणाचा विरोधही करण्यात आला.[६] शिवाय भारतातील सार्वजनिक उद्योगातील बळकट व सामर्थ्यवान कामगार संघटनांना खाजगीकरण म्हणजे नि:राष्ट्रीयीकरण वाटत असल्याने त्यांचा याला प्रखर विरोध होता परंतु असे असले तरी या खाजगीकरण प्रक्रियेचे अनुकूल व प्रतिकूल असे दोन्ही प्रकारचे परिणाम झाले. याबाबत प्रा. ठक्कर के. एच् व श्रीधर देशपांडे, विनायक देशपांडे, यांनी आपल्या अनुक्रमे ‘भारतीय अर्थशास्त्र’ व ‘भारतीय अर्थशास्त्र — संक्रमण आणि विकास’ या पुस्तकांमध्ये पुढील प्रमाणे परिणाम सांगितले आहेत.[७]

### २.३.२ खाजगीकरणाचे परिणाम

१. खाजगी क्षेत्रात वाढ झाली.

२. खाजगी उद्योगपतींचे वर्चस्व वाढले.

३. उत्पन्न कमी झाले.

४. भांडवलदारांची मक्तेदारी निर्माण झाली.

५. बेकारीमध्ये वाढ झाली.

६. भ्रष्टाचारात वाढ झाली.

७. निधीचा गैरवापर वाढला.

८. खाजगी क्षेत्रात वाढ झाली.

९. उत्पादन वाढले.

१०.भौतिक सुविधांमध्ये वाढ झाली.

## २.४ उदारीकरण

भारताने उदारीकरणाचे धोरण १९९१ मध्ये स्वीकारले. भारताचे प्रधानमंत्री

डॉ. मनमोहन सिंग यांना उदारीकरणाचे शिल्पकार असे म्हणतात. जेव्हा सरकार आंतरराष्ट्रीय देणे देण्यासही असमर्थ होते, कर्जाच्या जाळ्यात अडकलेले होते, राखीव विदेशी चलन देखील कमी होते तेव्हा या समस्या सोडविण्यासाठी भुतपूर्व प्रधानमंत्री डॉ. नरसिंहराव आणि भुतपूर्व अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांनी आर्थिक उदारीकरणाची प्रक्रिया भारतात सुरू केली. सन १९९१ मध्ये भारताने आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या सल्ल्याने उदारीकरणाचे धोरण 'स्थिरीकरणाची नीती' या स्वरूपात स्विकारले. सन १९९३—९४ पासून ही नवीन आर्थिक नीती संरचनात्मक समायोजन कार्यक्रमाचा पुरस्कार करणारी नीती म्हणून ओळखली गेली.[८] स्थिरीकरणाच्या नीतीने अंतर्गत चलनाचे अवमूल्यन, राजकोषीय तुटीत कपात, विदेशी भांडवलाच्या मुक्त प्रवाहातील अडथळे दूर करणे असे उपाय योजण्यात आले. सरकारने प्रामुख्याने आयात—निर्यात उत्पादनावर कोणत्याही प्रकारची नियंत्रणे लादू नयेत, अनावश्यक नियंत्रणे दूर करावीत, बाजारपेठेत किंमत यंत्रणेच्या माध्यमाने ज्या गोष्टी जशा घडतील तशा घडू दयाव्यात व अर्थव्यवस्थेत अधिक स्पर्धा व कार्यक्षमता असावी अशा गोष्टींना प्राधान्य देण्यात आले. संरचनात्मक समायोजन कार्यक्रमाच्या अंतर्गत राजकोषीय क्षेत्रात विदेशी विनिमय दर, व्यापार, औद्योगिक धोरण, सरकारी क्षेत्रात धोरण, वित्तीय क्षेत्र व भांडवल बाजार इत्यादींत सुधारणा करणे, या सर्व धोरणांना आर्थिक उदारीकरण असे संबोधले जाते. हल्लीच्या काळात आर्थिक उदारीकरणाचा साधा सरळ अर्थ अर्थव्यवस्थेतील प्रत्येक बाजारातील नियंत्रणे दूर करणे असा होतो. विदेशी विनिमय बाजार, वित्तीय व श्रम बाजार, शेतीमालाचा बाजार इत्यादींच्या बाबतीत सर्व अडथळे दूर करणे म्हणजे आर्थिक उदारीकरण होय.[९]

१९८० नंतर अर्थव्यवस्थेचे उदारीकरण म्हणजेच शिथिलीकरण व जागतिकीकरण हे परवलीचे शब्द बनले. उदारीकरण म्हणजे आपल्या देशाचा जगातील इतर देशांशी खुला व्यापार असणे व देशांतर्गत खाजगी क्षेत्रावर कोणतेही निर्बंध असता कामा नये. सीमाशुल्क व वाटप पध्दती नाहीशी करणे हा शिथिलीकरणामागील हेतू आहे. वस्तू व सेवांबाबतचे उत्पादनभाव व

विक्रीवाटप सरकारने न ठरविता खुल्या बाजाराने व स्पर्धेने ठरावेत अशी शिथिलीकरणामागील भूमिका आहे. सध्या उदारीकरणाची संकल्पना ही बाजारयंत्रणा, मुक्त स्पर्धा व खुला किंवा मुक्त बाजार यावर आधारीत आहे. जेव्हा उदारीकरणाच्या धोरणाचा स्वीकार केला जातो, तेव्हा पर्यायाने सरकार निष्क्रिय असावे लागते असे म्हटले जात असेल तरी खाजगी मालमत्ता बाळगणे व ती वाढविणे हा हक्क अबाधित ठेवण्यास व त्याचे रक्षण करण्यास आवश्यक असते. तसेच पैशांची निर्मिती व पुरवठा करायला सरकार हवेच. बाजारात मक्तेदारी उत्पन्न होणार नाही, उपभोक्त्यांना लुबाडले जाणार नाही हे पाहण्यास सरकार हवे. थोडक्यात या प्रक्रियेत सरकारचे कार्य देखरेखीचे व संरक्षणाचे असून अर्थव्यवस्थेच्या कोणत्याही क्षेत्रात सरकारचा अनावश्यक हस्तक्षेप नसावा हे अभिप्रेत आहे.

जून १९६६ मधील रूपयाचे अवमूल्यन हा भारताच्या आर्थिक उदारीकरणाचा पहिला टप्पा मानला जातो. १९७६ मध्ये आणीबाणीनंतर खुला सर्वसाधारण परवाना हा दृष्टीकोन स्वीकारला. निवडक वस्तूंच्या बाबतीत आयात उदारीकरण धोरण स्वीकारले. सन १९८० च्या दशकात आयात उदारीकरणावर प्रामुख्याने भर देण्यात आला. सन १९८० नंतर निर्यातवाढीसाठी जी आयात आवश्यक आहे ती मुक्त करण्याचे धोरण अवलंबिले. ज्यायोगे अंतर्गत स्पर्धा व अर्थव्यवस्थेची कार्यक्षमता वाढण्यास मदत होईल. त्या अनुषंगाने सन १९८४ मधील आबिद हुसेन समिती, सन १९८५ मधील नरसिंहम् समिती, अर्जुन सेना गुप्ता समिती, एल. के. झा समिती, व्ही. आर. पंचमुखी समिती, सन १९८६ मधील जगदीश भगवती समिती या सर्व समित्यांनी उदारीकरणाला अनुकूल भूमिका घेतली होती.[१०]

उदारीकरणाला खुलेपणा, शिथिलीकरण वा उदारमतवादी धोरण असेही संबोधले जाते. भारतीय संदर्भात खुलेपणा याचा अर्थ १९९० पूर्वीच्या लायसेन्स व परमिटराजमधील मगरमिठी सैल करणे होय. थोडक्यात शिथिलीकरणाचा अर्थ

वस्तू व सेवांचे उत्पादन व उपभोग यांचे प्रमाण बाजारभावाने ठरणे व बाजारामार्फत साधन संपत्तीचे योग्य वाटप केले जाणे असा होतो.

### २.४.१ उदारीकरणाच्या व्याख्या

**एम. रामनजनयुल**

आर्थिक उदारीकरण म्हणजे आयात व उत्पादन गुंतवणुकीवरील अनिष्ट निर्बंध, नियंत्रणे व परवाने मोडीत काढणे होय.[११]

- **डॉ. व्ही. एन. अत्री**

आर्थिक उदारीकरणाचा अर्थ अधिक विस्तृतपणे किंमत यंत्रणेचा वापर करणे होय. ज्या योगे व्यापार पध्दतीची निर्यातविरोधी प्रवृत्ती कमी होईल. जरी अर्थव्यवस्थेतील कार्यक्षमता व स्पर्धा वाढविणे यासाठी विरूपणे पूर्णपणे नष्ट करता आली नाहीत तरी अर्थव्यवस्थेतील विरूपण किमान करणे.[१२]

सरकारी निर्बंध व नियंत्रणे कमी करणे किंवा रद्द करण्याच्या धोरणाला उदारीकरण असे म्हणतात. यात अर्थव्यवस्थेतील उत्पादन, गुंतवणूक, आयात—निर्यात इत्यादी वरील परवाना पध्दतीसारखे जाचक निर्बंध, नियंत्रणे व नियम कमीत कमी करण्याच्या धोरणाचा समावेश होतो.

उदारीकरण म्हणजे सामाजिक व आर्थिक धोरणात पूर्वीच्या सरकारी बंधनात मर्यादित मिळालेली सूट किंवा शिथिलीकरण होय.

उदारीकरणाला शिथिलीकरण असेही म्हटले जाते. अर्थव्यवस्थेचे उदारीकरण म्हणजे अर्थव्यवस्थेतील उद्योगधंदे व व्यापार यावर सरकारने जी अनेक अनावश्यक बंधने व नियंत्रणे बसविलेली असतात. अशा अनावश्यक बंधनातून व नियंत्रणातून अर्थव्यवस्थेतील उद्योगधंदे व व्यापार यांना मुक्त करणे होय.[१३]

थोडक्यात उदारीकरण म्हणजे अर्थव्यवस्थेमध्ये लादण्यात आलेले निर्बंध व नियंत्रणे काढून टाकणे, सरकारी हस्तक्षेप कमी करणे, सरकराच्या सहभागाचे

क्षेत्र मर्यादित करणे, उद्योजकांना व व्यावसायिकांना सोयी व सवलती पुरविणे, त्यांना पुरेसे स्वातंत्र्य देणे, देशी परकीय गुंतवणूकीला प्रोत्साहन देणे आणि एकंदरीत अर्थव्यवस्था अधिक मुक्त, पारदर्शी व स्पर्धात्मक करणे होय. अशा या उदारीकरणाचे भारतावर झालेले विविध परिणाम प्रा. ठक्कर के. एच व प्रा. भोसले के. एम, प्रा. काटे के. बी. यांनी आपल्या अनुक्रमे भारतीय अर्थशास्त्र व भारतीय अर्थव्यवस्था या पुस्तकांमध्ये पुढील प्रमाणे सांगितले आहेत.[१४]

### २.४.२ उदारीकरणाचे परिणाम

१. खाजगी उद्योगांना अनेक सवलतींची प्राप्ती झाली.

२. औद्योगिक क्षेत्रातील स्पर्धेमध्ये वाढ झाली.

३. सार्वजनीक उद्योगांच्या कार्यक्षमतेत वाढ झाली.

४. विदेशी उद्योगांचे वर्चस्व वाढले.

५. बहूराष्ट्रीय कंपन्यांचे प्राबल्य वाढले.

६. आधुनिक उत्पादन तंत्रज्ञानावर भर देण्यात आला.

७. संशोधन व विकासावर खर्च करण्यात आला.

८. कामगार कपात करण्यात आली.

९. लघु उद्योगातील समस्येत वाढ झाली.

१०.खाजगी उद्योगांना अनेक सवलतींची प्राप्ती झाली.

११.औद्योगिक क्षेत्रातील स्पर्धेमध्ये वाढ निर्माण झाली.

## २.५. जागतिकीकरण

सन १९८८ नंतर मुक्त आयात व निर्यात अभिवृध्दीतील अपयश यामुळे महसुली खात्यावरील तूट सतत वाढत गेली. ही तूट दूर करण्यास सरकारने अंतर्गत व बाह्य कर्ज उभारले. सन १९८८ ते १९९१ या काळातील चुकीच्या धोरणाने भारतात आर्थिक अरिष्ट निर्माण झाले. परिणामी सन १९९१ पासून सरकारला विनाविलंब आर्थिक सुधारणांचा कार्यक्रम अंमलात आणावा लागला. त्यानुसार भारतात जागतिकीकरण या संकल्पनेचा उदय झाला. जागतिकीकरण ही आर्थिक एकीकरणाची प्रक्रिया आहे. जॉर्ज बुश अमेरिकेचे अध्यक्ष असताना

१९९१ साली नव्या जागतिक व्यवस्थेच्या विचारांची मांडणी झाल्याने जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला सुरूवात झाली. जागतिकीकरणाच्या धोरणाचा आराखडा डंकेल प्रस्तावाद्वारा मांडण्यात आला. या प्रस्तावात मांडलेल्या प्रमुख बाबी हाच जागतिकीकरणाचा गाभा आहे. भांडवलाचा मुक्तसंचार आणि बाजारपेठांचा विस्तार या दोन प्रमुख बाबी त्यांच्यापुढे होत्या आणि त्यातूनच जागतिकीकरणाचे धोरण पुढे आले.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत गॅटबाबत प्रमुख चर्चा होते. गॅट (GAT) म्हणजे जनरल ॲग्रिमेंट ऑन टॅरिफ ॲण्ड ट्रेड किंवा व्यापार आणि जकात विषयक सार्वत्रिक करार. गॅटची स्थापना १९४८ साली करण्यात आली. गॅटमध्ये प्रामुख्याने उत्पादित वस्तूंचा व्यापार आणि जकात विषयक विचार होत असे. परंतु १९८६ साली सुरू झालेल्या आठव्या फेरीपासून गॅटची व्याप्ती वाढवून कृषी उत्पादन, व्यापार, बौध्दिक मालमत्तेवरील हक्क, सेवा व्यवहार आणि गुंतवणूक या विषयाचा समावेश करण्याचा आग्रह पाश्चिमात्य देशांनी धरला. तेथूनच जागतिकीकरणाची प्रक्रिया खऱ्या अर्थाने सुरू झाली.[१५]

## २.५.१ जागतिकीकरणाच्या व्याख्या

जागतिकीकरण म्हणजे देशात खुला व्यापार, गुंतवणुकीसाठी मोकळी बाजारपेठ, तंत्रज्ञ व कुशल व्यावसायिकांना देशांतर करण्यास सुलभ कायदेकानून अशी जागतिक व्यवस्था होय.[१६]

लोकशाही ही राजकीय प्रणाली आणि भांडवलशाही ही आर्थिक प्रणाली यांच्या उत्कर्षाचा परमोच्च बिंदू म्हणजे जागतिकीकरण होय.

देशाची अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थेला जोडून त्यापासून व्यवसायाचा विस्तार आणि विकास करणे म्हणजे जागतिकीकरण होय.[१७]

- **चार्ल्स हिल**

जागतिकीकरण म्हणजे अधिक एकात्मक आणि परस्परावलंबी अशी जागतिक अर्थव्यवस्था निर्माण करण्याच्या दृष्टीने झालेला बदल होय.[१८]

- **माल्कम आदीसेशैया**

अर्थव्यवस्थेचे जागतिकीकरण याचा अर्थ जागतिक अर्थव्यवस्था उत्क्रांतीचे (विकासाचे) जागतिक मापन / विविध आयाम होय.[१९]

- **श्रवणकुमार सिंग**

जागतिकीकरण म्हणजे सर्व राष्ट्रांची एकच बाजारपेठ निर्माण करणे आणि त्या बाजारपेठेत जगातील साधनसामुग्रीचे आणि भांडवलाचे सुलभीकरण निर्माण करणे.[२०]

- **सी. टी. कुरीअन**

वेगवेगळ्या मार्गांनी एकमेकांशी परस्पर प्रक्रिया करून विविध कार्यक्रम पत्रिकेसह विजातीय एककांचे संग्रहण करणे आणि त्यांच्यात वैशिष्ट्यांमध्ये दिर्घकाळात बदल घडवून आणणे म्हणजेच जागतिकीकरण होय.[२१]

- **देवेंद्र अवस्थी**

जागतिकीकरणाची निर्मिती बाजाराधिष्ठीत आर्थिक धोरणातून झाली. आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मक वातावरणाशी राष्ट्रीय अर्थव्यवस्थेचा समन्वय साधण्याचा यात प्रयत्न केला जातो.[२२]

जागतिकीकरणाची व्याख्या करतांना राष्ट्रीय अर्थव्यवस्थेचे संघटन आणि सम्मीलीकरण अशा दुहेरी प्रक्रिया जागतिक अर्थकारणातील बाजारप्रणीत आणि पाश्चात्य तंत्रज्ञान, भांडवली वस्तू, उत्पादन संरचना आणि व्यवस्थापन तंत्र यांच्या वर्चस्वातून निर्माण होतात.[२३]

जागतिकीकरण म्हणजे मुक्त आर्थिक धोरण किंवा अर्थव्यवस्थेचे आंतरराष्ट्रीयीकरण करणे होय.[२४]

जागतिकीकरण म्हणजे संपूर्ण जग ही एकच बाजारपेठ असून या जगात असणारे सर्व देश हे या जागतिक बाजारपेठेतील घटक आहेत असे समजून सर्व देशांनी एकमेकांशी मुक्तपणे व्यापार करणे होय.

- **जागतिक बॅंकेच्या विश्लेषणानुसार**

जागतिकीकरण अथवा वैश्वीकरण म्हणजे जागतिक अर्थव्यवस्था निर्माण करण्याचा हेतूने भांडवल, तंत्रज्ञान, विविध वस्तू व श्रम यांची गतिशितला विविध देशांमध्ये कुठल्याही सीमारेषेची आडकाठी न बाळगता मुक्तपणे करता येणे होय. जागतिकीकरण म्हणजे

अ) उपभोग्य वस्तुंच्या समावेशासह सर्व वस्तुंवरील आयात नियंत्रणे हळूहळू रद्द करणे

ब) आयात जकातीचे दर कमी करणे.

क) सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांचे खाजगीकरण करणे होय.

जागतिकीकरण म्हणजे देशाच्या राजकीय सीमेबाहेर आर्थिक व्यवहारांचा विस्तार करणे होय.

आपल्या अर्थव्यवस्थेत जगातील औद्योगिकदृष्ट्यां प्रगत असणाऱ्या विविध देशांना उत्पादन करण्यासाठी व्यापार करण्यासाठी व आपल्या अर्थव्यवस्थेतील विविध उद्योगधंद्यात व अन्य अनेक क्षेत्रांत गुंतवणूक करण्यास मुक्त प्रवेश देणे म्हणजे अर्थव्यवस्थेचे जागतिकीकरण करणे होय.

अर्थव्यवस्थेचे जागतिकीकरण म्हणजे स्पर्धेच्या माध्यमांद्वारे देशांतर्गत किमतीचे आंतरराष्ट्रीय स्तरावरील किमतीशी समानीकरण करणे होय.

- **आंतरराष्ट्रीय नाणेनिधी**

जागतिकीकरण म्हणजे वस्तू, सेवा व आतंराष्ट्रीय भांडवलप्रवाह, अतिजलद व प्रसरण पावणारे तंत्रज्ञान ह्यांचे वाढते प्रमाण तसेच विविधता ह्यांच्या साह्याने जगातील देशांचे सतत वाढत जाणारे परस्परावलंबित्व होय.[२५]

- **रूसी मोदी**

जगतिकीकरण म्हणजे

१) मुक्त स्पर्धा, उच्च उत्पादनक्षमता, तंत्रज्ञानाचा वापर

२) संपूर्ण जगाची एकच बाजारपेठ असणे.[२६]

वरील व्याख्यांवरून जागतिकीकरणाचा अर्थ स्पष्ट होतो. व्यापार, वित्त, रोजगार तंत्रज्ञान, दळणवळण, विदेशी स्थलांतर, पर्यावरण, राहणी, शासन समाजव्यवस्था, संस्कृती अशा सर्व प्रकारच्या क्षेत्रांमधून होणारे रुपांतर म्हणजे जागतिकीकरण. थोडक्यात जागतिकीकरण म्हणजे वस्तू, सेवा तंत्रज्ञान व भांडवलाच्या हालचालीवरील सर्व प्रकारचे निर्बंध दूर करणे व त्यांचा प्रवाह सुखकर व गतिमान करण्याचा प्रक्रिया होय.

जागतिकीकरण ही प्रक्रिया होत असताना देशांच्या आयातीवरील निर्बंध रद्द होणे, आयात दर कमी होणे व कमीत कमी पातळीवर स्थिरावणे, तसेच सार्वजनीक क्षेत्रातील उद्योगांचे खाजगीकरण होणे असे बदल देशाच्या अर्थव्यवस्थेत घडून येतात. एकंदरीतच वरील सर्व व्याख्यांमधून जागतिकीकरणाचा संबंध प्रामुख्याने आर्थिक स्थितीशी असलेला दिसून येतो. मात्र जागतिकीकरण ही केवळ संकुचित आर्थिक व्यापार व व्यवहार प्रक्रिया नसून ती एक व्यापक सामाजिक व सांस्कृतिक देवाण घेवाण प्रक्रिया आहे.[२७] त्यामुळे अप्रत्यक्षपणे या आर्थिक प्रक्रियेचा परिणाम राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक अशा इतर सर्वच क्षेत्रांवर घडून येतो त्यातूनच पुढे व जागतिकीकरणाचे पुढील प्रमाणे प्रकार पाडले जातात.

**१) राजकीय जागतिकीकरण —**

आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील राजकीय संघर्ष व ताणतणावावर नियंत्रणाचा प्रयत्न.

**२) आर्थिक जागतिकीकरण —**

आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील आर्थिक हितसंबंध वृध्दींगत करण्याचा किंवा जोपासण्याचा प्रयत्न.

**३) सांस्कृतिक जागतिकीकरण —**

व्यक्ती व राज्य यांच्यातील विषमता कमी करुन वैश्विक संस्कृती निर्मितीचा प्रयत्न.

अशा या जागतिकीकरणाच्या संकल्पनेचे महत्त्वाचे चार मापन आहेत. त्यानुसार जागतिकीकरणात विविध घटकांचा समावेश होतो.

- व्यापारावरील बंधने कमी करावीत, ज्यायोगे देशाच्या सीमेबाहेर वस्तूंचाप्रवाह मुक्त स्वरूपाचा होईल.
- देशामध्ये भांडवलाच्या मुक्त प्रवाहास वाव मिळण्यासाठी योग्यवातावरण निर्माण करणे.
- तंत्रज्ञानाच्या मुक्त प्रवाहास परवानगी देऊन योग्य वातावरण तयार करणे.
- जगातील विविध देशांत कामगारांचा मुक्त संचार होण्यासाठी योग्य वातावरणाची निर्मिती करणे.

विशेषत: विकसनशील देशांच्या संदर्भात जागतिकीकरण ही बाब महत्त्वाची समजली जाते. मात्र प्रगत राष्ट्रे जागतिकीकरणाचे घटक म्हणून व्यापार, भांडवल व तंत्रज्ञान यांचा प्रवाह मुक्त असावा अडथळा असू नये अशी इच्छा व्यक्त करतात म्हणजेच जागतिकीकरणाच्या व्याख्येत हेच तीन घटक असावेत असे प्रतिपादन करून विकसनशील देशांनी ही व्याख्या मान्य करावी असा आग्रह सुध्दा धरतात. विकसनशील देशांतील अनेक अर्थशास्त्रज्ञांच्या मते जागतिकीकरणाचा चौथा घटक म्हणून कामगारांच्या हालचालींवर बंधन असता कामा नये. जागतिक व्यापार संघटना व इतर समितीच्या मते कामगारांचा प्रवाह हा जागतिकीकरणाचा आवश्यक घटक आहे.

एकंदरीत जागतिकीकरणाच्या या सर्व विवेचनाचा विचार करता त्याचे फायदे आणि तोटे आपणांस पुढीलप्रमाणे सांगता येतिल. याबाबत प्रा. ठक्कर के. एच, प्रा. भोसले के. एम, प्रा. काटे के. बी. व देशपांडे श्रीधर यांनी आपल्या अनुक्रमे 'भारतीय अर्थशास्त्र', 'भारतीय अर्थव्यवस्था व भारतीय अर्थशास्त्र – संक्रमण आणि विकास' या पुस्तकांमध्ये आपले मत व्यक्त केले आहे.[२८]

### २.५.२ जागतिकीकरणाचे फायदे

१. आर्थिक विकासाला प्रेरणा मिळते.

२. नवीन तांत्रिक ज्ञानाची देवाणघेवाण करणे शक्य होते.

३. बहुराष्ट्रीय उद्योग व व्यापार निगमांना सर्वत्र संधी प्राप्त होते.

४. राष्ट्राच्या आयात निर्यातीत वाढ होते.

५. चलन विनिमय बाजाराचा विकास होतो.

६. आर्थिक विकास दरात वाढ होते.

७. उद्योगधंद्यात वाढ होते.

८. परराष्ट्रीय व्यापारात वाढ होते.

९. विपुल प्रमाणात भांडवलाची गुंतवणूक होते.

१०. वस्तु उत्पादन व विक्रीत वाढ होते.

११. आंतरराष्ट्रीय संस्थांचे आर्थिक सहकार्य सहज प्राप्त होते.

१२. रोजगार निर्मिती व उपलब्धता होते.

१३. राहणीमानाच्या दर्जात वाढ व सुधारणा होण्यास मदत होते.

१४. आधुनिक व भौतिक सुखसोईत वाढ होते.

१५. संदेशवहन व दळणवळणाच्या अद्ययावत साधनांत वाढ होते.

१६. सांस्कृतिक परिवर्तन घडून येते.

१७. विदेश नितीत परिवर्तन करता येते.

१८. आर्थिक विकासास पुरक अशा राजकीय ध्येयधोरणांचा स्वीकार केला जातो.

१९. बाजारपेठीकरण, प्रादेशिकीकरण, राष्ट्रीयीकरण व आंतरराष्ट्रीयीकरणास वेग येतो.

२०. मुक्त व्यापार, खुली बाजारपेठ, आयात–निर्यातीवरील नियंत्रण मुक्त व्यवस्था इ. गोष्टींना प्राधान्य मिळते.

२१. उद्योग व वित्त पुरवठा करणाऱ्या संस्थांतील स्पर्धांमुळे ग्राहकास फायदा होतो.

२२. जागतिक एकत्रीकरण करणे शक्य होते.

२३. स्पर्धाशक्तीत वाढ होते.

२४. आंतरराष्ट्रीय व्यापारात वृदधी होते.

२५. उत्पादन क्षमतेच्या योग्य वापरावर भर देता येतो.

२६. लोकांच्या प्रवृत्तीत व मानसिकतेत सकारात्मक बदल होण्यास मदत होते.

२७. विदेशी चलन साठ्यात वाढ होते.

२८. उद्योगांच्या व्यवस्थापन कौशल्यात वाढ होते.

२९. अन्य देशातील आधुनिक तंत्रज्ञानाची सहज उपलब्धता होते.

३०. देशातील उत्पन्न वितरणातील विषमता कमी करता येते.

### २.५.३ जागतिकीकरणाचे तोटे

१. जगातील श्रीमंत राष्ट्रांकडे अर्थव्यवस्थेचे नेतृत्व जाण्याची शक्यता निर्माण होते.

२. अविकसीत किंवा विकसनशील राष्ट्रांवर कर्जबाजारी होण्याची वेळ येऊ शकते.

३. बहुराष्ट्रीय कंपन्यांची मक्तेदारी सुरू होते.

४. विकसनशील राष्ट्र विविध क्षेत्रात तोट्यात येतात.

५. नैसर्गिक साधनसंपत्तीचा ऱ्हास होतो.

६. शेतीवर अनिष्ट परिणाम होतात.

७. सांस्कृतिक विविधतेवर परिणाम होतो.

८. सार्वत्रिक विकासात विषमता येते.

९. वसाहतवादाचे पुनरागमन होते.

१०. चंगळवाद व भौतिकवादी सुखी जीवनाला प्रोत्साहन मिळते.

११. गळेकापू सत्तास्पर्धेत वाढ होते.

१२. पायाभूत सुविधा निर्मितीकडे दुर्लक्ष केले जाते.

१३. बेरोजगारी वाढण्याची शक्यता निर्माण होते.

१४. अर्थव्यवस्थेवर चलनवाढीचा अतिरिक्त ताण येतो.

१५. सहकारी उद्योगांचे अस्तित्व धोक्यात येते.

१६.दारिद्र्य व गरिबीत वाढ होते.

१७.आर्थिक शोषण व सामाजिक अन्यायात वाढ होते.

१८.पारंपरिक जीवनपध्दती व सांस्कृतिक नितीमूल्यांचा ऱ्हास होऊ शकतो.

१९.अन्नधान्याच्या उत्पादनातील स्वयंपूर्णता नष्ट होण्याची शक्यता निर्माण होते.

२०.औद्योगिक क्षेत्राची कार्यक्षमता कमी होण्याची शक्यता निर्माण होते.

२१.लघुउद्योगांच्या अस्तित्वावर घाला येतो.

## २.६. जागतिकीकरणाचा भारतीय समाजावर झालेला परिणाम

भारतीय लोकांना जागतिकीकरण ही संकल्पना नवीन नाही. जागतिकीकरण म्हणजे वैश्विकरण आणि वैश्विकरण म्हणजेच हे संपूर्ण विश्व एक असणे. भारतीय साहित्यातील ग्रंथ, पुराणे, वेद यांसारख्या अनेक साहित्यकृतींमधून निरनिराळ्या पध्दतीने ही संकल्पना वारंवार उध्दृत झालेली दिसते. वसुधैव कुटुंबकम् या संकल्पनेनुसार संपूर्ण पृथ्वी हे एक कुटुंबच आहे हे आपण पूर्वीच मान्य केलेले आहे. शिवाय संत ज्ञानेश्वरांनी आपल्या पसायदानात आता विश्वात्मके देवे, असे म्हणून सर्व विश्वाचा ईश्वर एकच आहे, आपण सर्वजण एकाच ईश्वराची लेकरे आहोत हे सांगितले आहे. तर इतर संतवाणीतूनही हे विश्वची माझे घर, असे म्हणून विविध माध्यमातून वैश्विकरण ही संकल्पना आपण मांडत आलो, अनुभवत आलो.

भारत अनादिकालापासून जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत सहभागी राहिला आहे. वस्तू, सेवा आणि विचारांची भारत आयातच नव्हे तर निर्यातही करीत आला आहे.[२९] प्राचीन काळीसुध्दा गुप्त, सातवाहन, मौर्य, शिलाहार यासारख्या राजसत्तांनी साम्राज्यविस्तार करुन परकीय सत्तांशी जोडलेल्या संबंधातून जागतिक सिमारेषांना पुसट करण्याचे काम केलेले दिसते. यात प्रामुख्याने सातवाहन काळात पश्चिम आशिया, ग्रीस व रोमन साम्राज्य यांच्याबरोबर व्यापार चालत असे. भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरून अरबस्थान व इजिप्तपर्यंत व्यापार चाले. याच काळात आग्नेय आशियात मुख्यत: जावा, सुमात्रा, इंडोचायना व मलाया ह्या प्रदेशात भारतीयांच्या वसाहती स्थापन होऊन तेथे

भारतीय संस्कृतीचा प्रसार झाला होता.[३०] शिवाय भारतीय मालाला परदेशी बाजारपेठ मिळाल्यामुळे येथील उद्योगधंदेही भरभराटीला आले होते. येथील सिल्क रूट व सॉल्ट रूट यामुळे इतर देशांशी आपले व्यापारी संबंध निर्माण झाले होते. तसेच रोमचे साम्राज्य पश्चिम आशिया व इजिप्त येथवर पसरल्याने या व्यापारास उत्तेजनही मिळाले. शिवाय ऑगस्टस सीझरला पाच भारतीय व्यापारी शिष्टमंडळांनी भेट देऊन भारतीय व्यापाराला रोमन साम्राज्यात सवलती मिळविल्या होत्या.[३१] मध्ययुगीन काळात सुलतान व मुघलशाही या दोन्ही राजसत्तांनी खुष्की व समुद्र अशा दोन्ही मार्गांनी आपल्या व्यापाराचा विस्तार केला तर मराठ्यांच्या काळात शिवराय व पेशवे अशा दोन्ही मातब्बर सत्तांनी परकियांशी निर्माण केलेले व्यापारी हितसंबंही सर्वश्रूतच आहेत. म्हणजेच जागतिकीकरण ही संकल्पना २१ व्या शतकात महत्त्वपूर्ण वाटत असली तरी व्यापारी दृष्टीकोनातून भारतीयांना पूर्वीपासून माहीत असल्याने जागतिकीकरण ही संकल्पना भारतीयांसाठी नवीन नाही. व्यापार, धर्मप्रसार, स्थलांतर अशा विविध गोष्टींद्वारे प्रादेशिक बंधने तोडून मानवी समाज गट इतर समाजगटांत मिसळून जात. यातून संस्कृतीची सरमिसळ होई. परंतु प्रसिध्द इतिहासतज्ञ शांता कोठेकर यांच्या मते विसाव्या शतकाच्या अखेरच्या चतुर्थात प्रचलित झालेल्या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचे संदर्भ पूर्णतः भिन्न आहेत. ते प्रामुख्याने वित्त, व्यापार व उद्योग अशा आर्थिक घटकांशी व त्यांच्याशी संबंधित असलेल्या यंत्रणेशी निगडीत आहेत.[३२]

भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. या विविधतेत भाषिक विविधता, सांस्कृतिक विविधता, धार्मिक विविधता व वांशिक विविधता अश अनेक घटकांचा समावेश होतो. भारत हा खंडप्राय देश असून त्यामध्ये प्रादेशिक असमानताही आहे. आज जरी येथील मुंबई, कोलकत्ता यांसारखी शहरे जागतिक स्तरावर महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असली तरी प्रामुख्याने भारत हा कृषीप्रधान व खेड्यांचा देश आहे. आजही जवळ जवळ ७०% लोक ग्रामीण भागात राहून शेतीवरच आपली उपजिविका भागवताना दिसतात. भारतात सुमारे ६ लाख खेडी आहेत. त्यामुळे जागतिकीकरणाचा भारतीय समाजावर पडलेला

प्रभाव अभ्यासताना प्रामुख्याने ग्रामीण भागावर काय परिणाम झाले हे पाहणे क्रमप्राप्त ठरते.

जागतिकीकरणाचा ग्रामीण भारतावर सकारात्मक व नकारात्मक असा दोन्ही प्रकारचा प्रभाव दिसून येतो. यातील सर्वांत मोठा प्रभाव म्हणजे शिक्षणाविषयीचा वृध्दिंगत झालेला दृष्टीकोन. सद्यस्थितीत अशिक्षित आणि आर्थिक दृष्टीने दुर्बल असलेल्या घटकांमध्ये सुध्दा शिक्षणाचे महत्त्व समजून त्यासाठी अविरत प्रयत्न करण्याची जिद्द निर्माण झाली आहे. ग्रामीण भागात गेल्या २० ते २५ वर्षांपूर्वी माध्यमिक शिक्षण सरासरी ७ ते ८ किलोमीटरच्या अंतरावर होते. मात्र प्राथमिक व माध्यामिक शिक्षण आता हाकेच्या अंतरावर उपलब्ध झालेल आहे. तसेच उच्च शिक्षणासाठी तालुका व जिल्ह्यापर्यंत प्रसंगी राज्याबाहेर जाणेही सर्वांना सहज शक्य झालेले आहे.

जागतिकीकरणामुळे समाजात अनुकूल बदल होण्यास करणीभूत ठरलेला सहज उपलब्धता. आज दूरध्वनी, भ्रमणध्वनी, दूरचित्रवाणी व इतर संपर्क साधनांच्या सहज उपलब्धतेमुळे ग्रामीण भागातील घरे जगाशी जोडली गेली. जवळजवळ ९०% हून अधिक गावांमध्ये दूरचित्रवाणीची व ९०% हून अधिक लोकांना भ्रमणध्वनीची सेवा उपलब्ध झाल्याने सर्व विषयांबाबतचे ज्ञान त्यांच्या पर्यंत पोहोचण्यास मदत होते.[३३]

दळणवळणाच्या बाबतीत म्हणायचे झाल्यास हे जग जवळ येण्यासाठी म्हणजेच जागतिकीकरण होण्यासाठी दळणवळणाच्या साधनांचा विकास होणे अपरिहार्य होते. या विकासाच्या आधारे ग्रामीण भागाचा तालुक्यांशी, जिल्ह्यांशी आणि मोठ्या शहरांशी संपर्क वाढल्याने मोठ्या प्रमाणात प्रगती घडून आली. शेतमालाला किमान आधारभूत किंमत मिळाल्याने शेतकऱ्यांना आर्थिक फायदा होत आहे. त्यामुळे त्यांच्या परिस्थितीत सुधारणा होत आहे. जागतिकीकरणाच्या स्पर्धेत टिकण्यासाठी शासना — कडून केल्या जाणाऱ्या प्रयत्नांमुळे रोजगार निर्मितीचे प्रमाणही वाढीस लागले आहे. ग्राम सडक योजना, राजीव गांधी आवास योजना किंवा यांसारख्या अन्य योजनांमुळे अकुशल व कुशल अशा

दोन्ही प्रकारच्या लोकांना रोजगार उपलब्ध होऊ लागला आहे. या सर्वांमुळे रोजंदारीवर काम करणारे, भूमीहीन शेतमजूर अथवा त्यांच्या सारख्या अन्य व्यक्तींची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत झाली. त्यामुळे त्यांचे राहणीमान व जीवनशैली यांच्यात सकारात्मक परिवर्तन घडून आलेले दिसते.

या व्यतीरिक्त प्रामुख्याने जागतिकीकरणामुळे समाजातील स्त्री या घटकाला नवे विश्व प्राप्त झालेल दिसते. प्रामुख्याने ग्रामीण भागातील स्त्रियांचा विचार करता त्यांना खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य मिळाले. वरील सर्व संसाधनांचा वापर त्या  लिलया करु लागल्या. शिवाय राजकारणापासून दूर असणाऱ्या व घराच्या उंबरठ्याबाहेरही पडू न शकणाऱ्या महिलांच्या मध्येही स्वनिर्णय क्षमता वाढीस लागली आहे. त्यांच्यातील ही प्रगती व सर्व क्षेत्रातील सक्रीय सहभाग ग्रामीण पर्यायाने देशपातळीवरील विकासास पुरकच ठरत आहे.

जागतिकीकरणामुळे भारतीय समाजाची जीवनशैली सुध्दा मोठ्या प्रमाणावर परिवर्तीत झालेली आहे. पूर्वी म्हणजे अगदी २० ते २५ वर्षांपूर्वीसुध्दा गावातील घरे ही प्रामुख्याने मातीचीच असत. सधन लोकांची घरे दगडी बांधणी अथवा सिमेंटची किंवा वाडे पध्दतीचीही असत. आता मात्र सर्वत्र पक्क्या विटा आणि अधिकाधिक भौतिक सोयी सुविधांनी युक्त अशा घरांची संख्या वाढलेली दिसते. जर ग्रामीण भागावर जागतिकीकरणाचा एवढा प्रभाव पडला असेल तर शहरीकरणावर त्याचा प्रभाव निश्चितच मोठा असणार हे मान्य करावेच लागेल. जागतिकीकरणाने निश्चितच त्यांचा चेहरा मोहरा बदलून टाकला. जागतिकीकरणामुळे शहरातील व्यक्तींचे जीवन हे अतिशय वेगवान झाले असून त्यांना विविध संधी तर उपलब्ध झाल्याच शिवाय विविध जबाबदाऱ्यांनाही त्यांना सामोरे जावे लागले.

एकंदरीतच जागतिकीकरणामुळे शिक्षण, दळणवळण, संपर्कसाधने, सरकारी योजना, यांच्या बरोबरच लोकांचे कपडे, भाषा, वाहने, घरांची रचना, जीवनशैली, शिक्षणाचे प्रमाण, त्यांची मानसिकता, आशा — आकांशा अशा सर्व गोष्टींमध्ये सकारात्मक बदल होत आहेच मात्र नकारात्मक दृष्टीने विचार

करता जागतिकीकरणामुळे बदलत जाणारी जीवनशैली भारतीय संस्कृती व मूल्यांच्या जपणूकीस बाधक ठरतांना दिसते. जागतिकीकरणाच्या या युगामध्ये विशेषत: मुले व तरुणांच्या जगण्याच्या पध्दतीत, मूल्यांमध्ये व तत्वांमध्ये बदल होतांना दिसतात. आज व्यक्ती वास्तववादी आणि स्वयंकेंद्रीत झालेली दिसते. तसेच आजच्या स्थितीत समाजाला ऐषोरामी जीवनशैलीची चटक लागलेली दिसते. त्यामुळे दिखावूपणा, बडेजाव व प्रसिध्दी याची हाव लोकांमध्ये वाढलेली दिसते. या सर्वांमुळे भ्रष्टाचार व गुन्हेगारीचे प्रमाणही दिवसेंदिवस वाढीस लागलेले आहे. एकंदरीत भोगवादी व चंगळवादी संस्कृतीस पोषक वातावरण निर्मित होत आहे असे म्हटल्यास वावगे ठरू नये. थोडक्यात नवीन आर्थिक धोरणामुळे जागतिकीकरणाचा आपण एक भाग बनलो आहोत. त्यामुळे जागतिकीकरणास त्याच्या फायदया तोट्यांसह स्वीकारणे अपरिहार्य ठरते.

## टीपा

१. नवीन आर्थिक धोरण व संबंधित संकल्पनांची या प्रकरणातील मांडणी पुढील पुस्तकांच्या आधारे केलेली आहे.

१.के. एच. ठक्कर, *भारतीय अर्थशास्त्र,* फडके प्रकाशन, कोल्हापूर, सप्टेंबर २००८

२.के. एम. भोसले, के. बी. काटे, *भारतीय अर्थव्यवस्था,* फडके प्रकाशन, कोल्हापूर, सप्टेंबर २००८.

२. ठक्कर, पूर्वोक्त, पृ. २४३.

३. कित्ता, पूर्वोक्त, पृ.२४१ —२४२.

४. भोसले, काटे, पूर्वोक्त, पृ. ३०५.

५. ठक्कर, पूर्वोक्त, पृ. २४३.

६. देविदास रौंदळ, *कोकणातील पर्यटन व्यवसायाच्या विपणन व्यवस्थेचे चिकित्सक अध्ययन,* पीएच. डी. प्रबंध, पुणे विद्यापीठ, जुलै २००९, पृ. ३६२.

७. खाजगीकरणा संबंधित संकल्पनांची या प्रकरणातील मांडणी पुढील पुस्तकांच्या आधारे केलेली आहे.

१. ठक्कर, पूर्वोक्त.

२.श्रीधर देशपांडे, विनायक देशपांडे, *भारतीय अर्थशास्त्र — संक्रमण आणि विकास,* हिमालया पब्लिकेशन हाऊस, २००४.

८. सुमित्रा पवार, जागतिकीकरण, खाजगीकरण आणि भारतीय अर्थव्यवस्था, *योजना,* फेब्रुवारी, २००१, पृ. ९.

९. ठक्कर, पूर्वोक्त, पृ. २३७.

१०. तत्रैव, पृ. २३५.

११. J. F. Patel, V. B. Kakade, *'World Economic Environment,* Phadke Prakashan, Kolhapur, 2002, p. 64 - 65.

१२. ठक्कर, पूर्वोक्त, पृ. २३६.

१३. भोसले, काटे, पूर्वोक्त, पृ. ३०७.

१४. उदारीकरण व संबंधित संकल्पनांची या प्रकरणातील मांडणी पुढील पुस्तकांच्या आधारे केलेली आहे.

१. ठक्कर, पूर्वोक्त.

२. भोसले, काटे,, पूर्वोक्त.

१५. गजानन खातू, *जागतिकीकरण परिणाम आणि पर्याय,* अक्षय प्रकाशन, मार्च २००१, पृ. १६.

१६. मो. वि. भाटवडेकर, *राजहंस व्यावहारिक मराठी शब्दार्थकोश,* राजहंस प्रकाशन, पृ. २४६.

१७. एम. एस. लिमण, रावेरकर ,वाडेकर ,वाणी , *विपणन आणि वित्त,* शेठ प्रकाशन, प्रथम आवृत्ती, मुंबई, ऑक्टोबर, २००३, पृ. ९४.

१८. सुभाष गंगाराम शिंदे, लोखंडे अजयकुमार प्रल्हाद, *समकालीन जग १९४५—२०००,* सेठ प्रकाशन, प्रथम आवृत्ती, मुंबई, जानेवारी, २००६, पृ. १८३.

१९. Malcom S. Adiseshiah, *Globalization of the Economy*, Indian Association of Social Science Institution (IASSI), Vol 11, no.1, July-Spt 1992.

२०. B. N. P. Singh (Ed), *Economic Liberalization in India*, Asia Publishing House, New Delhi, 1995, p. 37.

२१. C. T. Kurien, Indian Economic Reforms in the context of Emerging Global Economy, *Economic and Political Weekly*, 10th April 1993.

२२. Dvendra Awasthi, Globalisation of the Indian Economy : Strategies and constraints, *Indian Economic Journal*, Dec. 28-30, 1992, p. 136-137.

२३. B. M. Jauhiri (Ed.), *Economic Liberalization and globalization*, Common Wealth Publishers, New Delhi, 1996, p. 36.

२४. *Yojana*, vol. 45, March 2001, p. 34.

२५. V. N. Gumma , *The Impact of Globalization on small-scale Industries*, Regal Publications, New Delhi, 2009, p. 70-71.

२६ .Russi Mody, Globalization Efforts with Accent in Export, *The Economic Times*, April 21, 1992.

२७. एच. एम. देसरडा, जागतिकीकरण काय आहे आणि काय नाही?, *योजना,* मे, २००१, पृ. २२.

२८. जागतिकीकरण व संबंधित संकल्पनांची या प्रकरणातील मांडणी पुढील पुस्तकांच्या आधारे केलेली आहे.

१. ठक्कर, पूवोक्त.

२. भोसले, काटे, पूर्वोक्त.

३. देशपांडे, पूर्वोक्त.

२९. देसरडा, पूर्वोक्त, पृ.२२.

३०. आचार्य धनंजय, *प्राचीन भारत,* श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००५, पृ. १८७.

३१. रं. ना. गायधनी, व. ग. राहूरकर, *प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास,* कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, २००२, पृ. २१९.

३२. शांता कोठेकर, *इतिहास : तंत्र आणि तत्वज्ञान,* श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, ऑगस्ट, २००७, पृ. ३२८.

३३. www. Bsnl.org, acssed on 20 -5- 2013.

# प्रकरण तिसरे

## आगरी समाज आणि जागतिकीकरण

# ३. आगरी समाज आणि जागतिकीकरण

## ➢ प्रस्तावना

नवीन आर्थिक धोरणामुळे जागतिक स्तरावरील खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण या त्रिसूत्रीचा भारताने स्वीकार केला, नव्हे तर तो आपणांस करावाच लागला. त्यातील जागतिकीकरण या संकल्पनेने तर सर्व विश्वच व्यापून टाकले. या जागतिकीकरणाचा भारताच्या सर्वच क्षेत्रावर परिणाम झालेला आहे. हा बदल किंवा परिणाम सकारात्मक व नकारात्मक अशा दोन्ही स्वरुपाचा आहे. औद्योगिकीकरण, शेती, शिक्षण, सेवाक्षेत्र, राजकारण या सारख्या सर्वच क्षेत्रामधील बदल हे लक्षात येण्याजोगे आहेत. त्यातील समाज या घटकावर तर जागतिकीकरणाचा प्रभाव विशेष स्वरुपात झालेला दिसून येतो. भारतामध्ये असलेल्या विविध समाजांमध्ये जागतिकीकरणामुळे बदल घडून आले असले तरी त्या बदलाचा वेग त्या त्या समाजानुरुप वेगवेगळा आहे म्हणूनच त्या सगळ्या समाजांवर सदर दृष्टीकोनातून अभ्यास करणे आवश्यक आहे.

सदर प्रकरणात प्रामुख्याने अलिबाग तालुक्यातील आगरी समाजावर जागतिकीकरणामुळे झालेल्या सकारात्मक व नकारात्मक अशा दोन्ही प्रकारच्या परिणामांचा अभ्यास मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## ➢ आगरी समाजातील परिवर्तन

२० व्या शतकाच्या पूर्वार्धातच आगरी समाजामध्ये नव्या वैचारिक बदलांना सुरुवात झाली होती. त्यांच्या संघटना किंवा समाजाच्या परिषदा या माध्यमातून त्यांनी आपल्या ज्ञातीबांधवांना एकत्र करण्यास सुरुवात केली. मात्र त्यांचा वेग अतिशय कमी होता.[१] त्या तुलनेत जागतिकीकरणानंतर म्हणजेच गेल्या २० ते २५ वर्षात खऱ्या अर्थाने त्यांच्यात सर्वांगीण परिवर्तन घडून आलेले दिसते. हे परिवर्तन पुढील चार घटकांद्वारे आपणांस अधिक स्पष्ट करता येतील.

अ. सामाजिक परिवर्तन

ब. सांस्कृतिक परिवर्तन

क. आर्थिक परिवर्तन

ड. राजकीय परिवर्तन

**अ. सामाजिक परिवर्तन**

आगरी समाजामध्ये सामाजिक दृष्टीकोन झालेला बदल पुढील मुद्द्यांच्या आधारे अधिक चांगल्या प्रकारे स्पष्ट करता येईल.

**१. शिक्षण**

जागतिकीकरणामुळे जग जवळ आले. त्यातून रोजगार निर्मिती झाली. या रोजगार प्राप्तीसाठी अथवा अर्थार्जनासाठी शिक्षण आवश्यक झाले. आगरी समाजात स्वातंत्र्यपूर्व कालापासून शिक्षणाला सुरूवात झाली होती. स्वातंत्र्योत्तर काळात या शिक्षणाच्या प्रसाराने वेग घेतला परंतु आगरी समाजाचा प्रमुख व्यवसाय शेती असल्याने येथील समाजातील शिक्षित झालेल्या वर्गाने उच्च शिक्षण घेण्यासाठी तालुक्याबाहेर जाण्याऐवजी शेतीकडेच लक्ष देणे आवश्यक मानले होते. त्यामुळे औदयोगिकीकरणापूर्वी या समाजातील लोक शिक्षित होते पण उच्च शिक्षितांचे प्रमाण अत्यल्प होते.[२] त्यातच जागतिकीकरणाने खारेपाट भागात निर्माण झालेल्या विविध कारखान्यांमुळे समाजाच्या उदरनिर्वाहाच्या व्यवसायांवरच घाला आला. त्यामुळे चांगले स्थिर व आर्थिकदृष्टया सधन असलेले आयुष्य जगण्यासाठी त्यांनी शिक्षणाची कास धरली. म्हणूनच गेल्या २५ ते ३० वर्षात खऱ्या अर्थाने या समाजाची शैक्षणिक प्रगती घडून आली. स्वातंत्र्यापासून जवळजवळ ३० ते ४० वर्षात या समाजातील अनेक लोक शिक्षकी पेशात कार्यरत होती. अगदी हाताच्या बोटावर मोजता येतील एवढेच लोक डॉक्टर, इंजिनिअर, वकील, अथवा सरकारी अथवा निमसरकारी अशा उच्च पदाच्या नोकरीत होते.[३] मात्र या पिढीतील लोकांच्या मुलांनी त्यांची आर्थिक परिस्थिती चांगली बनल्यामुळे उच्च शिक्षण घेतले. त्याआधारे उच्च पदस्थ नोकरीत त्यांची वर्णी लागली. शिवाय विविध उद्योग व व्यवसायातही

त्यांनी आपला जम बसविला. सद्यस्थितीत सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, साहित्य, कला, क्रीडा, तांत्रिक, औद्योगिक व व्यावसायिक अशा सर्वच क्षेत्रातील त्यांची प्रगती निश्चितच कौतुकास्पद आहे. या व्यतिरिक्त चांगल्या दर्जाच्या व वेगळ्या क्षेत्रातील ज्ञान प्राप्तीसाठी परदेशी शिक्षण घेण्याचाही प्रयत्न आगरी समाज करतांना दिसतो. परदेशी जाऊन तेथील शिक्षण आत्मसात करून ते भारतात परत येतात किंवा तेथेच राहून आपल्या ज्ञानाचा प्रसारही करतांना दिसतात. उदा. बेलकडे या गावातील डॉ. उमेश पाटील यांनी भाषाशास्त्रामधून (Linguistics) पीएच. डी. पूर्ण केली. शिवाय सध्या ते Potsdam University – Germany येथे प्राध्यापकाचे काम करतात.[४] अशी उदाहरणे कमी असली तरी हे ही नसे थोडके.

याशिवाय उच्च शिक्षिणातील पीएच. डी, एम. फिल, इंजिनिअरींग, डॉक्टर, एल. एल. बी., जर्नालिझम, नेव्ही, आर्मी यांसारख्या विविध क्षेत्रातील अनेक पदव्या त्यांनी प्राप्त केल्या आहेत. साहित्यक्षेत्रात तर म. सु. पाटील, एम. पी. पाटील यांसारख्या अनेकांनी आपला ठसा उमटविला. तसेच अगदी शिक्षण क्षेत्रात वेगळ्या, सृजनात्मक पध्दतीने कार्य करून आदर्श शिक्षकाचा जिल्हा व राज्यस्तरीय पुरस्कारांचाही सन्मान त्यांनी मिळविला. उदाहरणा दाखल काही नावे पुढील प्रमाणे सांगता येतील.[५]

श्री. विजय पाटील – कुसुंबळे

श्री. प्रविण पाटील – कावाडे

श्री. जालिंदर पाटील – पेझारी

श्री. कृष्णा म्हात्रे – बांधण

श्री. कैलास पिंगळे – कुर्डूस

श्री. भालचंद्र पिंगळे – कुर्डूस

श्री. चंद्रकांत पाटील – वालवड

श्री. मनोज थळे – चरी

सौ. चंद्रकला म्हात्रे – रेवस

सौ. सुजाता चवरकर – पोयनाड

जागतिकीकरणात अत्यावश्यक असणाऱ्या तांत्रिक शिक्षणातही हा समाज प्रगती करू लागला आहे. संगणक विषयक आणि हार्डवेअरचे विविध कोर्सेस, आय. आय. टी. व आय. टी. आय. अशा वेगवेगळ्या क्षेत्रातील शिक्षणातही ते उच्च ज्ञान प्राप्त करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करताना दिसतात.

**२. भाषा**

आगरी समाजाची मूळ बोली भाषा म्हणजे आगरी भाषा होय. मराठी भाषेची ही कोकणातील बोली भाषा आहे. आदिवासी, कुणबी, कोळी व माळी या लोकांच्या बोलीशी आगरी बोलीचे बरेच साम्य आहे. 'ळ' बद्‌ल 'ल' व 'ण' बद्‌ल 'न' येणे हे या भाषेचे प्रमुख वैशिष्ट्य सांगता येईल.[६] या भाषेचा संबंध यादव काळातील प्राकृत भाषेशी जोडला जातो. ज्ञानेश्वरी व महानुभाव पंथातील गद्यग्रंथात ह्या बोलीची रूपे आढळतात. संतसाहित्य आणि लोकगीते तसेच मध्ययुगीन काळातील महानुभव पंथ व चक्रधर, ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास अशा अनेक संतांच्या लेखनात आगरी बोलीचा वापर सढळहस्ते सापडतो.[७] त्यामुळे यादवकालीन प्राकृत भाषा हीच आगरी बोलीची मध्यवर्ती भाषा असून त्यामध्ये स्थलपरत्वे व कालपरत्वे नवे शब्द येत गेले असावे असे आढळते.

ही भाषा समुद्रकाठची असल्याने त्यांच्या उच्चारात सुस्पष्टता नाही. मात्र तरीही या भाषेत एक विशिष्ट प्रकारचा गोडवा आहे. या भाषेतील उच्चार मृदू व ओष्ठ्य आहेत. यात कंठ्य व दन्तव्य म्हणजेच जड उच्चार टाळण्याचा प्रयत्न केला जातो. तसेच जोडाक्षरी उच्चारांनाही फाटा दिला जातो. ध्वनी परिवर्तनामुळेही यातील मुळ शब्दाच्या उच्चारात बदल घडून आलेला दिसतो. ड चा र होणे, उन – हून ऐवजी 'शी' हा प्रत्यय लावणे, वाक्याच्या शेवटी ओ असेल तर ऊ होणे, काही वेळा व ऐवजी ई येणे यासारखी कित्येक भाषा वैशिष्ट्ये आगरी बोलीभाषेत असलेली दिसतात. हे सर्व समजण्यासाठी पुढील उदाहरणे उपयोगी पडतील.[८]

- **प्राकृत — आगरी — नागरी**

वळख — वळख — ओळख यरव्ही — यरव्ही —एरव्ही

नोवरा — नोवरा — नवरा निसाणी — निसन — शिडी

- **ध्वनी परिवर्तन**

वेळ — येळ नथ — नत कृष्णा — किसना

सोळा — सोला पेणला — पेनला बोकड — बोकर

- **जोडाक्षरी उच्चार**

प्रत्येक — परतेक प्रगती — परगती

- **व चा लोप होऊन ई चा वापर**

वीस — ईस विशाल — ईशाल विश्वास — ईश्वास

विनाश — ईनाश विस्तव — ईस्तव

- **ऊन — हून ऐवजी शी हा प्रत्यय**

घरातून — घरन्शी मुंबईतून — मुंबैशी

- **ओ ऐवजी लू चा वापर**

आलो — आलू पोहोचलो — पोचलू

जेवलो — जवलू मेलो — मेलू

- **प्रश्नार्थक वाक्याच्या क्रियापदासाठी व चा वापर**

| नागरी | — | आगरी | नागरी | — | आगरी |
|---|---|---|---|---|---|
| येता का ? | — | येताव काय? | न्याल का ? | — | नेशीव काय? |
| जेवता का ? | — | जेवताव नं ? | जाल का ? | — | जाशीव काय ? |

तसे पाहता या समाजात शैक्षणिक विकास हा उशिरा झाल्याने ही भाषा बाह्य संस्कारापासून वंचित राहिली म्हणून आजही ग्रामीण भागात ही भाषा आपले मूळ रूप जतन करून आहे. या बोलीभाषेत लोककथा व लोकगीतांचा

अमाप साठा आहे. या साठ्याचे जतन करण्याचे काम आगरी स्त्रियांनी केले. आगरी लोकगीतांचे प्रामुख्याने धवळे, ओव्या, गणपतीची गाणी, होळीची गाणी, लग्नाची गाणी, वरातीची गाणी, बायांची गाणी असे अनेक प्रकार आढळतात.[९] आगरी स्त्रियांनी आपल्या अशिक्षितपणामुळे ही सर्व गीते मौखिक स्वरूपात जतन केली. त्यामुळे स्त्रियांची ही गीते म्हणजे त्यांची ओळख होती. मनोरंजनासाठीही त्यांना या गीतांचा आधार व्हायचा.

मात्र आधुनिकीकरणामुळे व बदलत्या शिक्षणप्रणालीमुळे कुठेतरी या भाषेच्या अस्तित्वाला धोका पोहचू लागला आहे कारण सद्यस्थितीत ही भाषा गावंढळ लोकांची भाषा म्हणून समजली जाते. त्यामुळे या समाजातील स्त्रिया व पुरुष ही भाषा बोलणे शक्यतो टाळतात. उलट शुध्द किंवा प्रमाण मराठी भाषा बोलण्याचा ते प्रयत्न करतात. त्यामुळे आगरी भाषेतील अमोल असा मौखिक साहित्याचा ठेवा पुढच्या पिढीला सांभाळणे शक्य होत नाही.[१०] काही प्रमाणात या समाजातील साहित्यिक ही भाषा जिवंत ठेवण्यासाठी प्रयत्न करताना दिसतात. ते आपल्या साहित्यातून आगरी भाषेचा वारसा जपतात.

**३. मनोरंजनाची साधने**

शेतात कराव्या लागणाऱ्या काबाडकष्टामुळे मनोरंजनासाठी या समाजाकडे विशेष साधने नव्हती तरीही खेळांव्यतिरिक्त नृत्य, गायन करणे, भजन व गाणे म्हणणे, नाटक व स्नेहसंमेलन यांचे आयोजन करून आगरी समाज आपले मनोरंजन करायचा.[११] आगरी लोकांची मनोरंजनासाठी गायीली जाणारी लोकगीते प्रसिध्द होती. भलरी, अंगाई गीते, गौरीची गाणी, गणपतीची गाणी, लग्नगीते, धवलगीते, बायांची गाणी अशा अनेक प्रकाराने गायन करून ते स्वत:चे मनोरंजन करायचे.[१२] या व्यतिरिक्त होळी, गोपाळकाला, गौरी – गणपती, नवरात्र यांसाारख्या सणांमध्ये विविध प्रकारचे नृत्य करून त्यातूनही ते आनंद प्राप्त करत. यात स्त्री – पुरूषांचा भवर नाच व चक्री नाच विशेष प्रसिध्द असे. तसेच नाटक, स्नेहसंमेलन व पडद्यावरचे चित्रपट ही त्यांची हळूहळू बदलत गेलेली मनोरंजनाची साधने.

मात्र गेल्या २५ वर्षात जागतिकीकरणाने आगरी समाजाच्या मनोरंजनाच्या साधनांमध्येही बदल घडवून आणला. टी.व्ही., चित्रपटगृहे व मनोरंजनाच्या इतर साधनांनी या जुन्या गोष्टी कालबाह्य होऊ लागल्या आहेत. ग्रामीण भागात मात्र आजही काही ठिकाणी या जुन्या मनोरंजनाच्या साधनांना आधुनिकतेची जोड देऊन जोपासले जाते. आता तर स्त्रिया आपले नाचमंडळ तयार करून मागणी नुसार नृत्य व गायन सादर करतात. तसेच आधुनिक पध्दतीच्या गाण्यांवर स्नेहसंमेलनाचेही आयोजन केले जाते. नाटक व कापडी पडद्यावरचे चित्रपट यांच्याकडे मात्र लोकांचे दुर्लक्ष होतांना दिसते.

## ४. सण — उत्सव

इतर समाजांप्रमाणे आगरी समाजामध्येही सण व उत्सवांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. या समाजाचे प्रमुख सण म्हणजे होळी, दहिहंडी, गौरी — गणपती, नवरात्र व दिवाळी .[१३] या सर्व सणांपैकी गणपती उत्सव ते खूप मोठ्या प्रमाणात साजरा करतात. मात्र या सर्वांतही आता कालानुरूप बदल होत आहे. गणपतींच्या दिवसात सासुरवाशीण स्त्रीला माहेरी आणून ववसा (सौभाग्याचा वसा म्हणून सुपामध्ये गोड पदार्थांनी ओटी भरून देणे) दिला जातो. आता हा ववसा देण्याचा प्रकार आधुनिक पध्दतीने केला जातो. शक्यतो ग्रामीण भागातच ही प्रथा राहिलेली आहे. नवरात्रोत्सवात नाचांचे आयोजन केले जाते. त्यातही आता जुन्या पारंपरिक नृत्यरचनांऐवजी सिनेमातील रेकॉर्ड डान्सवर ताल धरतांना व गरबा खेळतांना हे लोक दिसतात. तसेच मूर्ती विसर्जनातही सात्त्विक समाधानापेक्षा कर्कश अवडंबरावर त्यांचा भर असलेला दिसतो. सर्वत्र बडेजाव व दिखाऊपणाचा अंगिकार केलेला आढळतो.

होळीच्या सणातही आता रोषणाई व संगीतासाठी आधुनिक प्रकारांचा वापर केला जातो. पूर्वी गावामधून एकच होळी किंवा गणपती किंवा देवी असायची. आता मात्र गल्लोगल्ली स्वत:पुरती स्वतंत्र अशी सण साजरे करण्याची पध्दतच निर्माण झाली आहे. ग्रामीण भागात मात्र काही ठिकाणी

आजही पारंपरिक पध्दतीने नृत्य गायन करून सण उत्सव साजरे केले जातांना दिसतात.

धुळवड हाही सण आगरी समाजामध्ये मोठ्या आनंदाने साजरा केला जातो. या दिवशी प्रत्येकाकडून काही रक्कम वर्गणी स्वरूपात गोळा करतात. याला पोस्त म्हणतात. मग रात्री या पोस्ताच्या पैशातून 'खाना' केला जातो. खाना म्हणजे पुरूषांनी शिजवलेले बोकडाचे मटण. फार पूर्वी या समाजाची आर्थिक स्थिती तितकीशी चांगली नव्हती. त्यामुळे मटण खाणे त्यांच्या दृष्टीने फार दूरची गोष्ट असायची म्हणून संधी मिळताच ते एकत्र येऊन खाना करून आपली मांसाहाराची हौस भागवायचे. यासाठी प्रामुख्याने गावजत्रा, गटारी, धुलीवंदन, गणपती विसर्जनानंतर व यात्रा अशा काही ठराविक दिवशी हे सर्वजण एकत्र येतात. आता या समाजाची आर्थिक स्थिती चांगली असल्याने मटण खाणे या समाजासाठी अवघड गोष्ट राहिलेली नाही. मात्र खाना करणे या गोष्टीची आवड तेवढीच लोकप्रिय असलेली दिसते.

### ५. घरांची रचना व भौतिक सुधारणा

आगरी समाजाची घरे साधी, चौकोनी, मातीच्या भिंतीची, पेढ्यांची व उतरत्या छपरांची असतात. समोर मोकळी ओटी, मधे माजघर व मागे किंवा बाजूला जेवणाची पडवी असायची. घरापुढे अंगण व मागे आवार असण्याचीही पध्दती होती. घराच्या आसपास गुरांसाठी गोठा असायचा.[१४] घर व अंगण वेळोवेळी शेणाने सारवले जाई. मात्र जागतिकीकरणामुळे या समाजातील लोकांच्या घरांच्या रचनेत व भौतिक सोयी सुविधेत अमुलाग्र बदल झालेला दिसतो. गेल्या २० – २५ वर्षात या समाजातील लोकांमध्ये चांगल्या पध्दतीचे घर असणे आवश्यक झाले आहे. त्यांनी घराबाबतीत पूर्वीचीच रचना कायम ठेवली आहे मात्र आता घरे आधुनिक साहित्याचा वापर करून पक्क्या स्वरूपाची बांधतात. सधन लोक मोठे बंगले बांधण्याचा तर सर्वसामान्य लोक किमान भौतिक सुविधांनी युक्त असे सुसज्ज घर उभे करण्याचा प्रयत्न करतात. यासाठी प्रसंगी कर्ज काढण्यासही ते बिचकत नाही.

या शिवाय घरात आधुनिक यंत्र व उपकरणेही त्यांच्या दृष्टीने आवश्यक झालेली दिसतात. जसे की पूर्वी घरात चूल, उखळ — मुसळ, पाटा — वरवंटा यांसारख्या गोष्टी आवश्यक असायच्या तर आता या ऐवजी गॅस, मिक्सर, फोन, टी. व्ही. यांसारख्या भौतिक सुखाची गरज भागविणाऱ्या गोष्टी आवश्यक व अनिवार्य होऊ लागल्या आहेत. गरीब असो वा श्रीमंत सर्वांना या गोष्टींचे महत्त्व वाटते. जवळजवळ ९५ टक्के लोकांकडे या भौतिक सुविधा आढळतात. याबाबत एका मुलाखतदार गृहिणीने व्यक्त केलेले मत विचार करायला भाग पाडते, त्यांच्या मते 'एकवेळ घर कच्च्या विटा व मातीचे असले किंवा कुडाचे असले तरी चालेल पण घरात टी. व्ही. हवाच. शेजाऱ्यांकडे मुलांनी जाऊन टि. व्ही. पाहण्यापेक्षा एकवेळ उपाशी राहीले तरी चालेल. केबल आणि टी. व्ही. याशिवाय मजा येत नाही'.[१५]

एकंदरीत वीज व विजेवर चालणाऱ्या वस्तू, यंत्र व यांत्रिक उपकरणे, गाड्या, टी. व्ही., मोबाईल, आधुनिक पध्दतीची घरे यांसारख्या सर्व गोष्टी आज स्वतःची प्रतिष्ठा दाखवण्यासाठी त्यांच्या दृष्टीने आवश्यक झालेल्या आहेत. हा जागतिकीकरणाचा झालेला प्रमुख बदल म्हणता येईल.

### ६. साहित्य

२० व्या शतकाच्या पूर्वार्धातच आगरी समाजामध्ये शैक्षणिक विकासाला सुरूवात झाली होती. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात तर सर्वांप्रती शिक्षणाचे महत्त्व रूजले होते. शिक्षणचा सर्वत्र प्रसार झाल्याने आगरी समाजाने शिक्षणात आघाडी मारली परंतु या समाजात शिक्षणाचा प्रसार झाला असला तरी दैनिके, साप्ताहिके, मासिके यांमधून केले जाणारे लेखन किंवा इतर साहित्याची निर्मिती होण्याचे प्रमाण अत्यल्प होते. अलिबाग तालुक्यात साहित्य क्षेत्रात आपला ठसा उमटविणारे साहित्यीक, कवी, लेखक, नाटककार यांची संख्या कमी असली तरी त्यातही उच्चतम साहित्याची निर्मिती करून पुरस्कारास पात्र होणाऱ्या व्यक्ती होत्याच. त्यातील काही प्रतिथयश आगरी व्यक्तींची नावे व कार्य पुढील प्रमाणे सांगता येतील.[१६]

## ❖ भ. ल. पाटील :—

भगवान लक्ष्मण पाटील हे अलिबाग तालुक्यातील लोणघर येथे राहणारे होते. आगरी समाजात पुस्तक प्रकाशित करण्याचा पहिला मान भ. ल. पाटील यांच्याकडे जातो. ते 'सीताकांत' या टोपणनावाने काव्यलेखन तर 'वेन्नापणी' या टोपणनावाने काव्यलेखन करायचे. १९३० — ३५ च्या काळात यांची 'संगीत जमीनदार व संगीत कूळकायदा' ही नाटके प्रकाशित झाली व प्रेक्षकांच्या प्रचंड प्रतिसादात प्रसिध्द झाली. यांचे 'रसमाधुरी' या पुस्तकावरील समीक्षा करणारे पुस्तकही खूप गाजले. याशिवाय 'चौथेरत्न, राजमुकुट, स्वधर्मासाठी' ही त्यांची काही पुस्तके. जागतिकीकरणामुळे रायगड जिल्ह्यातील प्रामुख्याने खारेपाट भागातील शेतकऱ्यांच्या जीवन प्रणालीवर अनुकूल व प्रतिकूल असे दोन्ही परिणाम झाले. या सर्वांचा विचार भ. ल. पाटील यांनी आपल्या लेखनातून मांडला आहे. 'हंदा, आगोठीच्या तोंडावर, मजत, उघर' असे आगरी समाजाशी संबंधीत अनेक लेख त्यांनी विविध वर्तमान पत्रातून प्रकाशित केले. तसेच २००५ मध्ये झालेल्या ६ व्या आगरी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्षही झाले होते.

## ❖ डॉ. म. सु. पाटील :—

मराठी साहित्य क्षेत्राला म. सु. पाटील हे नाव अपरिचित नाही. मधुकर सुदाम पाटील हे त्यांचे पूर्ण नाव. त्यांचा जन्म अलिबाग तालुक्यातील धामणपाडा — शहाबाज येथे झाला. मराठी साहित्याच्या समीक्षा विभागात यांचे कार्य महत्त्वाचे आहे. त्यांच्या पीएच. डी च्या प्रबंधास मराठीतील सर्वोत्कृष्ट प्रबंध म्हणून पुरस्कार प्राप्त झाला आहे. 'दलितांच्या कविता' हे १९८९ ला प्रकाशित झालेले त्यांचे पहिले पुस्तक. 'बालकवींचे काव्यविश्व', 'सदानंद रेगे यांचे काव्यविश्व' आणि 'आदिबंधात्मक समीक्षा' हे समीक्षाग्रंथ, 'रूपशोध', 'इंदिरा यांचे काव्यविश्व', 'भारतीयांचा साहित्य विचार', 'साहित्याचे सामाजिक व सांस्कृतिक अनुबंध', 'ज्ञानेश्वरीतील तृष्णाबंध' व 'तुकाराम : अंतर्बाहय

संघर्षाची अनुभवरूपे' यांसारखी अनेक पुस्तके त्यांनी प्रकाशित केली. यातील सर्वांनाच मानाचे पुरस्कार प्राप्त झालेले आहेत.

### ❖ एम. पी. पाटील :—

साहित्यक्षेत्रातील समीक्षा लेखनातील एक महत्त्वाचे नाव म्हणजे एम. पी. पाटील. यांचे पूर्ण नाव मधुकर पोसू पाटील. यांचा जन्म अलिबाग तालुक्यातील खिडकी या गावी झाला. त्यांनी विविध मासिके व वर्तमानपत्रे यातून काव्यसमिक्षात्मक लेख, कथा, एकांकिका, स्फूट लेख यांसारखे लेखन केले आहे. शिवाय 'नाटट्वज्ञ समीक्षा : संहिता आणि रंगप्रयोग' व 'गीता — ज्ञानेश्वरी : इहवादी दृष्टीकोन' अशा दोन समीक्षा ग्रंथांनाही महत्त्वपूर्ण पुरस्कार मिळालेले आहेत.

### ❖ गंगाधर पाटील :—

गंगाधर गणेश पाटील यांचाही जन्म अलिबाग तालुक्यातील खिडकी या गावी झाला. त्यांनीही समीक्षात्मक लेखन करून मराठी साहित्य समृध्द करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी 'सुहृद्य' या टोपण नावाने लेखन केले. मात्र त्यांचे बरेचसे साहित्य आजही अप्रकाशित आहे. 'सुहद्यगाथा' व 'समीक्षेची नवी रूपे' ही त्यांची प्रकाशित झालेली दोन पुस्तके. या दोन्ही पुस्तकांच्या माध्यमातून त्यांनी समीक्षेला नवे रूप देण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. शिवाय वाङ्मय समीक्षांच्या नियतकालीकातील प्रसिध्द अशा 'अनुष्टूभ' या नियतकालीकाचे ते संपादकही होते.

### ❖ शंकर सखाराम :—

आगरी भाषेतील लक्षणीय स्वरूपाचे साहित्य लिहिण्याचा मान शंकर सखाराम यांना जातो. यांचा जन्म अलिबाग तालुक्यातील कोपर या गावी झाला. त्यांचा पहिला कथासंग्रह 'घुगाट' हा होता. त्याानंतर आजपर्यंत त्यांची जवळजवळ २० पेक्षा जास्त पुस्तके प्रकाशित झालीत. विविध मासिके व वर्तमानपत्रातील कविता, लेख, बालसाहित्य व चारोळी लेखन अशा सर्वच प्रकारच्या साहित्यक्षेत्रातील त्यांचे लेखन लोकप्रिय आहे. त्यांच्या लेखनातून

प्रामुख्याने रायगड जिल्ह्यातील आगरी समाज, त्यांचे पोशाख, आचारधर्म, संस्कृती, बोलीभाषा इ. बद्दलची माहिती उपलब्ध होते. याशिवाय त्यांची 'सेझ' ( SEZ ) ही कादंबरी मुंबई विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात समाविष्ट झालेली आहे. तसेच 'हरवलेली वस्तूसंस्कृती' हा त्यांचा मराठीतील पहिला वस्तूकोश आहे.

### ❖ अरूण म्हात्रे :—

अरूण म्हात्रे हे प्रसिध्द कवी व संगीतकार असून साहित्यिक व अभिनेतेही आहेत. यांचा जन्म अलिबाग तालुक्यातील हाशिवरे गावात झाला. 'ऋतु शहरातले' हा त्यांचा पहिला कवितासंग्रह. या काव्यसंग्रहास अनेक पुरस्कार प्राप्त झालेत. शिवाय त्यांचे 'ते दिवस आता कुठे' आणि 'कोसो मैल दूर आहे चांदणी' हे दोन काव्यसंग्रह प्रसिध्द आहेत. तसेच 'कवितेच्या गावा जावे' हा त्यांचा गीतगायनाचा कार्यक्रम संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिध्द आहे त्यातील 'हे कुठले रस्ते' आणि 'शुभ्र कळ्या मूठभर' या कविता वाचनाच्या त्यांच्या ध्वनीमुद्रिका (कॅसेट्स) विशेष प्रसिध्द आहेत.

### ❖ नीरजा पाटील :—

नीरजा पाटील यांचा जन्म अलिबाग तालुक्यातील धामणपाडा या गावात झाला. समीक्षक डॉ. म. सु. पाटील यांच्या त्या कन्या. वडिलांच्या साहित्याचा वारसा जपून त्यांनी आपला ठसा साहित्यक्षेत्रात उमटवला. कवयित्री म्हणून त्यांची ओळख सर्वश्रूत आहे. 'ते दर्पणी बिंबले', 'निरन्वय', 'वेणा' आणि 'स्त्रीगणेशा' हे त्यांचे काव्यसंग्रह. त्यांच्या कवितेचा केंद्रबिंदू स्त्री हा आहे. त्यांच्या अनेक साहित्यकृतींना विविध पुरस्कार मिळालेले आहेत.

### ❖ म. ना. पाटील :—

म. ना. पाटील यांचे पूर्ण नाव मधुकर नारायण पाटील हे होते. त्यांचा जन्म अलिबाग तालुक्यातील पेझारी या गावी झाला. त्यांचे 'रसमाधुरी' हे आगरी लोकगीतांचे वैशिष्ट्यपूर्ण पुस्तक प्रसिध्द आहे. त्यांनी प्रामुख्याने खारेपाटातील आगरी संस्कृतीवर आधारित लेखांचे लेखन 'खलाटी' या पुस्तकात

केलेले आहे. ते अनेक वर्तमानपत्रे व मासिकांमधून जनमानसांपर्यंत पोहोचलेले आहेत.

### ❖ सुनंदा मोडखरकर :—

सुनंदा मोडखरकर यांचा जन्म पेण येथे झाला. लग्नानंतर अलिबाग तालुक्यातील 'शहाबाज' या गावी त्या रहायला आल्या. सासरच्या पाठींब्यामुळे त्यांनी आपले शिक्षण पूर्ण करून साहित्यक्षेत्रात मोलाची भर टाकली. त्यांचे 'आगरी लोकगिते व परंपरा', 'शब्दफुले', 'सानिकाची गाणी', 'स्मृतीग्रंथ' हे प्रकाशित व आगरी कविता संग्रह, विविध कथा संग्रह असे अप्रकाशित साहित्य उपलब्ध आहे. त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण लेखनासाठी आगरी साहित्यभूषण व इतर पुरस्कार त्यांना प्राप्त झालेले आहेत. २०१२ मध्ये झालेल्या आगरी साहित्य संमेलनाच्या त्या अध्यक्ष्य होत्या.

### ❖ कैलास पिंगळे :—

कैलास मारूती पिंगळे यांचा जन्म अलिबाग तालुक्यातील कुर्डूस येथे झाला. त्यांच्या 'भारत माझा देश आहे', 'रेशीम गाठी', 'रानवाटा', 'रानवेल' व 'असा आहे अलिबाग' यांसारख्या साहित्यकृती प्रसिध्द आहेत. शिवाय त्यांनी स्थापन केलेल्या सह्याद्री साहित्य मंडळ व आगरी विकास मंचामुळे या समाजातील इतर साहित्यिकांनाही हक्काचे व्यासपीठ मिळाले आहे.

या व्यतिरिक्त पेझारी येथे राहणारे अशोक धुमाळ हेही एक प्रतिथयश साहित्यिक आहेत. ते कवी, लेखक, स्तंभलेखक, नैमित्तिक लेखक म्हणून विशेष प्रसिध्द आहेत.

एकंदरीत आगरी समाजातील स्त्री व पुरूष असे दोन्ही साहित्यक्षेत्रात कार्यरत असलेले आपणांस दिसतात. याशिवाय अनेक लोकगीते, ओव्या, धवले यांच्या माध्यमातूनही आगरी समाजाचे साहित्य आढळते. मात्र हा ठेवा मौखिक स्वरूपात आजपर्यंत सांभाळला गेला. आता या गीतांचे साहित्याच्या दृष्टीने लेखन होऊ लागले आहे. शिवाय त्यांच्या गाण्यांच्या ध्वनीमुद्रिकाही लोकप्रिय

होत आहेत. या व्यतिरिक्त अनेक नाटककार, कीर्तनकार, प्रवचनकार व लेखकांचे साहित्य प्रकाशित झाले तर काहींचे अप्रकाशित राहीले. मात्र आपल्या साहित्यातून त्यांनी आपल्या कथा व व्यथा मांडण्याचा प्रयत्न केला. सुरूवातीला समीक्षात्मक असणारे साहित्य आता समाजकेंद्री बनत चाललेले दिसते. आपली आगरी संस्कृती येणाऱ्या पिढ्यांना कळावी व तिचे संवर्धन व्हावे या दृष्टीने आगरी समाजातील साहित्याचे लेखन केले जात आहे. यासाठी व या समाजाला हक्काचे व्यासपीठ मिळावे यासाठी विविध ठिकाणी आगरी साहित्य संमेलनाचे आयोजनही केले जाते. अलिबाग मधील काही आगरी साहित्यिकांनीही याचे अध्यक्षपद भूषविलेले आहे.

### ७. समाजमंदिर

जागतिकीकरणाने आगरी समाज वेगवगळ्या घटकान्वये एकत्र येऊ लागला. त्यातील एक महत्त्वाचा घटक म्हणजे समाज मंदिर. आपल्या समाजातील लोकांची एकत्र येऊन सांगोपांग चर्चा व्हावी, तसेच विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी त्यांना व्यासपीठ मिळावे या उद्देशाने समाजमंदिरांची निर्मिती केली गेली.[१७] याचे प्रमाण आगरी समाजात विशेष उल्लेखनीय असे आहे. चरी, चिखली, वाघजई, देहेन, गोधंळपाडा, पेझारी, नागाव, आंबेपूर, दिव, रायवाडी, आक्षी, कुरूळ, आंबेघर, वडवली, धोकोडे, नारंगी, हाशिवरे, शहाबाज, चौकीचापाडा, झिराड, खंडाळे इत्यादी ठिकाणी आगरी समाजाची समाज मंदिरे आढळतात.[१८] अशा पध्दतीने एकत्र येऊन ते आधुनिकता व परंपरा यांमध्ये समन्वय साधण्याचा प्रयत्न करतांना दिसतात.

### ८. आरोग्य

शिक्षणाच्या प्रसार व प्रचारामूळे आगरी समाजात अमुलाग्र बदल झाला हे निश्चित परंतु आरोग्या बाबतीत त्यांच्यात तितकीशी प्रगती झाली नव्हती. डॉ. डी. एन. काळे यांच्या प्रबंधातील मतानुसार आगरी समाजातील लोक संसर्गजन्य रोग, त्वचारोग, प्राण्यांचे चावणे, ताप, खोकला, जखमा, रक्तस्त्राव, भाजणे, विषप्रयोग यांसारख्या अनेक रोग व आजारांसाठी डॉक्टरांपेक्षा भगत व

गावातल्या वैदू कडे उपचार करणे जास्त पसंत करत होते. त्यांची श्रध्दा अशा लोकांवर जास्त होती.[१९] वनस्पती, मासे यांपासून बनवलेल्या औषधाने किंबहूना देवाला बोललेल्या नवसाने व्यक्ती बरा होतो असा त्यांचा समाज होता. मात्र जागतिकीकरणाने आता त्यांच्यातील हा विचार बदलून टाकला. शिवाय आगरी समाजातील बरेच जण वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत झाल्याने त्यांच्यात आरोग्यविषयक भीती दूर होऊन वैज्ञानिक दृष्टीकोन वृध्दींगत होण्यास मदतच झाली. आता स्त्रियांचे बाळंतपण सुईणींमार्फत घरी न करता मुख्यत्वे दवाखान्यात केले जाते. तसेच लहान–सहान आजारापासून मोठ्या आजारापर्यंत सर्व गोष्टींचे निदान व उपचार होण्यासाठी दवाखान्याची मदत घेतली जाते. याशिवाय विविध समाजसेवी संस्थांमार्फत वेळोवेळी घेतल्या जाणाऱ्या आरोग्य तपासणी शिबिराचा लाभ घेण्यास व रक्तदान शिबिरात सहभागी होण्यात आगरी समाज अग्रेसर असलेला दिसून येतो.

### ९. अंत्यविधी

आगरी समाजात व्यक्ती मृत झाल्यानंतर जाळण्यात येते. अर्भकाचा मृत्यू झाला असेल किंवा देवी यासारख्या रोगाने मृत्यू झाला असेल तर त्यास पुरण्यात येते. विवाहित पुरूष मृत झाल्यास त्याच्या पत्नीचे सौभाग्यालंकार काढून घेऊन तिच्या बांगड्या दगडाने फोडतात. विवाहित स्त्रीचा मृत्यू झाल्यास तिला सौभाग्यालंकाराने सजवून स्मशानात नेले जाते. प्रेत स्मशानात नेते वेळी भजन गायले जाते. शिवाय प्रेताच्या मागे सुट्टे पैसे व गुलाल रस्त्यावर टाकतात. वयोवृध्द व्यक्ती मृत झाल्यास पालखीत घालून वाजत गाजत, फटाके वाजवत नेले जाते. स्मशानात प्रेतास मूठमाती देऊन त्यास अग्नी दिला जातो. काही ठिकाणी अग्नी देऊन घरी जातात नंतर ४ माणसे ज्यांना डोमे म्हणतात ते येऊन अस्थी गोळा करतात. तर काही ठिकाणी संपूर्ण प्रेताचे जळीत होऊन कवटी फूटे पर्यंत टाळ मृदूंगााचे भजन केले जाते. याच वेळी पिंडदानाचा दिवस ठरविला जातो. पिंडदान हे १०, ११ ते १३ व्या दिवशी करतात. अमावस्या, शनिवार वगैरे मध्ये आल्यास किंवा दुसरा महिना लागत असल्यास पिंडदानाचा दिवस मागे–पुढे करतात. पिंडदानाचा संपूर्ण विधी ब्राह्मण करतो. त्याच वेळी

कुंभदानही केले जाते. पिंडदान देणाऱ्या व्यक्तींना  सामूहिकरित्या एकत्र बसवले जाते. नंतर पिंडदान देणाऱ्या व्यक्ती नारळ, तांदूळ, कापड, पैसे, फुले इ. घेऊन तर कुंभदान देणाऱ्या व्यक्ती मातीचे लहान मडके, नारळ, भात, पैसे इ. घेऊन ब्राहमण सांगेल त्या पध्दतीने विधी करून हे सर्व ब्राह्मणास दान केले जाते.

जळीतानंतर १२ दिवस सुतक पाळले जाते. या दिवसात घरात अथवा नातेवाईकांमध्ये शुभकार्य केले अथवा ठरविले जात नाही. या १२ दिवसात नातेवाईक मृत व्यक्तीच्या घरी चहापान करण्यास जातात. यास 'हाक मारणे' असे म्हणतात. स्त्रिया साखर व चहापावडर घेऊन घरी जातात व त्याचा कोरा चहा बनवून सर्वजण घेतात. याशिवाय अत्यंत जवळचे नातेवाईक अथवा सगे सोयरे जेवणाचा शिधा घेऊन अथवा शिजवलेले जेवण घेऊन हाक मारायला येतात. या दिवसात मृत व्यक्तीच्या घरी अन्न शिजवले जात नाही. त्यानंतर दिवसकार्य झाल्यावर नातेवाईकांकडे त्यांना जेवायला नेले जाते. मगच त्यांचे सुतक सुटते. या मयत प्रसंगी या समाजातील स्त्रिया दु:खावेगाने जोरजोरात रडतात. मृत व्यक्तीचे नाव घेऊन त्याच्या आठवणी सांगत माणसांनुरूप रूदन करण्याची या समाजाची पध्दती वैशिष्ट्इज्ञपूर्ण वाटते. दिवसकार्याच्या दिवशी दुखवटा घेण्याची पध्दती होती. पूर्वी दुखवटा म्हणून आपापल्या ऐपती प्रमाणे पैसे दिले जायचे. काही वर्षापूर्वी ही पध्दत बंद होऊन कापड अंगावर टाकण्याची पध्दत सुरू झाली. मात्र आता समाजात अंगावर दुखवटा घेण्याची पध्दत जवळजवळ बंद होत आलेली आहे. शिवाय वर्षश्राध्द अथवा आयव नवमी या सारख्या दिवशी मृत व्यक्तीच्या स्मरणार्थ उपयोगी वस्तूंचे वाटप करण्याची पध्दत सुरू झालेली आहे. दु:खी प्रसंगी दु:ख व्यक्त करण्यासाठी या समाजातील स्त्रिया पदर उजव्या खांद्यावर आडवा घेतात व डोक्यावर खोंडा घ्यायच्या. आता हे प्रकार बंद झालेले असले तरी पदर आडवा घेतला जातो.

मृत व्यक्तीबद्दल काही जाणून घ्यायचे असल्यास भगताला बोलवून जाग / डाग घातला जातो व त्यानुसार मृताची अतृप्त इच्छा पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जातो. अंत्यविधीच्या ह्या पारंपरिक पध्दतीत अमूलाग्र बदल

झालेला नसला तरी दुखवटा न घेणे, सुतक जास्त दिवस न पाळणे, जाग न घालणे  व दुखवट्यासाठी लोकोपयोगी वस्तू वाटणे यासांरखे बदल झालेले दिसतात.

## ब. सांस्कृतिक परिवर्तन

ज्या प्रमाणे आगरी समाजात सामाजिक परिवर्तन घडून आले त्याप्रमाणे त्यांच्यात सांस्कृतिक परिवर्तनही घडून आले. त्याचा आढावा पुढील मुद्द्यांच्या आधारे घेता येईल.

### १. पोशाख

जागतिकीकरणामुळे प्रामुख्याने आगरी समाजामध्ये झालेला हा महत्त्वाचा बदल आहे. यामध्ये स्त्री आणि पुरूष या दोघाच्यांही पेहरावामध्ये परिवर्तन घडून आलेले आहे. आगरी समाजातील पुरूष हा कमरेला धोतर किंवा रूमाल कमरेला बांधायचा व अंगात सदरा, गंजी घालायचा. तसेच खांद्यावर घोंगडी व डोक्यावर टोपी हे प्राधान्याने घालायचे.[२०] हा पेहराव त्यांच्या व्यवसायाच्या दृष्टीने अतिशय उपयुक्त असा होता. परंतु हळूहळू रूमाल व धोतराची जागा हाफ पॅन्ट ने व सदऱ्याची जागा पांढऱ्या बनियनने घेतली. आज कित्येक गावात प्रामुख्याने शेती करणारा आगरी पुरूष याच कपड्यांमध्ये दिसतो. मात्र जागतिकीकरणाने मुळचा व्यवसायच बदलल्याने या समाजाचा पेहरावही त्यानुसार बदलला. आता मुख्यत्वे पुरूष अथवा मुले शर्ट पॅन्ट यांसारखे आधुनिक वस्त्र वापरतांना दिसतात. टोपी व घोंगडी या आवश्यक गोष्टींचा वापर आताच्या पिढीकडून होताना दिसत नाही.[२१]

स्त्रियांच्या पेहरावात तर विशेष बदल झालेला आहे. आगरी स्त्रियांमध्ये सामाजिकदृष्या झालेला हा सर्वात मोठा बदल आहे. आगरी स्त्रियांचा पेहराव म्हणजे आडवे नेसणे म्हणजेच या स्त्रिया ६ ते ९ वार लुगडे गुडघ्यापर्यत लांब व अंगाबरोबर चापून चोपून नेसायच्या. तसेच डाव्या खांद्यावरून पदर सोडायच्या. या त्यांच्या पेहरावामागचा त्यांचा प्रमुख उद्देश उदरनिर्वाह हा होता. त्यांच्या उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन म्हणजे शेती व थोड्या फार प्रमाणात

मासेमारी. शेतात काम करतांना त्यांना हा पोशाख सोयीचा ठरे. गुडघ्यापर्यंत विशिष्ट पध्दतीने साडी नेसलेली असल्याने शेतात काम करण्यासाठी इतर पोशाखाची आवश्यकता त्यांना भासत नसे. उलट शेतातल्या चिखलामध्ये काम करूनही त्यांना त्रास होत नसे. भरभर चालणे, चिखल तुडवणे, कांडी ओलांडून जाणे यासारख्या गोष्टी त्यांना सहज शक्य होत. चापून चोपून अंगाला लागून ही साडी नेसली जात असल्याने त्यांच्या कामात वस्त्रांमुळे अडथळा निर्माण होत नसे.[२२] स्त्रियांसाठी हा पोशाख होता. तर मुली परकर पोलके घालत असत वयात आल्यावर मात्र त्यांना साडीच परिधान करावी लागे. यासोबतच त्यांना खोंडा वापरावा लागत असे. खोंडा म्हणजे काळ्या रंगाची लोकरीची घडी केलेली एक पातळ चादर.[२३] आगरी स्त्रिया आपल्या नेहमीच्या वापरात हा खोंडा डोक्यावरून घेत असत. हा खोंडा म्हणजे आगरी स्त्रियांच्या पेहरावातील अविभाज्य घटक होता. त्यांच्या अब्रु रक्षणासाठी तो आवश्यक मानला जाई. हा खोंडा त्यांच्या फक्त शालीनतेचे प्रतिक होते असे नाही तर ऊन, वारा, पाऊस, थंडी यासारख्या समस्यांपासून स्त्रियांचे संरक्षण व्हावे हा खोंडा वापरण्यामागे पूर्वजांचा हेतू असावा असे वाटते. घराबाहेर पडतांना स्त्रियांना हा खोंडा अनिवार्य असे. तसेच याचा उपयोग त्या स्वत:ची बैठक करण्यासाठी किंवा अंथरूणसाठीही करत असत. मात्र आधुनिकीकरणाने त्यांच्या पेहरावात बराच बदल झाला. सध्यस्थितीत नऊवारी साडीपेक्षा ६ वारी साडी नेसणेच त्या पसंत करतांना दिसतात. ज्या स्त्रिया नोकरी करतात अथवा शहरात राहतात त्या ड्रेसेस अथवा अत्याधुनिक पोषाख घालू लागल्या आहेत. त्यामुळे पारंपरिक वेशभूषा मागे पडत चाललेली दिसते. गावांमध्येही आता स्त्रिया पहेरावाच्या बाबतीत शहरी स्त्रियांचे अनुकरण करतांना दिसतात फक्त जुन्या स्त्रियाच नऊवारीचा पारंपरिक पोशाष करतांना दिसतात.

कपड्यांची रंगसंगती, कापडाचा प्रकार या गोष्टींकडेही हा समाज आताआवर्जून लक्ष देतात. शिवाय पूर्वी कपड्यांची खरेदी फक्त विशेष कार्यक्रमासाठीच केली जायची. मात्र आता तसे दिसत नाहीत. कपड्यांबाबतची त्यांची सजगता त्यांच्यातील सामाजिक परिवर्तन दर्शवते.

## २. आहार

शेती व मासेमारी हे आगरी समाजाचे प्रमुख व्यवसाय असल्याने भात, भाकरी व मासे हे त्यांचे प्रमुख अन्न होते परंतु जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने आता यात थोडेफार बदल झालेले आहेत. भात, भाकरी व मासे हे आजही त्यांचे प्रमुख अन्न आहेच. परंतु आता इतरांप्रमाणे नवनवीन खाद्य पदार्थांची संख्या त्यांच्या अन्नात वाढलेली दिसते. दूध अथवा दुधाचे पदार्थ यांच्या जेवणात विशेषत्वाने नसायचे. त्यांचा या समाजाने आता स्विकार केला आहे. विविध भाज्या, गोड पदार्थ व चमचमीत अशा बाहय खाद्यपदार्थांमध्ये त्यांची आवड निर्माण झालेली आहे. चायनिज पदार्थ, दाक्षिणात्य अथवा पंजाबी पदार्थांचाही समावेश आता त्यांच्या आहारात दिसतो. या समाजातील लोक सकाळची न्याहरी म्हणून भाजी भाकरी किंवा मासे आणि भाकरी खाणे पसंत करायचे. आता मात्र कांदेपोहे, शिरा, उपमा, इडली किंवा मॅगी यांसारखे पदार्थ त्यांच्या नाश्त्यात आढळतात.[२४] या पदार्थांचा वापर प्रामुख्याने शहरी अथवा नोकरदार वर्गातील आगरी समाजात होतांना दिसतो. ग्रामीण भागात हे पदार्थ आवडीने खाल्ले जात असले तरी भाजी, मच्छी आणि भाकरीला आजही प्राधान्य आहे. या नव्या युगात आर्थिक परीस्थिती चांगली झाल्यामुळे या समाजातील लोक हॉटेलिंगही करू लागले आहेत. कधीतरी का होईना पण चांगल्या हॉटेलमध्ये जाऊन खाणे त्यांना गरजेचे वाटू लागले आहे. शिवाय खाण्याच्या बाबतीत सध्या या समाजाचा प्रसिध्द असलेला पदार्थ म्हणजे पोपटी. पोपटी म्हणजे वालाच्या शेंगा विशिष्ट पध्दतीने भाजून खाणे. पूर्वी पोपटी लावणे ही समाजातील अती सधन अथवा उनाड, टवाळ मुलांच्या गमतीचा भाग होता.[२५] परंतु या आधुनिकीकरणामुळे समाजातील लोक इतरांचे अनुकरण करू लागले आहेत. त्यानुसार घाट माथ्यावर जशी शेतात हुर्डापार्टी आयोजित केली जाते तशा पध्दतीने आता आगरी समाजातही वालाच्या शेंगांच्या पोपटीची पार्टी सर्रास केली जाते. गरीब श्रीमंत असा भेद न करता साधारपणे या शेंगाच्या हंगामात सगळेच जण पोपटीचा आस्वाद घेतात. त्यातही परिस्थिती व

आवडीनुसार मटनाचे तुकडे, अंडी, बटाटी यांसारखे पदार्थही यात घातले जातात. पोपटी हा प्रकार त्यांच्यासाठी आनंदाची पर्वणी असतो.

जागातिकीकरणामुळे हे जग जवळ आले. त्यामुळे आपल्या समाजातील वेगळेपण दाखविण्याच्या दृष्टीने तेही प्रयत्नशील बनले. या समाजात बनवले जाणारे सुके मटण, भाकरी व तळलेले मासे यांसारखे पदार्थ आणखी जास्त चांगल्या पध्दतीने बनवून आता त्याचा उपयोग ते आगरी खाद्य संस्कृती विकसित करण्यासाठी करतांना दिसतात.

**३. अलंकार**

पूर्वी आगरी समाजातील पुरूषांची आर्थिक स्थिती चांगली नसल्याने व त्यांना दागिन्यांचे फारसे वेड नसल्याने खूप वेगवेगळ्या पध्दतीचे अलंकार वापताना ते दिसत नाहीत. गेल्या २०—२५ वर्षांचा विचार करता पारंपरिक व्यवसायापेक्षा नोकरी अथवा इतर व्यवसाय करताना ते आढळतात. या व्यवसायातून त्यांची वाढलेली सधनता व जागतिकीकरणामुळे त्यांच्या समोर येवून ठेपलेली इतरांची संस्कृती यांचे अनुकरण करत तेही आता सोन्या — चांदीचे किंवा इतर धातूचे फॅशनेबल दागिने वापरायला लागले आहेत. इतर काही नसले तरी किमान गळ्यात चेन किंवा साखळी व बोटात अंगठी घालणे ते अधिक पसंत करतात.

पुरुषांप्रमाणेच आगरी स्त्रियांचीही आर्थिक परिस्थिती फारशी उत्तम नसल्याने फार पूर्वी त्यांना भरपूर प्रमाणत दागदागीने मिळाले नाहीत परंतु तरीही या समाजातील स्त्रियांचे काही विशिष्ट प्रकारचे दागिने त्यांच्या संस्कृतीचे प्रतिक मानले जायचे. त्यात चांदीच्या पाटल्या, गोठ, नाकात मोती (नथ), कानात गाठे (कर्णफुले), गळ्यात पुतळ्याची माळ, कमरेला कमरपट्टा व पायात तोडे अशा दागिन्यांचा विशेष उल्लेख करावा लागेल. मात्र निर्धन महिलेकडे या दागिन्यांऐवजी एका सोन्याच्या डावेसह काळी पोत इतकेच दागिने असायचे. ज्या स्त्रियांची कौटुंबिक स्थिती सधन होती अशा स्त्रियांना दागिने घालून

मिरवण्यास संधी होती. मात्र सर्वसामान्य स्त्रियांना या सर्व अलंकारांची पूर्तता होईलच अशी स्थिती नव्हती.

परंतु जसजसा काळ बदलला तसतसे त्यांच्या दागिन्यांचे स्वरूपही बदलू लागले आहेत. आता हातात चांदीच्या पाटल्यांऐवजी सोन्याच्या बांगड्या, कानात गाठे घालण्याऐवजी वेगवेगळ्या प्रकारच्या कुड्या किंवा कानातले घालणे त्या पसंत करतात. तसेच कमरपट्ट्यांऐवजी छल्ला व पायात तोड्याऐवजी पैंजणांचा वापर करतांना दिसतात. नाकात मोती म्हणजे मोठी नथ घालण्याची पध्द्त होती. मात्र आता त्याऐवजी अगदी लहान नथ घातली जाते. गळ्यात मात्र पुतळ्यांची माळ ही संकल्पना पूर्णपणे बाद होवून विविध प्रकारचे हार अथवा कंठी अशा अलंकारांना त्या पसंती दर्शवितात.

प्रामुख्याने आधुनिक पेहरावाप्रमाणे अलंकार निवडण्याकडे यांचा कल असलेला दिसतो.

## ४. खेळ

पूर्वी आगरी समाजाची मनोरंजनाची साधने म्हणजे विविध खेळ होती. त्यामध्ये बैलगाडीच्या शर्यती, कोंबड्याच्या झुंजी, कुस्ती, कबड्डी, मल्लखांब यांसारख्या खेळांचा समावेश होई.[२६] आता जागतिकीकरणाने त्यांच्या आवडी निवडीतही बदल झालेला आहे. टि.व्ही., मोबाईल, व्हिडीओ गेम, यांसारख्या खेळाकडे या समाजातील तरूण व बाल वर्ग आकर्षीत होऊ लागला आहे. हे खरे असले तरी आजही या खेळांबरोबरच पारंपरिक खेळांशी ते आधुनिकतेने एकरूप झालेले दिसतात.

कबड्डी व बैलगाड्यांच्या शर्यती या दोन खेळांसाठी तर हा समाज प्रचंड वेडा आहे. यापैकी कबड्डी या खेळात घरातला किमान एक माणूस तरी प्राविण्य मिळविलेला दिसतो कारण कबड्डी या खेळात प्राविण्य असलेले व किमान शैक्षणिक अहर्ता असलेले कित्येक जण आज चांगल्या पदावर कार्यरत आहेत. नव्हे तर बऱ्याच जणांच्या त्या अनुषंगाने आवश्यकतेनुसार परदेश

वाऱ्याही झाल्या आहेत. यातील काहींना अनेक पुरस्काराने सन्मानीतही करण्यात आले आहे. तर काहींनी कार्यवाह, सल्लागार व प्रशिक्षक म्हणूनही कार्य केलेले आहे. उदाहरणादाखल काहींची नावे पुढील प्रमाणे सांगता येतील.[२७]

## नाव — पद — गाव — नोकरीचे ठिकाण

१. श्री. लक्ष्मण वैजनाथ बैकर — राष्ट्रीय प्रशिक्षक — कमळपाडा — आर. सी.एफ., थळ.

२. श्री. परशुराम थळे — राष्ट्रीय खेळाडू — मेढेखार — एम.आय.डी.सी., मुंबई.

३. श्री. हिरामण समजीस्कर — राष्ट्रीय खेळाडू — बांधण — बॅक ऑफ महाराष्ट्र, मुंबई.

४. श्री. दिलीप पांडुरंग धुमाळ — राष्ट्रीय खेळाडू — दिवलांग — आर.सी. एफ.,थळ.

५. श्री. सुधिर पाटील — राष्ट्रीय खेळाडू — शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त — शहाबाज — आर.सी.एफ., मुंबई.

६. श्री. नथुराम पाटील — शिवछत्रपती पुरस्कार — पेझारी — कार्यवाह — रायगड जिल्हा क्रीडा असोसिएशन.

७. श्री. महेश धुमाळ — राष्ट्रीय खेळाडू — दिवलांग — मुंबई पोलीस.

या शिवाय अनेक ठिकाणी कबड्डी क्रीडा मंडळांचीही निर्मीती करण्यात आलेली आहे. यापैकी पेझारी — दिवलांग येथील विनायक क्रीडा मंडळाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त जानेवारी २०१२ मध्ये राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. याच मंडळातील दोन खेळाडू बर्मिंगहॅम — इंग्लड येथे आंतरराष्ट्रीय स्पर्धा खेळून आलेले आहेत.[२८]

तसेच पूर्वीपासून त्यांच्या मनोरंजनाची असलेली गोष्ट म्हणजे बैलगाड्यांची शर्यत. या शर्यतीलाही आता आधुनिकीकरणाचे वळण लागले आहे. यासाठी प्रामुख्याने शेतकरी वर्ग तयारी करतो. साधारणपणे

समुद्रकिनाऱ्यावर ह्या स्पर्धा होतात. बैल हा शेतकऱ्याचा प्राण त्यामुळे या बैलगाड्यांच्या स्पर्धाना आगरी समाज प्रामुख्याने उपस्थित असतो. अगदी साध्या पध्दतीने होणाऱ्या या स्पर्धा आता मात्र आधुनिक पध्दतीने व विशेष स्वरूपाचे पारिताषक देऊन आयोजित केल्या जातात. विविध चषक व रोख रकमेची बक्षिसे या स्पर्धांचे आकर्षण स्थान ठरते. तालुका, जिल्हा व वैयक्तिक पातळीवरही या स्पर्धांचे आयोजन केले जाते. कधी कधी तर फक्त स्पर्धांमध्ये यशस्वी होण्यासाठी या बैलांवर प्रचंड खर्च केला जातो. त्यामुळे या स्पर्धांनाही आता व्यावसायिक स्वरूप येवू लागले आहे.

याशिवाय सद्यस्थितीत व्हॉलीबॉल या खेळातही विशेष रस घेऊन हा समाज कार्यरत असल्याचे दिसून येते. व्हॉलीबॉल मधील शुटींग बॉल या क्रीडाप्रकारासाठी अलिबाग तालुक्यातील रांजणखार गाव फारच प्रसिध्द झाले आहे. या गावात १४ जानेवारी १९६० रोजी मॉडेल संघ रांजणखार या संघाची स्थापना झाली. पुढे या हॉलीबॉल संघाचे रूपांतर शुटींग बॉल संघात झाले.[२९] येथीला नव्याने निर्माण झालेल्या मॉडर्न स्टार ग्रुप या संघाला २५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल २००९ मध्ये त्यांच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमीत्त राष्ट्रीय शुटींग बॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी ठिकठिकाणाहून देशभरातील संघ आले होते.[३०] कबड्डी हा इथला प्रमुख खेळ असतांनाही एक वेगळा क्रीडा प्रकार आत्मसात करून सलग ५० वर्ष तो जोपासला गेला. शिवाय त्यांच्या राज्य, जिल्हा व इतर प्रकारच्या भरविल्या जाणाऱ्या सामन्यांमधून त्याचे वैविध्य लोकांपर्यत पोहोचवले जाते.

याव्यतिरिक्त श्री. अमित पाटील – पेझारी यांनी शरीर सौष्ठव स्पर्धेत भारत श्री मध्ये तृतीय क्रमांक व महाराष्ट्र श्री हा बहुमान पटकाविलेला आहे. तसेच स्नेहा मोहन धुमाळ – पेझारी ही मुलगी आंतरराष्ट्रीय नेटबॉल स्पर्धेत भारताच्या संघातून सहभागी झाली होती.[३१] अशाच प्रकारचे पुरस्कार कराटे, बुध्दीबळ व सायकलींग या सारख्या खेळामध्येही या समाजाने मिळविलेले आहेत.

थोडक्यात असे म्हणता येईल की आता जनसंपर्क वाढल्याने इतरांप्रमाणे त्यांच्या खेळांमध्येही व्यावसायिकता आलेली आहे. हे खेळ केवळ त्यांच्या मनोरंजनासाठी मर्यादित न राहता त्यांच्या उत्पन्नाचे व प्रतिष्ठेचे एक साधन बनले आहे. हा आधुनिक दृष्टीकोन जागतिकीकरणानेच त्यांच्यात निर्माण झालेला दिसतो.

**५. यात्रा — जत्रा**

आगरी समाजामध्ये यात्रा व जत्रांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. यात्रांच्या बाबतीत विचार करता पारंपरिक पध्दतीने आजही त्यांचे आयोजन केले जात आहे मात्र यातही आता कालानुरूप बदल होत आहे. पूर्वी या यात्रा भरवण्याचा उद्देश मनोरंजन व खरेदी — विक्री असा होता. परंतु जागतिकीकरणामुळे सगळ्याच गोष्टींची उपलब्धता कोणत्याही क्षणी सहज होत असल्याने यात्रांचे महत्त्व वस्तुंच्या खरेदी — विक्रीच्या दृष्टीने कमी होत चालले आहे. ग्रामीण भागातच यात्रांचे आयोजन प्रामुख्याने केले जाते. काही प्रमाणात शहरात राहायला गेलेल्या या समाजातील माणसे विविध सण व यात्रांसाठी खास सुट्टी घेऊन येतात व त्यांच्या आनंदात सहभागीही होतात.

भैरवनाथ, जाखमाता, मरुआई, म्हसोबा यांसारख्या ग्रामदेवता व इष्टदेवतांच्या यात्रा भरविल्या जातात. अगदी सुरूवातीला या यात्रांचा उद्देश सामान्यांच्या मनोरंजन, बाजारहाटाचे ठिकाण व उत्पन्नाचे साधन असा होता. मात्र सद्यस्थितीत जागतिकीकरणाने जग जवळ आले नी या सर्व संकल्पना पूर्णपणे बदलून गेल्या. आता मनोरंजनासाठी किंवा बाजारहाटासाठी यात्रांव्यतिरिक्त अनेक माध्यमे उपलब्ध झाल्याने या यात्रा प्रकारांचे आयोजन ग्रामीण पातळीवर फक्त परंपरा म्हणूनच केले जाते. या परंपरांपैकी उदाहरणादाखल एक दाखला म्हणजे गेल्या काही वर्षांपर्यंत अलिबाग तालुक्यात केजाची पध्दत अस्तित्वात होती. दळणवळणाच्या अपुऱ्या सोयीमुळे व्यापाराचे प्रमाण येथे कमी होते. त्यामुळे काही ठराविक हंगामात या समाजातील लोक इतर समाजातील लोकांबरोबर धान्य व खाद्यपदार्थांचे विनिमय करायचे त्याला

केज देणे असे म्हटले जाई. आगरी समाजाकडे तांदळाचे उत्पादन जास्त असल्याने तांदुळ, कण्या किंवा तांदळाचे खाद्यपदार्थ (गोट्यां, घावणं, आंबोळी, पापड, फेण्या इ.) यांच्या बदल्यात कोळी समाजाकडून सुकी मच्छी किंवा ओली मच्छी घेतली जाई.[३२] ही पध्दत जागतिकीकरणामुळे नष्ट झाली.

या यात्रांच्या वेळीच उंच उंच काठ्यांचे पूजन करून पालखी सारख्या त्या संपूर्ण गावातून फिरवून देवळात आणल्या जातात. ही प्रथा पारंपरिक स्वरूपात आजही अस्तित्वात आहे. या समाजात गावच्या देवांना मनातील इच्छा पूर्ण करण्यासाठी नवस बोलण्याची पध्दत आहे. या नवसात पशू म्हणजे कोंबडा व बोकड इत्यादी, नारळ, गुळ फळे, खोबरे यांसारख्या वस्तू मान म्हणून दिल्या जातात. शिवाय काही ठिकाणी खोडा — बेडीचा सुध्दा नवस बोलला जातो. रात्रभर देवतांच्या पालख्या गावात फिरविण्यात येतात. यात्रेच्या दिवशी शुभकार्यात देवांना बळी देण्याची पध्दत होती. गावावर येणारी आपत्ती दूर व्हावी यासाठी ग्रामदेवतेला बळी देऊन शांत केले जाई. हे बल (बळी दिलेल्या पशूची मान) संपूर्ण गावभर फिरवून लोकांवर जरब बसविला जाई. यात्रांमध्ये देवतेला रात्री दिले जाणारे बळी किंवा मनातले संकल्प पूर्ण करण्यासाठी बोलले जाणारे नवस ह्या पध्दतीचे प्रमाणही आधुनिकीकरणात कमी होत चालले आहे. जागतिकीकरणाने झालेल्या शैक्षणिक व वैज्ञानिक प्रगतीने यांच्या अशा विधीचे स्वरूप पारंपरिकच राहिले आहे.

याशिवाय प्रामुख्याने हनुमान जयंतीच्या दिवशी सर्वत्र देवळात सप्ताह बसतो. त्या निमित्ताने संपूर्ण आठवडाभर गावातले लोक एकत्र येवून किर्तन, प्रवचन व नामस्मरण करतात. शेवटच्या दिवशी सामुहिक भोजनाचा आस्वाद घेतला जातो. आषाढी कार्तीकी, एकादशी या दिवशी देवळांमध्ये किर्तन केले जातात. तसेच रोगराई आल्यास गावटाकणी केली जाते. गावटाकणी म्हणजेच संपूर्ण गाव निर्मनुष्य केले जाते. मेढेखार, चिखली, कुसुंबळे, कातळपाडा यासारख्या गावांमध्ये आजही गावटाकणी केली जाते.[३३]

शिवजयंती, गणेश जयंती, रामनवमी हे सुध्दा या आगरी समाजात आता उत्सवा प्रमाणे साजरे केले जातात. या दिवशी विविध ठिकाणी वेगवेगळ्या सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. पूर्वी ठराविक वेळीच होणारे कार्यक्रम किंवा स्नेहसंमेलन आता या निमित्ताने आयोजित केले जातात. शिवाय यांना मोठ्या रकमेची बक्षिसेही ठेवतात. तसेच  विविध सण किंवा यात्रा प्रसंगी स्त्री पुरूषांचे नाच मंडळ आपले नृत्य व गायन सादर करतात. मात्र आता यात्रांच्या वेळी पूर्वी चालणारे खेळ व मनोरंजनासाठी आयोजित केली जाणारी नाटके, स्नेहसंमेलन यांचे प्रमाण कमी झाले. शिवाय आधुनिक वाद्यांच्या गजराने, डी.जे. सिस्टिम व रोशणाईने या यात्रांना थोडे वेगळे स्वरूप प्राप्त होऊ लागले आहे. आता या समाजाचे म्हणून असलेल्या या वैशिष्ट्यपूर्ण गोष्टींच्या परंपरा धुसर होत चालल्या आहेत.

### ६. लग्नपध्दती

आगरी समाजातील लग्नपध्दतीबद्दल या आधी आपण सविस्तरपणे पाहीले आहे. आज या लग्नपध्दतीत खूप बदल झालेला आहे. ग्रामीण भागात आता हा ६ दिवस चालणारा लग्नसोहळा २ ते ३ दिवसात तर शहरात एक दिवसातच पूर्ण केला जातो. याशिवाय आगरी पद्ध्तीची उभी साडी न लावता स्त्रिया गोल किंवा आधुनिक पध्दतीची वस्त्रे (चनिया चोळी इ.) नेसतात. तसेच स्त्रियांना लग्नात दिला जाणारा देज ही पध्दतही आता बंद झालेली आहे. त्याऐवजी आपल्या ऐपती प्रामाणे मुलीला स्वत:चे घर उभे करता येईल अशा पध्दतीचा आहेर म्हणून कपाट, फ्रिज, टि.व्ही, गॅस इ. सारख्या आधुनिक वस्तू दिल्या जातात. शिवाय आता नोंदणी पध्दतीने व हॉलवर मोठ्या झगमगाटात लग्ने होतात. पूर्वी साखरपुडा करणे ही अत्यावश्यक बाब नसायची कारण फक्त लग्नाचे शिक्कामोर्तब करण्यासाठी हा केला जात असे. त्यामुळे हा कार्यक्रम छोटेखानी स्वरूपाचा असायचा. मात्र आता आपण किती सधन आहोत हे दाखविण्याची चढओढ या समाजात लागलेली दिसते. सद्यस्थितीत साखरपुड्यात लग्नासारखा खर्च अमाप खर्च केला जातो. साखरपूडा व हळद

या दोन्ही प्रसंगी प्रामुख्याने मद्य व मांसाहारासाठी भरपूर पैसा खर्च केला जातो.
३४

तसेच जागतिकीकरणामुळे झालेला महत्त्वाचा बदल म्हणजे आता या समाजात आंतरजातीय विवाह होऊ लागले आहेत. शिवाय या समाजात लग्न जमविण्यासाठी वधूवर सुचक मंडळ व इतर माध्यमांचाही वापर केला जातो. त्यामुळे या समाजाच्या पूर्वापार चालत आलेल्या संस्कृतीत बदल होत चाललेले दिसतात. पूर्वी आगरी समाजात प्रेमविवाह हा प्रकार विशेष आढळत नव्हता. आता प्रेमविवाह किंवा स्वत:हून वर किंवा वधूची निवड करून लग्न करण्याची पध्दती सुरू झाली आहे. सद्यस्थितीत विधीकार्यापेक्षा मानसन्मान व खाणे पिणे याचीच जास्त दिखावेगीरी चालते. तसेच लग्नात वाद्यवृंदाची आवश्यकता व दागिन्यांची देवाणघेवाण ह्या प्रथा नव्याने सुरू झाल्या आहेत. शिवाय लग्नाचे आमंत्रन तोंडी देण्याची पध्दत होती. आता मात्र आपापल्या आर्थिक कुवतीनुसार लग्नपत्रिका छापली जाते. पूर्वी फक्त देवासमोर ठेवायला किंवा लांबच्या व महत्त्वाच्या व्यक्तींना देण्यासाठी थोड्याशा लग्नपत्रिका छापल्या जायच्या. आता मात्र हजारो रूपयांच्या व संख्येच्या पत्रिका छापून सर्वत्र वाटल्या जातात. तसेच बस्ता किंवा दस्ता बांधणे म्हणजे लग्नासाठी कपड्यांची खरेदी करणे या प्रथेतही आता आर्थिक स्थितीनुरूप बदल होत चालला आहे. अत्याधुनिक व खर्चिक स्वरूपाचे वस्त्र खरेदी करण्याकडे लोकांचा कल झालेला दिसतो. शिवाय दळणवळणाच्या सोयीमूळे जवळच्या बाजारातून खरेदी न करता दूरवरच्या व महत्त्वाच्या शहरांमध्ये खरेदी करणे पसंत केले जाते. चून दळण्याच्या कार्यक्रमातही आता बदल झालेत. हळदीच्या दिवशी तांदळाचे वडे खाण्यासाठी स्त्रिया जात्यावर बसून मोठ्याा प्रमाणात पीठ तयार करायच्या. आता वड्यांची पध्दत तशीच आहे मात्र हे वडे बनविण्याची ऑर्डर दिली जाते किंवा ते साच्याने बनवले जातात. तसेच मुहूर्तासाठी जात्यावर थोडे तांदूळ दळले जातात. उरलेले दळण चक्कीतून दळून आणतात. हाच प्रकार पापड फेण्यांच्या बाबतीतला आहे. आगरी समाजातील लग्नात तांदळाच्या घाऱ्या व फेण्या हे पदार्थ अतिशय प्रसिध्द व आवश्यक आहेत. ते आता पूर्वीप्रमाणे सहकारी

तत्वावर न बनवता विकत आणले जातात. परंतु या सर्व पध्दती ग्रामीण भागात काही प्रमाणात आजही तग धरून आहेत.

जेवणाच्या बाबतीत पंगतीने जेवण वाढण्याची पध्दत होती ती बदलून आता टेबलावर किंवा बुफे पध्दतीने घेण्याची सुरूवात झालेली आहे. तसेच इतर समाजातील काही लग्नविधी जसे की सप्तपदी, रुखवत यांचेही अनुकरण करतांना हे लोक दिसतात. त्यातील एक म्हणजे रूखवत. आगरी समाजातील रीतीप्रमाणे नवरीची बहीण एका ताटात मिठाईचा पुडा, दूध, चहाचा कप, तांब्यावाटी व मुंडावळ अशा वस्तू नवऱ्याला रूखवत म्हणून न्यायची. आता इतर समाजाप्रमाणे या सर्व पदार्थांबरोबरच विविध शोभेच्या वस्तू, खाण्याचे पदार्थ रूखवत म्हणून वेगळ्या पध्दतीने मांडले जातात. तसेच फिल्मी पध्दतीच्या वेगवेगळ्या प्रथा व चालीरीतींचा अंगिकार होतांना दिसतो.

**७. बाजार**

फार पूर्वी अलिबाग तालुक्यात सर्वसामान्य दळणवळणांच्या सोयी सुविधा भरपूर प्रमाणात नसल्याने व्यापारासाठी किंवा आपल्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठी आठवडा बाजाराची निर्मिती झाली होती. ही पध्दत थोड्या फार फरकाने सर्वत्र होतीच. पूर्वीच्या काळात याला Barter system असे संबोधले जात असे.[३५] या आठवडा बाजारात येथील स्थानिक लोक आपापल्या वस्तूंची खरेदी – विक्री करत असत. पुढे जागतिकीकरणाने जग जवळ आल्याने व्यापाराची ही संकल्पनाच बदलून गेली. बाजार या संकल्पनेच्या माध्यमातून आगरी समाजा बरोबरच इतर समाजांमध्ये ऋणानुबंध निर्माण होऊन सांस्कृतिक आदानप्रदान चालत असते. सद्यस्थितीत आठवडा बाजाराचे रूप अत्याधुनिक झालेले असले तरी मुळ पाया तसाच आहे. जागतिकीकरणाने व्यापार व त्यातून होणाऱ्या अर्थार्जनाचे महत्त्व पटल्याने लोकांचा दृष्टीकोन आधुनिक बनला आहे. म्हणूनच विविध सोंयीची उपलब्धता झाली व ठराविक काळच चालणारे हे आठवडा बाजार पावसाळ्यातही चालू राहू लागले. सद्यस्थितीत आधुनिक पध्दतीचा वापर करून आठवडे बाजार भरवले जातात. यापूर्वी अलिबाग

तालुक्यात आंबेपूर (पोयनाड), किहीम, आंदोशी, नागाव व रामराज येथेच आठवडा बाजार भरत होते.[३६] मात्र आता सहाणगोठी व वरसोली येथेही हे बाजार भरू लागले आहेत.

आठवडा बाजार या संकल्पनेतील उत्सुकता ग्रामीण पातळीवर असली तरी सद्यस्थितीत शहरी भागातील हा समाज मॉलसदृश्य दुकानांमध्ये खरेदी करणे पसंत करतो. शिवाय आता सर्वच ठिकाणी अत्याधुनिक सेवासुविधा निर्माण झाल्याने व या समाजातील लोक आपल्या वस्तू व्यापारी अथवा इतरांना न विकता स्वत: विकणे जास्त पसंत करतो म्हणूनच येथील पर्यटकांना रस्तोरस्ती पांढरे कांदे, कलिंगड, आंबे, चिंच, रानमेवा, पापड यांसारख्या गोष्टींची दुकाने लहान मोठ्या प्रमाणात दिसतात.

## ८. श्रध्दा — अंधश्रध्दा

आगरी समाज हा अतिशय श्रध्दाळू समाज आहे. पूर्वपारंपरिक पध्दतीने चालत आलेल्या रूढी परंपरा पाळणे हे तो आपले इतिकर्तव्य मानतो. यातील काही श्रध्दा ह्या अंधश्रध्देकडे झुकणाऱ्याही आहेत. जसे की भगत या व्यक्तीला या समाजात मान आहे. भूत, प्रेत अथवा अनिष्ट प्रवृत्तींचा नाश करण्याचे सामर्थ्य असलेला देवाचा माणूस म्हणजे हा मांत्रिक किंवा भगत. त्यामुळे आजारपण किंवा घरात घडणाऱ्या वाईट गोष्टींचे निराकरण करण्यासाठी प्रामुख्याने यांची मदत घेतली जायची. लग्नकार्यात सुध्दा गौरत खेळवणे यापध्दतीत भगत या व्यक्तीला मान देऊन आमंत्रित केले जाते. त्यांच्या मदतीने पाटा सारणे हा विधी करून भूत — प्रेतांना शांत केले जाते. याशिवाय मनातल्या सुप्त इच्छांना पूर्ण करण्यासाठी ग्रामदेवतेपासून इच्छित देवापर्यंत कोणालाही नवस करण्याची पध्दत होती.

आधुनिकीकरणाच्या या युगात मात्र आता या सर्व प्रथांना एक नवा अन्वयार्थ लागू झाला आहे. आजही या समाजात या श्रध्दा पाळल्या जातात. मात्र त्या फक्त परंपरा म्हणूनच. त्यामागचा वैज्ञानिक दृष्टीकोन स्पष्ट झाल्याने नवस, भगत यांसारख्या गोष्टींना तितकेसे महत्त्व राहीलेले दिसत नाही.

**क. आर्थिक परिवर्तन :**

संपूर्ण मानव जातीच्या उत्क्रांतीतील शेती हा एक महत्त्वाचा व क्रांतीकारक असा टप्पा मानला जातो. यामुळे मानवाची शारीरिक गरज भागविली गेली. कृषिजीवनामुळे मानवाच्या वर्तनात आणि उपजीविकेच्या साधनांमध्ये क्रांतीकारक बदल होत गेले.[३७] त्यामुळे शेती हा आर्थिक परिवर्तनातील महत्त्वाचा घटक मानला जातो. रायगड जिल्ह्यातील आगरी ही सर्वात मोठी कृषक जात असून बागाईतदार म्हणून प्रसिध्द आहे.[३८] शेती, मिठागरे व नारळी पोफळीच्या बागा पिकविणे यामध्ये त्यांचे कौशल्य वाखाणण्यासारखे आहे.[३९] आगरी समाज हा मुलत: कष्टकरी शेतिनिष्ठ समाज आहे. येथील आगरी कुणब्यांसारखे असले तरी त्यांची खास सामाजिक विशेषता आहे. खार जमिनीतही भाताचे पीक काढण्यात त्यांची कुशलता आहे.[४०] भातशेती हाच आगरी शेतकऱ्यांचा प्रमुख व्यवसाय आहे. सुरूवातीला हे आगरी लोक स्थानिक जमीनदारांकडे कूळ म्हणून काम करत होते. मात्र १९६० च्या कूळ कायद्यानंतर ते जमिनीचे मालक बनून स्वतंत्रपणे शेती करू लागले. खारजमिनीत भातशेती पिकविण्याचे कसब फक्त त्यांनाच माहित असल्याने हाच त्यांचा पारंपरिक व्यवसाय होता. मात्र खारजमिनीतून एकच पीक निघत असल्यामुळे खाडीकाठी मासेमारी करणे हा सुध्दा एक पूरक व्यवसाय ते करत. या व्यतिरिक्त काही ठिकाणी पशुपालन, कुक्कुटपालन, भाजीपाला पिकवणे या सारखे छोटे व्यवसाय सहउद्योग म्हणूनही अल्पप्रमाणात केले जायचे. गोड्या जमिनीत दुबार पीक घेतले जाई. या पिकासाठी व भाजपाला, बागा पिकविण्यासाठी विहिरीच्या पाण्याचा वापर केला जाई. पक्क्या विहिरींप्रमाणेच कच्च्या मातीच्या विहिरी या भागात आहेत. या विहिरींना डोहरे असे संबोधले जाते.[४१]

साधारणपणे स्वातंत्र्यानंतर ३०—४० वर्षात या समाजातील शिक्षण घेणाऱ्यांची संख्या वाढल्याने नोकरी करण्याचे प्रमाणही वाढले आहे. प्रामुख्याने या समाजातील लोक शिक्षक पेश्यामध्ये असलेले आढळतात. १९८० पासून रायगड जिल्ह्यात झालेले औद्योगिकीकरण त्यांचा व्यवसाय बदलण्यास

कारणीभूत ठरले. प्रामुख्याने १९९०—९१ साली धरमतर खाडीजवळ झालेल्या निप्पॉन डेन्रो इस्पात लिमिटेड (J.S.W.), जॉन्सन, गेल यांसारख्या मोठ्या कारखान्यांच्या निर्मितीने त्यांचे प्रमुख व्यवसाय बदलले. या कंपन्यामूळे निर्माण झालेल्या दूषीत पाण्यामुळे मासेमारी व्यवसायास नुकसान झाले तर जागेचा भराव केल्याने शेतजमिनीत खारे पाणी जाऊन जमिनीची भात पिकावण्याची क्षमताही कमी झाली त्यामुळे या समाजाचे शेती व मासेमारी हे दोन्ही परंपरागत व्यवसाय आता कमी प्रमाणत चालतात.[४२] उलट औद्योगिकीकरण व जागतिकीकरणामुळे उदरनिर्वाहासाठी त्यांनी वेगवेगळ्या उद्योगांकडे आपले लक्ष वळविले ते पुढीलप्रमाणे सांगता येतील.

### १. नोकरी

गेल्या ५० वर्षातील आगरी समाजातील शिक्षणाची प्रगती पाहता हा समाज या शैक्षणिक सामर्थ्याच्या आधारे विविध क्षेत्रातील नोकरी व्यवसायात जम बसवू लागलेला दिसतो. यात प्रामुख्याने सरकारी नोकरी करण्यावर त्यांचा भर असतो. शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, तलाठी, ग्रामसेवक, ग्रामविस्तार अधिकारी यांसारख्या अनेक महत्त्वाच्या पदांवर ते कार्यरत आहेत. या व्यतिरिक्त आता उच्चशिक्षण घेऊन डॉक्टर, वकिल, इंजिनीअर, चार्टड अकाउंटंट, प्राध्यापक, साहित्यीक, कवी, मार्गदर्शक, समुपदेशक अशा विविध क्षेत्रातही ते विशेषत्वाने कार्यरत असलेले दिसतात.

### २. वाहक

जागतिकीकरणामुळे प्रामुख्याने झालेला बदल म्हणजे दळणवळणाच्या सोयीत झालेली वाढ. त्यामध्ये मुख्यत: अनेक वाहने किंवा औद्योगिक क्षेत्रासाठी आवश्यक असणारी यंत्रे येतात. या यंत्रांना व वाहनांना चालविण्याचे तंत्र आगरी समाजातील लोकांनी आत्मसात केल्याने या क्षेत्रातही त्यांचे विशिष्ट कौशल्य दिसून येते. रिक्शा, विक्रम, टेम्पो, डंपर, सुमो, बस यांसारख्या वाहनांची खरेदी करून किंवा वाहक म्हणून काम करुन त्यावर या समाजातील अनेक लोकांचा उदरनिर्वाह चालू असतो. त्यातही अलिबाग तालुक्यात प्रथमच

दिपाली मारुती पाटील या शहाबाज येथे राहणाऱ्या स्त्रीने वाहक बनून विक्रम रिक्शा स्वत: चालवून स्त्रियांसाठी उदरनिर्वाहाचे एक साधन म्हणून या क्षेत्रा आदर्श निर्माण केला. हा बदलही जागतिकीकरणाचा एक चांगला पैलू म्हणता येईल.

### ३. रेती व्यवसाय

पूर्वी आगरी समाजातील काही लोक या व्यवसायात कार्यरत होते. मात्र या व्यवसायातून मिळणाऱ्या अधिकतम उत्पन्नामूळे आता बरेच लोक या व्यवसायात उतरले आहेत. जागतिकीकरण व आधुनिकीकरण यामुळे समाजाच्या राहणाीमानात प्रचंड बदल झालेला आहे. यातील घर ही संकल्पना आता सर्वांनाच महत्त्वाची वाटते. अत्याधुनिक व पक्क्या स्वरूपाचे घर सर्वांची गरज बनली आहे. कोणत्याही बांधकामासाठी रेती अत्यावश्यक आहे त्यामुळे या व्यवसायाला प्रचंड मागणी आहे. धरमतर खाडीत व इतर नद्यांच्या पात्रातून या वाळूचा उपसा करून त्यावर प्रक्रिया करून हा व्यवसाय केला जातो.

### ४. वीट व्यवसाय

आगरी समाजातील लोक वीट व्यवसायातही कार्यरत आहेत. घरबांधणीसाठी किंवा इतर बांधकामासाठी आवश्यक असणारा घटक म्हणजे वीट होय. या विटेसाठी लागणारी माती या समाजाला आपल्या शेतातून सहज उपलब्ध होई परंतु पूर्वी येथे पाण्याची उपलब्धता अत्यल्प असल्याने हा व्यवसाय मोठ्या प्रमाणावर चालत नव्हता. मात्र सद्यस्थितीत या वीट व्यवसायात आगरी समाजाने चांगली प्रगती केलेली दिसते.

### ५. मांडव व्यवसाय

मांडव व्यवसाय म्हणजे वेगवेगळ्या भाज्यांचा मांडव लावून त्यातून

मिळणाऱ्या भाजीची विक्री करणे. यासाठी दूधीभोपळा, कारली, तोंडली, पडवळ, शिराळी, घोसाळी इ. भाज्यांचा मांडव लावला जातो. त्यातून मिळणाऱ्या भाज्या व्यापाऱ्यांना घाऊक स्वरूपात विकल्या जातात. त्यानंतर

उरणारी भाजी हे लोक वैयक्तिकरित्या बाजारातही विकतात. या व्यवसायात खर्च कमी व नफा जास्त आसल्याने या व्यवसायात आगरी समाज मोठ्या प्रमाणात गुंतलेला दिसतो. या व्यवसायातून अनेक कुटुंब एकाच वेळी आपला चरितार्थ चालवतात.

### ६. वाल व पांढऱ्या कांद्याची शेती

जागतिकीकरणाने जग जवळ आले नी प्रत्येक ठिकाणच्या स्थानिक वस्तूंनाही महत्त्व प्राप्त झाले. व्यावसायिक दृष्टीकोनातून प्रत्येक गोष्टींचा विचार होऊ लागला. शिवाय या नेहमीच्या वाटणाऱ्या साध्या गोष्टींचा व्यापार करून त्यांच्या अर्थार्जनास सुरुवात झाली.आगरी समाजही याला अपवाद नाही. या समाजाचा आवडता व प्रसिध्द खाद्यप्रकार म्हणजे पोपटी. यासाठी लागणाऱ्या वालाच्या शेंगा ह्या पूर्वी आवश्यकते नुसार शेतात पिकविल्या जात. परंतु आता कडधान्य स्वरूपात विकण्यासाठी व सतत विविध कारणास्तव लागणाऱ्या पोपटीसाठी एक जोड व्यवसाय म्हणून वालाच्या शेतीची निर्मिती केली जाते. यातून चांगल्या प्रकारे उत्पन्न मिळते. याशिवाय आणखी एका शेतमालाला चांगली किंमत येते ते म्हणजे पांढरे कांदे. शेतामध्ये विशेषत्वाने उलीची किंवा पातीच्या कांद्याची लागवड केली जाते. त्यानंतर यातून निघणाऱ्या कांद्यांच्या माळी करून विकल्या जातात. पूर्वी व्यापाऱ्यांना ह्या वस्तू विकण्याचा प्रघात होता. मात्र आता अलिबाग मध्ये विकसीत होणाऱ्या पर्यटन व्यवसायाला अनुरूप अशा पध्दतीने या समाजातील लोक आपापल्या घरासमोर किंवा रस्त्याच्या कडेला पांढरे कांदे, चिंचेचे गोळे, पापड इ. गोष्टी विकायला ठेवतात. सद्यस्थितीत याप्रकारेही ते अर्थार्जन करताना दिसतात.

### ७. शेततळी व्यवसाय

शेतीमधून मिळणारे अत्यल्प उत्पन्न, पाण्याची कमी उपलब्धता, बदलते हवामान, मृदेची वाढणारी क्षारता, शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या मजुरांची सहज उपलब्धता न होणे, कमी क्षेत्र असल्यामूळे मोठ्या यंत्र व अवजारांचा वापर न करता येणे, खाऱ्या जमिनीसाठी आवश्यक असणारी बांधबंधीस्ती

वेळेवर न होणे, शिवाय नोकरी व्यवसायाकडे आकृष्ट झालेल्या शेतकरी वर्गाच्या मुलांना या शेती व्यवसायात रस न राहणे यांसारख्या अनेक कारणांमुळे शेती नापीक बनत चालली आहे. परंतु पारंपरिक शेती सोडून देणे या समाजाला मान्य नसल्याने आधुनिकीकरणाच्या मदतीने शेती व मासेमारी या दोन्ही पारंपरिक व्यवसायांचा सुवर्णमध्य साधण्याचा प्रयत्न या शेततळी व्यवसायात आगरी समाजाने केलेला दिसतो. अलिबाग तालुक्यात अनेक ठिकाणी या समाजातील लोकांनी आपल्या शेतातच तळी खोदली आहेत. उन्हाळ्यात खोदलेल्या या तळ्यांमध्ये पावसाळ्यात पाणी साठवले जाते. नंतर यात माशांची पैदास करून त्यांची विक्री केली जाते. सद्यस्थितीत या व्यवसायातील त्यांची प्रगती विशेष उल्लेखनीय म्हणावी लागेल.

## ८. **फुल व्यवसाय**

आगरी समाजापैकी रांजणखार या गावातील आगरी लोकांचा गेल्या १०० वर्षापासूनच फुलांचा व्यवसाय अस्तित्वात आहे. या गावाव्यतिरिक्त काही ठिकाणी मोगरा, कागडा, अबोली, झेंडू यांसारख्या फुलांची लागवड केली जायची मग या फुलांची विक्री करून हा समाज उदरनिर्वाह करायचा. जागतिकीकरणामुळे निर्माण झालेल्या व्यावसायिक दृष्टीकोनातून आता या फुल व्यवसायाकडे पाहीले जाते. आता सर्वत्र स्वत:च्या घरी, शेतात फुलांची लागवड करण्याशिवाय मुंबई, पुणे यांसारख्या मोठ्या शहरातून फुलांची खरेदी करून घाऊक व किरकोळ अशा दोन्ही स्वरूपात खरेदी विक्री करून हा व्यवसाय केला जातो. शिवाय हार, वेणी, गजरे, बुके, तुरे, सजावटीसाठी फुलांची आरास व इतर स्वरूपात निर्मिती करून सद्यस्थितीत या समाजातील लोक हा व्यवसाय व्यावसायिक पातळीवर करण्यात यशस्वी झाले आहेत.

## ९. **पापड व मसाला व्यवसाय**

भातशेती पिकविणे हा आगरी समाजाचा प्रमुख व्यवसाय असल्याने तांदुळ हे त्यांचे मुख्य अन्न होते. याची पूर्वीपासून मुबलकता असल्याने तांदळाच्या पीठापासून पापड, फेण्या, शेवया यांसारख्या अनेक गोष्टी बनविण्यात आगरी समाजाचा हातखंडा होता. मात्र जसजसे शेतीकडे दुर्लक्ष होऊ लागले किंवा उत्पादन कमी होऊ लागले तसा या गोष्टींवर प्रभाव पडू लागला. परंतु आता पुन्हा एकदा व्यावसायिक दृष्टीकोनातून याकडे पाहीले जाते. अलिबाग तालुक्याच्या शेजारचा तालुका पेण म्हणजे पापडांचे माहेर घर. येथीला पापड अत्यंत प्रसिध्द. त्यातूनच व्यवहाराचे धडे घेऊन येथील समाजातील लोकांनी हा व्यवसाय घरगुती स्वरूपात स्वीकारून आता त्यांची संख्या झपाट्यांने वाढू लागली आहे. तसाच प्रकार मसाल्याच्या बाबतीतला. यांचा मसाला सुध्दा विशिष्ट पध्दतीने बनवला जात असल्याने यालाही चांगली मागणी मिळत आहे.

१०. **हॉटेल व्यवसाय**

गेल्या ५० वर्षात आगरी समाजाने या व्यवसायात आपला जम बसवला असला तरी सुरूवातीला हा टपरी स्वरूपाचा व्यवसाय होता. म्हणजेच गावातल्या लोकांना एकत्र करून गप्पा—टप्पा करणे अथवा विसावा घेऊन चर्चा करण्याचे ठिकाण म्हणुन हे दुकान घातले जाई. मात्र जागतिकीकरणाने या व्यवसायाच्या बाबतीतील त्यांचा विचार आधुनिकतेच्या दिशेने वळवला. अत्याधुनिक सोई, लोकांच्या आवडी — निवडी व अधिक उत्पन्नाच्या दृष्टीने उपलब्धता करणे अशा दृष्टीने या हॉटेलांची निर्मिती केली जाते. लहान दुकानापासून मोठ्या हॉटेलापर्यंत सर्वच क्षेत्रात यांची मक्तेदारी निर्माण झाली आहे. पंजाबी, दाक्षिणात्य यांच्याबरोबर चायनिज व परदेशी पदार्थांचीही रेलचेल येथे दिसते. काही हॉटेलमध्ये मात्र खास आगरी पध्दतीच्या जेवणालाच प्राधान्य दिले जाते. या समाजाचे प्रमुख खाद्यपदार्थ जसे की मटण, चिकन, भाकरी, मच्छी फ्राय, खेकडे व कोलंबीचे विविध पदार्थ व सुप्रसिध्द जिताडा मासा यांचे विविध प्रकार स्थानिकच नव्हे तर इतर पर्यटकांना भुरळ पाडल्याशिवाय राहात नाही. उदा. अलिबाबा ॲण्ड फोर्टी

प्लेयर या नावाचे पांडवादेवी — पोयनाड येथील हॉटेल अल्पावधीतच खाद्यपदार्थांबरोबर विविध श्रीमंती खेळांसाठी प्रसिध्द झाले आहे. तसेच ठिकठिकाणी चायनिज पदार्थांचे स्टॉल व हॉटेल यांच्यावरही आगरी समाजाची मालकी असलेली दिसते. एकंदरीतच या जागतिकीकरणाने त्यांचा हा व्यवसाय अमूलाग्र बदलला आहे.

**११. वाडी व्यवसाय**

अलिबाग हे विशेषत्वाने प्रसिध्द आहे ते येथील नाराळ, पोफळीच्या वाड्यांसाठी. येथीला विविध समाजांची प्रामुख्याने माळी समाजाची या वाड्यांवर मालकी असलेली दिसते. मात्र खारेपाटापासून लांब गेल्यानंतर उथळ आगरी समाजातील लोक या माळी समाजाच्या सानिध्यात आल्याने त्यांनीही माळी समाजाप्रमाणे वाडी व्यवसाय सुरू केला. गेल्या २५—३० वर्षात आगरी समाजाचा यात चांगला जम बसला आहे. त्यांनी या वाड्यांमध्ये नारळा व्यतिरिक्त प्रामुख्याने आंबे, फणस, जांभुळ यांसारख्या झाडांचे उत्पादन घेतले. तयार फळे व्यापारांना विकून किंवा प्रसंगी स्वत: व्यापार करून तेही आता बागायातदार या नामाभिधानापर्यंत पोहचू लागले आहेत. संपूर्ण वाडी सांभाळणे किंवा ती व्यापाऱ्याला तात्पुरत्या स्वरूपात करायला देणे यांसारख्या माध्यमातूनही ते पैसा मिळवू लागले.

**१२. बचत गट**

आगरी समाजामध्ये कामाच्या बाबतीत स्त्री व पुरूष या दोघांनाही समान दर्जा दिला जातो. पुरूषांच्या बरोबरीने स्त्री शेतात राबते त्यामुळे तिला या समाजात मानाचे स्थान आहे. जागतिकीकरणाने जग जवळ आले. शिक्षणाचे महत्त्व वाढले या समाजातील स्त्रियांचेही शिक्षणाचे प्रमाण वाढले व त्या नोकरी व उद्योगात आघाडीवर जाऊ लागल्या. या व्यतिरिक्त गृहिणी असलेल्या किंवा शेतातवर जाऊन काम करणाऱ्या महिलांना एकत्र करून अलिबाग तालुक्यात बचत गटांची निर्मिती केली गेली. अलिबाग मध्ये सध्या ४०० बचत गटांपैकी २६२ बचत गट नियमित स्वरूपात चालू अवस्थेत कार्यरत आहेत.[४३]

या बचत गटात सर्वच समाजातील स्त्रिया व पुरूषांचा सहभाग आहे. मात्र आगरी समाजातील स्त्रियांनी मोठ्या प्रमाणावर एकत्र येवून बचत गटांच्या निर्मितीत सहभाग घेतला. आगरी समाजातील स्त्रियांनी या बचत गटाच्या माध्यमातून खानावळ, पोळीभाजी केंद्र, पापड, मसाले यांसारखे पदार्थ व इतर लघुव्यवसायांच्या मार्फत अर्थार्जन करण्यास सुरूवात केली आहे.

## १३. महिला नाच मंडळ

आगरी समाजाचे मनोरंजनाचे पारंपरिक स्वरूप म्हणजे नृत्य व गायन. प्रत्येक सण व उत्सवासाठी या समाजातील स्त्रियांनी विविध गाण्यांची रचना केलेली आहे. विशिष्ट पध्दतीची गीते, त्यांची विशिष्ट पध्दतीची चाल व त्यावरील खास पध्दतीची नृत्यशैली आगरी समाजात पहायला मिळते. पूर्वी फक्त निखळ मनोरंजन या संकल्पनेतून मौखिक स्वरूपात जपलेला हा ठेवा आता आधुनिकतेच्या संकल्पनेतून नव्याने चर्चीला जाऊ लागला. सद्यस्थितीत या स्त्रियांनी आपापले महिला नाच मंडळ बनवून विविध सण व समारंभ प्रसंगी ते नृत्याची सुपारी घेऊ लागले. त्यामुळे यात आता आधुनिक स्वरूपाचे बदल होऊ लागले आहेत.

## १४. पशुपालन व कुक्कुटपालन व्यवसाय

पशूपालन व कुक्कुटपालन हे आगरी समाजाचे अर्थार्जिनाचे शेतीबरोबरचे जोड व्यवसाय होते. मात्र त्याचे स्वरूप घरगुती स्वरूपाचे होते. जागतिकीकरणाने त्यांच्या या व्यवसायातही अमुलाग्र बदल झाला. गाय, म्हैस, बकरी यांसारखे प्राणी व कोंबड्यांचा स्वतंत्र व्यवसाय त्यांना आर्थिकदृष्ट्या सबल बनवू लागला. दूध व मांसाहार याकडे ओढा वाढलेल्या या समाजात हे दोन्ही व्यवसाय भरभराटीस आले.

थोडक्यात आपणांस असे म्हणता येईल की जागतिकीकरणाने ज्याप्रमाणे आगरी समाजाच्या सामाजिक व सांस्कृतिक घटकांमध्ये अमुलाग्र बदल झाला तसाच आर्थिक स्थितीतही प्रचंड बदल घडून आला. शैक्षणिक प्रगतीने त्यांना नोकरी व व्यवसायात भरपूर संधी उपलब्ध करून दिली आहे. तर विविध बॅंक,

पतसंस्था व शासकीय योजनांच्या विशिष्ट मदतीने अर्थसहाय्य उपलब्ध झाल्याने लघुउद्योगातही त्यांनी मोठी झेप घेतली आहे. यात स्त्री व पुरूष दोन्ही आघाडीवर राहीले. आर्थिक उत्पन्न वाढल्याने त्यांची सांपत्तिक स्थिती सुधारली. परिणामी त्यांच्या राहणीमानात अनुकूल बदल होऊन भौतिक सुधारणा व सोयी मिळविण्याचा त्यांनी अट्टहास केला. या बदलत्या आर्थिक स्थितीने त्यांना स्थैर्य दिले व भविष्याच्या वाटचालीसाठी दिशा दिली.

हे सर्व पाहत असतांना एक महत्त्वाची गोष्ट येथे नमूद करावीशी वाटते ती म्हणजे सेझ [sez] प्रकरण. रायगड जिल्ह्याचे औद्योगिकीकरण १९८० पासून झपाट्यांने सुरू झाले. या नव्या औद्योगिक धोरणाचा भाग म्हणून १९९०—९१ सालापासून अलिबाग येथे नवीन अशा मोठ्या कारखान्यांची निर्मिती झाली. या कारखान्यांमुळे येथील समाजाला नोकरी व व्यवसाय मिळाले असले तरी त्यांचे स्वरूप चतुर्थ श्रेणीतील असेच होते. त्यातून मिळणाऱ्या फायद्यापेक्षा त्यांच्या जमीनीचे झालेले नुकसान मोठ्या स्वरूपाचे होते. कारखाने निर्माण करण्यासाठी येथील जमीनी साम, दाम, दंड, भेद अशा सर्व प्रकारे प्रयत्न करून विकत घेतल्या गेल्या. सुरूवातीला अपेक्षेपेक्षा जास्त पैसा मिळाल्याने बऱ्याच शेतकऱ्यांनी आपल्या जमीनी दलालांना विकूनही टाकल्या. परिणामी उपजाऊ जमीन आता हळूहळू नापीक बनू लागली. ज्या शेतकऱ्यांनी आपल्या जमीनी विकल्या नाहीत त्यांच्या पुढील पिढीचा ओढा शेती करण्याकडे नसल्याने व मजुरांच्या अभावाने उरलेली शेतजमीनही आता नापीक होऊ लागली आहे. शिवाय भौतिक सुविधांसाठी लागणारा पैसा शेती करण्यापेक्षा शेती विकून सहज उपलब्ध होतो व आपल्या गरजा भागवतो हे लक्षात आल्याने शेती विक्रीचे प्रामण वाढले. त्यातून या आगरी समाजाची अर्थार्जनाची साधने विशेषत्वाने बदलली असे म्हणता येईल.

## ड. राजकीय परिवर्तन

एखाद्या समाजाचा सामाजिक व सांस्कृतिक विकास होण्यामागे जशी आर्थिक स्थिती कारणीभूत असते तशीच त्यांची राजकीय स्थितीही जबाबदार असते. आगरी समाजातील लोकांनी किमान शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत आपली मजल मारल्याने त्यांच्यामध्ये शैक्षणिक परिवर्तनाबरोबरच आर्थिक परिवर्तनही घडून आले. त्यातच हा समाज मुळचाच क्षत्रिय वृत्तीचा असल्याने त्याच्याकडे नेतृत्व व कर्तृत्व असे दोन्ही गुण उपजतच होते. शिक्षणाने त्यांच्या या दोन्ही गुणांना सामर्थ्य प्राप्त करून दिले. स्वातंत्र्योत्तर काळातही त्यांनी वेगवगळ्या संप व सत्याग्रहांमध्ये सहभाग घेऊन आपली क्षमताही सिध्द केलेली आहे. ब्रिटीश कालखंडात झालेल्या जंगल सत्याग्रहात अलिबाग तालुक्यातील आगरी लोकांचा सहभाग तर विशेष उल्लेखनीय आहे. याबाबतचा एक दाखला पुढील प्रमाणे सांगता येईल.

‘कुलाबा जिल्ह्यातील जंगल सत्याग्रह प्रथम अलिबाग तालुक्यात सुरू झाला. जुलैच्या पहिल्या आठवड्यात जंगल सत्याग्रहासाठी अलिबागला प्रशिक्षण शिबीर स्थापन करण्यात येऊन तेथे सत्याग्रहींना प्रशिक्षण दिले जात असे. त्यामुळे अलिबाग  हे आंदोलनाचे केंद्र बनले होते. आगरी लोकांचा आंदोलनास वाढता पाठींबा ब्रिटिश शासनास चिंतेची बाब वाटत होती’.[४४]

यावरून आगरी समाजाचा सत्याग्रहातील सहभाग लक्षात येतो. शिवाय संपूर्ण जगातील शेतकऱ्यांचा एकमेव व प्रदीर्घ झालेला असा चरीचा संप सर्वांनाच माहित आहे. आपल्याच जमिनीवर व्यापाऱ्यांच्या जुलमी वृत्तीमुळे कुळ म्हणून राबून उपाशीपोटी राहण्याची वेळ आल्यावर संघटीत होऊन बेदरकारपणे सलग ७ वर्षे येथील समाजाने दिलेला हा लढा निश्चितच कौतुकास्पद होता. या सर्व संप व सत्याग्रहातील आगरी समाजाचा सहभाग विशेष उल्लेखनीय होता. त्यांची या संपातील भूमिका अन्यायाला वाचा फोडणारी होती.

तेव्हा राजकीय क्षेत्रात त्यांची विशेष प्रगती झालेली नव्हती. मात्र शिक्षणप्रसार व जागतिकीकरणामुळे निर्माण झालेले औद्योगिकीकरण यांचा अनुकूल व प्रतिकूल होणारा परिणाम ते अनुभवू लागले. त्यामुळे आपल्या लोकांना संघटीत करून पुन्हा एकदा प्रस्थापितांविरोधी लढा देणे अत्यावश्यक आहे हे लक्षात येऊन आगरी समाजाने त्या दृष्टीने आपले संघ व संघटना निर्माण केल्या. त्यातील काही संघटना व त्यांचे कार्य पुढील प्रमाणे सांगता येतील.[४५] :—

**संघटना — अध्यक्ष — कार्य**

**१. चोविस गाव बचाव संघर्ष समिती — श्री. अर्जुन गावंड.**

अलिबाग तालुक्यातील रांजणखारच्या आसपासच्या प्रस्तावीत क्षेत्रात विविध कंपन्यांमार्फत नवीन आर्थिक क्षेत्राची निर्मिती करण्यासाठी भूसंपादन केले जात होते. यात इंडिया बुल्स ही कंपनी अग्रेसर होती. या कंपनीला पर्यायाने संपूर्ण भूसंपादनाला विरोध करण्यासाठी २४ गावांनी एकत्र येवून चोविस गाव बचाव संघर्ष समितीची स्थापना केली.

**२. चौदा गाव बचाव संघर्ष समिती — श्री. दत्ता पाटील.**

१९९६ साली अलिबाग येथील रेवस — मांडवा परिसरात सांताक्रुझ विमानतळाला पर्यायी नियोजित दुस—या आंतरराष्ट्रीय विमानतळाची घोषणा करण्यात आली. शिवाय औद्योगिक क्षेत्राच्या विकासाच्या दृष्टीने रेवस — आवरे बंदराची निर्मितीही करण्याचे ठरले. त्यावेळी या दोन्ही प्रस्तावांना या परिसरातील १४ गावांनी एकत्र येवून विरोध करण्यासाठी चौदा गाव बचाव संघर्ष समितीची स्थापना केली.

**३. नऊ गाव खारेपाट कृती समिती — श्री. नाना पाटील.**

अलिबाग तालुक्यातील धेरंड — शहापूर या परिसरात टाटा व रिलायन्स या दोन कंपन्यांमार्फत औष्णिक विद्युत प्रकल्प उभे करण्याचे ठरले. त्यासाठी या कंपन्यांमार्फत भूसंपादन केले गेले. या प्रकल्पाला शहापूर गावामधिल आदर्श

मित्र मंडळातील काही तरुणांनी विरोध केला. परंतु ही लढाई मोठी असल्याने त्यांनी श्रमिक मुक्ती दलाची मदत घेतली. अखेर या प्रकल्पांना पर्याय म्हणून पवनचक्कीचा प्रकल्प येण्यासाठी व भूसंपादन रोखण्यासाठी आसपासच्या नऊ गावांनी एकत्र येवून नऊ गाव खारेपाट कृती समितीची स्थापना केली.

**४. वाघेश्वर प्रकल्पग्रस्त संघर्ष समिती — डॉ. श्री. संजय पाटील.**

सुर्या रोशनी प्रकल्प व पटनी प्रकल्प या येवू घातलेल्या प्रकल्पांसाठी या परिसरात भूसंपादन केले जात होते. श्रमिक मुक्ती दलाच्या नेतृत्वाखाली सुरु झालेल्या संघर्षांतर्गत या दोन्ही प्रकल्पांना विरोध करण्यासाठी वाघेश्वर प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीची निर्मिती केली गेली.

**५. शहाबाज बचाव संघर्ष समिती — श्री. नरेश म्हात्रे.**

अलिबाग तालुक्यातील धरमतर खाडीत पी.एन.पी. मेरीटाईम्स व जे. एस.डब्लू. इस्पात या कंपनीचे येणारे मालवाहू प्रवासी जहाज व बार्जेसमुळे येथील खाडी असुरक्षित बनली. सततच्या ये — जा मुळे खाडीतील मासेमारीवर विपरीत परिणाम झाला तर खाडीची बांधबंदिस्ती तुटल्यामुळे आसपासची शेतीही नापीक होऊ लागली आहे. त्यांना विरोध करण्यासाठी शहाबाज बचाव संघर्ष समितीची स्थापना करण्यात आली.

यांसारख्या विविध संघटनांच्या माध्यमातून आगरी समाजाने आपल्यावर होणाऱ्या अन्यायाला विरोध केला. या व्यतिरिक्त आगरी समाजातील अनेक स्त्री व पुरुष आता राजकारणात विविध पदांवर सुध्दा कार्यरत असलेले दिसतात. यात प्रामुख्याने पुढील व्यक्तींची नावे सांगता येतील. :—[४६]

- **कै. श्री. प्रभाकर पाटील** —

सदस्य — पोयनाड ग्रामपंचायत, सरपंच — ग्रुप ग्रामपंचायत पोयनाड, संचालक — रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, संचालक— महाराष्ट्र अर्बन को — ऑपरेटिव्ह बँक, सभापती — आरोग्य व बांधकाम विभाग, अध्यक्ष — रायगड जिल्हा परिषद, संचालक— मार्केटिंग फेडरेशन महाराष्ट्र राज्य, संचालक

— रायगड बाजार, प्रदेशाध्यक्ष— रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशन, उपाध्यक्ष— महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन.

- **श्रीमती मिनाक्षी पाटील**

सरपंच — ग्रामपंचायत आंबेपूर, सदस्य —जिल्हा परिषद, तज्ञ सदस्य — जिल्हा परिषद स्थायी समिती, अध्यक्ष — रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघ, महिला आघाडी प्रमुख — शेतकरी कामगार पक्ष, संचालक —हौसिंग फायनान्स, संचालक — एम.एस.सी बँक, राज्यमंत्री — बंदर व मत्स्य खाते.

- **श्री. जयंत पाटील**

सदस्य — पंचायत समिती अलिबाग, जिल्हा चिटणीस — रायगड जिल्हा शेतकरी कामगार पक्ष, सदस्य — रायगड जिल्हा परिषद अलिबाग, सदस्य — महाराष्ट्र राज्य विधान परिषद, सदस्य — भारतीय शेतकरी कामगार पक्ष राज्य चिटणीस मंडळ, सरचिटणीस — भारतीय शेतकरी कामगार पक्ष, चेअरमन — रायगड जिल्हा मध्यवर्ती सह. बँक लि. पेण, संचालक — श्रीबाग सहकारी मध्यवर्ती ग्राहक मंडळ लि. (रायगड बाजार) अलिबाग, संचालक — महाराष्ट्र राज्य मच्छिमार सहकार संघ लि., संचालक — अलिबाग तालुका खरेदी विक्री संघ लि., संचालक — महाराष्ट्र राज्य मार्केटिंग फेडरेशन लि. मुंबई, संचालक — कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. कोल्हापूर, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक प्रतिनिधी, संचालक — कुलाबा कृषी प्रक्रिया सहकारी संस्था लि., संचालक — रायगड जिल्हा सह. मजूर फेडरेशन लि., संचालक — पीएनपी मेरीटाईम सर्व्हिसेस प्रा. लि., संचालक — सीस्पे ॲल्युमिनिअम बोटस् (इंडिया) प्रा.लि., संचालक — रायटेक ॲग्रो एक्सपोर्ट लि.

- **श्री. सुभाष पाटील**

अध्यक्ष — रायगड जिल्हा परिषद अलिबाग, सभापती — पंचायत समिती अलिबाग.

- **सौ. चित्रलेखा पाटील**

  महिला आघाडी प्रमुख — शेतकरी कामगार पक्ष.

- **श्री. प्रशांत नाईक**

  नगराध्यक्ष — नगरपरिषद, अलिबाग.

- **श्री. बाळासाहेब तेलगे**

  सदस्य — रायगड जिल्हा परिषद अलिबाग.

- **श्री. प्रकाश धुमाळ**

  अध्यक्ष — रायगड जिल्हा परिषद अलिबाग.

- **सौ. चित्राताई पाटील**

  सदस्य — रायगड जिल्हा परिषद.

- **सौ. सुगंधा पाटील**

  सदस्य — पंचायत समिती अलिबाग,

- **सौ. मिनाक्षी पाटील**

  सरपंच — ग्रामपंचायत शहाबाज

- **सौ. तुळसाबाई पाटील**

  सदस्य — ग्रामपंचायत आंबेपूर

- **सौ. नमिता नाईक**

  नगराध्यक्ष — नगरपरिषद, अलिबाग.

एकंदरीत जागतिकीकरणाने आगरी समाजातील स्त्री व पुरूष या दोहोंमध्ये लैंगिक समानतेच्या दृष्टीकोनातून परिवर्तन घडून आपल्या हक्क व अधिकाराप्रती जास्त सजग अशी भूमीका निर्माण झालेली दिसते. हे राजकीय परिवर्तन आगरी समाजाच्या विकासास पोषकच ठरलेले दिसते.

## ❖ प्रश्नावलींचे सांख्यिकी विश्लेषण

आगरी समाजातील विविध स्तरातील, वयोगटातील व विभागातील एकूण ९८० लोकांकडून भरुन घेतलेल्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक प्रश्नावलींच्या आधारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषण पुढील प्रमाणे –

### • सामाजिक प्रश्नावलीचे विश्लेषण

**प्रश्न क्र. १ मला माझ्या घरात स्वतंत्र स्थान आहे.**

कोष्टक क्र. १

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| होय | २८९ | ७१ | ९६ | ९० |
| नाही | १२ | ८ | ४ | १० |
| एकूण | ३०१ | ७९ | १०० | १०० |

१. ९६% पुरूष आणि ९०% स्त्रियांच्या मते त्यांना त्यांच्या घरात स्वतंत्र स्थान आहे.

२. ४% पुरूष आणि १०% स्त्रियांच्या मते त्यांना त्यांच्या घरात स्वतंत्र स्थान नाही.

**प्रश्न क्र. २ पारंपरिक सण व उत्सव साजरे करण्यास आवडते.**

कोष्टक क्र २

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टककेवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| होय | २९८ | ७६ | ९९ | ९६ |
| नाही | ३ | ३ | १ | ४ |
| एकूण | ३०१ | ७९ | १०० | १०० |

१. ९९% पुरूष आणि ९६% स्त्रियांना पारंपरिक सण व उत्सव साजरे करण्यास आवडतात.

२. १% पुरूष आणि ४% स्त्रियांना पारंपरिक सण व उत्सव साजरे करण्यास आवडत नाही.

**प्रश्न क्र.३ पारंपरिक रूढी किंवा परंपरा जतन करणे योग्य आहे.**

कोष्टक क्र . ३

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टककेवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| होय | २५६ | ६१ | ८५ | ७७ |
| नाही | ४५ | १८ | १५ | २३ |
| एकूण | ३०१ | ७९ | १०० | १०० |

१. ८५% पुरूष आणि ७७% स्त्रियांच्या मते पारंपरिक रूढी किंवा परंपरा जतन करणे योग्य आहे.

२. १५% पुरूष आणि २३% स्त्रियांच्या मते पारंपरिक रूढी किंवा परंपरा जतन करणे योग्य नाही.

**प्रश्न क्र.४ माझ्या मते गेल्या २० वर्षापासून माझ्या समाजात बरेच बदल झाले आहेत.**

कोष्टक क्र. ४

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| होय | २९० | ७२ | ९६ | ९१ |
| नाही | ११ | ७ | ४ | ९ |
| एकूण | ३०१ | ७९ | १०० | १०० |

१. ९६% पुरूष आणि ९१% स्त्रियांच्या मते गेल्या २० वर्षांपासून त्यांच्या समाजात बरेच बदल झालेले आहेत.

२. ४% पुरूष आणि ९% स्त्रियांच्या मते गेल्या २० वर्षांपासून त्यांच्या समाजात बरेच बदल झालेले नाहीत.

**प्रश्न क्र.५ दळणवळणाच्या वाढत्या सोयींमुळे माझे जीवन गतीमान बनले आहे.**

कोष्टक क्र . ५

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| होय | २७७ | ६९ | ९२ | ८७ |
| नाही | २४ | १० | ८ | १३ |
| एकूण | ३०१ | ७९ | १०० | १०० |

१. ९२% पुरूष आणि ८७% स्त्रियांच्या मते दळणवळणाच्या वाढत्या सोयींमुळे त्यांचे जीवन गतीमान बनले आहे.

२. ८% पुरूष आणि १३% स्त्रियांच्या मते दळणवळणाच्या वाढत्या सोयींमुळे त्यांचे जीवन गतीमान बनले नाही.

**प्रश्न क्र.६ इलेक्ट्रॉनिक्स् साधने वापरल्याने वेळेची बचत होते.**

कोष्टक क्र . ६

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| होय | २८६ | ७२ | ९५ | ९१ |
| नाही | १५ | ७ | ५ | ९ |
| एकूण | ३०१ | ७९ | १०० | १०० |

१. ९५% पुरूष आणि ९१% स्त्रियांच्या मते इलेक्ट्रॉनिक्स साधने वापरल्याने वेळेची बचत होते.

२. ५% पुरूष आणि ९% स्त्रियांच्या मते इलेक्ट्रॉनिक्स साधने वापरल्याने वेळेची बचत होत नाही.

**प्रश्न क्र.७ माझ्या मते पुरूषांप्रमाणे स्त्रीलाही घरात बरोबरीचे स्थान असावे.**

कोष्टक क्र . ७

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| होय | २९८ | ७९ | ९९ | १०० |
| नाही | ३ | ० | १ | ० |
| एकूण | ३०१ | ७९ | १०० | १०० |

१. ९९% पुरूष आणि १००% स्त्रियांच्या मते पुरूषांप्रमाणे स्त्रीलाही घरात बरोबरीचे स्थान असावे.

२. १% पुरूषांच्या मते पुरूषांप्रमाणे स्त्रीलाही घरात बरोबरीचे स्थान नसावे.

**प्रश्न क्र.८ माझ्या आहारामध्ये शक्यतो पारंपरिक पदार्थांचाच समावेश असतो.**

कोष्टक क्र . ८

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टककेवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| होय | २३२ | ५५ | ७७ | ७० |
| नाही | ६९ | २४ | २३ | ३० |
| एकूण | ३०१ | ७९ | १०० | १०० |

१. ७७% पुरूष आणि ७०% स्त्रियांच्या मते त्यांच्या आहारामध्ये शक्यतो पारंपरिक पदार्थांचाच समावेश असतो.

२. २३% पुरूष आणि ३०% स्त्रियांच्या मते त्यांच्या आहारामध्ये शक्यतो पारंपरिक पदार्थांचाच समावेश नसतो.

**प्रश्न क्र.९ मी माझ्या बोलीभाषेचा वापर व्यवहारात करतो.**

कोष्टक क्र . ९

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| होय | २५९ | ७० | ८६ | ८९ |
| नाही | ४२ | ९ | १४ | ११ |
| एकूण | ३०१ | ७९ | १०० | १०० |

१. ८६% पुरूष आणि ८९% स्त्रियांच्या मते ते त्यांच्या बोलीभाषेचा वापर व्यवहारात करतात.

२. १४% पुरूष आणि १२% स्त्रियांच्या मते ते त्यांच्या बोलीभाषेचा वापर व्यवहारात करत नाहीत.

**प्रश्न क्र.१० मला माझी बोलीभाषा चांगली बोलता येते.**

कोष्टक क्र . १०

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| होय | २८७ | ७५ | ९५ | ९५ |
| नाही | १४ | ४ | ५ | ५ |
| एकूण | ३०१ | ७९ | १०० | १०० |

१. ९५% पुरूष आणि ९५% स्त्रियांच्या मते त्यांना त्यांची बोलीभाषा चांगली बोलता येते.

२. ५% पुरूष आणि ५% स्त्रियांच्या मते त्यांना त्यांची बोलीभाषा चांगली बोलता येत नाही.

**प्रश्न क्र.११ समाजातील बदलानुरूप माझ्या पालकांनी त्यांच्या विचारसरणीत बदल करावा असे मला वाटते.**

कोष्टक क्र . ११

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| होय | २५९ | ६५ | ८६ | ८२ |
| नाही | ४२ | १४ | १४ | १८ |
| एकूण | ३०१ | ७९ | १०० | १०० |

१. ८६%पुरूष आणि ८२% स्त्रियांच्या मते समाजातील बदलानुरूप त्यांच्या पालकांनी त्यांच्या विचारसरणीत बदल करावा असे त्यांना वाटते.

२. १४%पुरूष आणि १८% स्त्रियांच्या मते समाजातील बदलानुरूप त्यांच्या पालकांनी त्यांच्या विचारसरणीत बदल करावा असे त्यांना वाटत नाही.

**प्रश्न क्र.१२ समाजबदल म्हणजे पेहरावात बदल यास मी सहमत आहे.**

कोष्टक क्र. १२

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| होय | १७४ | ४६ | ५८ | ५८ |
| नाही | १२७ | ३३ | ४२ | ४२ |
| एकूण | ३०१ | ७९ | १०० | १०० |

१. ५८% पुरूष आणि ५८% स्त्रियांच्या मते समाज बदल म्हणजे पेहरावात बदल यास ते सहमत आहेत.

२. ४२% पुरूष आणि ४२% स्त्रियांच्या मते समाज बदल म्हणले पेहरावात बदल यास ते सहमत नाहीत.

**प्रश्न क्र.१३ परप्रांतिय किंवा इतर समाजाचे अनुकरण आमच्याकडे लग्नविधीत केले जातात.**

कोष्टक क्र . १३

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| होय | १२४ | ३३ | ४१ | ४२ |
| नाही | १७७ | ४६ | ५९ | ५८ |
| एकूण | ३०१ | ७९ | १०० | १०० |

१. ४१% पुरूष आणि ४२% स्त्रियांच्या मते परप्रांतीय किंवा इतर समाजाचे अनुकरण त्यांच्याकडे लग्नविधीत केले जातात.

२. ५९% पुरूष आणि ५८% स्त्रियांच्या मते परप्रांतीय किंवा इतर समाजाचे अनुकरण त्यांच्याकडे लग्न विधीत केले जात नाहीत.

**प्रश्न क्र.१४ सद्यस्थितीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर अपरिहार्य वाटतो.**

कोष्टक क्र . १४

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| होय | २०३ | ५० | ६७ | ६३ |
| नाही | ९८ | २९ | ३३ | ३७ |
| एकूण | ३०१ | ७९ | १०० | १०० |

१. ६७% पुरूष आणि ६३% स्त्रियांच्या मते सद्यस्थितीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर अपरीहार्य वाटतो.

२. ३३% पुरूष आणि ३७% स्त्रियांच्या मते सद्यस्थितीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर अपरीहार्य वाटत नाही.

**प्रश्न क्र. १५ समाज मंदिरामध्ये जाणे हे माझ्या समाजात अनिवार्य आहे.**

कोष्टक क्र . १५

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| होय | १६१ | ४३ | ५३ | ५४ |
| नाही | १४० | ३६ | ४७ | ४६ |
| एकूण | ३०१ | ७९ | १०० | १०० |

१. ५३% पुरूष आणि ५४% स्त्रियांच्या मते समाज मंदिरामध्ये जाणे हे त्यांच्या समाजात अनिवार्य आहे.

२. ४७% पुरूष आणि ४६% स्त्रियांच्या मते समाज मंदिरामध्ये जाणे हे त्यांच्या समाजात अनिवार्य नाही.

**प्रश्न क्र.१६ समाज विकासाठी सामाजिक संघटना महत्त्वाची भूमिका बजावतात**.

कोष्टक क्र . १६

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| होय | २७२ | ६२ | ९० | ७८ |
| नाही | २९ | १७ | १० | २२ |
| एकूण | ३०१ | ७९ | १०० | १०० |

१. ९०% पुरूष आणि ७८% स्त्रियांच्या मते समाज विकासाठी सामाजिक संघटना महत्त्वाची भूमिका बजावतात.

२. १०% पुरूष आणि २२% स्त्रियांच्या मते समाज विकासासाठी सामाजिक संघटना महत्त्वाची भूमिका बाजावत नाहीत.

**प्रश्न क्र.१७ जागतिकीकरणामुळे राहणीमानाचा दर्जा सुधारला असे मला वाटते.**

कोष्टक क्र . १७

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| होय | २७७ | ६९ | ९२ | ८७ |
| नाही | २४ | १० | ८ | १३ |
| एकूण | ३०१ | ७९ | १०० | १०० |

१. ९२% पुरूष आणि ८७% स्त्रियांच्या मते जागतिकीकरणामुळे राहणीमानाचा दर्जा सुधारला असे त्यांना वाटते.

२. ८% पुरूष आणि १३% स्त्रियांच्या मते जागतिकीकरणामुळे राहणीमानाचा दर्जा सुधारला असे त्यांना वाटत नाही

**प्रश्न क्र.१८ माझ्या मते इतर समाजाच्या तुलनेत माझा समाज कमी प्रगत आहे.**

कोष्टक क्र . १८

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| होय | १५१ | ३७ | ५० | ४७ |
| नाही | १५० | ४२ | ५० | ५३ |
| एकूण | ३०१ | ७९ | १०० | १०० |

१. ५०% पुरूष आणि ४७% स्त्रियांच्या मते इतर समाजाच्या तुलनेत त्यांचा समाज कमी प्रगत आहे.

२. ५०% पुरूष आणि ५३% स्त्रियांच्या मते इतर समाजाच्या तुलनेत त्यांचा समाज कमी प्रगत नाही.

- **आर्थिक प्रश्नावलीचे विश्लेषण**

**प्रश्न क्र. १ माझा पारंपरिक व्यवसाय शेती किंवा मासेमारी आहे.**

कोष्टक क्र . १९

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्रिया | पुरूष | स्त्रिया |
| होय | २६० | ५६ | ८४ | ७८ |
| नाही | ४८ | १६ | १६ | २२ |
| एकूण | ३०८ | ७२ | १०० | १०० |

१. ८४% पुरूष व ७८% स्त्रियांच्या मते त्यांचा पारंपरिक व्यवसाय शेती किंवा मासेमारी आहे.

२.१६% पुरूष व २२% स्त्रियांच्या मते त्यांचा पारंपरिक व्यवसाय शेती किंवा मासेमारी नाही.

**प्रश्न क्र. २ मी करीत असलेला व्यवसाय वडीलोपार्जित आहे.**

कोष्टक क्र . २०

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्रिया | पुरूष | स्त्रिया |
| होय | २४७ | १३ | ६९ | ६५ |
| नाही | ९५ | २५ | ३१ | ३५ |
| एकूण | ३४२ | ३८ | १०० | १०० |

१. ६९% पुरूष व ६५% स्त्रियांच्या मते त्यांचा व्यवसाय वडीलोपार्जित आहे.

२. ३१%पुरूष व ३५% स्त्रियांच्या मते त्यांचा व्यवसाय वडीलोपार्जित नाही.

**प्रश्न क्र. ३ सेझ प्रकरणाचा फायदा प्रत्येक शेतकऱ्याला होईल.**

कोष्टक क्र . २१

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्रिया | पुरूष | स्त्रिया |
| होय | ११० | २४ | ३६ | ३३ |
| नाही | १९७ | ४८ | ६४ | ६७ |
| एकूण | ३०७ | ७२ | १०० | १०० |

१. ३६% पुरूष व ३३% स्त्रियांच्या मते सेझ प्रकरणाचा फायदा प्रत्येक शेतकऱ्याला होईल.

२. ६४% पुरूष व ६७% स्त्रियांच्या मते सेझ प्रकरणाचा फायदा प्रत्येक शेतकऱ्याला होणार नाही.

**प्रश्न क्र. ४ माझ्या मते परंपरागत चालत आलेला व्यवसाय नवीन नोकरीपेक्षा योग्य आहे.**

कोष्टक क्र . २२

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्रिया | पुरूष | स्त्रिया |
| होय | १६१ | ४४ | ५२ | ६१ |
| नाही | १४७ | २८ | ४८ | ३९ |
| एकूण | ३०८ | ७२ | १०० | १०० |

१. ५३% पुरूष व ६१% स्त्रियांच्या मते परंपरागत चालत आलेला व्यवसाय नवीन नोकरीपेक्षा योग्य आहे.

२. ४८% पुरूष व ३९% स्त्रियांच्या मते परंपरागत चालत आलेला व्यवसाय नवीन नोकरीपेक्षा योग्य नाही.

**प्रश्न क्र. ५ शेती विकणे सद्यस्थितीत आत्यंतिक गरजेचे आहे.**

कोष्टक क्र . २३

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्रिया | पुरूष | स्त्रिया |
| होय | ८३ | १९ | २७ | २६ |
| नाही | २२५ | ५३ | ७३ | ७४ |
| एकूण | ३०८ | ७२ | १०० | १०० |

१. २७% पुरूष व २६% स्त्रियांच्या मते शेती विकणे सद्यस्थितीत आत्यंतिक गरजेचे आहे

२. ७३% पुरूष व ७४% स्त्रियांच्या मते शेती विकणे सद्यस्थितीत आत्यंतिक गरजेचे नाही.

**प्रश्न क्र. ६ माझ्या मते भविष्यकाळात बचत करणे खूप गरजेचे आहे**

कोष्टक क्र . २४

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्रिया | पुरूष | स्त्रिया |
| होय | २९५ | ६९ | ९६ | ९६ |
| नाही | १३ | ०३ | ४ | ४ |
| एकूण | ३०८ | ७२ | १०० | १०० |

१. ९६% पुरूष व ९६% स्त्रियांच्या मते भविष्य काळात बचत करणे खूप गरजेचे आहे.

२. ४% पुरूष व ४% स्त्रियांच्या मते भविष्य काळात बचत करणे खूप गरजेचे नाही.

**प्रश्न क्र. ७ मी माझी व माझ्या मुलांची पॉलीसी काढली आहे.**

कोष्टक क्र . २५

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्रिया | पुरूष | स्त्रिया |
| होय | १४० | २५ | ४५ | ३५ |
| नाही | १६८ | ४७ | ५५ | ६५ |
| एकूण | ३०८ | ७२ | १०० | १०० |

१. ४५% पुरूष व ३५% स्त्रियांनी त्यांची व त्यांच्या मुलांची पॉलीसी काढली आहे.

२. ५५% पुरूष व ६५% स्त्रियांनी त्यांची व त्यांच्या मुलांची पॉलीसी काढली नाही.

**प्रश्न क्र. ८ स्त्रियांनी घराच्या आर्थिक हातभारास मदत करण्यास काहिही हरकत नाही.**

कोष्टक क्र . २६

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्रिया | पुरूष | स्त्रिया |
| होय | २८४ | ६७ | ९२ | ९३ |
| नाही | २४ | ५ | ८ | ७ |
| एकूण | ३०८ | ७२ | १०० | १०० |

१. ९२% पुरूष व ९३% स्त्रियांच्या मते स्त्रियांनी घराच्या आर्थिक हातभारास मदत करण्यास काहीही हरकत नाही.

२. ८% पुरूष व ७% स्त्रियांच्या मते स्त्रियांनी घराच्या आर्थिक हातभारास मदत करू नये.

**प्रश्न क्र. ९ व्यवसायात फायदा व्हावा यासाठी मी सतत प्रयत्नशील असतो.**

कोष्टक क्र . २७

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्रिया | पुरूष | स्त्रिया |
| होय | २७९ | ५८ | ९१ | ८१ |
| नाही | २९ | १४ | ९ | १९ |
| एकूण | ३०८ | ७२ | १०० | १०० |

१. ९१% पुरूष व ८१% स्त्रियांच्या मते व्यवसायात फायदा व्हावा यासाठी ते सतत प्रयत्नशील असतात.

२. १०% पुरूष व १९% स्त्रियांच्या मते व्यवसायात फायदा व्हावा यासाठी ते प्रयत्नशील नसतात.

**प्रश्न क्र. १० माझ्या मते लग्न, पूजा, सण, उत्सव यासाठी होणार खर्च पूर्वीच्या तुलनेत आता जास्त आहे.**

कोष्टक क्र . २८

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्रिया | पुरूष | स्त्रिया |
| होय | २९५ | ७२ | ९६ | १०० |
| नाही | १२ | ० | ४ | ० |
| एकूण | ३०८ | ७२ | १०० | १०० |

१. ९६% पुरूष व १००% स्त्रियांच्या मते लग्न, पूजा, सण, उत्सव यासाठी होणार खर्च पूर्वीच्या तुलनेत आता जास्त आहे.

२. ४% पुरूषांच्या मते लग्न, पूजा, सण, उत्सव यासाठी होणार खर्च पूर्वीच्या तुलनेत आता जास्त नाही.

**प्रश्न क्र. ११ माझ्या मते नोकरीपेक्षा व्यवसायातून अधिक पैसा कमवू शकतो.**

कोष्टक क्र . २९

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्रिया | पुरूष | स्त्रिया |
| होय | २२९ | ५४ | ७४ | ७५ |
| नाही | ७९ | १८ | २६ | २५ |
| एकूण | ३०८ | ७२ | १०० | १०० |

१. ७४% पुरूष व ७५% स्त्रियांच्या मते नोकरीपेक्षा व्यवसायातून अधिक पैसा कमवू शकतो.

२. २६% पुरूष व २५% स्त्रियांच्या मते नोकरीपेक्षा व्यवसायातून अधिक पैसा कमवू शकत नाही.

**प्रश्न क्र. १२ आर्थिक सुबत्तेमुळे समाजाची प्रगती होण्यास मदत होते.**

कोष्टक क्र . ३०

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्रिया | पुरूष | स्त्रिया |
| होय | २८८ | ७० | ९४ | ९७ |
| नाही | २० | २ | ६ | ३ |
| एकूण | ३०८ | ७२ | १०० | १०० |

१. ९४% पुरूष व ९७% स्त्रियांच्या मते आर्थिक सुबत्तेमुळे समाजाची प्रगती होण्यास मदत होते.

२. ६% पुरूष व ३% स्त्रियांच्या मते आर्थिक सुबत्तेमुळे समाजाची प्रगती होण्यास मदत होत नाही.

**प्रश्न क्र. १३ माझ्या मते समाजाचा आर्थिक स्तर वाढविण्यासाठी स्वतः आर्थिक दृष्ट्या सुबत्त असणे आवश्यक आहे.**

कोष्टक क्र . ३१

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्रिया | पुरूष | स्त्रिया |
| होय | २८४ | ६४ | ९२ | ८९ |
| नाही | २४ | ८ | ८ | ११ |
| एकूण | ३०८ | ७२ | १०० | १०० |

१. ९२% पुरूष व ८९% स्त्रियांच्या मते समाजाचा आर्थिक स्तर वाढविण्यासाठी स्वत: आर्थिकदृष्ट्या सुबत्त असणे आवश्यक आहे.

२. ८% पुरूष व ११% स्त्रियांच्या मते समाजाचा आर्थिक स्तर वाढविण्यासाठी स्वत: आर्थिकदृष्ट्या सुबत्त असणे आवश्यक नाही.

**प्रश्न क्र. १४ जागतिकीकरणामुळे व्यवसायवृध्दी होण्यास मदत झाली.**

कोष्टक क्र . ३२

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्रिया | पुरूष | स्त्रिया |
| होय | २९४ | ६३ | ९५ | ८८ |
| नाही | १४ | ९ | ५ | १२ |
| एकूण | ३०८ | ७२ | १०० | १०० |

१. ९५% पुरूष व ८८% स्त्रियांच्या मते जगतिकीकरणामुळे व्यवसायवृध्दी होण्यास मदत झाली.

२. ५% पुरूष व १२% स्त्रियांच्या मते जगतिकीकरणामुळे व्यवसायवृध्दी होण्यास मदत झाली नाही.

**प्रश्न क्र. १५ इतर समाजाशी तुल्यबळ होण्यासाठी आर्थिक वृध्दी गरजेची आहे.**

कोष्टक क्र . ३३

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्रिया | पुरूष | स्त्रिया |
| होय | २९५ | ६९ | ९५ | ९६ |
| नाही | १३ | ३ | ५ | ४ |
| एकूण | ३०८ | ७२ | १०० | १०० |

१. ९५% पुरूष व ९६% स्त्रियांच्या मते इतर समाजाशी तुल्यबळ होण्यासाठी आर्थिक वृध्दी गरजेची आहे.

२. ५% पुरूष व ४% स्त्रियांच्या मते इतर समाजाशी तुल्यबळ होण्यासाठी आर्थिक वृध्दी गरजेची नाही.

- **शैक्षणिक प्रश्नावलीचे विश्लेषण**

**प्रश्न क्र. १ समाजामध्ये स्वतःचे स्थान निर्माण करण्यासाठी शिक्षण पैशापेक्षा अधिक महत्त्वाचे आहे.**

कोष्टक क्र . ३४

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टककेवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| होय | १५६ | ३२ | ८७ | ९७ |
| नाही | २३ | १ | १३ | ३ |
| एकूण | १७९ | ३३ | १०० | १०० |

१. ८७% पुरूष आणि ९७% स्त्रियांच्या मते समाजामध्ये स्वत:चे स्थान निर्माण करण्यासाठी शिक्षण पैशापेक्षा अधिक महत्त्वाचे आहे.

२. १३% पुरूष आणि ३% स्त्रियांच्या मते समाजामध्ये स्वत:चे स्थान निर्माण करण्यासाठी शिक्षण पैशापेक्षा अधिक महत्त्वाचे नाही.

**प्रश्न क्र. २ उच्च शिक्षण घेऊन परंपरागत व्यवसाय टाळणे आजच्या काळात योग्य आहे असे मला वाटते.**

कोष्टक क्र . ३५

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| होय | १५६ | ३२ | ८७ | ९७ |
| नाही | २३ | १ | १३ | ३ |
| एकूण | १७९ | ३३ | १०० | १०० |

१. ८७% पुरूष आणि ९७% स्त्रियांच्या मते उच्च शिक्षण घेऊन परंपरागत व्यवसाय टाळणे आजच्या काळात योग्य आहे असे त्यांना वाटते.

२. १३% पुरूष आणि ३% स्त्रियांच्या मते उच्च शिक्षण घेऊन परंपरागत व्यवसाय टाळणे आजच्या काळात योग्य आहे असे त्यांना वाटत नाही.

**प्रश्न क्र.३ इतर समाजाच्या तुलनेत माझ्या समाजातील मुले अधिक शिक्षण घेतात.**

कोष्टक क्र . ३६

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| होय | १४८ | २९ | ८३ | ८८ |
| नाही | ३१ | ४ | १७ | १२ |
| एकूण | १७९ | ३३ | १०० | १०० |

१. ८३% पुरूष आणि ८८% स्त्रियांच्या मते इतर समाजाच्या तुलनेत त्यांच्या समाजातील मुले अधिक शिक्षण घेतात.

२. १७% पुरूष आणि १२%स्त्रियांच्या मते इतर समाजाच्या तुलनेत त्यांच्या समाजातील मुले अधिक शिक्षण घेतात.

**प्रश्न क्र. ४ माझ्या मते मुलींच्या शिक्षणाने समाज विकासास वेग येईल.**

कोष्टक क्र . ३७

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| होय | १४४ | ३१ | ८० | ९४ |
| नाही | ३५ | २ | २० | ६ |
| एकूण | १७९ | ३३ | १०० | १०० |

१. ८०% पुरूष आणि ९४% स्त्रियांच्या मते मुलींच्या शिक्षणाने समाज विकासास वेग येईल.

२. २०% पुरूष आणि ६% स्त्रियांच्या मते मुलींच्या शिक्षणाने समाज विकासास वेग येणार नाही.

**प्रश्न क्र. ५ स्त्रियांनी उच्चशिक्षणासाठी बाहेर जाण्यास हरकत नाही असे मला वाटते.**

कोष्टक क्र . ३८

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| होय | १२८ | २४ | ७२ | ७३ |
| नाही | ५१ | ९ | २८ | २७ |
| एकूण | १७९ | ३३ | १०० | १०० |

१. ७२% पुरूष आणि ७३% स्त्रियांच्या मते स्त्रियांनी उच्च शिक्षणासाठी बाहेर जाण्यास हरकत नाही असे त्यांना वाटते.

२. २८% पुरूष आणि २७% स्त्रियांच्या मते स्त्रियांनी उच्च शिक्षणासाठी बाहेर जाऊ नये असे त्यांना वाटते.

**प्रश्न क्र. ६ शैक्षणिक बदल हा समाजबदलाचा पायाभूत घटक आहे**

कोष्टक क्र . ३९

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| होय | १५४ | २९ | ८६ | ८८ |
| नाही | २५ | ४ | १४ | १२ |
| एकूण | १७९ | ३३ | १०० | १०० |

१. ८६% पुरूष अणि ८८% स्त्रियांच्या मते शैक्षणिक बदल हा समाजबदलाचा पायाभूत घटक आहे.

२. १४% पुरूष आणि १२% स्त्रियांच्या मते शैक्षणिक बदल हा समाजबदलाचा पायाभूत घटक नाही.

**प्रश्न क्र.७ पूर्वीच्या तुलनेत सद्यस्थितीत माझ्या समाजातील शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे.**

कोष्टक क्र . ४०

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| होय | १६७ | ३२ | ९३ | ९७ |
| नाही | १२ | १ | ७ | ३ |
| एकूण | १७९ | ३३ | १०० | १०० |

१. ९३%पुरूष आणि ९७% स्त्रियांच्या मते पूर्वीच्या तुलनेत सद्यस्थितीत त्यांच्या समाजातील शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे.

२. ७% पुरूष आणि ३% स्त्रियांच्या मते पूर्वीच्या तुलनेत सद्यस्थितीत त्यांच्या समाजातील शिक्षणाचे प्रमाण वाढले नाही.

**प्रश्न क्र. ८ समाजातील शिक्षणाचे प्रमाण वाढल्याने आर्थिक क्षेत्र बदलास मदत मिळते.**

कोष्टक क्र . ४१

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| होय | १६१ | २८ | ९० | ८५ |
| नाही | १८ | ५ | १० | १५ |
| एकूण | १७९ | ३३ | १०० | १०० |

१. ९०% पुरूष आणि ८५% स्त्रियांच्या मते समाजातील शिक्षणाचे प्रमाण वाढल्याने आर्थिक क्षेत्र बदलास मदत मिळते.

२. १०% पुरूष आणि १५% स्त्रियांच्या मते समाजातील शिक्षणाचे प्रमाण वाढल्याने आर्थिक क्षेत्र बदलास मदत मिळत नाही.

**प्रश्न क्र.९ शैक्षणिक विकासामुळे समाजातील मागासलेपण दूर होण्यास मदत झाली.**

कोष्टक क्र . ४२

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| होय | १४५ | २९ | ८१ | ८८ |
| नाही | ३४ | ४ | १९ | १२ |
| एकूण | १७९ | ३३ | १०० | १०० |

१. ८१%पुरूष आणि ८८% स्त्रियांच्या मते शैक्षणिक विकासामुळे माजातील मागासलेपण दूर होण्यास मदत झाली आहे.

२. १९ %पुरूष आणि १२% स्त्रियांच्या मते शैक्षणिक विकासामुळे समाजातील मागासलेपण दूर होण्यास मदत झाली नाही.

**प्रश्न क्र. १० पूर्वीच्या तुलनेत सद्यस्थितीत माझ्या समाजातील स्त्री शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे.**

कोष्टक क्र . ४३

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| होय | १७१ | ३० | ९६ | ९१ |
| नाही | ०८ | ०३ | ०४ | ०९ |
| एकूण | १७९ | ३३ | १०० | १०० |

१. ९६ % पुरूष आणि ९१% स्त्रियांच्या मते पूर्वीच्या तुलनेत सद्यस्थितीत त्यांच्या समाजातील स्त्री शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे.

२. ४% पुरूष आणि ९% स्त्रियांच्या मते पूर्वीच्या तुलनेत सद्यस्थितीत त्यांच्या समाजातील स्त्री शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे.

## ❖ अर्थनिर्वचन

सामाजिक प्रश्नावली मधून प्राप्त झालेल्या उत्तरांच्या वर्गीकरणातून तसेच वेळोवेळी घेतलेल्या मुलाखतीतून हे लक्षात आले की आगरी समाजामध्ये स्त्री या घटकाला प्राधान्य दिलेले आहे. त्यांना समाजात स्वतंत्र स्थान तर दिले जातेच. शिवाय पुरूषांच्या बरोबरीनेही त्यांना समानतेची वागणूक देण्याचा प्रयत्न केला जातो. या समाजात आजही पारंपरिकतेला महत्त्व आहे. प्रामुख्याने पारंपरिक सण साजरे करणे, रूढी, परंपरा पाळणे व पारंपरिक पदार्थांचा आहारात समावेष करणे यास प्राधान्य दिले जाते. या समाजात आधुनिक तंत्रज्ञान

वापरून त्याच्याशी संबधित उपकरणे व दळणवळणाच्या साधनांमुळे त्यांना विकास करण्यास मदत झाली. त्यांच्यामध्ये सामाजिक दृष्टीकोनातून निश्चितच बदल झालेला आहे. मुख्यत्वे या लोकांनी स्वत:च्या सामाजिक संघटनांचाीही निर्मिती केली जेणेकरून त्यांना आपला विकास साधणे सोपे झाले. आधुनिक तंत्रज्ञान व सुख सोईचा अवलंब यांनी आपल्या जीवनात केलेला असला तरी लग्नपध्दती व इतर विधीमध्ये ते पारंपरिकता जपतात. यातही इतरांचे अनुकरण पूर्णपणे करत नसले तरी काही प्रमाणात हे अनुकरण सुरू झालेले आहे. शिवाय त्यांच्या बोलीभाषेतही परिवर्तन झालेले दिसतात. या सर्वांमागे जागतिकीकरणाचा प्रभाव आहे हे मात्र अधिकांश लोक मान्य करतात.

आर्थिक प्रश्नावलींच्या आधारे मिळालेल्या माहितीतून असे लक्षात आले की आगरी समाजाचा प्रमुख व्यवसाय शेती असून वेळे गरजेनुसार ते मासेमारी करण्यास प्राधान्य देतात. बहुतांश लोकांचा हा वडिलोपार्जीत व पारंपरिक व्यवसाय आहे. भविष्यात येत असलेल्या विविध प्रकल्पांसाठी रायगड जिल्ह्यात जे भूसंपादन चाललेले आहे यात अलिबाग तालुका प्राधान्य क्रमावर आहे. त्यामुळे सेझला अनुषंगून चालेलेल्या भूसंपादनास येथील अधिकाधीक लोकाच्या विरोध आहे. सेझ येण्याचा शेतकऱ्याना विशेष फायदा होणार नाही. असे त्यांना वाटते तसेच शेती विकू नये असे अधिकाधिक लोकांना वाटत असले तरी त्यातुलनेत परंपरागत शेती व्यवसाय करण्यास त्यांची पसंती असलेली दिसत नाही. व्यवसायात अधिक प्रमाणात फायदा व्हावा यासाठी ते प्रयत्नशिल असतात. त्यामुळे स्त्रियानी आर्थिक हातभार लावण्यास ते प्रोत्साहन देतात परंतु त्यांच्यादृष्टीने बचत आवश्यक असली तरी पॉलिसी वगैरे काढण्यासारख्या आधुनिक तंत्राकडे त्यांचा कल आढळत नाही. जागतिकीकरणामुळे झालेल्या व्यवसाय वृदधीमुळे त्यांची आर्थिक स्थिती सुधारली त्यामुळे खऱ्या अर्थाने या समाजातील जीवन पध्दतीत बदल झालेला दिसतो परंतु समाजात आर्थिक सुबत्ता आली असली तरी लग्न, सण, पूजा यांसारख्या विविध कौटुंबिक कार्यक्रमांवरील खर्चातही वाढ झालेली दिसते.

शैक्षणिक प्रश्नावलींच्या माध्यमातून संकलीत झालेल्या माहितीतून हे लक्षात आले की आगरी समाजात पैशापेक्षा शिक्षणाला महत्त्वाचे स्थान दिलेले आहे. शिक्षणामुळेच त्यांच्या समाजात प्रामुख्याने बदल झाले असे ते मानतात. शिक्षणाच्या विकासाने त्यांचे आर्थिक क्षेत्र बदलले व त्यांच्यातील मागासलेपण दूर होऊन त्यांच्या विकासास चालना मिळाली. सर्वसाधारणपणे आगरी समाजातील शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण इतर समाजातील घटकांच्या तुलनेत अधिक आहे असे त्यांना वाटते. तर स्त्रीशिक्षण हा त्यांच्या विकासाचा पाया असून उच्च शिक्षणासाठी प्रसंगी स्त्रियांना बाहेर जाण्याची मुभा / स्वातंत्र्य आहे.

एकंदरीतच शैक्षणिक विकासाने आगरी समाजातील आर्थिक व सामाजिक विकास होण्यास मदत झाली असली तरी हा विकास होण्यामागे जागतिकीकरणाचा सहभाग निश्चितच मोठा आहे हे लक्षात येते.

## टीपा

१. मुलाखत — हरिभाऊ पाटील, कार्यवाह, आगरी शिक्षण संस्था, पनवेल, दिनांक — २२/४/२०१२.

२. मुलाखत — मुरलीधर म्हात्रे, निवृत्त प्राथमिक शिक्षक, पेण, दिनांक — ११/१/२०१२.

३. Ibid, Kale, p.n. 13.

४. मुलाखत — उमेश पाटील, प्राध्यापक, पॉट्सडॅम विद्यापीठ, जर्मनी, दिनांक — २२/१२/२०१२.

५. अहवाल, शिक्षण विभाग, पंचायत समिती, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग, २०१२.

६. शंकर सखाराम, पूर्वोक्त, पृ. ७५.

७. का. ध. पाटील, पूर्वोक्त, पृ. ३.

८. अविनाश पाटील, म्हात्रे, पूर्वोक्त, पृ. १४४—१४५.

९. सुनंदा मोडखरकर, *आगरी लोकगीते व परंपरा,* सुयोग प्रकाशन, पेण, पृ. ८.

१०. मुलाखत — लिला जुईकर, निवृत्त मुख्याध्यापिका, थळ, दिनांक — ०८/१०/२०११.

११. मुलाखत — ह. जो. पाटील, ज्येष्ठ नाटट्ढज्ञकर्मी, शहाबाज, दिनांक — ९/१/२०१२.

१२. काळे, पूर्वोक्त, पृ. २५१.

१३. प्रगती म्हात्रे, *आगरी समाजातील स्त्री : परिवर्तनाचा अभ्यास,* एम. फिल. प्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, २०१०, पृ. ३४.

१४. मोकल, पूर्वोक्त, पृ. १७.

१५. मुलाखत – सुरेखा पाटील, अध्यक्ष, आदर्श महिला मंडळ, आंबेपूर, दिनांक – ५/४/२०१२.

१६. म्हात्रे, पूर्वोक्त, पृ. १६१.

१७. मुलाखत – महेश ठाकूर, प्राध्यापक, अलिबाग, दिनांक – २/२/२०१२.

१८. मुलाखत –जयेश पाटील, ग्रामसेवक, अलिबाग, दिनांक – १२/१२/२०१२.

१९. काळे, पूर्वोक्त, पृ. ९७.

२०. शंकर सखाराम, म्हात्रे  पूर्वोक्त, पृ. ६७.

२१. मुलाखत – गंगाधर पाटील, ज्येष्ठ कार्यकर्ते, वालवड, दिनांक – ८/९/२०११.

२२. मुलाखत – मालती पाटील, शेतमजूर, कमलपाडा, दिनांक – ४/३/२०१२.

२३. पाटील, म्हात्रे, पूर्वोक्त, पृ.२२.

२४. मुलाखत – सुनिता पाटील, गृहिणी, कोपर, दिनांक – ११/११/१२.

२५. मुलाखत – मनोज पाटील, प्राथमिक शिक्षक, चरी, दिनांक – ४/३/२०१३.

२६. महादेव जोशी, (संपा.), *भारतीय संस्कृतिकोश, प्रथम खंड,* भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे, पृ. ३९०.

२७. मुलाखत – लक्ष्मण बैकर, राष्ट्रीय क्रीडा प्रशिक्षक, कमलपाडा, दिनांक – २८ /८/२०१२.

२८. वसंत चौलकर, विनायक मंडळाची कबड्डी स्पर्धा, दैनिक कृषीवल, दिनांक – २२/१/२०१३.

२९. प्रभाकर भगत, शुटिंग बॉलचा हिरा – मॉडेल संघ रांजणखार, *आदर्श अग्रसेन रौप्य महोत्सवी विशेषांक,* मार्च–एप्रिल २००९, पृ. २०.

३०. मुलाखत – कैलास म्हात्रे, खेळाडू ,मॉडेल संघ, रांजणखार, दिनांक – ३/२/२०१३.
३१. मुलाखत – नरेंद्र पाटील, प्राथमिक शिक्षक, पेझारी, दिनांक – १४/३/२०१३.
३२. मुलाखत – तुळसाबाई पाटील, माजी सदस्य, ग्रामपंचायत आंबेपूर – पेझारी, दिनांक – १/१/२०१३.
३३. मुलाखत – चंद्रशेखर पाटील, ग्रामस्थ, कुर्डूस, दिनांक – १/१/२०१३.
३४. सुचिता पाटील, हळदीची रात्र, *मासिक आगरी दर्पण,* जे. डी. तांडेल, मुंबई, मार्च– एप्रिल २०११, पृ.२३.
३५. स्मिता दामले, मराठेकालीन कोकणातील व्यापार व धंदे, *त्रैमासिक भारतीय इतिहास आणि संस्कृती,* जुलै १९९२, मुंबई, पृ. ४३.
३६. कुलाबा व्यापार उदीम, जिल्हा जनगणना निर्देश ग्रंथ, १९६१, पृ. ४६.
३७. स. मा. गर्गे, (संपा.), *भारतीय समाजविज्ञान कोश,* भाग २, समाजविज्ञान मंडळ, पुणे, १९८७, पृ. २९.
३८. चौधरी, पूर्वोक्त, पृ. २२५.
३९. गीता हरवंदे, *पेण,* ग्रंथाली ज्ञानयज्ञ प्रकाशन, पुणे, जानेवारी २००६, पृ. २४.
४०. अनंत पाटील, *गाथा आगरी संस्कृतीची,* जाणीव प्रकाशन, मुंबई, २००७, पृ. २२७.
४१. ऋतू दिवान, संध्या म्हात्रे, (अनु.), वासंती दामले, *धावपट्टीच्या विळख्यातील गावे,* ग्रंथाली प्रकाशन, सप्टेंबर १९९८, पृ. ७४.
४२. बोकील, *जनाचे अनुभव पुसतां,* पूर्वोक्त, पृ. १४५.
४३. अहवाल, बचतगट विभाग, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, अलिबाग, २०१२–१३.
४४. K.K. Choudhary, (Edi.), Source Material For History Of Freedom Movement, Bombay, 1990, p.n.683.

४५. मुलाखत – विष्णू पाटील, सामाजिक कार्यकर्ते, धाामणपाडा, दिनांक, २३/३/२०१३.
४६. मुलाखत – दिनेश पाटील, प्राथमिक शिक्षक, सुतारपाडा, दिनांक – १२/११/१२.

# प्रकरण चौथे

# कोळी समाज आणि जागतिकीकरण

# ४.कोळी समाज आणि जागतिकीकरण

## • प्रस्तावना

नवीन आर्थिक धोरणाने संपूर्ण देशभरात विकास प्रक्रियेने जोर धरला. जागतिकीकरणाच्या या प्रवाहात ज्या ज्या समाजाने स्वत:ला बदलून घेण्याचा प्रयत्न केला तो तो समाज आज आपल्यात परिवर्तन पाहत आहे मात्र तरीही हे परिवर्तन सर्वच प्रकारच्या जाती जमातीतील लोकांना बदलण्यास परिपूर्ण ठरले असे आपणांस म्हणता येणार नाही. जागतिकीकरणाने समृध्द झालेल्या संपर्क व दळणवळणाच्या आणि शिक्षणाच्या सोईंपासून येथील मूळचा रहिवासी असलेला आदिवासी समाज बराच काळ अलिप्तच होता. हा आदिवासी समाज प्रस्थापित समाजापासून दूर आपल्याच कोशात राहणे पसंत करीत होता त्यामुळे आदिवासींच्या बाबतीत ही जागतिकीकरणाची प्रगती विशेष उल्लेखनीय नव्हती. जागतिकीकरणाच्या अनुषंगाने येथे येऊ घातलेल्या औद्योगिक प्रकल्पांमुळे या आदिवासींच्या अन्न, वस्त्र व निवारा या मुलभूत गरजांवरच परिणाम होऊ लागला. त्यांच्या अर्थार्जनात समस्या निर्माण होऊ लागल्या त्यामुळे शिक्षण घेऊन हा समाजही अर्थार्जनाचा प्रयत्न करण्यास उद्युक्त झाला. त्यातच शासनाकडून मिळणाऱ्या योजनांचा लाभ घेतल्याने व इतर समाजांच्या संपर्कात जास्त काळ आल्याने या समाजातही परिवर्तन होण्यास सुरूवात झाली. या आदिवासी समाजामध्ये अनेक उपप्रकार आहेत मात्र सदर प्रबंध प्रामुख्याने अलिबाग तालुक्यातील कोळी समाजावर जागतिकीकरणामुळे झालेल्या अनुकूल व प्रतिकूल परिणामांचा अभ्यास करणारे असल्याने त्या अनुषंगाने यात विवेचन देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## • कोळी समाजातील परिवर्तन

अलिबाग येथील कोळी समाज हा मुख्यत्वे किनारपट्टीलगत राहून मासेमारी करणारा असल्याने त्यांच्यावर जागतिकीकरणाचा प्रभाव प्रामुख्याने पडलेला दिसतो. पारंपरिक व्यवसायामुळे ते शिक्षणापासून वंचित राहीले असले

तरी नवीन यंत्र व तंत्रज्ञानामुळे त्यांच्या अर्थार्जनात प्रतिकूल व अनुकूल असे दोन्ही प्रकारचे परिवर्तन घडून आले. हे परिवर्तन पुढील चार घटकांद्वारे अधिक चांगल्या प्रकारे स्पष्ट करता येतील.

अ. सामाजिक परिवर्तन

ब. सांस्कृतिक परिवर्तन

क. आर्थिक परिवर्तन

ड. राजकीय परिवर्तन

**अ. सामाजिक परिवर्तन**

कोळी समाजात सामाजिक दृष्टीकोनातून झालेले परिवर्तन पुढील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करता येतील.

**१) शिक्षण**

जागतिकीकरणामुळे जग जवळ आले. त्यातून रोजगार निर्मिती झाली. या रोजगार प्राप्तीसाठी अथवा अर्थार्जनासाठी शिक्षण आवश्यक झाले. कोळी समाजातील स्त्री व पुरूष मासेमारी या पारंपरिक व्यवसायामूळे शिक्षण घेऊ शकले नाहीत. त्यांच्या मासेमारीच्या वेळा अनियमित असल्याने त्यांना प्राथमिक ते उच्च असे शिक्षण प्रत्येकवेळी पूर्ण करता येत नव्हते. फार तर प्राथमिक व पूढे जाऊन माध्यमिक शिक्षणापर्यंतच ते शिक्षण घ्यायचे. त्यामुळे पूर्वी हा समाज बऱ्यापैकी अशिक्षित राहिला होता.[१] जागतिकीकरणामुळे या समाजातही शिक्षणाचे महत्त्व सर्वांना पटू लागले आहे. मात्र त्यातही वकिल, डॉक्टर, इंजिनिअर यांसारख्या पदवीपर्यंतचे शिक्षण घेणाऱ्यांची संख्या कमी आहे. त्यांच्या व्यवसायातून मिळणाऱ्या अत्यल्प उत्पन्नामुळे खऱ्या अर्थाने अर्थार्जनासाठी ते आता शिक्षणाकडे वळू लागले आहेत. त्यातून ते उच्च पदावरही पोहचू लागले आहेत. या समाजातील मुले शिक्षण घेऊ लागली आहेत कारण शिक्षणाने आपलाही विकास होऊ शकतो हे आता त्यांना पटू लागले आहे. या बाबत एका अशिक्षीत कोळीणीने (मुलाखतदाराने) व्यक्त केलेले मत

म्हणजे 'चार बुका शिकली तर हीच पोरा मोटी होऊन लय पैसा कमावतील नायतर आज्या बापासारा ह्याच्या त्याच्या होरीवर जावाला लागल.'[२] तर स्त्रीशिक्षणाबाबत दुसऱ्या मुलाखतदाराने व्यक्त केलेले मत म्हणजे 'पोरी शिकल्या तरच त्यांना शिकलेले नी नोकरीवाले नवरे मिलतान.'[३]

या दोन्ही वक्तव्यावरून मुले आणि मुली या दोघांनाही शिक्षणाने स्थैर्य मिळू शकते हे या समाजातील कनिष्ठ वर्गालाही समजलेले आहे हे लक्षात येते. कदाचीत त्यामुळेच की काय कमी प्रमाणात का होईना पण उच्च शिक्षीत झालेल्या काही व्यक्ती चांगल्या पदावर पोहचलेल्या दिसतात. उदा.[४]

श्री. जितेंद्र भगत – वकील

श्री. सुशिल बुंदके – वकील

श्री. विलास चांगे – डॉक्टर

श्री. अरविंद कटोर – डॉक्टर

श्री. बळीराम नाखवा – बॅक मॅनेजर

श्री. दत्ताराम धोंडे – बॅक मॅनेजर

श्री. पी.जी.कोळी – ॲडीशनल कलेक्टर

श्री. रामदास झलके – तहसीलदार

श्री. बामा रामा मटू – पुरवठा अधिकारी

आधुनिकीकरणाने कोळी लोकांचा पारंपरिक मासेमारी व्यवसायही अमुलाग्र बदलला. या व्यवसायातील महत्त्वाचे साधन असलेल्या होड्या, जाळी आणि इतर साधनांमध्ये झालेले अत्याधुनिक बदल व यांत्रिकीकरण यांचे ज्ञान प्राप्त होण्यासाठी तत्सम शिक्षण घेण्याकडेही या समाजातील मुलांचा कल वाढलेला दिसतो. सर्वसामान्य व व्यवसायोपयोगी शिक्षणाचे प्रमाण या समाजात वाढलेले आहे कारण जागतिकीकरणामुळे मासेमारी व्यवसायालाही स्पर्धा निर्माण झाली. या स्पर्धेत टिकाव लागावा व परंपरागत व्यवसायापासून दूर जाण्याऱ्या मच्छीमारांच्या वर्गाला पुन्हा नव्याने या क्षेत्रात कार्य करता यावे यासाठी व्यवसायोपयोगी शिक्षण राज्यात सुरू करण्यात आले. यांत्रिकीकरणाद्वारे प्रगत

सागरी योजना मच्छीमारी तंत्राचा अवलंब करून मत्स्योत्पादन कसे वाढवावे यांचे मच्छीमार युवकांना सर्वांगिण प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने अलिबाग – रायगड येथे मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्रे स्थापन केली आहेत. याशिवाय भूजल योजने अंतर्गत मच्छीमार युवकांना गोड्या पाण्यातील मत्स्यव्यवसायाच्या आधुनिक तंत्रज्ञानाचे एक महिन्याचे लघू प्रशिक्षण शासकिय मत्सबीज केंद्र खोपोली येथे देण्यात येते. या साठी विद्यावेतनही देण्यात येते.[५]

आगरी आणि कोळी समाजाच्या शिक्षण या घटकाचा तुलनात्मक अभ्यास करता असे लक्षात आले की आगरी समाजात २० व्या शतकाच्या पूर्वार्धातच शैक्षणिक विकासास प्रारंभ झाला होता. जरी हे प्रमाण अत्यल्प असले तरी ते आगरी समाजाच्या विकासास पुरकच होते. त्या तुलनेत कोळी समाजातील शैक्षणिक विकास हा स्वातंत्र्योत्तर काळात सुरू झालेला दिसतो. त्यामुळे या समाजात आगरी समाजाच्या तुलनेत विकासाचे प्रमाण कमी आहे.

## २) भाषा

कोळी बोली व भाषा ही मराठीच्या इतर बोलींपैकीच एक आहे. तिचे स्वरूप इतर बोलीभाषेपेक्षा वेगळे आहे. वाक्यरचना, रूपिम, स्वनिम या तिन्ही बाबतीत ती इतर बोलीपेक्षा वेगळी आहे.[६] या भाषेच्या उच्चारात स्पष्टता नाही मात्र तरीही या भाषेत एक विशिष्ट प्रकारचा गोडवा आहे. आपल्या कष्टमय जीवनातून आनंद मिळावा यासाठी सण उत्सवात ते नृत्य गायन करतात. त्यात त्यांच्या भाषेतील गाणी हृदयाचा ठाव घेतांना दिसात.[७] या भाषेत ज व छ या ऐवजी स किंवा श चा वापर करतात. तसेच ड व ढ ऐवजी र किंवा ऱ्ह चा तर ण ऐवजी न चा वापर बहुतांशी केला जातो. तसेच ळ चा ल होणे व वि चा ई होणे हे सुध्दा त्यांच्या भाषेचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. याचे स्पष्टीकरण पुढील उदाहरणाद्वारे सहज लक्षात येईल.[८]

### ❖ र ऐवजी ल चा वापर

लरतो – रडतो.

❖ **ड ऐवजी र चा वापर**

पडला — परला                    कडी — करी

❖ **ढ ऐवजी ऱ्ह चा वापर**

चढत — चऱ्हत        काढ — काऱ्ह        वाढ — वाऱ्ह

❖ **ळ ऐवजी ल चा वापर**

माळ — माल        चोळी — चोली        काळा — काला

**प्रश्नार्थक वाक्य**

| **प्राकृत** | **मराठी** |
|---|---|
| कशाला आलात? | कनाला आयलय? |
| कुठे चाललात? | कय चाललास? |
| काय पाहिजे? | काय व्हय? |
| माहित आहे काय? | ठाव हाय का? |
| इकडे थांब. | यांगे थोपस. |
| तिकडे बोलावले आहे. | त्यांगे वारलाय. |

पूर्वी कोळी समाज हा एकाच ठिकाणी रहात असल्याने त्यांच्या भाषेवर बाह्य संस्काराचे संस्करण झालेले नव्हते. मात्र जागतिकीकरणाने त्यांचे व्यवसाय बदलले शिक्षण व बदलते व्यवसाय या दोन्ही मुळे त्यांच्या भाषेतही बदल होऊ लागला आहे. ते सुध्दा प्रमाण अथवा शुध्द मराठी बोलण्याचा प्रयत्न करतांना दिसतात.

आगरी आणि कोळी समाजाच्या भाषेबाबतीत तुलनात्मक अभ्यास करता असे लक्षात आले की दोन्ही समाजाच्या भाषेत बहुतांशी साम्य आहे. काही ठिकाणी जसे की ड चा र होणे, ळ चा ल होणे किंवा ण चा न होणे यांसारखी काही भाषिक गुणवैशिष्ट्ये हे त्यांच्यात समानतेच्या पातळीवर आढळतात त्यामुळे आगरी आणि कोळी समाजाची भाषा बहुतांशी समान वाटते. परंतु दोन्ही समाजाच्या भाषेच्या उच्चारात बराच फरक आहे. सद्यस्थितीत या

समाजातील मुले शिक्षण घेऊ लागल्याने प्रमाण भाषेवर त्यांचे प्रभूत्व येवू लागले असले तरी कोळी समाज हा आगरी समाजाच्या तुलनेत या बाबतीत मागे आहे असे आढळते. कोळी समाजात आजही त्यांच्या बोलीभाषेचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो परंतु आगरी समाजात याचे प्रमाण अत्यल्प होऊ लागले आहे.

### ३) मनोरंजनाची साधने

सतत कराव्या लागणाऱ्या काबाडकष्टामुळे मनोरंजनासाठी या समाजाकडे विशेष साधने नव्हती. तरीही नृत्य, गायन करणे व पत्ते खेळणे याद्वारे कोळी समाज आपले मनोरंजन करायचा. कोळी लोकांची मनोरंजनासाठी गाईली जाणरी लोकगीते प्रसिध्द आहेत. या व्यतिरिक्त नारळी पौर्णिमा, दहीहंडी, गौरी गणपती, होळी यांसारख्या सणांमध्ये विविध प्रकारचे नृत्य करून त्यातूनही ते आनंद प्राप्त करत. यात स्त्रियांचा गोलाकार केला जाणारा नाच विशेष प्रसिध्द असे.

मात्र गेल्या २५ वर्षात जागतिकीकरणाने कोळी समाजाच्या मनोरंजनाच्या साधनांमध्येही बदल घडवून आणला. टी. व्ही, चित्रपटगृहे व मनोरंजनाच्या इतर साधनांनी या जुन्या गोष्टी कालबाह्य होऊ लागल्या आहेत. ग्रामीण भागात मात्र आजही काही ठिकाणी या जुन्या मनोरंजनाच्या साधनांना आधुनिकतेची जोड देऊन जोपासले जाते. आजही स्त्रिया सण समारंभात व उत्सवात नृत्य करतात. मात्र आधुनिक पिढीचा कल मोबाईल व मनोरंजनाच्या तत्सम साधनांकडे वळलेला दिसतो.

### ४) सण — उत्सव

आगरी समाजाप्रमाणेच कोळी समाजामध्येही सण व उत्सवांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. हसतमुख राहणारा कोळी समाज जरी आजकाल शहरात विखुरलेला असला तरी आपल्या परंपरागत सणांना अजून विसरलेला नाही.[१] या समाजाचे प्रमुख सण म्हणजे नारळी पौर्णिमा, गौरी, गणपती, होळी, व महाशिवरात्र. या सर्व सणांपैकी नारळी पौर्णिमेचा सण दर्याला नारळ वाहून

नाचत, वाजत गाजत साजरा केला जातो.[१०] यावेळी प्रामुख्याने स्त्रिया एकाच रंगाच्या साड्या परिधान करतात. सागर देवतेला शांत करून आपल्या व्यवसायात भरभराट यावी यासाठी गावच्या पाटलांकडून मानाचा नारळ अर्पण केला जातो. त्यानंतर इतर सर्व लोक आपापले नारळ समुद्रात सोडतात. मग घावण व खोबऱ्याच्या पदार्थाचा नैवेद्य दाखवला जातो. यावेळी नारळ फोडण्याचा व नाचगाण्याचा कार्यक्रम ते खूप मोठ्या प्रमाणात साजरा करतात.[११] मात्र या सर्वांत आता कालानुरूप बदल होत आहे. जुन्या पारंपरिक नृत्यरचनांऐवजी सिनेमातील रेकॉर्ड डान्स व बॅंजोवर ताल धरतांना हे लोक दिसतात. तसेच सर्वत्र बडेजाव व दिखाऊपणाचा अंगीकार केलेला आढळतो.

होळी हा सण कोळी लोकांच्या दृष्टीने फार मोठा असतो. सर्वत्र होळी उभारली जाते. प्रत्येक जण आपापल्या आळीतील लोकांकडून वर्गणी काढून होळीसाठी लागणारे साहित्य आणतात. त्यानंतर पूजा, आरती व नैवेद्याचा मान दाखवून गावच्या पाटलांमार्फत होळी पेटवली जाते. या सणातही आता रोशनाई व संगीतासाठी आधुनिक प्रकारांचा वापर केला जातो. पूर्वी गावामधून एकच होळी असायची मात्र आज गल्लोगल्ली स्वत:पुरती स्वतंत्र अशी होळी उभारली जाते. शिवाय आपापल्या पुरते सण साजरे करण्याची पध्दत निर्माण झाली आहे. ग्रामीण भागात मात्र काही ठिकाणी आजही पारंपरिक पध्दतीने नृत्य गायन करून सण उत्सव साजरे केले जातात. याव्यतिरिक्त गौरी गणपती व रक्षाबंधन, भाऊबीज यांसारखे सण उत्सव देखील ते नव्या पध्दतीने साजरे करण्याकडे त्यांचा कल असतो.

### ५) घरांची रचना व भौतिक सुधारणा

जागतिकीकरणाचा प्रभाव कोळी समाजाच्या आर्थिक स्थितीवर जसा पडलेला आहे तसाच तो त्याच्या मानसिकतेवरही पडलेला आहे. त्यामुळे इतर समाजांप्रमाणे त्यांनीही आपल्या घरांच्या रचनेत व भौतिक सुविधेत बदल केलेले आहेत. कोळी समाज हा प्रामुख्याने समुद्राकिनारी राहणारा असल्याने त्यांच्या घरांची रचना त्याला अनुलक्षून होती. बराच काळ हा समाज व्यवसायाच्या

निमित्ताने घराबाहेर रहात असल्याने पूर्वी घरांच्या रचना वैशिष्ट्यपूर्ण नव्हत्या. घरासभोवती मोकळी जागा आणि पुढील बाजूस ओटा, दिवाणखाना, स्वयंपाकघर, मागील बाजूस पडवी अशी घराची रचना असायची. घराचा आकार मोठा असल्यास दिवाणखान्यास लागून दोन खोल्याही असायच्या.[१२] ओटीवर किंवा माजघरातच सुकी मच्छी साठविण्याची सोय केली जायची. घरासमोर अथवा आसपास मासे सुकविण्यासाठी व जाळी विणण्यासाठी खळ्यांची (अंगणाची) सोय केलेली असल्याने कोळी पुरूष ओटीवर बसून जाळे विणण्याचे काम करीत तर स्त्रिया मच्छीशी संबंधीत कामे करत. मात्र या सर्वांमुळे त्यांच्या घरांना मच्छीचा एक विशिष्ट वास येई. शिवाय या समाजातील स्त्रियांना मच्छिव्यवसायासाठी सतत बाहेर रहावे लागत असल्याने घरात बऱ्याचवेळा अस्वच्छता असायची. घरे सर्वसामान्य पध्दतीची व जवळपास उपलब्ध साहित्यातूनच बांधली जायची. घर फारच सुंदर असणे ही त्यांच्या दृष्टीने तेव्हा महत्त्वाची गोष्ट नव्हती.

सद्यस्थितीत जागतिकीकरणामुळे या समाजातील सर्वांचाच या बाबतीतील दृष्टीकोन बदलत चालला आहे. स्वतःचे घर मोठे, अतिशय स्वच्छ व सुंदर असण्याकडे या समाजाचा कल झालेला आहे. घरामध्ये शोभेच्या वस्तुंचा भरणा अधिक असतो. शिवाय त्यांच्यासाठी कपाट, शोकेस व सोफा यांसारख्या मोठ्या व फ्रीज, टी. व्ही. शंसारख्या इलेक्ट्रॉनीक्स वस्तू अत्यावश्यक झालेल्या आहेत.

### ६) साहित्य —

शिक्षणाचा प्रसार व प्रचार कोळी समाजात उशिरा झाल्याने आजही हा समाज आगरी समाजाच्या तुलनेत या बाबतीत मागे आहे. या समाजातील गेल्या ३० वर्षातील पिढ्यांनी उच्च शिक्षण घेण्याचा प्रयत्न केला असला तरी याचे प्रमाण कमी आहे. त्यातही या शिक्षित लोकांपैकी साहित्य क्षेत्राकडे वळलेल्या लोकांचे प्रमाण तर अगदी नगण्य आहे. मुंबई व आसपासच्या भागातील कोळी लोकांचा विचार केला तर तेथील समाजात साहित्याप्रती जागृती निर्माण होत आहे. या समाजातील काही लोक पत्रकारितेच्या क्षेत्रातही कार्य

करून कोळी समाजाच्या कथा व व्यथांना लोकांसमोर आणण्याचा प्रयत्न करत आहेत. त्या तुलनेत अलिबाग तालुक्यातील साहित्यक्षेत्रात योगदान असणाऱ्या कोळी समाजाचे प्रमाण निश्चितच कमी आहे.

### ७. समाजमंदिर

आपल्या समाजातील लोकांची एकत्र येऊन सांगोपांग चर्चा व्हावी, तसेच विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी त्यांना व्यासपीठ मिळावे या उद्देशाने समाजमंदिरांची निर्मिती केली गेली असली तरी याचे प्रमाण कोळी समाजात विशेष उल्लेखनीय असे नाही. थेरोंडा, सुडकोली, खारीकपाडा, खानाव, नागाव, लोणारे, बहिरोळे, पोयनाड, दिवलांग, मुशेत, घसवड इत्यादी ठिकाणी कोळी समाजाची समाजमंदिरे आढळतात.[१३] अशा पध्दतीने एकत्र येऊन ते आधुनिकता व परंपरा यांमध्ये समन्वय साधण्याचा प्रयत्न करतांना दिसतात.

### ८. आरोग्य

पूर्वी कोळी समाजातील लोक अनेक रोग व आजारांसाठी डॉक्टरांपेक्षा भगत व गावातल्या वैदूकडे उपचार करुन घेणे जास्त पसंत करत होते. त्यांची श्रध्दा देव, भगत व मांत्रिक अशा लोकांवर जास्त होती. देवाला बोललेल्या नवसाने व्यक्ती बरा होतो असा त्यांचा समज असल्याने उपचारांपेक्षा नवस, उपास – तापास या सर्वांकडे त्यांचा कल अधिक असायचा. त्यामुळे आरोग्या बाबतीत त्यांच्यात तितकीशी जागृती झालेली दिसत नाही. जागतिकीकरणाने आता त्यांच्यातील हा विचार बदलून टाकला. प्रामुख्याने शिक्षणाच्या प्रसार व प्रचारामुळे कोळी समाजातही अमुलाग्र बदल झाला. शिवाय या समाजातील काही जण वैद्यकीय क्षेत्रातही कार्यरत झाल्याने त्यांच्यात आरोग्यविषयक भीती दूर होऊन वैज्ञानिक दृष्टीकोन वृध्दींगत होण्यास मदतच झाली. आता स्त्रियांचे बाळंतपण सुईणींमार्फत घरी न करता मुख्यत्वे दवाखान्यात केले जाते. तसेच लहान – सहान आजारांपासून मोठ्या आजारांपर्यंत सर्व गोष्टींचे निदान व उपचार होण्यासाठी दवाखान्याची मदत घेतली जाते.

आगरी आणि कोळी या दोन्ही समाजातील आरोग्यविषयक जनजागृतीचा विचार केल्यास आरोग्य विषयक विविध तपासणी व सेवासुविधांचा लाभ घेण्यात आगरी समाज अग्रेसर असलेला दिसून येतो.

## ९) अंत्यसंस्कार

कोळी समाजातील अंत्यविधी आगरी समाजातील अंत्यविधीप्रमाणेच असतात. कोळी समाजात मयत झाल्यानंतर जवळच्या सर्व नातेवाईकांना कळविले जाते. त्याचवेळी घरातील स्त्रिया मोठमोठ्याने रडतात. मग आजूबाजूच्या स्त्रियाही येऊन आणखी मोठ्याने रडू लागतात. त्यांचे रडणे गीतात्मक व हेल काढून असते. मृत झालेल्या व्यक्तीच्या नावाचा व गुणांचा उल्लेख करून शक्य तितक्या मोठ्याने रडले जाते. हे रडणे कधी कधी नाटकी स्वरूपाचेही वाटते. प्रेताचे जळीत झाल्यानंतर त्यांची हाडे गोळा करून घरी आणली जातात. त्यानंतर आर्थिक कुवतीनुसार अस्थि विसर्जन केले जाते. प्रामुख्याने समुद्रात किंवा खाडीत अस्थिंचे विसर्जन करण्यास प्राधान्य दिले जाते. या समाजाची आर्थिक स्थिती फारशी चांगली नसल्याने मयताच्या तिसऱ्या दिवशी 'दिडक्या' काढण्याचा प्रघात आहे. म्हणजे मयताच्या घरी भेटायला गेल्यानंतर एका बशीत आपापल्या ऐपतीप्रमाणे पैसे टाकतात. या जमलेल्या पैशातून मृत व्यक्तीच्या अंत्यसंस्काराचा खर्च भागविण्याचा प्रयत्न केला जातो. यांच्या समाजात दुखवटा म्हणून पांढरी टोपी, टॉवेल व साडी घेतली जाते. त्यानंतर बाराव्या दिवशी पिडंदानाचा कार्यक्रम असतो. तो घरी किंवा स्मशानात केला जातो. या बारा दिवसाच्या आत अमावस्या आली तर दसपिंड करतात. वर्षाने वर्षश्राध्द घालतात. तेंव्हाही पिंडदानाचा कार्यक्रम असतो. शिवाय सर्वपित्री अमावस्येला ताटामध्ये मृत व्यक्तीला आवडणारे अधिकाधिक खाद्यपदार्थ करून त्यांना वाढले जातात. अकस्मीक मृत्यू झाल्यास जाग घातला जातो. (म्हणजे अचानक झालेल्या मृत्युचे कारण समजण्यासाठी किंवा इच्छापूर्तीसाठी मृत व्यक्तीच्या आत्माचे वीधीवत आवाहन करणे). त्यानुसार मृत व्यक्तीच्या इच्छा पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जातो. दिवसकार्यात लोकांना जेवण दिले जाते.

त्यावेळी प्रामुख्याने वृध्द व्यक्तींच्या स्मृतीप्रित्यर्थ जवळच्या नातेवाईकांकडून ताटात गोड पदार्थ ठेवला जातो.

जागतिकीकरणमुळे कोळी समाजातील अंत्यविधीत बरेच बदल झालेले दिसत नाहीत. मात्र शैक्षणिक विकासामुळे येथील लोकांची मनस्थिती बदलत चालली आहे. शिक्षित समाजात जोरजोरात रडणे, दुखवटा घेणे (म्हणजे दु:खाला वाटून घेण्यासाठी आर्थिक अथवा तत्सम मदत घेण) यांसारख्या पध्दती हळूहळू कमी होत चालल्या आहेत.

## ब. सांस्कृतिक परिवर्तन

ज्या प्रमाणे कोळी समाजात सामाजिक परिवर्तन घडून आले त्याचप्रमाणे त्यांच्यात सांस्कृतिक परिवर्तनही घडून आले. त्याचा आढावा पुढील मुद्द्यांच्या आधारे घेता येईल.

### १) पोशाख

कोळी समाजातील स्त्री पुरूषांचा पारंपरिक पेहराव वैशिष्ट्यपूर्ण व आकर्षक असा असायचा. कोळी पुरूष अंगात कोट किंवा बंडी घालायचे, कमरेच्या खाली त्रिकोण येईल अशा पध्दतीने लंगोट नेसायचे व डोक्याला लाल टोपी असायची कारण कोळ्यांचे जीवन रणरणत्या उन्हात भर समुद्रात व्यतीत होत असल्यामुळे अंगावर कमीतकमी कपडे आणि डोक्यावर उन्हापासून बचाव करण्यासाठी टोपी असा ओलसरपणापासून बचाव करणारा या समाजाचा पेहराव असायचा.[१४] स्त्रिया नऊवारी किंवा बारावारी साडीचा कसोटा मारून काष्टा पध्दतीची साडी नेसायच्या. कोपरापर्यंत लांब बाह्यांचे, बंद गळ्याचे व समोर गाठ मारता येईल असे ब्लाऊज घालायच्या तर मुली परकर पोलका असा पोषाख परिधान करायच्या. स्त्रिया साडी नेसतांना कमरेला दोन चार वेढे घ्यायच्या कारण त्यांना सतत डोक्यावर माशांच्या टोपल्यांच्या ओझ्यांची ने आण करावी लागत असे. शिवाय उन्हातही बराच काळ त्यांचा वावर असे. या पेहरावामुळे मान, कंबर व त्वचा यांची काळजी घेतली जाई.[१५]

आधुनिकीकरण व जागतिकीकरण यामुळे या समाजातील लोकांचा इतर समाजाशी अधिक संपर्क येवू लागला. यापूर्वी कोळी समाजातील पुरूष व्यवसायानिमित्त बराच काळ बाहेर समुद्रावर असायचे तर स्त्रिया मासळी विक्रीच्या निमित्ताने सतत त्यात गुंतलेल्या असायच्या त्यामुळे त्यांचे पारंपरिक पोषाख त्यांना अनुरूप होते. सद्यस्थितीत मासेमारीत त्यांच्या मुलांचा सहभाग कमी झाल्याने व इतर कारणास्तव ते आधुनिक पेहराव परिधान करतांना दिसतात. इतरांप्रमाणेच पुरूष शर्ट व पॅन्ट तर स्त्रिया ड्रेस व सहावारी साडी नेसतांना आढळतात. नवीन पिढीतील मुले तर अत्याधुनिक वस्त्रप्रावरणांना प्राधान्य देतात. मात्र आजही भडक रंग व उठावदार कपडे परिधान करणे ते पसंत करतात.

आगरी व कोळी समाजात पेहरावाबाबत झालेल्या बदलांचा अभ्यास करता आगरी समाजातील बदल अधिक आढळतात. आगरी समाजातील पारंपरिक पेहराव प्रामुख्याने खोंडा हा तर कालबाह्य झालाय. त्या तुलनेत कोळी समाजात आजही सण उत्सवाच्या निमित्ताने पारंपरिक पेहरावास पसंती दिली जाते. जागतिकीकरणाचा प्रभाव या बाबतीत आगरी समाजावर जास्त असलेला दिसतो.

**२) आहार**

भात, भाकरी व माशांचे कालवण हे कोळी समाजातील लोकांचे प्रमुख अन्न आहे. यात भाताला ते धान, भाकरीला रोटी व माशांच्या कालवणाला आंबट असे म्हणतात.[१६] मासेमारी हा त्यांचा प्रमुख व्यवसाय असल्याने त्यांच्या आहारात पूर्वी रोज ओल्या किंवा सुक्या मच्छीचा समावेश असायचाच. त्यानंतर काही प्रमाणात पालेभाज्या व कडधान्यही असायचे. मात्र सद्यस्थितीत यांचाही आहार काही प्रमाणात बदलेला आहे. कोळी समाजातही आता पारंपरिक पदार्थांपेक्षा दाक्षिणात्य व पाश्चिमात्य पदार्थांचा समावेश होऊ लागला आहे. प्रामुख्याने आधुनिक पिढीचा चायनीज पदार्थांकडे ओढा असलेला आढळतो. आधुनिकीकरणामुळे कोळी समाजातील लोकही इतरांप्रमाणे वैविध्यपूर्ण आहार

घेण्याचा प्रयत्न करतांना दिसतात. मात्र मसाला व तेलाचा सर्रास वापर हा त्यांचा आहारात आजही आढळतो. कोळी लोकांचे मासे हे प्रमुख अन्न असूनही उपवासाच्या वेळी ते मनापासून या गोष्टी वर्ज्य करतात. प्रामुख्याने सोमवार, मंगळवार, गुरूवार, शनिवार, एकादशी, संकष्टी या दिवशी ते मटण किंवा मच्छी खात नाहीत. परंतु बुधवार व रविवारी मात्र ते आवर्जून मच्छी मटणच खातात. सद्यस्थितीत या समाजातील काही लोकांनी वारकरी संप्रदायाचा अनुनय करुन मांसाहार वर्ज्य करून शाकाहार घेण्यास सुरूवात केलेली आहे. अशा प्रकारच्या आहार घेणाऱ्यांचे प्रमाण या समाजात दिवसेंदिवस वाढत आहे.[१७]

आगरी आणि कोळी समाजाच्या आहाराच्या पध्दतीतही बरेच साम्य असलेले आढळते. या दोन्ही समाजांमध्ये आहारातील नव्याने झालेले बदलही समानतेच्या पातळीवरच आढळतात. मांसाहारापेक्षा शाकाहाराला प्राधान्य, दही — दुधाचा वापर, पौष्टिक खाण्याकडे वाढता कल व इतर समाजांचे अनुकरण या गोष्टीत दोन्ही समाजातील परिवर्तन समान म्हणावे लागेल.

### ३) अलंकार

कोळी समाजातीला लोकांना दागिन्यांचे प्रचंड वेड असलेले दिसते. शिवाय या समाजातील लोकांना मासेमारी व्यवसायासाठी सतत घरापासून लांब रहावे लागत असल्याने जे काही अलंकार त्यांच्याकडे होते ते घरी ठेवणे धोक्याचे असल्याने ते त्यांना अंगावर घालणेच सोयिस्कर पडे.[१८] मात्र त्यांच्या या सवयीमुळे पूर्वीपासूनच समुद्राकिनारी राहणाऱ्या कोळी समाजाला सोनकोळी म्हटले गेले. या समाजातील स्त्रिया प्रामुख्याने सौभाग्यालंकार म्हणून पाच ते सात पदर असलेल्या काळ्या मण्यांची पोत मोठ्या सोन्याच्या डावेसह घालायच्या. हातात हातभरून बांगड्या व कानात गाठे (कानातले) घालायच्या. सद्यस्थितीत त्यांच्या अलंकारांमध्येही परिवर्तन झालेले दिसून येते. आर्थिक परिस्थितीनुरूप दागिन्यांची संख्या ठरवली जाते मात्र सोने परवडत नसेल तर सोन्याचा मुलामा दिलेले दागिने त्या वापरतात. मोठ्या आकाराचे व लांबी

रूंदीचे लफ्फेदार दागिने घालणे त्या पसंत करतात. काळ्या मण्यांची मोठी पोत व कानातील गाठे हे दागिने मात्र कालबाह्य ठरत चालले आहेत.

जागतिकीकरणाने आगरी आणि कोळी या दोन्ही समाजातीला लोकांच्या आर्थिक स्थितीवर परिणाम झाला. मात्र तरीही दागिन्यांचे आकर्षण या दोन्ही समाजाला विशेषत्वाने असलेले दिसून येते. सद्यस्थितीत या दोन्ही समाजातील लोक अत्याधुनिक अलंकारांना प्राधान्य देतांना दिसतात.

**४) खेळ**

कोळी समाज हा अत्यंत कष्टकरी समाज आहे त्यातही त्यांचा व्यवसाय मासेमारी असल्याने प्रत्येकवेळी त्यांना विविध खेळात सहभागी होणे शक्य होत नसे. तरी पत्ते खेळणे, बैलगाडीच्या शर्यतीत सहभागी होणे व होड्यांच्या स्पर्धांमध्ये भाग घेणे हे त्यांचे प्रमुख खेळ. यातही जागतिकीकरणामुळे बदल होत चाललेला आहे. आधुनिक पध्दतीचे खेळ म्हणजे टी. व्ही., मोबाईल, व्हिडीओ गेम यांसारख्या खेळांकडे या समाजातील मुले आकर्षित होऊ लागली आहेत. क्रिकेट, कुस्ती, कराटे व कबड्डी यातही त्यांचा सहभाग वाढला आहे. नवगाव येथील कु. समीक्षा किसन कटोर या मुलीने तर कुस्ती या क्रीडा प्रकारात राष्ट्र पातळी पर्यंत मजल मारली आहे.[१९]

अलिबाग तालुक्यातील आग्राव येथील कोळी समाजातर्फे (दर्यासारंग मित्रमंडळातर्फे) चैत्र शुध्द द्वितीयेला म्हणजेच गुढीपाडव्याच्या दुसऱ्या दिवशी शिडाच्या होड्यांच्या जंगी शर्यती भरविल्या जातात. या शर्यतींना सुमारे ३५-४० वर्षांची परंपरा आहे.[२०] सद्यस्थितीत या स्पर्धेला आधुनिकतेची जोड देऊन त्यास व्यावसायिक दर्जा देण्याचा प्रयत्न केला जातोय. शिवाय बैलगाड्यांच्या शर्यती व कबड्डी सारख्या स्पर्धेतून आपले कौशल्यही दाखविण्याचा ते प्रयत्न करतात.

आगरी व कोळी समाजाचा खेळ या बाबतीत तुलनात्मक अभ्यास केल्यास असे आढळते की आगरी समाज हा त्यांच्या परंपरागत खेळांना

आधुनिक स्वरूप देऊन स्वत:चा फायदा करून घेतांना दिसतो त्या तुलनेत कोळी समाज मागे आहे. हा समाज आजही खेळाकडे फक्त मनोरंजन म्हणूनच पाहतांना दिसतो.

## ५) यात्रा – जत्रा

जत्रेचे बाह्य स्वरुप गावागावानुसार बदलत असले तरी जत्रा भरण्याचा उद्देश सर्वसाधारणपणे एकच असतो तो म्हणजे देवदर्शन. वेगवेगळ्या ग्रामदेवता आणि क्षेत्रदेवतांच्या नावाने, संत आणि महात्म्यांच्या नावाने जत्रा भरवल्या जातात.[२१] आगरी समाजाप्रमाणे कोळी समाजामध्येही यात्रा व जत्रांना महत्त्वाचे स्थान आहे. हा समाज देवभोळा व श्रध्दाळू असल्याने तसेच सतत कष्टमय जीवन जगावे लागत असल्याने या यात्रा व जत्रांच्या माध्यमातून ते आपले मनोरंजन करून घ्यायचे. शिवाय जत्रेमध्ये सुक्या मच्छिचा व्यापार करणेही त्यांना सोईचे पडे.

कोळी समाजाचे जेजूरीचा खंडोबा व कार्ल्याची एकवीरा देवी हे प्रमुख दैवत आहे.[२२] त्यापैकी अलिबाग येथील कोळी समाज कार्ल्याला होणाऱ्या एकविरेच्या जत्रेमध्ये प्रामुख्याने सहभागी होतो. तसेच खंडोबा या त्यांच्या मानाच्या देवाच्याही नावाने यात्रांचे आयोजन केले जाते. यात प्रामुख्याने वरसोली गावातील खंडोबाच्या नावाने यात्रेचे आयोजन केले जाते. तसेच मानिभूते – संगमेश्वर – मुळे येथील खंडोबाच्या मंदिरात पौष महिन्याच्या दर रविवारी उत्सव होतो. यावेळी समस्त कोळी समाज आवर्जून उपस्थित असतो.[२३] शिवाय अलिबाग तालुक्यात होणाऱ्या विविध यात्रा व जत्रांमध्येही ते प्रामुख्याने सहभागी होतांना दिसतात. यात कनकेश्वर, नागेश्वर, नागाव, चौल व आवास येथील यात्रांना विशेष गर्दी आढळते. मागील प्रकरणात उल्लेख केल्याप्रमाणे रेवस मार्गावरील गावांमधील यात्रांमध्ये आजही केजाची पध्दत अस्तित्वात आहे. ह्या पध्दतीतील प्रमुख घटक कोळी समाजच आहे. कारण त्यांच्याकडील सुकविलेल्या मच्छीच्या बदल्यात इतर समाजातील लोक आपल्या वस्तुंची देवाणघेवाण करतात.

जागतिकीकरणाने अत्याधुनिक तंत्रज्ञान व यांत्रिकीकरण निर्माण झाल्याने जत्रा व यात्रांचे प्रमाणच कमी होत चालल्याने आगरी व कोळी या दोन्ही समाजावर याचा प्रभाव पडलेला दिसतो.

## ६) लग्नपध्दती

कोळी समाजात लग्नसोहळा अत्यंत आनंदाने व उत्साहाने साजरा केला जाई. लग्न सोहळा हा पाच दिवस चाले. त्यांच्या बऱ्याचशा पध्दती, चालीरीती ह्या आगरी समाजाप्रमाणेच आहेत. यांच्यातही धवले गाणारी धवलारीन असते. मोठ्या, अनुभवी व प्रतिष्ठीत माणसांच्या मध्यस्थीने सोयरीक जुळविली जाते. या समाजात देण्या घेण्याची (हुंडा) पध्दत नव्हती मात्र तरीही आवडीने देण्या घेण्याची पध्दत चालूच होती. शिवाय थाटामाटात लग्न करणे त्यांच्यालेखी अनिवार्य असल्याने त्यासाठी प्रसंगी कर्ज काढण्याचीही तयारी ते दर्शवितात. चून धुणे हा विधी या समाजात आवडीनुसार केला जातो. हळदीला मात्र जेवणात भाकरी, मोठे मासे किंवा सुक्या मच्छीचे कालवण व भरपूर दारू पाजण्याचा कार्यक्रम होतो. लग्नात दागदागिने, फुले व कपड्यांचा भरपूर वापर केला जातो. येथे प्रेमविवाहास मान्यता असलेली दिसते. परंतु आंतरधर्मीय विवाह या समाजाला अजिबात मान्य नाहीत. शिवाय लग्न करते वेळी सर्वप्रथम मामाच्या मुलीचा विचार केला जातो. प्रामुख्याने आपल्याच कोळीवाड्यात किंवा फार तर जवळच्या कोळीवाड्यात लग्न करण्याची पध्दती होती.[२४]

सद्यस्थितीत या लग्नपध्दतीत अमुलाग्र बदल झालेला आहे. आर्थिक सुबत्ता आल्याने त्याचे पडसाद या लग्न सोहळ्यात दिसतात. फटाक्यांची आतिषबाजी, बडेजाव व ढोलताशांच्या गजरात, प्रचंड प्रमाणात खर्च करून यांचे विवाह केले जातात. साखरपुडासुध्दा मोठ्या धुमधडाक्यात केला जातो. शिक्षित झालेली पिढी हे प्रघात बदलण्याचा प्रयत्न करतांना दिसतात. त्यातही ५ दिवस चालणारा लग्नसोहळा आता हळद व लग्न अशा दोन दिवसात उरकला जातो. तसेच नोकरीनिमित्त दूर राहणाऱ्या स्थळांसाठी, लांबची सोयरीक करण्यासही ते आता तयारी दर्शवितात.

एकंदरीत आगरी व कोळी समाजातील लग्नपध्दतीचा अभ्यास करतांना असे लक्षात आले की दोन्ही समाजात अनुकूल व प्रतिकूल असे दोन्ही प्रकारचे परिवर्तन होत आहे.

**७) बाजार**

कोळी समाजाच्या दृष्टीने आठवडा बाजार ही महत्त्वपूर्ण संकल्पना होती. सतत दैनंदिन मासे विक्रीच्या व्यवसायात गुंतलेले असल्याने त्यांना आवश्यक वस्तुंच्या खरेदीसाठी आठवडा बाजार उपयुक्त ठरायचा. त्यात ते स्वत:साठी खरेदी तर करायचेच शिवाय ताजी न संपलेली किंवा ठरवून सुकवलेली सुकी मच्छी विकण्यासाठी घेऊन यायचे. यासाठी अलिबाग तालुक्यातील पोयनाडचा आठवडा बाजार फार प्रसिध्द आहे. या बाजारात थळ, नवगाव पासून अनेक ठिकाणचे मच्छी विक्रेते मच्छी विकण्यास येतात. जागतिकीकरणामुळे याला सुध्दा आधुनिक स्वरूप प्राप्त झाले आहे.

**८) श्रध्दा – अंधश्रध्दा**

कोळी समाजाला आपल्या व्यवसायामुळे सतत समुद्राशी संपर्कात असावे लागते. त्यामुळे त्यांच्या जीवनात अनिश्चितता व अस्थैर्य निर्माण झाल्याने सर्वच देवतांचे या समाजात श्रध्देने पूजन केले जाते. कदाचीत त्यातूनच हा समाज थोड्या फार प्रमाणात अंधश्रध्दाळूही बनलेला आहे. देवीचा कोप, भुतबाधा, मूठ मारणे, करणी यांसारख्या गोष्टींवर त्यांचा अतूट विश्वास असलेला दिसतो. त्यामुळे कोणत्याही आजारपणात, शुभकार्यात प्रामुख्याने देवातांना खुश ठेवण्यासाठी पुजा विधी केले जातात. तसेच मनातील इच्छा फलश्रुत होण्यासाठी नवस व उपास — तापास केले जातात. त्यासाठी कोंबडे, बोकड, गुळ, फळे यांसारख्या वस्तू देवताला अर्पण केल्या जातात. प्रामुख्याने मुलगा होण्यासाठी केलेले नवस फेडण्याचे प्रमाण या समाजात अधिक आहेत. कोणत्याही कामानिमित्त रात्री अपरात्री व अमावस्येच्या दिवशी घराबाहेर रहावे लागल्यास भूतबाधा होऊ शकते असा या समाजाचा समज असल्याने मांत्रिकांमार्फत भूतबाधा दूर केली जाते. तसेच जादूटोण्यावरही या समाजाचा

प्रचंड विश्वास आहे. प्रामुख्याने अंगात येणे यावर या समाजाची श्रध्दा आहे. देवी स्वत: अंगात येऊन झालेल्या चुकीचे परिमार्जन करण्यास सांगते असा यांचा समज आहे. द्विधा मनस्थितीत निर्णय घेण्यासाठी कौल लावणे, भगत व मांत्रिकांची मदत घेणे याकडे त्यांचा कल असतो. प्रामुख्याने शितळादेवीकडे कौल (कळी) लावण्याचा प्रघात आहे. तसेच कोळी भगिनींची केळंबा देवीवरही फार श्रध्दा असल्याने दर मंगळवारी व शुक्रवारी तिच्या मंदिरात अनेक भाविक दर्शनासाठी येतात.[२५] या सर्वांसाठी त्यांचा अशिक्षितपणा कारणीभूत होता. जागतिकीकरणाने या समाजातील शिक्षणाचे प्रमाण वाढीस लागले. त्यातून यांच्यातील ह्या अंधश्रध्दांचे प्रमाण आता कमी होण्यास मदत झाली आहे.

आगरी व कोळी या दोन्ही समाजांपैकी कोळी समाजात तुलनेने आजही अंधश्रध्देचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून आले.

### क. आर्थिक परिवर्तन

ज्या प्रमाणे कोळी समाजात सामाजिक परिवर्तन घडून आले त्याचप्रमाणे त्यांच्यात सांस्कृतिक परिवर्तनही घडून आले. हे दोन्ही प्रकारचे परिवर्तन घडून येण्यासाठी त्यांच्यातील आर्थिक परिवर्तन प्रामुख्याने कारणीभूत ठरले. या आर्थिक परिवर्तनाचा आढावा पुढील प्रमाणे घेता येईल.

कोळी समाजाचा प्रमुख व्यवसाय मासेमारी असल्याने त्यांच्या आर्थिक परिवर्तनात या मत्यव्यवसायाची भूमिका महत्त्वाची आहे. समुद्र, नद्या, सरोवरे, तलाव आणि कृत्रिम जलाशयात माशांचे साठे निसर्गत: असतात. या साठ्यांमधून शक्य त्या साधनांनी मासे पकडणे ते टिकवणे विक्री करणे तसेच निर्यात करण्याच्या व्यवसायाला मत्स्यव्यवसाय असे म्हणतात.[२६] रायगड जिल्ह्यात शेती खालोखाल मच्छीमारीचा व्यवसाय चालतो. मत्स्यव्यवसाय हा मोठा दुय्यम व्यवसाय असून त्यातील मोरा — करंजा, अलिबाग, रेवदंडा, मुरूड आणि श्रीवर्धन हे पाच मासेमारी विभाग आहेत. त्यापैकी अलिबाग व रेवदंडा विभागात जिल्ह्यातील एकूण मासेमारी पैकी ६०टक्के मत्स्यव्यवसाय होतो.[२७] त्यामुळे याचा फायदा येथील कोळी समाजाला निश्चितच झालेला

आहे. भारतात ११२९ साली राजा सोमेश्वर यांनी मानसोल्लास हे पुस्तक लिहिले. त्यामध्ये मत्स्यविनोद या प्रकल्पात मासे पकडण्याविषयी माहिती दिली आहे.[२८] यावरूवन या व्यवसायाची प्राचीनता लक्षात येते.

आंतरराष्ट्रीय कायद्याप्रमाणे मासेमारी मचव्यावर काम करणारे सर्व लोक मच्छीमार म्हणून गणले जातात. मग तो कप्तान असो वा खलाशी असो वा मचव्यावर काम करणारे असोत. मच्छीमारी करणारे, जाळी दुरूस्त करणारे, पकडलेले मासे बाजारात नेणारे हे सर्व स्त्री पुरूष व त्यांचे कुटुंबीय मच्छीमारच होत.[२९] हाच मच्छीमार समाज प्रामुख्याने या मत्स्यव्यवसायात कार्यरत आहे.

कोळी समाजाच्या आर्थिक जडणघडणीत समुद्राइतकाच समुद्रकिनाराही महत्त्वाचा आहे. विशेष म्हणजे पुरुषाबरोबर कोळी समाजातील स्त्रियाही व्यवसाय करुन संसाराला हातभार लावतात.[३०] यात मासे पकडणे हे पुरुषाचे तर ते जहाजातून उतरविण्यापासून विकण्यापर्यंत स्त्रियांचे काम असते. त्यामुळे या व्यवसायाच्या माध्यमातून चांगले उत्पन्न या समाजाला मिळायचे. येथे प्रामुख्याने पारंपरिक पध्दतीनेच मासेमारी केली जायचबी मात्र जागतिकीकरणामुळे या व्यवसायांशी संबंधीत सर्व घटकांमध्ये विशेष परिवर्तन घडून आले. मच्छीमारी पध्दतीबाबत सांगायचे तर आता दोन पध्दती वापरल्या जातात.

**१) पारंपरिक पध्दतीची मच्छीमारी**

नौकेवर कोणत्याही यांत्रिक साधनाचा वापर न करता शिडाच्या व वल्ह्याच्या साहाय्याने केलेली मच्छीमारी.

**२) यांत्रिक पध्दतीने मच्छीमारी**

नौकेवर मच्छीमारीची आधुनिक अवजारे घेऊन त्या साधनांद्वारे (उदा. इंजिन यंत्राने ओढण्याची जाळी वायरलेस इको साउंडर इ.) केलेली मच्छीमारी.[३१]

या दोन्ही प्रकारच्या मासेमारीत नौका व जाळी महत्त्वाची असतात.

संपूर्ण किनारपट्टीवर वापरल्या जाणाऱ्या नौका वेगवेगळ्या तऱ्हेच्या असतात. त्यांचे वर्गिकरण चार प्रकारात केले जाते.

**१. पगार  २. होडी  ३. मचवा व गलबत  ४. यांत्रिक नौका**

या व्यतीरिक्त जाळ्यांच्या बाबतीत म्हणायचे तर महाराष्ट्राच्या ७२० कि. मी. लांबीच्या किनारपट्टीवर प्रामुख्याने पुढील साधनांच्या सहाय्याने मासे पकडले जातात.

**१. रांपण  २. डोल  ३. गिलनेट  ४. पर्ससीन  ५. गळ** [३२]

यापैकी अलिबाग मध्ये या सर्वांचाच वापर थोड्याफार प्रमाणात केला जातो. मच्छीमारांची परंपरागत जाळी शेवसुताची असत. परंतु त्या जाळ्यांचा टिकाऊपणा कमी असल्यामूळे त्या जाळ्यांऐवजी क्रमशः रासायनिक द्रव्यांचे म्हणजे टेरिलीनची सूतजाळी वापरण्यास मत्स्यव्यवसाय विभागाने मच्छीमारांना प्रोत्साहन दिले. कालांतराने टेरिलीनच सुताऐवजी रूढ झाले. अखेर सूत तयार करण्याचा उद्योगही मच्छीमारांच्या वाढत्या गरजा भागविण्यासाठी देशभर सुरू झाला.

याशिवाय पकडलेल्या माशांच्या विक्रीतून व त्यासाठी आवश्यक असणाऱ्या संबंधित घटकांतून निर्माण झालेल्या पुरक व्यवसायातूनही या समाजाला आर्थिक उत्पन्नाची साधने उपलब्ध झाली. यात प्रामुख्याने मासे टिकविण्यासाठी ज्या पध्दती आहेत जसे की,

१.मासे उन्हात सुकविणे किंवा वाळविणे.

२.खारविणे – अ) सुकी पध्दत ब) ओली पध्दत.

३.पिकलिंग.

४.धुरविणे.

५.गोठवणे, डबाबंद करणे (कॅनिंग), गोठवून सूकविणे, बर्फात ठेवणे.[३३]

अशा प्रकारे घरगुती व व्यावसायिक अशा दोन्ही स्तरावर सुरु झालेल्या या नौका, जाळी व इतर पुरक व्यवसायातूनही कोळी समाजाला

उत्पन्न मिळण्यास मदत होते. मात्र बऱ्याच वेळेला जरी विविध माध्यमातून त्यांना उत्पन्न मिळण्याच्या शक्यता असल्या तरी शिक्षणाचा अभाव, मासे विक्री व त्यानंरच्या कार्यातील पुरुषांची अनास्था, दलाल अथवा इतर संबंधीत व्यक्तींच्या हस्तक्षेपामुळे उत्पन्न चांगले मिळत असले तरी त्यातील काही ठरावीक व्यक्ती सोडल्यास अनेकांची आर्थिक स्थिती यथातथाच राहते असे म्हटल्यास वावगे ठरु नये.

या सर्वांचा विचार करुन मच्छीमार आर्थिकदृष्ट्यां दुर्बल असल्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी शासनानेही सहकारी संस्था स्थापण्यावर जोर दिला. स्वातंत्र्यापूर्वी अशा संस्था अस्तित्वात नव्हत्या. मासळीला भरपूर किंमत मिळून मासेमारीसाठी लागणाऱ्या गोष्टी अगदी स्वस्तात मिळाव्यात आणि दलाल, मध्यस्थांच्या शोषणातून मच्छीमारांची सुटका व्हावी या मूळ उद्देशानेच संबंधीत सहकारी संस्था स्थापन करण्यात येऊ लागली.[३४]

**❖ मच्छीमारी सहकारी सोसायटी**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० नुसार किमान २५ मच्छीमारांनी एकत्रित येऊन सभासदांना मच्छीमारीसाठी साहित्य पुरविण्याकरिता व मत्स्यउत्पादन वाढविण्याचा उद्देशाने स्थापन झालेली संस्था म्हणजे मच्छीमारी सहकार सोसायटी होय.[३५] इ. स. १९६१ —६२ च्या सुमारास अलिबाग तालुका सहकारी मच्छीमारी व विक्री संस्था उदयास आली. १९६४ मध्ये तिचेच जिल्हा मध्यवर्ती सहकारी मच्छीमारी व विक्री या संस्थेत रुपांतर झाले. यातून पुढे मच्छीमारी सहकार सोसायटीचे दोन प्रकार पडले.[३६]

- **सागरी मत्स्यव्यावसायिक सहकारी संस्था**
- **भूजल मत्स्यव्यावसायिक सहकारी संस्था**

यापैकी अलिबाग तालुक्यात कोळी समाजाच्या समस्या निवारणार्थ पुढील सागरी व भूजल मत्स्यव्यावसायिक सहकारी संस्थांची निर्मिती करण्यात आली.

- **सागरी मत्स्यव्यावसायिक सहकारी संस्था**

| | |
|---|---|
| १. अलिबाग मच्छीमार सहकारी संस्था मर्यादित | अलिबाग |
| २. आग्राव मच्छीमार सहकारी संस्था मर्यादित | आग्राव |
| ३. नवेदर नवगांव मच्छीमार सहकारी संस्था मर्यादित | नवेदर |
| ४. मल्हारी मार्तंड मच्छीमार सहकारी संस्था मर्यादित | बोडणी |
| ५. थळ मच्छीमार सहकारी संस्था मर्यादित | थळ |
| ६. थेरोंडा मच्छीमार सहकारी संस्था मर्यादित | थेरोंडा |
| ७. श्री मार्तंड मच्छीमार सहकारी संस्था मर्यादित | वरसोली |
| ८. नांदाईचा पाडा मच्छीमार सहकारी संस्था मर्यादित | नांदाईचा पाडा |
| ९. सासवणे मच्छीमार सहकारी संस्था मर्यादित | सासवणे |
| १०. नवनिर्माण मच्छीमार सहकारी संस्था मर्यादित | आग्राव |
| ११. सागर मच्छीमार सहकारी संस्था मर्यादित | बहिरीचा पाडा |
| १२. दर्यातरंग मच्छीमार सहकारी संस्था मर्यादित | चौल |
| १३. रेवदंडा मच्छीमार सहकारी संस्था मर्यादित | रेवदंडा |
| १४. सदिच्छा मच्छीमार सहकारी संस्था मर्यादित | काचळी |
| १५. श्री देवी मच्छीमार सहकारी संस्था मर्यादित | चिखली |
| १६. फणसापूर मच्छीमार सहकारी संस्था मर्यादित | फणसापूर |
| १७. साखर मच्छीमार सहकारी संस्था मर्यादित | साखर |
| १८. हनुमान मच्छीमार सहकारी संस्था मर्यादित | चाळमळा |
| १९. श्री गणेश मच्छीमार सहकारी संस्था मर्यादित | साखर |
| २०. रायगड जिल्हा महिला मच्छीमार सहकारी संस्था मर्यादित | अलिबाग |

- **भूजल मत्स्यव्यावसायिक सहकारी संस्था**

| | |
|---|---|
| १. एकविरा भूजल सहकारी संस्था मर्यादित | ढवर, कुरूळ. |
| २. करजाई माता सहकारी संस्था मर्यादित | तळकावीर. |
| ३. भुवनेश्वर सहकारी संस्था मर्यादित | हाशिवरे. |

४. सुडकोली सहकारी संस्था मर्यादित सुडकोली.

वरील सर्व सोसायट्यांकडून मच्छीमारांना खालील साहित्य प्रामुख्याने उपलब्ध करुन दिले जाते.[३७]

१. होडीसाठी लागणारे सर्व साहित्य.

२. विविध प्रकारची जाळी.

३. जाळी दुरूस्ती करीता आवश्यक असणारे सर्व प्रकारचे धागे व दोरखंड.

४. वॉटर पंप.

५. डिझेल व इंजिन ऑईल.

६. इंजिनचे सुटे भाग.

७. लुंगी, टॉवल, रूमाल व टोपी इ.

८. स्टोव्ह, कोयता, कुऱ्हाड, कंदिल.

या मदतीमुळे सर्वसामान्य मच्छीमारांना सुध्दा व्यवसायात आर्थिक यश मिळण्यास मदत होते. शिवाय जागतिकीकरणामुळे या समाजाचेही व्यवसाय बदलू लागले आहेत. आता ते पुढील दुय्यम व्यवसायाकडे आपले लक्ष केंद्रीत करू लागले आहेत.

**१. मोलमजूरी** **२. खाजगी नोकरी** **३. डेकोरेशन**

**४. गवंडी काम** **५. कुक्कुट पालन** **६. वाहक**

**७. गणपती व्यवसाय** **८.दुग्धव्यवसाय** **९. फोटोग्राफी**

यांसारख्या व्यवसायातूनही त्यांनी आपल्या अर्थाजनाची साधने वाढविली. मात्र असे असले तरी वेगवेगळ्या कारणांसाठी त्यांचा हा पैसा खर्च केला जात असल्याने त्याचा परिणाम त्यांच्या प्रतिकूल अर्थव्यवस्थेत परिवर्तित होतो.

थोडक्यात मत्स्योत्पादनात वाढ तसेच मच्छीमार समाजाची सामाजिक व आर्थिक उन्नती ही दुहेरी उदिद्ष्टये डोळ्यासमोर ठेवून आखलेल्या विविध योजनांमुळे मत्स्यव्यवसायाची व मच्छीमार समाजाची क्रमशः पण निश्चितपणे प्रगती होत गेली असली तरी याचे प्रमाण आगरी समाजाच्या तुलनेत निश्चितच

कमी आहे. प्रामुख्याने व्यवसायातून मिळणाऱ्या उत्पन्नाचा वापर स्वतःच्या प्रगतीसाठी करण्याचा कल आगरी समाजापेक्षा कोळी समाजात कमी असलेला दिसतो.

### ड. राजकीय परिवर्तन

अविरत कष्ट व अनिश्चित जीवन लाभलेला कोळी समाज हा त्यांच्या पारंपरिक व्यवसायामुळे प्रामुख्याने समुद्रकिनारी एकत्र राहतांना दिसतो. त्यांच्या एकत्रित वस्तीला कोळीवाडे अशी संज्ञा वापरली जाते. त्यांच्यात लग्नेही प्रामुख्याने आपापल्या कोळीवाड्यातच केली जात. मात्र तरीही हा समाज इतर सर्व गोष्टीसाठी संघटीत झालेला आढळत नाही. जागतिकीकरण्याच्या रेट्यात या समाजाला सतत आपल्या व्यवसायाशी अनुरुप अशा समस्यांना तोंड दयावे लागते आहे. मत्स्य दुष्काळ, डिझेलचे वाढते दर मच्छीमारीची महागडी साधने, विदेशी ट्रॉलर्सची अतिक्रमणे, राहत्या जागेचा प्रश्न, तिवरांची कत्तल अशा एक ना अनेक समस्याचे निराकरण करण्यासाठी या समाजाने एकत्र येऊन संघर्ष करणे अपेक्षित होते मात्र त्यासाठी संघटीत होणे अथवा उत्कृष्ट नेतृत्व लाभणे अशा गोष्टी या समाजाला लाभल्या नाहीत. त्यामुळे राजकीय क्षेत्रातही तशी त्यांची विशेष नावे आढळत नाहीत. अलिबाग तालुक्यातील फक्त श्री. ना. का. भगत या माजी स्वातंत्र्य सैनिकांनी कोळी समाजातील आमदार होण्याचा मान पटकावला मात्र तोही अल्पावधीसाठीच होता.[३८] त्यानंतर मात्र या समाजाचे नेतृत्व इतर समाजाच्या पुढाऱ्यांकडे गेलेले दिसते. अलिबाग तालुक्यात समान समस्या असणारे व आपल्या हक्कांसाठी मोठ्या प्रमाणावर संघर्ष करण्याऱ्या आगरी समाजाच्याच विविध संघर्षात सामिल होऊन कोळी समाजाने आपला सहभाग दर्शविला. यात मागील प्रकरणात उल्लेख केल्याप्रमाणे विविध संघर्षसमितींची माहिती देता येतील. त्यातही प्रामुख्याने पुढील नावे घेता येतील.

**०१. शहाबाज बचाव संघर्ष समिती**

**०२. चौदा गाव बचाव संघर्ष समिती**

**०३. नऊ गाव खारेपाट कृती समिती**

या संघर्ष समितींनी खार जमीन व बांध बंधिस्ती तसेच खाडी किनारे यांच्याशी संबंधित समस्यांना विरोध करण्यासाठी काम केले. त्यामुळे स्वत: कोळी समाजाने यात सहभाग घेऊन आपल्या हक्कांसाठी लढा दिला. कोळी समाज व समुद्रकिनारा यांचा अतूट संबंध आहे. भारताला लाभलेल्या मोठ्या किनाारपट्टीचा विचार करता माजी पंतप्रधान श्री इंदिरा गांधी यांनी सर्व राज्य सरकारांना सागरकिनारा क्षेत्रात विकास करतांना घ्यावयाची काळजी बाबत सूचना पाठविल्या. त्याला अनुसरून फेब्रुवारी १९९१ मध्ये भारत सरकारच्या पर्यावरण आणि वन मंत्रालयाने समुद्रकिनाऱ्यावरील विकास कामांवर देखरेख ठेवण्यासाठी पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ च्या अंतर्गत सागर किनारा नियमन क्षेत्र अधिसूचना जारी केली. हीच अधिसूचना इंग्रजीत सीआरझेड (C.R.Z.) या नावाने प्रचलित आहे. या अधिसूचनेनुसार सागरी लाटांच्या भरती रेषेपासून ५०० मीटर जमिनीच्या दिशेने भरतीचा प्रवाह आत शिरलेल्या खाडी, खाजण, नदीमुख आणि उपसागर क्षेत्रात भरती रेषेपासून १०० ते १५० मीटर क्षेत्रात विशिष्ट विकास कामांना प्रतिबंध करण्यात आलेला आहे. यात चार प्रकारची वर्गवारी करण्यात आली आहे.

**१. सागरकिनारा नियमन क्षेत्र १ —**

**पर्यावरण दृष्टया संवेदनशील आणि भरती — ओहोटी दरम्यानचे क्षेत्र**

**२. सागरकिनारा नियमन क्षेत्र २ — नागरी किंवा विकसित क्षेत्र.**

**३. सागरकिनारा नियमन क्षेत्र ३ —ग्रामीण क्षेत्र**

**४. सागरकिनारा नियमन क्षेत्र ४ — (अंदमान, निकोबार आणि लक्षद्वीप बेटे)**

या पैकी अलिबाग हे ग्रामीण क्षेत्र ३ मध्ये येते. या नियमानुसार समुद्राच्या उच्चतम भरती रेषेपासून जमिनीकडे ५०० मीटर एवढे क्षेत्र येते. हा झोन ग्रामीण विभागातील क्षेत्राला लागू करण्यात आला असून भरती रेषेपासून जमिनीकडील २०० मीटरचे क्षेत्र ना विकास क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले आहे. तसेच २०० ते ५०० मीटर क्षेत्रात काही बंधने स्वीकारून निर्देशित

केलेल्या काही कामांना परवानगी मिळू शकते. हे नियम करण्यामागचा मुळ हेतू पर्यावरणाचे संरक्षण असा आहे. या किनाऱ्याच्या भागात प्रामुख्याने खारफुटी म्हणजेच तिवरे म्हणजेच कांदळवन म्हणजेच मॅनग्रोव्ह या वनस्पतीची झाडे मोठ्या प्रमाणात आढळतात. समुद्रजीव, मासे, कासव यांच्या वाढीसाठी ही वनस्पती अत्यंत महत्त्वपूर्ण ठरते. शिवाय किनारा व जमिनीची धूप रोखणे, किनाऱ्यावरील लोकवस्तीचे संरक्षण करणे, समुद्रजीवांच्या नैसर्गिक संवर्धन व प्रजनन यासाठी ही वनस्पती महत्त्वाची भूमिका बजावते. त्यामुळे समुद्र पर्यायाने मासेमारी व्यवसायाशी संबंधीत सर्वांच्या दृष्टीने खारफुटीचे संरक्षण अत्यावश्यक ठरते परंतु आपल्या स्वार्थासाठी प्रामुख्याने समाजातील काही घटकांकडून सागरकिनारा नियमन क्षेत्र ३ —ग्रामीण क्षेत्र अंतर्गत येणाऱ्या नियमाची पायमल्ली केली जाते किंवा त्यातून पळवाटा शोधल्या जातात. अशा प्रकारे तिवरांच्या केल्या जाणाऱ्या बेसुमार कत्तलीचा दुष्परिणाम सर्वांनाच प्रामुख्याने आगरी आणि कोळी समाजाला भोगावा लागला. या विरूध्द सुध्दा वरील संघर्ष समितींमार्फत कार्य केले जात आहे.

याच बरोबरच या समाजातील काही व्यक्ती आता आरक्षणाद्वारे राजकीय पदावर रुजू होऊ लागल्या आहेत परंतु हे प्रमाण अत्यंत कमी आहे हे निश्चित. त्यातील काही नावे पुढील प्रमाणे

०१. श्री. फीडी रमेश कटोर — अध्यक्ष, कोळी समाज संघर्ष समिती.

०२. गौऱ्या विठ्ठल पावशे — चेअरमन, बोरेश्वर मच्छीमार सोसायटी नवगाव.

०३. अविनाश शिवा जैतू — सरपंच, नवगाव.

०४ तुकाराम गौऱ्या लडगे — पंचायत समिती सदस्य, नवगाव.

०५. देवयानी प्रदिप कटोर — पंचायत समिती सदस्य, नवगाव.

०६. हरिश्चंद्र लक्ष्मण कोळी — मामलेदार.

०७. हाशाराम रामा बडा — असिस्टंट कमिशनर.

०८. मनोहर नारायण भगत — मामलेदार.

०९. दिपीका दिनेश थळे — सरपंच, शहाबाज.

थोडक्यात असे म्हणता येईल की पारंपरिक व्यवसायामुळे हा समाज राजकारणापासून तसा लांब होता मात्र कोळी समाजाला मिळालेल्या आरक्षणामुळे या समाजातील मुले शिक्षण घेऊन विविध पदांवर काम करु लागली. त्यातून त्यांना शिक्षणाचे महत्त्व वाटून ते राजकीय स्तरावर ही पोहोचली मात्र नंतर काही ठरावीक उपजातींनाच शासनाने आरक्षणाचा मार्ग उपलब्ध करुन दिल्याने या समाजाची पुन्हा फरफट होऊ लागली. सद्यस्थितीत त्यांच्याकडे त्यांच्या जातीचे दाखले नसल्याने त्यांच्या नोकरी व पदांवर गंडांतर येत आहे. याचे उत्तम उदाहरण म्हणजे अलिबाग तालुक्यातील नवगाव नवेदर व बोडणी ही गावे. येथे आजही शासनाचे प्रतिनिधी म्हणून प्रशासकांमार्फत कामकाज चालवले जाते कारण येथे संपूर्ण कोळी समाज राहत असला तरी दाखल्या अभावी ते निवडणूका लढवू शकत नाही अथवा लढाविल्यास त्यांना जातपडताळणी नियमांतर्गत पायउतार व्हावे लागते. त्यामुळे स्वत:च्या जातीचे खंबीर व भक्कम असे राजकीय नेतृत्व न मिळाल्याने निश्चितच या समाजावर परिणाम होतो आहे.

आगरी आणि कोळी समाजामध्ये राजकीय नेतृत्वाचा तौलनिक अभ्यास केल्यास हे दिसून येते की आगरी समाजाच्या विकासामध्ये त्यांच्यामागे असलेले त्यांचे खंबीर नेतृत्व निश्चितच कारणीभूत ठरलेले आहे. त्या तुलनेत कोळी समाज प्रामुख्याने अलिबागमधील कोळी समाज बराच पिछाडीवर असलेला दिसतो. राजकीय नेतृत्व नसल्या कारणाने सामाजिक आर्थिक व सांस्कृतिक क्षेत्रावर परिणाम होतो.

थोडक्यात वरकरणी आर्थिकदृष्ट्यां कोळीसमाज हा श्रीमंत दिसत असला तरी त्याला मिळणाऱ्या उत्पन्नाला अनेक वाटा असल्याने ही श्रीमंती केवळ दिसण्याइतपतच असते. शिवाय त्यांच्या जातींच्या अनिश्चित आरक्षणामुळे विविध समस्या निर्माण होतात त्यामुळे सतत त्यांना त्या विविध समस्यांना सामोरे जावे लागते.

- **प्रश्नावलींचे सांख्यिकी विश्लेषण**

आगरी समाजातील विविध स्तरातील, वयोगटातील व विभागातील एकूण ९८० लोकांकडून भरुन घेतलेल्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक प्रश्नावलींच्या आधारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषण पुढील प्रमाणे —

- **सामाजिक प्रश्नावलीचे विश्लेषण**

**प्रश्न क्र. १ मला माझ्या घरात स्वतंत्र स्थान आहे.**

**कोष्टक क्र. ४४**

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| होय | ९८ | ५७ | ९९ | ९८ |
| नाही | ०१ | ०१ | ०१ | ०२ |
| एकूण | ९९ | ५८ | १०० | १०० |

१. ९९% पुरूष आणि ९८% स्त्रियांच्या मते त्यांना त्यांच्या घरात स्वतंत्र स्थान आहे.

२. ०१% पुरूष आणि ०२% स्त्रियांच्या मते त्यांना त्यांच्या घरात स्वतंत्र स्थान नाही.

**प्रश्न क्र. २ पारंपरिक सण व उत्सव साजरे करण्यास आवडते.**

**कोष्टक क्र. ४५**

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| होय | ९८ | ५८ | ९९ | १०० |
| नाही | ०१ | ०० | ०१ | ०० |
| एकूण | ९९ | ५८ | १०० | १०० |

१. ९९% पुरूष आणि १००% स्त्रियांना पारंपरिक सण व उत्सव साजरे करण्यास आवडतात.

२. १% पुरूषांना पारंपरिक सण व उत्सव साजरे करण्यास आवडत नाही.

**प्रश्न क्र.३ पारंपरिक रूढी किंवा परंपरा जतन करणे योग्य आहे.**

**कोष्टक क्र. ४६**

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| होय | ९४ | ५५ | ९५ | ९५ |
| नाही | ०५ | ०३ | ०५ | ०५ |
| एकूण | ९९ | ५८ | १०० | १०० |

१. ९५% पुरूष आणि ९५% स्त्रियांच्या मते पारंपरिक रूढी किंवा परंपरा जतन करणे योग्य आहे.

२. ०५% पुरूष आणि ०५% स्त्रियांच्या मते पारंपरिक रूढी किंवा परंपरा जतन करणे योग्य नाही.

**प्रश्न क्र.४ माझ्या मते गेल्या २० वर्षापासून माझ्या समाजात बरेच बदल झाले आहेत.**

**कोष्टक क्र. ४७**

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| होय | ९७ | ५३ | ९७ | ९१ |
| नाही | ०३ | ०८ | ०२ | ०८ |
| एकूण | ९९ | ५८ | १०० | १०० |

१. ९७% पुरूष आणि ९१% स्त्रियांच्या मते गेल्या २० वर्षांपासून त्यांच्या समाजात बरेच बदल झालेले आहेत.

२. ०२% पुरूष आणि ०८% स्त्रियांच्या मते गेल्या २० वर्षांपासून त्यांच्या समाजात बरेच बदल झालेले नाहीत.

**प्रश्न क्र.५ दळणवळणाच्या वाढत्या सोयींमुळे माझे जीवन गतीमान बनले आहे.**

**कोष्टक क्र. ४८**

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| होय | ९६ | ५२ | ९७ | ९० |
| नाही | ०४ | ०६ | ०४ | १० |
| एकूण | ९९ | ५८ | १०० | १०० |

१. ९७% पुरूष आणि ९०% स्त्रियांच्या मते दळणवळणाच्या वाढत्या सोयींमुळे त्यांचे जीवन गतीमान बनले आहे.

२. ०४% पुरूष आणि १०% स्त्रियांच्या मते दळणवळणाच्या वाढत्या सोयींमुळे त्यांचे जीवन गतीमान बनले नाही.

**प्रश्न क्र.६ इलेक्ट्रॉनिक्स् साधने वापरल्याने वेळेची बचत होते.**

**कोष्टक क्र. ४९**

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| होय | ९४ | ५६ | ९५ | ९७ |
| नाही | ०५ | ०२ | ०५ | ०३ |
| एकूण | ९९ | ५८ | १०० | १०० |

१. ९५% पुरूष आणि ९७% स्त्रियांच्या मते इलेक्ट्रॉनिक्स साधने वापरल्याने वेळेची बचत होते.

२. ०५% पुरूष आणि ०३% स्त्रियांच्या मते इलेक्ट्रॉनिक्स साधने वापरल्याने वेळेची बचत होत नाही.

**प्रश्न क्र.७ माझ्या मते पुरूषांप्रमाणे स्त्रीलाही घरात बरोबरीचे स्थान असावे.**

**कोष्टक क्र. ५०**

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| होय | ९८ | ५४ | ९९ | ९३ |
| नाही | ०१ | ०४ | ०१ | ०७ |
| एकूण | ९९ | ५८ | १०० | १०० |

१. ९९% पुरूष आणि ९३% स्त्रियांच्या मते पुरूषांप्रमाणे स्त्रीलाही घरात बरोबरीचे स्थान असावे.

२. ०१% पुरूषांच्या मते आणि ०७% स्त्रियांच्या मते पुरूषांप्रमाणे स्त्रीलाही घरात बरोबरीचे स्थान नसावे.

**प्रश्न क्र.८ माझ्या आहारामध्ये शक्यतो पारंपरिक पदार्थांचाच समावेश असतो.**

**कोष्टक क्र. ५१**

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| होय | ८६ | ५३ | ८७ | ९१ |
| नाही | १३ | ०५ | १३ | ०९ |
| एकूण | ९९ | ५८ | १०० | १०० |

१. ८७% पुरूष आणि ९१% स्त्रियांच्या मते त्यांच्या आहारामध्ये शक्यतो पारंपरिक पदार्थांचाच समावेश असतो.

२. १३% पुरूष आणि ०९% स्त्रियांच्या मते त्यांच्या आहारामध्ये शक्यतो पारंपरिक पदार्थांचाच समावेश नसतो.

**प्रश्न क्र.९ मी माझ्या बोलीभाषेचा वापर व्यवहारात करतो.**

**कोष्टक क्र. ५२**

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| होय | ८८ | ४५ | ८९ | ७८ |
| नाही | ११ | १३ | ११ | २२ |
| एकूण | ९९ | ५८ | १०० | १०० |

१. ८९% पुरूष आणि ७८% स्त्रियांच्या मते ते त्यांच्या बोलीभाषेचा वापर व्यवहारात करतात.

२. ११% पुरूष आणि २२% स्त्रियांच्या मते ते त्यांच्या बोलीभाषेचा वापर व्यवहारात करत नाहीत.

**प्रश्न क्र.१० मला माझी बोलीभाषा चांगली बोलता येते.**

**कोष्टक क्र. ५३**

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| होय | ९८ | ५७ | ९९ | ९८ |
| नाही | ०१ | ०१ | ०१ | ०१ |
| एकूण | ९९ | ५८ | १०० | १०० |

१. ९९% पुरूष आणि ९८% स्त्रियांच्या मते त्यांना त्यांची बोलीभाषा चांगली बोलता येते.

२. ०१% पुरूष आणि ०१% स्त्रियांच्या मते त्यांना त्यांची बोलीभाषा चांगली बोलता येत नाही.

**प्रश्न क्र.११ समाजातील बदलानुरूप माझ्या पालकांनी त्यांच्या विचारसरणीत बदल करावा असे मला वाटते.**

**कोष्टक क्र. ५४**

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| होय | ८६ | ४८ | ८७ | ८३ |
| नाही | १३ | १० | १३ | १७ |
| एकूण | ९९ | ५८ | १०० | १०० |

१. ८७% पुरूष आणि ८३% स्त्रियांच्या मते समाजातील बदलानुरूप त्यांच्या पालकांनी त्यांच्या विचारसरणीत बदल करावा असे त्यांना वाटते.

२. १३% पुरूष आणि १७% स्त्रियांच्या मते समाजातील बदलानुरूप त्यांच्या पालकांनी त्यांच्या विचारसरणीत बदल करावा असे त्यांना वाटत नाही.

**प्रश्न क्र.१२ समाजबदल म्हणजे पेहरावात बदल यास मी सहमत आहे.**

**कोष्टक क्र. ५५**

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| होय | ६३ | ३५ | ६४ | ६० |
| नाही | ३६ | २३ | ३६ | ४० |
| एकूण | ९९ | ५८ | १०० | १०० |

१. ६४% पुरूष आणि ६०% स्त्रियांच्या मते समाज बदल म्हणजे पेहरावात बदल यास ते सहमत आहेत.

२. ३६% पुरूष आणि ४०% स्त्रियांच्या मते समाज बदल म्हणले पेहरावात बदल यास ते सहमत नाहीत.

**प्रश्न क्र.१३ परप्रांतिय किंवा इतर समाजाचे अनुकरण आमच्याकडे लग्नविधीत केले जातात.**

**कोष्टक क्र. ५६**

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| होय | ४६ | १४ | ६४ | १४ |
| नाही | ५३ | ४४ | ५३ | ४४ |
| एकूण | ९९ | ५८ | १०० | १०० |

१. ६४% पुरूष आणि १% स्त्रियांच्या मते परप्रांतीय किंवा इतर समाजाचे अनुकरण त्यांच्याकडे लग्नविधीत केले जातात.

२. ५३% पुरूष आणि ४४% स्त्रियांच्या मते परप्रांतीय किंवा इतर समाजाचे अनुकरण त्यांच्याकडे लग्नविधीत केले जात नाहीत.

**प्रश्न क्र. १४ सद्यस्थितीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर अपरिहार्य वाटतो.**

**कोष्टक क्र. ५७**

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| होय | ७४ | ४९ | ४५ | ८४ |
| नाही | २५ | ०९ | २५ | १६ |
| एकूण | ९९ | ५८ | १०० | १०० |

१. ४५% पुरूष आणि ८४% स्त्रियांच्या मते सद्यस्थितीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर अपरीहार्य वाटतो.

२. २५% पुरूष आणि १६% स्त्रियांच्या मते सद्यस्थितीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर अपरीहार्य वाटत नाही.

**प्रश्न क्र. १५ समाज मंदिरामध्ये जाणे हे माझ्या समाजात अनिवार्य आहे.**

**कोष्टक क्र. ५८**

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| होय | ४९ | १९ | ७५ | ३३ |
| नाही | ५० | ३९ | ५० | ६७ |
| एकूण | ९९ | ५८ | १०० | १०० |

१. ७५% पुरूष आणि ३३% स्त्रियांच्या मते समाज मंदिरामध्ये जाणे हे त्यांच्या समाजात अनिवार्य आहे.

२. ५०% पुरूष आणि ६७% स्त्रियांच्या मते समाज मंदिरामध्ये जाणे हे त्यांच्या समाजात अनिवार्य नाही.

**प्रश्न क्र.१६ समाज विकासाठी सामाजिक संघटना महत्त्वाची भूमिका बजावतात.**

**कोष्टक क्र. ५९**

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| होय | ८८ | ५४ | ४९ | ९३ |
| नाही | ११ | ०४ | ११ | ०७ |
| एकूण | ९९ | ५८ | १०० | १०० |

१. ४९% पुरूष आणि ९३% स्त्रियांच्या मते समाज विकासाठी सामाजिक संघटना महत्त्वाची भूमिका बजावतात.

२. ११% पुरूष आणि ०७% स्त्रियांच्या मते समाज विकासासाठी सामाजिक संघटना महत्त्वाची भूमिका बाजावत नाहीत.

**प्रश्न क्र.१७ जागतिकीकरणामुळे राहणीमानाचा दर्जा सुधारला असे मला वाटते.**

**कोष्टक क्र. ६०**

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| होय | ९३ | ५४ | ९४ | ९३ |
| नाही | ०६ | ०४ | ०६ | ०७ |
| एकूण | ९९ | ५८ | १०० | १०० |

१. ९४% पुरूष आणि ९३% स्त्रियांच्या मते जागतिकीकरणामुळे राहणीमानाचा दर्जा सुधारला असे त्यांना वाटते.

२. ०६% पुरूष आणि ०७% स्त्रियांच्या मते जागतिकीकरणामुळे राहणीमानाचा दर्जा सुधारला असे त्यांना वाटत नाही.

**प्रश्न क्र.१८ माझ्या मते इतर समाजाच्या तुलनेत माझा समाज कमी प्रगत आहे.**

**कोष्टक क्र. ६१**

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| होय | ५७ | ३२ | ५८ | ५५ |
| नाही | ४२ | ४६ | ४२ | ४५ |
| एकूण | ९९ | ५८ | १०० | १०० |

१. ५८% पुरूष आणि ५५% स्त्रियांच्या मते इतर समाजाच्या तुलनेत त्यांचा समाज कमी प्रगत आहे.

२. ४२% पुरूष आणि ४५% स्त्रियांच्या मते इतर समाजाच्या तुलनेत त्यांचा समाज कमी प्रगत नाही.

- **आर्थिक प्रश्नावलीचे विश्लेषण**

**प्रश्न क्र. १ माझा पारंपरिक व्यवसाय मासेमारी आहे.**

**कोष्टक क्र. ६२**

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्रिया | पुरूष | स्त्रिया |
| होय | ८७ | ३५ | ९४ | ९५ |
| नाही | ०६ | ०२ | ०६ | ०५ |
| एकूण | ९३ | ३७ | १०० | १०० |

१. ९४% पुरूष व ९५% स्त्रियांच्या मते त्यांचा पारंपरिक व्यवसाय मासेमारी आहे.

२. ०६% पुरूष व ०५% स्त्रियांच्या मते त्यांचा पारंपरिक व्यवसाय मासेमारी नाही.

**प्रश्न क्र. २ मी करीत असलेला व्यवसाय वडिलोपार्जित आहे.**

**कोष्टक क्र. ६३**

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्रिया | पुरूष | स्त्रिया |
| होय | ७५ | ३१ | ८१ | ९४ |
| नाही | १८ | ०६ | १९ | ०६ |
| एकूण | ९३ | ३७ | १०० | १०० |

१. ८१% पुरूष व ९४% स्त्रियांच्या मते त्यांचा व्यवसाय वडीलोपार्जित आहे.

२.१९%पुरूष व ०६% स्त्रियांच्या मते त्यांचा व्यवसाय वडीलोपार्जित नाही.

**प्रश्न क्र. ३ सेझ प्रकरणाचा फायदा प्रत्येक शेतकऱ्याला होईल.**

**कोष्टक क्र. ६४**

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्रिया | पुरूष | स्त्रिया |
| होय | ५९ | ३२ | ६३ | ८६ |
| नाही | ३४ | ०५ | ३७ | १४ |
| एकूण | ९३ | ३७ | १०० | १०० |

१. ६३% पुरूष व ८६% स्त्रियांच्या मते सेझ प्रकरणाचा फायदा प्रत्येक शेतकऱ्याला होईल.

२. ३७% पुरूष व १४% स्त्रियांच्या मते सेझ प्रकरणाचा फायदा प्रत्येक शेतकऱ्याला होणार नाही.

**प्रश्न क्र. ४ माझ्या मते परंपरागत चालत आलेला व्यवसाय नवीन नोकरीपेक्षा योग्य आहे.**

**कोष्टक क्र. ६५**

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्रिया | पुरूष | स्त्रिया |
| होय | ४३ | ०७ | ४६ | १९ |
| नाही | ५० | ३० | ५४ | ८१ |
| एकूण | ९३ | ३७ | १०० | १०० |

१. ४६% पुरूष व १९% स्त्रियांच्या मते परंपरागत चालत आलेला व्यवसाय नवीन नोकरीपेक्षा योग्य आहे.

२. ५४% पुरूष व ८१% स्त्रियांच्या मते परंपरागत चालत आलेला व्यवसाय नवीन नोकरीपेक्षा योग्य नाही.

**प्रश्न क्र. ५ शेती विकणे सद्यस्थितीत आत्यंतिक गरजेचे आहे.**

**कोष्टक क्र. ६६**

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्रिया | पुरूष | स्त्रिया |
| होय | ४७ | ३० | ५० | ८१ |
| नाही | ४६ | ०७ | ५० | १९ |
| एकूण | ९३ | ३७ | १०० | १०० |

१. ५०% पुरूष व ८१% स्त्रियांच्या मते शेती विकणे सद्यस्थितीत आत्यंतिक गरजेचे आहे

२. ५०% पुरूष व १९% स्त्रियांच्या मते शेती विकणे सद्यस्थितीत आत्यंतिक गरजेचे नाही.

**प्रश्न क्र. ६ माझ्या मते भविष्यकाळात बचत करणे खूप गरजेचे आहे.**

**कोष्टक क्र. ६७**

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्रिया | पुरूष | स्त्रिया |
| होय | ८८ | ३५ | ९४ | ९५ |
| नाही | ०५ | ०२ | ०६ | ०५ |
| एकूण | ९३ | ३७ | १०० | १०० |

१. ९४% पुरूष व ९५% स्त्रियांच्या मते भविष्य काळात बचत करणे खूप गरजेचे आहे.

२. ६% पुरूष व ५% स्त्रियांच्या मते भविष्य काळात बचत करणे खूप गरजेचे नाही.

**प्रश्न क्र. ७ मी माझी व माझ्या मुलांची पॉलीसी काढली आहे.**

**कोष्टक क्र. ६८**

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्रिया | पुरूष | स्त्रिया |
| होय | ७६ | २९ | ८२ | ७८ |
| नाही | १७ | ०८ | १८ | २२ |
| एकूण | ९३ | ३७ | १०० | १०० |

१. ८२% पुरूष व ७८% स्त्रियांनी त्यांची व त्यांच्या मुलांची पॉलीसी काढली आहे.

२. १८% पुरूष व २२% स्त्रियांनी त्यांची व त्यांच्या मुलांची पॉलीसी काढली नाही.

**प्रश्न क्र. ८ स्त्रियांनी घराच्या आर्थिक हातभारास मदत करण्यास काहीही हरकत नाही.**

**कोष्टक क्र. ६९**

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्रिया | पुरूष | स्त्रिया |
| होय | ८९ | ३४ | ९६ | ९२ |
| नाही | ०४ | ०३ | ०४ | ०८ |
| एकूण | ९३ | ३७ | १०० | १०० |

१. ९६% पुरूष व ९२% स्त्रियांच्या मते स्त्रियांनी घराच्या आर्थिक हातभारास मदत करण्यास काहीही हरकत नाही.

२. ४% पुरूष व ८% स्त्रियांच्या मते स्त्रियांनी घराच्या आर्थिक हातभारास मदत करू नये.

**प्रश्न क्र. ९ व्यवसायात फायदा व्हावा यासाठी मी सतत प्रयत्नशील असतो.**

**कोष्टक क्र. ७०**

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्रिया | पुरूष | स्त्रिया |
| होय | ८९ | ३७ | ९६ | १०० |
| नाही | ०४ | ० | ०४ | ० |
| एकूण | ९३ | ३७ | १०० | १०० |

१. ९६% पुरूष व १००% स्त्रियांच्या मते व्यवसायात फायदा व्हावा यासाठी ते सतत प्रयत्नशील असतात.

२. ४% पुरूषांच्या मते व्यवसायात फायदा व्हावा यासाठी ते प्रयत्नशील नसतात.

**प्रश्न क्र. १० माझ्या मते लग्न, पूजा, सण, उत्सव यासाठी होणार खर्च पूर्वीच्या तुलनेत आता जास्त आहे.**

**कोष्टक क्र. ७१**

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्रिया | पुरूष | स्त्रिया |
| होय | ९० | ३७ | ९७ | ९७ |
| नाही | ०३ | ०१ | ०३ | ०३ |
| एकूण | ९३ | ३७ | १०० | १०० |

१. ९७% पुरूष व ९७% स्त्रियांच्या मते लग्न, पुजा, सण, उत्सव यासाठी होणार खर्च पूर्वीच्या तुलनेत आता जास्त आहे.

२. ३% पुरूषांच्या व ३% स्त्रियांच्या मते लग्न, पूजा, सण, उत्सव यासाठी होणार खर्च पूर्वीच्या तुलनेत आता जास्त नाही.

**प्रश्न क्र. ११ माझ्या मते नोकरीपेक्षा व्यवसायातून अधिक पैसा कमवू शकतो.**

**कोष्टक क्र. ७२**

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्रिया | पुरूष | स्त्रिया |
| होय | ८३ | ३५ | ८९ | ९५ |
| नाही | १० | ०२ | ११ | ०५ |
| एकूण | ९३ | ३७ | १०० | १०० |

१. ८९% पुरूष व ९५% स्त्रियांच्या मते नोकरीपेक्षा व्यवसायातून अधिक पैसा कमवू शकतो.

२.११% पुरूष व ५% स्त्रियांच्या मते नोकरीपेक्षा व्यवसायातून अधिक पैसा कमवू शकत नाही.

**प्रश्न क्र. १२ आर्थिक सुबत्तेमुळे समाजाची प्रगती होण्यास मदत होते.**

**कोष्टक क्र. ७३**

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्रिया | पुरूष | स्त्रिया |
| होय | ८० | ३१ | ८६ | ९४ |
| नाही | १३ | ०६ | १४ | ०६ |
| एकूण | ९३ | ३७ | १०० | १०० |

१. ८६% पुरूष व ९४% स्त्रियांच्या मते आर्थिक सुबत्तेमुळे समाजाची प्रगती होण्यास मदत होते.

२.१४% पुरूष व ६% स्त्रियांच्या मते आर्थिक सुबत्तेमुळे समाजाची प्रगती होण्यास मदत होत नाही.

**प्रश्न क्र. १३ माझ्या मते समाजाचा आर्थिक स्तर वाढविण्यासाठी स्वत: आर्थिक दृष्ट्या सुबत्त असणे आवश्यक आहे.**

**कोष्टक क्र. ७४**

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्रिया | पुरूष | स्त्रिया |
| होय | ७९ | ३३ | ८५ | ८९ |
| नाही | १४ | ०४ | १५ | ११ |
| एकूण | ९३ | ३७ | १०० | १०० |

१. ८५% पुरूष व ८९% स्त्रियांच्या मते समाजाचा आर्थिक स्तर वाढविण्यासाठी स्वत: आर्थिकदृष्ट्यां सुबत्त असणे आवश्यक आहे.

२.१५% पुरूष व ११% स्त्रियांच्या मते समाजाचा आर्थिक स्तर वाढविण्यासाठी स्वत: आर्थिकदृष्ट्यां सुबत्त असणे आवश्यक नाही.

**प्रश्न क्र. १४ जागतिकीकरणामुळे व्यवसायवृध्दी होण्यास मदत झाली.**

**कोष्टक क्र. ७५**

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्रिया | पुरूष | स्त्रिया |
| होय | ८१ | ३२ | ८७ | ८६ |
| नाही | १२ | ०५ | १३ | १४ |
| एकूण | ९३ | ३७ | १०० | १०० |

१. ८७% पुरूष व ८६% स्त्रियांच्या मते जागतिकीकरणामुळे व्यवसायवृध्दी होण्यास मदत झाली.

२. १३% पुरूष व १४% स्त्रियांच्या मते जागतिकीकरणामुळे व्यवसायवृध्दी होण्यास मदत झाली नाही.

**प्रश्न क्र. १५ इतर समाजाशी तुल्यबळ होण्यासाठी आर्थिक वृध्दी गरजेची आहे.**

**कोष्टक क्र. ७६**

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्रिया | पुरूष | स्त्रिया |
| होय | ७४ | ३३ | ८० | ८९ |
| नाही | १९ | ०४ | २० | ११ |
| एकूण | ९३ | ३७ | १०० | १०० |

१. ८०% पुरूष व ८९% स्त्रियांच्या मते इतर समाजाशी तुल्यबळ होण्यासाठी आर्थिक वृध्दी गरजेची आहे.

२. २०% पुरूष व ११% स्त्रियांच्या मते इतर समाजाशी तुल्यबळ होण्यासाठी आर्थिक वृध्दी गरजेची नाही.

- **शैक्षणिक प्रश्नावलीचे विश्लेषण**

**प्रश्न क्र. १ समाजामध्ये स्वत:चे स्थान निर्माण करण्यासाठी शिक्षण पैशापेक्षा अधिक महत्त्वाचे आहे.**

**कोष्टक क्र. ७७**

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| होय | १११ | २४ | ९७ | ९२ |
| नाही | ०४ | ०२ | ०३ | ०८ |
| एकूण | ११५ | २६ | १०० | १०० |

१. ९७% पुरूष आणि ९२% स्त्रियांच्या मते समाजामध्ये स्वत:चे स्थान निर्माण करण्यासाठी शिक्षण पैशापेक्षा अधिक महत्त्वाचे आहे.

२. ०३% पुरूष आणि ०८% स्त्रियांच्या मते समाजामध्ये स्वत:चे स्थान निर्माण करण्यासाठी शिक्षण पैशापेक्षा अधिक महत्त्वाचे नाही

**प्रश्न क्र. २ उच्च शिक्षण घेऊन परंपरागत व्यवसाय टाळणे आजच्या काळात योग्य आहे असे मला वाटते.**

**कोष्टक क्र. ७८**

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| होय | ०१ | ०९ | ०१ | ३५ |
| नाही | ११४ | १७ | ९९ | ६५ |
| एकूण | ११५ | २६ | १०० | १०० |

१. ९९% पुरूष आणि ६५% स्त्रियांच्या मते उच्च शिक्षण घेऊन परंपरागत व्यवसाय टाळणे आजच्या काळात योग्य आहे असे त्यांना वाटत नाही.

२. ०१% पुरूष आणि ३५% स्त्रियांच्या मते उच्च शिक्षण घेऊन परंपरागत व्यवसाय टाळणे आजच्या काळात योग्य आहे असे त्यांना वाटते.

**प्रश्न क्र.३ इतर समाजाच्या तुलनेत माझ्या समाजातील मुले अधिक शिक्षण घेतात.**

**कोष्टक क्र. ७९**

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| होय | ११० | १८ | ९६ | ६९ |
| नाही | ०५ | ०८ | ०४ | ३१ |
| एकूण | ११५ | २६ | १०० | १०० |

१. ९६% पुरूष आणि ६९% स्त्रियांच्या मते इतर समाजाच्या तुलनेत त्यांच्या समाजातील मुले अधिक शिक्षण घेतात.

२. ०४% पुरूष आणि ३१% स्त्रियांच्या मते इतर समाजाच्या तुलनेत त्यांच्या समाजातील मुले अधिक शिक्षण घेतात.

**प्रश्न क्र. ४ माझ्या मते मुलींच्या शिक्षणाने समाज विकासास वेग येईल.**

**कोष्टक क्र. ८०**

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| होय | ११३ | १२ | ९८ | ५८ |
| नाही | ०५ | ११ | ०२ | ४२ |
| एकूण | ११५ | २६ | १०० | १०० |

१. ९८% पुरूष आणि ५८% स्त्रियांच्या मते मुलींच्या शिक्षणाने समाज विकासास वेग येईल.

२. २% पुरूष आणि ४२% स्त्रियांच्या मते मुलींच्या शिक्षणाने समाज विकासास वेग येणार नाही.

**प्रश्न क्र. ५ स्त्रियांनी उच्चशिक्षणासाठी बाहेर जाण्यास हरकत नाही असे मला वाटते.**

**कोष्टक क्र. ८१**

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| होय | ११२ | २१ | ९७ | ८१ |
| नाही | ०३ | ०५ | ०३ | १९ |
| एकूण | ११५ | २६ | १०० | १०० |

१. ९७% पुरूष आणि ८१% स्त्रियांच्या मते स्त्रियांनी उच्च शिक्षणासाठी बाहेर जाण्यास हरकत नाही असे त्यांना वाटते.

२. ३% पुरूष आणि १९% स्त्रियांच्या मते स्त्रियांनी उच्च शिक्षणासाठी बाहेर जाऊ नये असे त्यांना वाटते.

**प्रश्न क्र. ६ शैक्षणिक बदल हा समाजबदलाचा पायाभूत घटक आहे.**

**कोष्टक क्र. ८२**

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| होय | ११३ | १७ | ९८ | ६५ |
| नाही | ०२ | ०९ | ०२ | ३५ |
| एकूण | ११५ | २६ | १०० | १०० |

१. ९८% पुरूष अणि ६५% स्त्रियांच्या मते शैक्षणिक बदल हा समाजबदलाचा पायाभूत घटक आहे.

२. ०२% पुरूष आणि ३५% स्त्रियांच्या मते शैक्षणिक बदल हा समाजबदलाचा पायाभूत घटक नाही.

**प्रश्न क्र.७ पूर्वीच्या तुलनेत सद्यस्थितीत माझ्या समाजातील शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे.**

**कोष्टक क्र. ८३**

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| होय | ११२ | २६ | ९७ | १०० |
| नाही | ०३ | ० | ०३ | ० |
| एकूण | ११५ | २६ | १०० | १०० |

१. ९७% पुरूष आणि १००% स्त्रियांच्या मते पूर्वीच्या तुलनेत सद्यस्थितीत त्यांच्या समाजातील शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे.

२. ०३% पुरूषांच्या मते पूर्वीच्या तुलनेत सद्यस्थितीत त्यांच्या समाजातील शिक्षणाचे प्रमाण वाढले नाही.

**प्रश्न क्र. ८ समाजातील शिक्षणाचे प्रमाण वाढल्याने आर्थिक क्षेत्र बदलास मदत मिळते.**

**कोष्टक क्र. ८४**

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| होय | ११३ | २२ | ९८ | ८५ |
| नाही | ०२ | ०४ | ०२ | १४ |
| एकूण | ११५ | २६ | १०० | १०० |

१. ९८% पुरूष आणि ८५% स्त्रियांच्या मते समाजातील शिक्षणाचे प्रमाण वाढल्याने आर्थिक क्षेत्र बदलास मदत मिळते.

२. ०२% पुरूष आणि १५% स्त्रियांच्या मते समाजातील शिक्षणाचे प्रमाण वाढल्याने आर्थिक क्षेत्र बदलास मदत मिळत नाही.

**प्रश्न क्र.९ शैक्षणिक विकासामुळे समाजातील मागासलेपण दूर होण्यास मदत झाली.**

**कोष्टक क्र. ८५**

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| होय | ११४ | २३ | ९९ | ८८ |
| नाही | ०१ | ०३ | ०१ | १२ |
| एकूण | ११५ | २६ | १०० | १०० |

१. ९९% पुरूष आणि ८८% स्त्रियांच्या मते शैक्षणिक विकासामुळे समाजातील मागासलेपण दूर होण्यास मदत झाली आहे.

२. ०१ % पुरूषांच्या १२% स्त्रियांच्या मते शैक्षणिक विकासामुळे समाजातील मागासलेपण दूर होण्यास मदत झाली नाही.

**प्रश्न क्र. १० पूर्वीच्या तुलनेत सद्यस्थितीत माझ्या समाजातील स्त्री शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे.**

**कोष्टक क्र. ८६**

| प्रतिसाद | एकूण व्यक्ती | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| होय | ११३ | २३ | ९८ | ८८ |
| नाही | ०२ | ०३ | ०२ | १२ |
| एकूण | ११५ | २६ | १०० | १०० |

१. ९८% पुरूष आणि ८८% स्त्रियांच्या मते पूर्वीच्या तुलनेत सद्यस्थितीत त्यांच्या समाजातील स्त्री शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे..

२. ०२% पुरूषांच्या व १२% स्त्रियांच्या मते पूर्वीच्या तुलनेत सद्यस्थितीत त्यांच्या समाजातील स्त्री शिक्षणाचे प्रमाण वाढले नाही.

### ❖ अर्थनिर्वचन

कोळी समाजाच्या बाबतीची माहिती लिखित स्वरुपात अत्यंत कमी प्रमाणात उपलब्ध असल्याने प्रत्यक्ष सर्वेक्षण करणे अत्यावश्यक वाटले त्यानुसार सामजिक १५७, शैक्षणिक १४१ व आर्थिक १३० इतक्या लोकांकडून प्रत्यक्ष त्या प्रश्नावल्या भरुन घेतल्या. त्याआधारे उपलब्ध झालेल्या माहितीचे सांख्यिकी विश्लेषण केल्यानंतर उपलब्ध तथ्यांचे विश्लेषण पुढील प्रमाणे करता येईल. कोळी समाजाचा पारंपरिक व्यवसाय मासेमारी असून त्यासोबत जोडधंदा म्हणून काही प्रमाणात ते शेतीही करतात. त्यांचा हा धंदा अथवा व्यवसाय वडिलोपार्जित असून या व्यवसायात अतिरीक्त फायदा व्हावा यासाठी ते सतत प्रयत्नशील असतात. कारण नोकरीपेक्षा व्यवसायात अधिक पैसा मिळतो असे त्यांना वाटते. सद्यस्थितीत त्यांना आरक्षणाच्या आधारे नोकरीची संधी उपलब्ध होत असल्याने परंपरागत व्यवसायापेक्षा नवीन नोकरीसाठी त्यांनी प्रयत्न करावे असे या समाजातील स्त्रियांना प्रकर्षाने वाटते. यांचे भविष्य अस्थिर असल्याने भविष्यकाळासाठी बचत करण्याकडे यांचा कल आहे त्यासाठी ते विविध प्रकारच्या पॉलिसी काढतात. शेती विकल्यास एक रक्कमी पैसा हातात येवू शकतो. त्यातून भविष्यात चांगली स्थिती निर्माण होईल असे वाटल्याने शेती विकणे व सेझचा फायदा होणे असे या समाजातील स्त्रियांना वाटते.

या समाजातील आर्थिक बाजू सावरण्यासाठी स्त्रियांनी हातभार लावलेला दिसतो. त्यांनी आर्थिक मदत करावी असे हा समाज गृहीत धरतो. आर्थिक स्थिती कशीही असली तरी कर्ज काढून का होईना सण साजरे करण्याची पध्दत या समाजाची असल्याने पूर्वीच्या तुलनेत सद्यास्थितीत यांच्या खर्चाचे प्रमाण

वाढले आहे. शिवाय जागतिकीकरणामुळे यांच्या व्यवसायात वृध्दी झाल्याचे हा समाज मानतो. मात्र स्वत:ची आर्थिक स्थिती सुधारल्यास समाजाची आर्थिक वृध्दी होईल व ती झाल्यासच इतर समाजांमध्ये हा समाज तुल्यबळ ठरेल यावर कोळी समाजाचे मताधिक्य आहे.

शैक्षणिक प्रश्नावलीच्या आधारे मिळालेल्या माहितीवरुन कोळी समाजात शिक्षण महत्त्वाचे मानणाऱ्या लोकांची संख्या आधिक आहे. गेल्या काही वर्षात त्यांच्या समाजात शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. शिवाय इतर समाजांच्या तुलनेत या समाजातील मुले अधिक प्रमाणात शिक्षण घेऊ लागली आहेत असे त्यांना वाटते. स्त्रिया हा या समजाचा महत्त्वाचा घटक असल्याने त्यांच्या शिक्षणाने समाजात निश्चितच बदल होईल असे स्त्रियांच्या तुलनेत पुरुषांना अधिक वाटते त्यामुळे या समाजातील स्त्री शिक्षणाचे प्रमाण वाढते आहे. त्यामुळे उच्चशिक्षणासाठी त्यांना बाहेर पाठविण्यासही त्यांची तयारी दिसते. शैक्षणिक बदल हा समाज बदलास सहाय्यभूत असून याद्वारे त्यांच्यातील मागासलेपणा दूर होण्यास निश्चितच मदत होईल असे त्यांना वाटते. शिवाय परंपरागत व्यवसायापेक्षा उच्चशिक्षण मोठे आहे असे ते मानतात त्यामुळे या समाजात शैक्षणिक विकासास सुरूवात होऊन ते गतिमान झाल्याचे दिसते.

सामाजिक प्रश्नावलीच्या आधारे मिळालेल्या माहितीवरून हे लक्षात येते की, कोळी समाजातील लोकांना त्यांच्या घरात स्वत:चे स्वतंत्र असे स्थान दिले जाते. पारंपरिक रूढी परंपरा जतन करून पूर्वापार चालत आलेल्या सण उत्सवांना साजरे करण्यात त्यांना आवड वाटते. गेल्या २० वर्षात कोळी समाजात बरेच बदल झालेत हे ते मान्य करतात यात बदललेल्या दळणवळणाच्या सुविधा व इलेक्ट्रॉनिक्स साधने यामुळे वेळ, कष्ट व पैसा वाचला असे त्यांना वाटते. जागतिकीकरणाने या समाजातील राहणीमानाचा दर्जा सुधारला शिवाय त्यामुळे विचारसारणीतही बदल होऊ लागला आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर अपरिहार्य आहे असे मान्य केले तरी ते आपल्या लग्नपध्दतीत

परप्रांतियांचे अनुकरण करत नाही. त्यांना स्वत:च्याच चाली रितीनुसार विधी कार्य करण्यास आवडते.

या समाजात स्त्रियांना समान दर्जाचे स्थान दिले जाते शिवाय या समाजतील बहुसंख्य लोकांना त्यांची बोलीभाषा चांगल्या पध्दतीने बोलता येते तर अधिकाधिक लोक त्याचा वापर आपल्या व्यवहारात करतांना दिसतात. यात स्त्रियांचे प्रमाण अधिक आहे. हा समाज आपल्या आहारात प्रामुख्याने पारंपरिक पदार्थांचाच समावेश करण्यावर भर देतो. त्यांच्यात समाज मंदिरात जाणे अनिर्वाय नाही मात्र स्वत:ची सामाजिक संघटना असावी असे त्यांना आवर्जून वाटते. त्यांच्या लेखी त्यांच्या समस्या निवारणार्थ सामाजिक संघटना महत्त्वाची भूमिका बजावू शकते. जागतिकीकरणामुळे या समाजात बदल झाले असेल तरी इतर समाजांच्या तुलनेत कोळी समाज कमी प्रगत आहे असे या समाजाला वाटते.

एकंदरीत जागतिकीकरणामुळे निश्‍चितच कोळी समाजावर प्रभाव पडलेला दिसतो. त्यांच्या राहणीमान व अत्याधुनिक सोई सुविधांच्या वापरात वाढ झालेली आहे मात्र या समाजाला चांगल्या परिणामांबरोबरच वाईट परिणामांनाही सामोरे जावे लागत आहे.

## टीपा

१. मुलाखत — सुंदरराव नाईक, मुख्याध्यापक, अलिबाग, दिनांक — २५/०४/२०१३.

२. मुलाखत — किस्नी थळे, कोळीण मच्छी विक्रेती, थळ, दिनांक — २७/०१/२०१३

३. मुलाखत — कमला नाईक , कोळीण मच्छी विक्रेती, अलिबाग, दिनांक — १२/०१/२०१३

४. मुलाखत — गौऱ्या विठ्ठल पावशे, चेअरमन, बोरेश्वर मच्छीमार सोसायटी, नवेगाव नवेदर, दिनांक — ०१/०८/२०१२

५. अहवाल, मत्सव्यवसाय विभाग सहाय्यक आयुक्त, मत्सव्यवसाय रायगड, २००५.

६. उज्ज्वला महाडीक, *कोळी बोली — एक अभ्यास,* पीएच. डी. प्रबंध, मुंबई विद्यापीठ, १९९७, पृ. ३०.

७. पंढरीनाथ तामोरे, दर्याचे राजे, *दैनिक सकाळ,* शनिवार, दिनांक — २३ जुलै २०११ पृ ७.

८. महाडीक, पूर्वोक्त, पृ. ३२.

९. श्रीनिवास गडकरी, लोकजीवन व संस्कृती, *साप्ताहिक विवेक,* हिंदुस्थान प्रकाशन संस्था, २००३, पृ. १७.

१०. पंढरीनाथ तामोरे, वादळवारं सुटल गं, *दैनिक सामना,* २६ ऑगस्ट २००७ पृ.३.

११. मुलाखत — सुयोग आंग्रे, उपसंपादक, *दैनिक विश्वरूप,* दिनांक — ११/११/१२.

१२. चंद्रकांत मेहेर, *कोळी समाज — विहंगमावलोकन,* शुभाय प्रकाशन, मुंबई, एप्रिल २०१३, पृ. ८८.

१३. मुलाखत – जितेंद्र मधुकर पाटील, ग्रामसेवक, अलिबाग, दिनांक – ११/०८/२०१२.

१४. पूर्वोक्त, मेहेर, पृ. ९५.

१५. मुलाखत – गोमा रामा झुरे, माजी सरपंच, नवगाव नवेदर, दिनांक – ०१/०८/२०१२.

१६. मुलाखत – सत्यवती कोळी, गृहिणी, रेवसगाव, दिनांक – १/२/१२.

१७. मुलाखत – वासुदेव पाटील, वारकरी, देहेन, दिनांक – २/५/१३.

१८. पूर्वोक्त, पंढरीनाथ तामोरे, *दैनिक सकाळ,* पृ. ०७.

१९. मुलाखत – सचिन गौऱ्या पावशे, *दैनिक विश्वरूप,* दिनांक – ११/११/१२.

२०. वसंत चौलकर, *दैनिक कृषीवल,* १० एप्रिल २०१३, पृ. ५.

२१. दुर्गा दिक्षित, (संपा.), *महाराष्ट्र संस्कृतीकोश,* डायमंड पब्लीकेशन, पुणे, जुलै २००९, पृ. १५८.

२२. लक्ष्मणशास्त्री जोशी, पूर्वोक्त, पृ. ४०२.

२३. मुलाखत – भगत बाबा, पुजारी – खंडोबा मंदिर, अलिबाग. दिनांक ०५/१०/२०१२

२४. मुलाखत – रंजिता वरसोलकर, प्राथमिक शिक्षिका, आलिबाग, दिनांक ०५/१०/२०१२.

२५. गे. ना. परदेशी, *सरखेल कान्होजी राजे आंग्रे,* समुद्रा प्रकाशन, अलिबाग, १९९०, पृ. ३२.

२६. भास्कर बडे, *मत्स्यव्यवसाय,* साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद, १९९६, पृ. ६.

२७. चव्हाण, पूर्वोक्त, पृ. १२७.

२८. बडे, पुर्वोक्त, पृ. ५.

२९. जोशी, पुर्वोक्त, पृ. ९७७.

३०. मुलाखत – पुनम डोयले, गृहिणी, साखर, दिनांक – १/१/२०१३.

३१. चव्हाण, पुर्वोक्त, पृ. १३.

३२. द. वा.बाळ, नंदिनी देशमुख, *महाराष्ट्राची सागरी मत्स्यसंपत्ती*, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९९३, पृ. ७२.

३३. चव्हाण, पुर्वोक्त, पृ. ५७.

३४. बाळ, देशमुख, पुर्वोक्त, पृ. ९१.

३५. चव्हाण, पुर्वोक्त, पृ. १४.

३६. तत्रैव, पृ. १५५.

३७. मुलाखत – गौऱ्या विठ्ठल पावशे, चेअरमन, बोरेश्वर सोसायटी, नवगाव, दिनांक – ०५/०७/२०१२.मच्छीमार

३८. मुलाखत – सचिन जोशी, वकिल, अलिबाग, दिनांक – १४/६/२०१३.

# प्रकरण पाचवे

# उपसंहार

# ५. उपसंहार

ग्रामीण समाज ज्या वेगाने नागरी संस्कृतीच्या संपर्कात येऊ लागला त्या वेगाने त्यांच्या रूढी परंपरा लोप पावणे स्वाभाविक आहे. अलिकडे शिक्षणाच्या प्रसाराने व दळणवळणाच्या साधनाने घडवून आणलेल्या क्रांतीकारी बदलाने प्रत्येक समाज आपल्या परंपरा टाकून अधिक नागरी होऊ लागला आहे. यात जागतिकीकरणाचा प्रभाव निश्चितच पडलेला दिसतो. शिक्षण आणि आर्थिक वृध्दी या परस्परावलंबी बाजू आहेत. यु. एन. डी. पी. च्या १९९० च्या मानवी विकास अहवालाप्रमाणे शैक्षणिक विकास हा मानवी विकासाचा घटक मानला आहे. तर सी.एफ. कार्टरच्या मते, आर्थिक विकासामध्ये शिक्षणाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. शिक्षणाची पातळी जेवढी जास्त तेवढा आर्थिक विकासाचा दर जास्त असतो. प्रसिध्द अर्थशास्त्रज्ञ गुनार मिर्दल यांनी एशियन ड्रामा या ग्रंथामध्ये शिक्षण आर्थिक विकासाचा कणा असतो असे मत मांडले.[१] शिक्षण मानवाला दारिद्रयातून बाहेर काढू शकते आणि विकासाच्या दिशेने प्रोत्साहन देते म्हणून शिक्षण आर्थिक विकासाचे प्रभावी साधन आहे असे म्हटले जाते. या सर्व बाबींचा विचार केल्यास आगरी आणि कोळी समाजामध्ये परिवर्तन घडून येण्यामागे शिक्षणाचा मोठा सहभाग असलेला दिसतो. मात्र याचे प्रमाण आगरी समाजात तुलनेने अधिक आहे. शिक्षण व राहणीमानाचा दर्जा यांचे महत्त्व जागतिकीकरणामुळे वाढीस लागले त्यामुळे आपोआपच आगरी व कोळी या दोन्ही समाजात या गोष्टीत अमुलाग्र बदल झाला. समाजात शिक्षणासाठी स्त्रियांनाही महत्त्वाचे स्थान देण्यात आले.

आरोग्यविषयक बाबींमध्ये या समाजात जनजागृती झाली असली तरी पूर्वीच्या तुलनेत सद्यस्थितीतील शारीरिक श्रम कमी झाल्याने आरोग्याच्या तक्रारी वाढीस लागल्या आहेत. या दोन्ही समाजातील लोकांना पारंपरिक सण व उत्सव आनंदाने व उत्साहाने साजरे करायला आवडतात मात्र त्यातही कोळी समाज आपल्या पारंपरिक वेशात व पध्दतीनेच हे सण साजरे करण्यावर भर

देतो. पेहराव बदल हा तर अनिवार्य मुद्दा बनला आहे. ग्रामीण भागात मात्र जुन्या व वयोवृध्द माणसांकडूनच पारंपरिक पेहराव परीधान केला जातो. त्यातही प्रामुख्याने कोळी समाजातील लोक पारंपरिक सण उत्सवात आवड म्हणून पारंपरिक पोशाख घालतांना दिसतात.

जागतिकीकरणामुळे प्रामुख्याने दोन्ही समाजाच्या वैचारिक पात्रतेत मोठा बदल झालेला दिसतो. नोकरी व व्यसायातील या समाजाचा सहभाग वाढीस लागला. शिवाय मुला मुलींच्या लग्नाचे वय वाढले. प्रामुख्याने दोन्ही समाजात साधारणपणे १९९० पूर्वी १५ ते १८ व्या वर्षी लग्ने केली जायची. ती आता म्हणजे साधारणपणे २०१० पर्यंत २० ते २५ एवढी वयोमर्यादा झालेली आहे. शिवाय आंतरजातीय व प्रेमविवाहांचेही प्रमाण वाढले आहे. तसेच कुटुंबातील मुलांची संख्या ही १ किंवा २ इथपर्यंत  मर्यादीत होत चाललेली दिसते. आगरी व कोळी या दोन्ही समाजात मासेमारीतील प्रमुख घटक व अन्न म्हणून माशांचे सेवन करणे हे नित्याचे असले तरी उपवास व वारीच्या काळामध्ये त्यास हातही लावला जात नाही. या दोन्ही समाजातील अनेक लोक शाकाहारी किंवा माळकरी झालेले दिसतात. हे त्यांच्यातील विशेष परिवर्तन आहे.

याशिवाय त्यांच्यातील अनेक लोकांनी पारंपरिक व्यवसाया बरोबरच इतर अनेक पुरक व्यवसाय करण्यावर भर दिलेला आहे. यात वाहक, दुग्धव्यवसाय, मोलमजुरी, वीटभट्टी, रेतीव्यवसाय, दुकाने, कुक्कुटपालन, बागायत, गवंडी, सुतार काम, गणपती व्यवसाय, इत्यादी सारख्या जोडव्यवसायांचा समावेश होतो. सर्वात जास्त प्रमाणात नोकरी करण्याकडे यांचा कल आहे. या संदर्भात जागतिकीकरणाच्या प्रभावाबाबत बोलायचे झाल्यास अलिबाग तालुक्यातील श्री महादेव लक्ष्मण ठाकूर यांनी स्थापन केलेल्या श्रीराम हॉटेल – बामणगाव येथील शेवचिवडा इस्त्राईल व जर्मनी येथे पाठविला जातो तर परहुर पाड्यातील जगन्नाथचंद्र पाटील यांची चोंढीची जिलेबी कर्नाटक बेळगावातही प्रसिध्द झालेली आहे. शिवाय येथील कोळंबी, पापलेट, जिताडा, बांगडे, खेकडे, बोंबिल यांसारख्या ओल्या व सुक्या अशा दोन्ही प्रकारच्या मच्छींना देशात व

परदेशातही विपुल मागणी आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या व्यापारातून व व्यवहारातूनही या दोन्ही समाजावर प्रभाव पडलेला दिसतो.

वाईट परिणाम पाहता दोन्ही समाजामध्ये दिखाऊपणा, बडेजाव व श्रीमंतीचे प्रदर्शन यांसारख्या चुकीच्या गोष्टींचा समावेश झालेला दिसतो. नातेसंबंधात दुरावा निर्माण होत आहे. माणसे स्वार्थी व आत्मकेंद्री बनत चालली आहे. भौतिक सुविधांमध्ये विनाकारण एकमेकांशी तुलना करुन वरचढ ठरण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यामुळे पैशाची उधळपट्टी अथवा अतिरिक्त खर्च होऊ लागला आहे. कोळी समाजातील लोक मासेमारी हा व्यवसाय मनापासून करत असल्याने माशांच्या प्रजनन काळात ते मासेमारी बंद ठेवत पुढे शासनाच्या नियमाने असे करणे बंधनकार झाले मात्र परदेशी मासेमारांना हा नियम नसल्याने अक्षरशः समुद्राचा तळ ढवळून मोठमोठ्या यंत्रांच्या व साधनांच्या सहाय्याने लहान मोठ्या अशा सर्व माशांची पकड केली जाते त्यामुळे समुद्राचे चक्रही अनियमित होते. जमीनही नापीक होत चालली असल्याने ती विकून येणाऱ्या पैशातून अधिकांश लोकांनी भौतिक सुविधा मिळविण्यासाठी प्रयत्न केला. त्यामुळे सद्यस्थितीत आता जमीनही नाही आणि पैसाही नाही अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. या सर्वांमुळे विकासाचे एक नैसर्गिक संसाधन म्हणून मासे व शेती नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत.

जागतिकीकरणाच्या काळात ज्या अनेक संकल्पना उदयास आल्या त्यातील सर्वात महत्त्वाची व वेगाने वाढणारी संकल्पना म्हणजे विशेष आर्थिक क्षेत्र म्हणजेच सेझ. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत टिकून राहण्यासाठी देशातील आद्योगिकीकरणाचा वेग वाढवून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर व्यापारवृध्दी करण्यासाठी निर्यातवृध्दी घडवून देशाच्या विकासाला गती प्राप्त करण्यासाठी आज विकसित व अविकसित राष्ट्रे जाणीवपूर्वक प्रयत्न करीत आहेत. या प्रयत्नांचा एक भाग म्हणजे विशेष आर्थिक क्षेत्र. चीनने ज्याप्रमाणे सेझ मार्फत आपला विकास केला त्याच अनुषंगाने भारतातही विशेषतः कोकणात सेझ राबविण्याचा प्रयत्न केला जात आहे. मात्र सेझ कल्याणकारी असले तरी

कोकणातील विकासाच्या नावाखाली राबविण्यात येत असलेल्या सेझमुळे सुपीक जमीन नष्ट होते आहे. शिवाय भूसंपादनामुळे गावाच्या पुनर्वसनाचाही प्रश्न उभा राहतो आहे. त्यामुळे जरी सेझ व सीआरझेड या संकल्पना समाजाच्या विकासासाठी राबविल्या जात असल्या तरी त्याचा अलिबाग तालुक्यातील आगरी आणि कोळी समाजावर प्रतिकूल परिणाम होतांना दिसतो आहे. खारशेती पिकविण्याचे कसब असलेला आगरी समाज व समुद्र, खाडी मध्ये मासेमारी करणारा कोळी समाज त्यांच्या पारंपरिक व्यवसाया पासून दुरावत चालेला आहे.

## ❖ — ठळक निष्कर्ष —

### १. आगरी व कोळी समाजावर जागतिकीकरणाचा फार मोठा प्रभाव पडलेला आहे.

आधुनिकीकरणाचे वारे वाहून सर्वांमध्ये बदल घडून आले.जागतिकीकरण म्हणजे जग जवळ येणे. जगात घडून आलेल्या स्थित्यंतराचा प्रभाव अलिबाग तालुक्यातील आगरी व कोळी हे संख्येने अधिक असलेले दोन समाज आहेत. या दोन्ही समाजात सामाजिक सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय दृष्ट्या परिवर्तन घडून येण्यास जागतिकीकरण प्रामुख्याने कारणीभूत ठरलेले दिसते.

### २. दोन्ही समाजातील शैक्षणिक प्रगती उल्लेखनीय आहे. त्यातही स्त्री शिक्षणास विशेष प्राधान्य दिले गेले आहे.

जागतिकीकरणामुळे आगरी व कोळी या दोन्ही समाजात वैचारीक प्रगती झाली. स्वत:चे स्थान समाजात उच्च व्हावे, आपल्या समाजास स्थैर्य प्राप्त व्हावे या दृष्टीने दोन्ही समाजांनी शैक्षणिक विकास घडवून आणला. दोन्ही समाजाने प्राथमिक शिक्षणापासून उच्चशिक्षण व तत्सम व्यावसायिक शिक्षण घेण्यास प्राधान्य दिले. त्यातही स्त्री शिक्षणास आडकाठी न करता अग्रक्रम दिला मात्र तौलनिक दृष्ट्या या विकासाचा वेग कोळी समाजापेक्षा आगरी समाजाचा अधिक होता.

**३. जागतिकीकरणामुळे येथे औद्योगिकरण, आधुनिकीकरण व शहरीकरण वेगाने वाढले.**

जागतिकीकरणाचा मुळ उद्देश सर्वांनाच व्यापारासाठी मुक्त धोरण असावे असा होता. सर्वांचीच प्रगती व्हावी सर्वाना रोजगार मिळावे या उद्देशाने एत्तदेशीय अथवा परदेशी गुंतवणूकदारांनी आपले भांडवल गुंतवून उत्पन्न व उत्पादन वाढ होण्यासाठी प्रयत्न केले. या सर्वांचा परिणाम होउन गेल्या २० — २५ वर्षात अलिबाग तालुका व असपास अनेक उदयोगधंदे निर्माण झाले. यात इस्पात, गेल इंडिया, नेटको, आर सी एफ, जे. एस. डब्ल्यु. यासांरख्या कपन्या आहेत. त्यांच्या निर्मितीने येथे आधूनिकीकरण व शहरीकरण होण्यास मदत झालेली आहे त्याचा परिणाम आगरी आणि कोळी समाजावर झाला.

**४. औद्योगिकीकरणामुळे सहज स्वरूपात तृतीय व चतुर्थ श्रेणीची कामे मिळत असल्याने आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत झाली मात्र शेती व मासेमारीचे प्रचंड नुकसान झाले.**

येथे निर्माण झालेल्या औदयोगिकरणामुळे अनुकूल व प्रतिकूल असे दोन्ही स्वरूपाचे परिणाम झाले यातील अनुकूल परिणाम म्हणजे येथील समाजाला तृतीय व चतुर्थ श्रेणीची कामे सहज उपलब्ध झाली. अल्प व उच्च शिक्षीत अथवा अशिक्षित लोकांनाही सुरूवातीला कामे मिळाल्याने उत्पन्न वाढून आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत झाली. मात्र हे औदयोगिकीकरण होतांना अथवा झाल्यांनतर मात्र येथील समाजाची प्रमुख उत्पन्नाची साधने म्हणजे शेती व मासेमारी या पारंपरिक व्यवसायात कार्यरत असणाऱ्या लोकांचा ओघ नोकरी करण्याकडे वळल्याने येथील काम करणाऱ्या लोकांच्या अनुप्लब्धतेने शेती व मासेमारीचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले.

**५. पूर्वीच्या तुलनेत सद्यस्थितीत आर्थिक सुबत्ता चांगली झाल्यामुळे राहणीमानाचा दर्जा उंचावला आहे. शिवाय भौतिक सुधारणाचा व सुविधांचा वापर वाढला आहे.**

पारंपरिक व दृय्यम व्यवसायांच्या मदतीने येथील आर्थिक उत्पन्न वाढीस लागले. त्यामुळे या दोन्ही समाजाच्या राहणीमानात बदल झाला जागतिकीकरणामुळे आधुनिकीकरण झाले त्यातूनच भौतिक व तांत्रिक सुधारणा व सुविधांचा वापर या सर्वांच्या मदतीने पूर्वीच्या तुलनेत सद्यस्थितीतील आगरी आणि कोळी समाजाचा राहणीमानाचा दर्जा उंचावण्यास मदत झाली.

**६. पारंपरिक व्यवसायात आधुनिकीकरण व यांत्रिकीकरणाचा वापर वाढीस लागला.**

आसपासच्या तालुक्याशी नव्हे तर संपूर्ण जगाशीच संपर्कात आल्याने येथील समाजाला विविध प्रकारच्या तंत्रज्ञानाची ओळख झालेली आहे त्याचा उपयोग आगरी आणि कोळी समाजाने आपल्या पारंपरिक व्यवसायातही केला. शेती व मासेमारी या आगरी आणि कोळी समाजाच्या पारंपरिक व्यवसायात आधुनिक यंत्र व तंत्रज्ञानाचा वापर वाढीस लागलेला दिसतो.

**७. समाजामध्ये असलेल्या पोटजाती नष्ट होऊन एकत्र वहिवाटीचे प्रमाण वाढले.**

जागतिकीकरणाने समाजामध्ये असलेल्या जातीय व धार्मिक बंधनाची सीमारेषा पुसट झाली त्याच प्रमाणे अलिबाग तालुक्यात असलेल्याा आगरी व काळी समाजातही जे उपप्रकार होते त्यांचे प्रकार कमी होऊन सर्वच समाज एकत्रित वहिवाट करण्यावर भर देऊ लागले स्वत:च्या समाजाचे उपप्रकार नष्ट करून दोन्ही समाज बऱ्याच प्रमाणात एकत्र आले. मात्र यातही आगरी समाज अग्रेसर असलेला दिसतो.

**८. आंतरजातीय विवाह संबंधांना मान्यता मिळाली.**

आगरी व कोळी समाजात आंतरजातीय अथवा आंतरधर्मीय लग्नास संपूर्ण मान्यता नव्हती. अशा जोडप्यांना वाळीत टाकण्याची प्रथा होती. अथवा जात पंचायती मार्फत निवाडा केला जाई. मात्र सद्यस्थितीत वैचारिक दृष्ट्या या लोकांची मानसिकता बदलत चालल्याने अशा विवाहांना मान्यता दिली जात आहे. किमानपक्षी अतीव विरोध केला जात नाही.

**९) आरोग्यविषयक जागृती निर्माण होऊन अंधश्रध्दांचे प्रमाण कमी झाले**

शैक्षणिक प्रगती झाल्यामुळे आगरी आणि कोळी समाजात विशेषत्वाने आरोग्यविषयक बाबतीत प्रचंड प्रमाणत जागृती घडून आली आरोग्याच्या बाबतीत त्या अंधश्रध्दा होत्या. त्या बऱ्याच प्रमाणात कमी झाल्या. शिवाय वैदू तांत्रिक व मांत्रिक यांच्या बाबतीतही हे लोक सजग झाालेले दिसतात. यातही आगरी समाज कोळी समाजाच्या तुलनेत जास्त जागृत असलेला दिसतो.

**१०. आरोग्यविषयक जागृती निर्माण होऊन अंधश्रध्दांचे प्रमाण कमी झाले .**

आगरी आणि कोळी समाजाची स्वत:ची अशी एक विशिष्ट प्रकारची संस्कृती आहे ही संस्कृती विशेषत्वाने गावांमध्ये सवंर्धित आहे मात्र जागतिकीकीणाने त्यांच्या या वैशिष्टङ्घज्ञपूर्ण संस्कृतीवर प्रभाव पाडला नावीन्य स्विकारण्याच्या अट्टाहासापोटी या दोन्ही समाजाची ग्रामीण संस्कृती नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. शिवाय येथील लोक अधिकाधिक आत्मकेंद्री बनू लागलेली दिसतात.

**११. ग्रामीण संस्कृती नष्ट होऊन समाज आत्मकेंद्री व व्यक्तीकेंद्री होऊ लागला आहे. पारंपरिक कृषी व मस्त्य संस्कृतिचा लोप होत चालला आहे.**

आगरी आणि कोळी हे दोन्ही समाज शेती व मासेमारी या व्यवसायांशी निगडीत आहेत. त्यामुळे या दोन्ही व्यवसायांशी संबंधित संस्कृतीचा विकास या आगरी आणि कोळी समाजात झालेल्या दिसायचा मात्र जागतिकीकरणाने निर्माण झालेल्या रोजगाराच्या संधीमुळे पारंपरिक अशा कृषी व मत्स्य व्यवसायाकडे या समाजाचे लक्ष कमी होत आहे त्यामुळे तत्सम संस्कृतीचा लोप होतांना दिसतो.

**१२. दोन्ही समाजाची मुख्य ओळख असलेला त्यांचा पेहराव व बोली भाषेत अमुलाग्र बदल घडून आलेला आहे.**

आगरी आणि कोळी समाजाची बोलीभाषा ही त्यांची खासीयत आहे हे दोन्ही समाज आपल्या बोलीभाषेतच वहिवाट करतांना दिसायचे. त्यांची गाणी ही त्यांच्या भावनांना व्यक्त करणारे उत्तम माध्यम होते तसेच दोन्ही समाजाचा विशिष्ट प्रकारचा पेहराव ही त्यांची ओळख होती यात आगरी समाजाचा स्त्री

परीधान करणारा खोंडा व कोळी समाजातील स्त्रियांचे आडवी व उभी साडी नेसणे व पुरूषांचा लंगोट हा पोशाख आता या आधुनिकीकरणात लुप्त होत चालला आहे. फक्त सणा समारंभापुरते अथवा ग्रामीण पातळीवरच याचे पालन होतांना दिसते. प्रमाण अथवा शुध्द भाषेत वाचन, लेखन व संवाद करण्याला ते प्राधान्य देतांना दिसतात. यातील कोळी समाजात मात्र आगरी समाजाच्या तुलनेत पारंपरिकता जपतांना दिसतो.

**१३. श्रीमंती, एकमेकांशी तुलना, वरचढपणा यासाठी चुकीच्या मार्गांचा वापर वाढला आहे.**

जागतिकीकरणमुळे दोन्ही समाजाला आर्थिक स्थैर्य मिळण्यास मदत झाली. त्यामुळे त्यांच्या राहणीमानाचा दर्जाही उंचावला परंतु यातुनच आपापसातील सत्ता संघर्षही वाढला. आपण इतरांपेक्षा श्रेष्ठ आहोत हे दाखविण्यासाठी प्रामुख्याने लग्न, साखरपुडा, हळद, पूजा यांसारख्या धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमात प्रचंड खर्च केला जातो. प्रसंगी यासाठी कर्जही काढले जाते. असाच प्रकार खाणे पिणे राहणीमान भौतिक सुविधाच्या उपलब्धतेबाबत केला जातो.

**१४. आगरी समाज बऱ्यापैकी संघटीत असल्याने त्यांच्या सामाजिक संस्था आढळतात. त्या तुलनेत कोळी समाजाच्या सामाजिक संघटना आढळत नाहीत.**

शिक्षणाचा विकास व काही प्रमाणात स्थिर जीवनपध्दती लाभल्याने आगरी समाजाच्या विकासाचा वेग हा कोळी समाजाच्या विकासाच्या वेगापेक्षा तुलनेने जास्त होता. त्यामुळे सांघिक कार्य करण्यासाठी ते नेहमी एकत्र जमण्यावर भर देत. या त्यांच्या संघभावनेतूनच अनेक सामाजिक संघटना व संस्थांची निर्मिती झाली. या उलट शिक्षणाचा अभाव व अस्थिर जीवनपध्दतीमुळे कोळी समाजास संघर्ष अथवा विकासासाठी एकत्रित येणे अवघड बनले यामुळे आगरी समाजाच्या तुलनेत कोळी समाजाच्या सामाजिक स्तरावरच्या संघटनाचे प्रमाण अत्यल्प असलेले आढळते.

**१५. आगरी समाजाला खंबीर असे राजकीय व सामाजिक नेतृत्व उपलब्ध आहे त्या तुलनेत कोळी समाजाला राजकीय अथवा सामाजिक पातळीवरील सक्षम नेतृत्व आलिबाग मध्ये उपलब्ध असलेले दिसत नाही.**

स्वत:च्या समाजाच्या संघटना व संस्था विशेषत्वाने कार्यरत असल्याने आगरी समाजाला या सर्वांमधून खंबीर असे सामाजिक व राजकीय नेतृत्व उपलब्ध झाले. शैक्षणिक प्रगतीमुळे तर या समाजातील अनेक लोक राजकीय स्तरावर उच्च दर्जाची कामगीरी करतांना दिसतात त्या तुलनेतील कोळी समाजाच्या नेतृत्वाबाबत विचार करता असे लक्षात येते की या समाजाला प्रबळ अथवा समर्थ असे राजकीय नेतृत्व लाभलेले नाही शिवाय सामाजिक पातळीवरही अशा नेतृत्वाचा अभावच दिसतो.

**१६. जमीन व मासे या नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन करण्याऱ्या आगरी आणि कोळी समाजापुढे त्यांचे संरक्षण करण्याऐवजी त्यांची विक्री करणे हाच पर्याय उरल्याने त्यांची परिस्थिती वाईट झाली आहे.**

जागतिकीकरणामुळे अलिबाग परिसरात इस्पात, गेल इंडिया, नेटको, आर. सी. एफ., जे. एस. डब्ल्यु. यासांरख्या कंपन्या विविध प्रकल्पांची उभारणी झाली. यांच्या माध्यमातून इथल्या स्थानिकांना रोजगार मिळाले असले तरी शेती व मासेमारी या त्यांच्या मुळ व्यवसायास हानी पोहोचली. कंपनीसाठी आपल्या पिकत्या जमीनी विकत देण्या व्यतिरिक्त या लोकांकडे पर्याय उरला नाही तर कंपनीतून सोडल्या जाणऱ्या दुषीत पाण्यामुळे माशांची झालेली नासाडी अथवा खारफुटीची कत्तल या सर्वांमुळे नैसर्गिकरित्या संवर्धन केल्या जाणऱ्या घटकांचे संरक्षण करण्यास आगरी व कोळी समाज असमर्थ ठरू लागला त्यामुळे अनिच्छेने का होईना पण त्यांना शेती व मासेमारीतून मिळणाऱ्या उत्पन्नास मुकावे लागले. यातून त्यांची स्थिती आणखीनच वाईट झाली.

**१७. अनेक कारणांमुळे आगरी व कोळी या दोन्ही समाजांनी आपल्या पारंपरिक व्यवसायाकडे पाठ फिरवली आहे.**

कमी उत्पन्न, जास्त खर्च, वारंवार निर्माण होणाऱ्या समस्या, मजुरांची अनुप्लब्धता, साठवणूकीच्या साधनांचा अभाव यांसारख्या कारणांमुळे आगरी व कोळी या दोन्ही समाजानी आपल्या पांपरीक अशा शेती व मासेमारी या व्यवसायाकडे दुर्लक्ष केलेले आहे.

## ❖ शिफारशी

सदर संशोधनाद्वारे मिळालेल्या माहितीच्या आधारे वरील निष्कर्ष काढण्यात आले. या निष्कर्षावरून समाज, शासन व इतरांना काही सुचना देऊन काही शिफारशी करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्या पुढील प्रमाणे

१. आगरी व कोळी समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी शासनातर्फे विशेष प्रयत्न केले जावेत. हे प्रयत्न फक्त कागदोपत्री न राहता त्याची वारंवार पुनर्तपासणी व्हावी.

२. या दोन्ही समाजात शैक्षणिक प्रगती झाली असली तरी उच्च शिक्षणाच्या गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी प्रयत्न करावेत.

३. समाजिक संघटना निर्माण करून कोळी समाजास हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून दयावे.

४. आरक्षण प्रक्रियेत अडकलेल्या, जातीचे दाखले नसलेल्या कोळी समाजाच्या तत्सम समस्या सोडविण्यासाठी विशेष प्रयत्न करणे.

५. पारंपरिक शेती व मत्स्य व्यवसायाला नवसंजीवनी मिळण्यासाठी तत्सम अनुदान व सोयी उपलब्ध करून देणे.

६. औद्योगिकीकरण व पारंपरिक व्यवसाय यांचा सुवर्ण मध्य काढण्यासाठी सम पातळीवर विचार करणे.

७. जागतिक स्तरावर टिकण्यासाठी या दोन्ही समाजांना व्यावसायिक दृष्टीने प्रशिक्षित करणे अथवा तशा प्रकारचे अभ्यासक्रम उपलब्ध करून देणे.

८. सेझसारख्या प्रकल्पांसाठी येथील सुपिक अथवा पिकती खार जमिनी न वापरता त्यावर अनुषंगाने इतर प्रकल्प राबविणे.

९. कांदळवन– तिवरे– खारफुटी यांची कत्तल, मत्स्यनाश यांसारख्या समस्यांवर ठोस उपाय योजना करणे.

१०. सामाजिक ऐक्य निर्माण होण्यासाठी पुरक कार्यक्रमांची आखणी करणे.

११. पारंपरिक बोलीभाषेचा, वस्तुंचा अभ्यास करण्यासाठी प्रोत्साहन देणे.

१२. परंपरागत सण, उत्सव, रूढी, परंपरा यांमधून निर्माण होणाऱ्या संस्कृतीच्या संवर्धनासाठी प्रयत्न करणे.

## ❖ पुढील संशोधनासाठी दिशा :–

सदर संशोधन हे आगरी आणि कोळी समाजांवर जागतिकीकरणाचा पडलेला प्रभाव अभ्यासणारे आहे पण तरीही या क्षेत्रात अत्याधिक संशोधन होण्यास निश्चितच वाव आहे म्हणूनच भावी संशोधकांना पुढील मुद्द्यांतून नवी दिशा मिळू शकेल असे वाटते.

### • प्रत्येक समाजाचा स्वतंत्र अभ्यास –

प्रस्तुत संशोधनात फक्त आगरी आणि कोळी या दोनच समाजांचा अभ्यास करण्यात आलेला आहे. जागतिकीकरणाचा प्रभाव हा प्रत्येक समाजावर वेगवेगळ्या पध्दतीने पडलेला असल्याने अशा सर्वच समाजांचा स्वतंत्ररित्या अभ्यास करणे.

### • कोळी समाजाच्या प्रत्येक उपप्रकारचा स्वतंत्र अभ्यास –

प्रामुख्याने कोळी म्हटल्यानंतर महादेव कोळी समाजावर फार अभ्यास करण्यात आलेला आहे मात्र या व्यतिरिक्त असणाऱ्या कोळी समाजातील इतर उपप्रकारांवर सखोल अभ्यास करणे उपयुक्त ठरेल.

### • आगरी आणि कोळी समाजातील शैक्षणिक स्थितीचा अभ्यास –

या दोन्ही समाजातील परिवर्तनामध्ये त्यांची आर्थिक व शैक्षणिक स्थिती कारणीभूत ठरलेली दिसते. त्यामुळे या दोन्ही समाजातील शैक्षणिक परिवर्तनाच्या सर्वच पैलूंचा सविस्तर अभ्यास करणे गरजेचे आहे.

- **आगरी आणि कोळी समाजाच्या संघर्षाचा अभ्यास —**

कोळी समाजाच्या तुलनेत आगरी समाजाचा संघर्षातील सहभाग अधिक आहे हे या प्रबंधात उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे लक्षात येते मात्र हे दोन्ही समाज गेली कित्येक वर्षे येथील निसर्गाशी एकरूप झालेली दिसतात. त्यामुळे निश्चितच परकीय अथवा स्वकियांशी यांचा संघर्ष झाला असणार. त्यामुळे याबाबतही प्रामुख्याने संशोधन होणे आवश्यक ठरते.

- **स्थानिक इतिहास वृध्दिंगत व्हावा —**

आगरी व कोळी हे दोन्ही समाज स्थानिक समाजात मोडत असल्याने त्यांच्या विविध घटकांचा अभ्यास सविस्तर व सखोलपणे केल्यास त्यातून स्थानिक इतिहास वृध्दिंगत होण्यास मदत होईल.

एकंदरीतच जागतिकीकरणाचा आगरी आणि कोळी अशा दोन्ही समाजावर परिणाम पडलेला दिसतो. कमी उत्पन्न भरपूर कष्ट, अस्थिर जीवन, जास्त गुंतवणुकीचे भांडवल, अत्याधुनिक तंत्रज्ञान व यांत्रिकीकरणाची माहिती नसणे, परप्रांतीयांचे त्यांच्या व्यवसायामध्ये होणारे अतिक्रमण दैनंदिन पातळीवर निर्माण होणाऱ्या समस्या या सारख्या अनेक करणांमुळे हे दोन्ही समाज आपल्या मुळच्या कृषी व मत्स्य संस्कृतीपासून लांब चालले आहेत.त्यातही आगरी आणि कोळी समाजाचा तौलनिक अभ्यास करता हे लक्षात येते की आगरी समाज हा कोळी लोकांपेक्षा अधिक प्रगतीशील असून त्यांच्यात परिवर्तन स्विकारण्याची वृत्ती अधिक आहे. तुलनेने कोळी समाज हा अधिक रूढी व परंपरावादी आहे. परंतु परिवर्तन हे त्यांनीही स्विकारले आहेच. दोन्ही समाजाला

आपल्या पारंपरिक व्यवसायाला मुकावे लागून नव्या पध्दतीचे दैनंदिन जीवन स्विकारावे लागले.

थोडक्यात जागतिकीकरणाने जरी ज्ञान व विज्ञानात प्रगती झालेली असली, समाजाच्या विकासाला हातभार लागलेला असला तरी या प्रवाहात विशिष्ट समाजांची असलेली मुळ ओळख कुठेतरी हरवतांना दिसते आहे. त्यामुळे दोन्ही समाजावर जागतिकीकरणाचे अनुकूल व प्रतिकूल परिणाम झालेले दिसतात.

टिपा

१. ज्ञान जगत, ग्लोबल टिचर्स इंटरडिसीप्लीनरी रीसर्च असोसिएशन, नागपूर, २००८.

# संदर्भ सूची

# संदर्भ ग्रंथ सूची

## • प्राथमिक प्रकाशित साधने

### ❖ शासकीय माहिती, अहवाल


१. Administration Reports of Bombay Presidency, Bombay, 1871-1872.

२. Administration Reports of Bombay Presidency, Bombay, 1872-1873.

३. Judgument of supreme court, Madhuri Patil vs Addl. Commissioner on 2 spetember 1994, received from Adv. Sachin Joshi, Alibag,14/06/2013

४. अहवाल, बचतगट विभाग, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, अलिबाग, २०१२—१३.

५. अहवाल, रायगड जिल्हा मच्छीमार मध्यवर्ती सहकारी संघ लिमिटेड, अलिबाग, १९९९—२००० ते २००८—२००९

६. अहवाल, शिक्षण विभाग, पंचायत समिती, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग, २०१२.

७. आगळे हितबोध पुस्तिका, १९०६ — हरीभाऊ गोसावी, आगरी शिक्षण संस्था पनवेल, कार्यवाह, यांच्याकडून प्राप्त, दि. २२/०४/२०१२.

८. कुलाबा व्यापार उदीम, जिल्हा जनगणना निर्देश ग्रंथ, मुंबई, १९६१.

९. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, रायगड जिल्हा, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९९१—९२ ते २००७—२००८

१०. जी. आर. १०/२००६/प्र. क्र. ५, मावक ५, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, २५ मे २००६

११. भारतीय जनगणना, जिल्हा जनगणना निर्देश ग्रंथ, कुलाबा —मुंबई, १९६१.

## ❖ गॅझेटिअर


१. Choudhary K.K., (Edi.), Source Material For History Of Freedom Movement, Bombay, 1990.

२. Choudhary K.K., Gazetteer of The Bombay Presidency, Kolaba District, Bombay,1989.

३. Gazetteer of The Bombay Presidency, Kolaba and Janjira vol. XI, Bombay,1883.

४. Karve Iravati, Maharashtra State Gazetteer, Land and Its People, Bombay, 1986.

५. चौधरी कि. का. (संपा), महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर (रायगड जिल्हा), महाराष्ट्र राज्य शासन, मुंबई, १९९३.


## ❖ दुय्यम अप्रकाशित साधने


१. Kale D.N., Agris – A Socio Economic Survey, Ph.D. thesis, University of Mumbai, 1950.

२. अष्टपुत्रे पूर्वा, आगरी बोलीचा भाषा—वैज्ञानिक अभ्यास, पीएच्. डी. प्रबंध, मुंबई विद्यापीठ, २००६.

३. खाडिलकर उत्तरा, अलिबाग तालुक्याचा सामाजिक व सांस्कृतीक इतिहास १९५० ते २०१०, पी. एच्. डी. प्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, जानेवारी २०१३.

४. चव्हाण बाबाजी विश्वास, रायगड जिल्हयातील मच्छीमार सहकारी सोसायट्यांच्या कार्यांचा विश्लेषक अभ्यास, पीएच. डी. प्रबंध, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक,२०११.

५. म्हात्रे प्रगती, आगरी समाजातील स्त्री : परिवर्तनाचा अभ्यास, एम. फिल. प्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, २०१०.

६. पिचड नलिनी, महादेव कोळी समाजाच्या शैक्षणिक प्रगतीवर त्यांच्या आर्थिक, सामाजिक स्थितीचा होणारा परिणाम, पीएच. डी. प्रबंध, पुणे विद्यापीठ, २००६.

७. बांगर अनिल, रायगड जिल्ह्यातील आगरी समाजाच्या लोकसाहित्याचा वाङ्.मयीन व भाषिक अभ्यास, पीएच. डी प्रबंध, मराठवाडा विद्यापीठ, २०१०.

८. भैरगुंडे श्रीशैल, आदिवासी ( कोळी ) लोकसाहित्यातील स्त्री पुरूष चित्रण, पीएच. डी. प्रबंध, मराठवाडा विद्यापीठ, २००६.

९. महाडिक उज्ज्वला, कोळी बोली – एक अभ्यास, पीएच्. डी. प्रबंध, मुंबई विद्यापीठ, १९९७.

१०. रौंदळ देविदास, कोकणातील पर्यटन व्यवसायाच्या विपणन व्यवस्थेचे चिकित्सक अध्ययन, पीएच. डी. प्रबंध, पुणे विद्यापीठ, जुलै २००९.

## • दुय्यम प्रकाशित साधने

### ❖ संस्कृतीकोश

१. कुलकर्णी कृ. पा., मराठी व्युत्पत्ती कोश, तिसरी आवृत्ती, शुभदा सारस्वत प्रकाशन, पुणे, १९९६.

२. केतकर श्रीधर व्यंकटेश, महाराष्ट्रीय ज्ञानकोष, विभाग ७, महाराष्ट्रीय ज्ञानकोष मंडळ, नागपूर १९२४.

३. गर्गे स. मा. (संपा), भारतीय समाजविज्ञान कोश, भाग २, समाजविज्ञान मंडळ, पुणे, १९८७.

४. गणोरकर प्रभा, टाकळकर उषा (संपा), संक्षिप्त मराठी वाङ्मय कोश, (१९२० पासून २००३ पर्यंतचा कालखंड), जी. आर. भटकळ फाउंडेशन, मुंबई, फेब्रुवारी २००३.

५. जोशी महादेवशास्त्री, (संपा) भारतीय संस्कृती कोश खंड ३, ५, ७, अनमोल प्रकाशन, पुणे, ऑगस्ट १९९८, १९९९, २००१.

६. जोशी लक्ष्मणशास्त्री, मराठी विश्वकोश, खंड २, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९७६.

७. दाते, कर्वे, महाराष्ट्र शब्दकोश, विभाग तिसरा, वरद बुक्स पुणे, १९९५.

८. दिक्षित दुर्गा (संपा), महाराष्ट्र संस्कृती कोश, डायमंड प्रकाशन, पुणे, जुलै २००९.
९. भाटवडेकर मो. वि., व्यावहारिक मराठी शब्दार्थ कोश, राजहंस प्रकाशन, पुणे, ऑक्टोबर २००७.
१०. साने र. य., महाराष्ट्र पर्यटन कोश, विदयाविकास पब्लिशर्स, नागपूर, २००८.

## ❖ मराठी पुस्तके

१. आकलेकर भालचंद्र, कोकणचा सांस्कृतिक इतिहास, नवभारत प्रकाशन, मुंबई, २००३.
२. आगलावे प्रदीप, सामाजिक संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, दुसरी आवृत्ती, २००८.
३. आचार्य धनंजय, प्राचीन भारत, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००५.
४. कऱ्हाडे बी. एम., ग्रामीण व नागरी समाजशास्त्र, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.
५. कऱ्हाडे बी. एम., शास्त्रीय संशोधन पध्दती, पिंपळापूरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, जुलै २००७.
६. कुलकर्णी अरविंद, रायगड जिल्हयाचा इतिहास, रोहित प्रकाशन, पुणे, १९८४.
७. कुलकर्णी शिल्पा, महाराष्ट्राचे समाजशास्त्र, डायमंड प्रकाशन, पुणे, फेब्रुवारी २००९.
८. कोठेकर शांता, इतिहास : तंत्र आणि तत्वज्ञान, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, ऑगस्ट, २००७.
९. कोळी बोली –एक शैक्षणिक प्रश्न व उकल, भाषा विकास प्रकल्प, शिक्षण विभाग, बृहन्मुंबई, महानगरपालिका.
१०. खडसे भा. कि., भारतीय समाज आणि सामाजिक संस्था, हिमालया पब्लिशिंग हाऊस, मुंबई, २००४.

११. खातू गजानन, जागतिकीकरण परिणाम आणि पर्याय, अक्षय प्रकाशन, मार्च २००१.

१२. खोबरेकर वि. गो., मराठेकालीन कोकणचे सामाजिक व आर्थिक जीवन,नवभारत प्रकाशन संस्था, मुंबई, १९९७.

१३. खोबरेकर वि. गो. मराठेकालीन कोकणचा राजकीय इतिहास (इ.स.पूर्व ते इ.स. १८२०), नवभारत प्रकाशन संस्था, मुंबई, १९९७.

१४. गायधनी रं. ना., राहूरकर व. ग., प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, २००२.

१५.गारे गोविंद, सहयाद्रीतील आदीवासी, महादेव कोळी, सहाध्ययन प्रकाशन, मुंबई, १९७४.

१६.गारे गोविंद, सहयाद्रीच्या दऱ्याखोऱ्यातील ठाकूर आदिवासी, प्रकाशन, पुणे.

१७.घाणेकर प्र. के., भटकंती रायगड जिल्हयाची, स्नेहल प्रकाशन, पुणे, एप्रिल २००७.

१८.घुर्ये एस. जी., दि महादेव कोळी, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६३.

१९.घोरमोडे के. यु., घोरमोडे क. कृ, शैक्षणिक समाजशास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर, २०१०.

२०.जाधव बळीराम (संपा), जगातील एकमेव शेतकऱ्यांचा प्रदीर्घ संप, सुविद्या प्रकाशन, पुणे, २७ ऑक्टोबर २००९.

२१.जाधव सुदाम, आदिवासी साहित्य, सुलबा प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, सप्टेंबर १९९९.

२२.जाधव सुदाम, सातपुडयातील आदिवासी, सुलबा प्रकाशन, औरंगाबाद, मार्च २०१२.

२३.टिकेकर अरुण, स्थल काल, मौज प्रकाशन, मुंबई, फेब्रुवारी २००४

२४.ठक्कर के. ए., भारतीय अर्थशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, सप्टेंबर २००८.

२५.ठाकूर वासंती, पारंपरिक आगरी गीतातील भावसौंदर्य, श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, पनवेल, मार्च २००६.
२६. थळे सुचिता, चूल, राहुल थळे, अलिबाग, पहिली आवृत्ती, सप्टेंबर २०१२
२७.दिवान ऋतु, म्हात्रे संध्या (अनु.), वासंती दामले, धावपट्टीच्या विळख्यातील गावे, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, सप्टेंबर, १९९८.
२८.दिक्षित लिला (संपा.), विविध दिशा आणि दर्शन, प्रतिमा प्रकाशन, पुणे जानेवारी २०११
२९.देव प्रभाकर, इतिहासशास्त्र संशोधन, अध्यापन आणि लेखन परंपरा, ब्रेन टॉनिक प्रकाशन गृह, नाशिक, पहिली आवृत्ती, ऑगस्ट २००७.
३०.देवगांवकर एस. जी., महाराष्ट्रातील निवडक जाती—जमाती, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००९.
३१.देशपांडे अ. ना., महादाइसा व तिचे धवळे, प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास भाग १, व्हिनस प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, जानेवारी १९९५.
३२.देशपांडे श्रीधर, देशपांडे विनायक, भारतीय अर्थव्यवस्था, हिमालया पब्लिशिंग हाऊस, मुंबई, २००४.
३३.देशमुख एस. एम., असा हा रायगड, सुधांशू प्रकाशन, अलिबाग, प्रथम आवृत्ती, २००३.
३४.नाडगोंडे गुरुनाथ, भारतीय आदिवासी, कॉन्टीनेंटल प्रकाशन, पुणे १९७९.
३५.नाडगोंडे गुरूनाथ, सामाजिक संशोधन पध्दती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९९४.
३६.पटवर्धन मो. वि., वर्ण व जाती, विदर्भ मराठवाडा बुक कंपनी, पुणे, १९६६.
३७.परदेशी गे. ना., सरखेल कान्होजी राजे आंग्रे, समुद्रा प्रकाशन, अलिबाग, १९९०.

३८.पाटील अनंत, गाथा आगरी संस्कृतीची, जाणीव प्रकाशन, मुंबई, २००७.
३९.पाटील श्रीकृष्ण दत्तात्रेय, आंग्रेकालीन अष्टागर – आमचे पूर्वज व आम्ही आणि आजची स्थिती, प्रकाशन, ठाणे, २००७.
४०.पिंगळे कैलास, असा आहे अलिबाग, केतकी प्रकाशन, अलिबाग, २००९.
४१. पिंपळे पराग, साद सागराची, बुकमार्क प्रकाशन, पुणे, मे २०१०.
४२.फाटक मधुसूदन, चंदेरी हिरवाईचे अष्टगार, ग्रंथाली प्रकाशन, २८ सप्टेंबर २००४.
४३.बडे भास्कर, मत्स्यव्यवसाय, साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद, १९९६.
४४.बाळ द. वा., देशमुख नंदिनी, महाराष्ट्राची सागर संपत्ती, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, ऑगस्ट, १९९३.
४५.बोकील मिलींद, कातकरी –विकास की व्यवस्थापन, मौज प्रकाशन, मुंबई, २००६.
४६.बोकील मिलिंद, जनाचे अनुभव पुसतां, मौज प्रकाशन, मुंबई, जून २००२.
४७.भोसले के. एम., काटे के. बी., भारतीय अर्थव्यवस्था, फडके प्रकाशन, कोल्हापूर, सप्टेंबर २००८.
४८.मढवी काशिनाथ, उत्तर कोकणातील आगरी गोत्र गंगा, जाणिव प्रकाशन, मुंबई,२०१३.
४९.मायी सुनिल, सामाजिक संशोधन पध्दती, डायमण्ड पब्लीकेशन, २००८.
५०.मेहेर चंद्रकांत, कोळी समाज – विहंगमावलोकन, शुभाय प्रकाशन, मुंबई, एप्रिल २०१३.
५१.मोकल गोपीनाथ बाळाजी, आगरी समाज शोध आणि बोध, काशिबाई गोपीनाथ मोकल, मुंबई, प्रथमावृत्ती, जुलै १९९६.

५२.मोडखरकर सुनंदा, आगरी लोकगीते आणि परंपरा, सुयोग प्रकाशन, पेण, प्रथमावृत्ती, मार्च २००४.

५३.म्हात्रे मुरलीधर , आगरी समाजाचा इतिहास, सुयोग प्रकाशन, पेण, पहिली आवृत्ती, नोव्हेंबर २००५.

५४.राजवाडे वि. का., महिकावतीची उर्फ माहिमाची बखर, चित्रशाळा प्रेस, पुणे, १८४६.

५५.लिमण एम. एस., रावेरकर, वाडेकर, वाणी, विपणन आणि वित्त, शेठ प्रकाशन, प्रथम आवृत्ती, मुंबई, ऑक्टोबर, २००३.

५६.लोटे रा. ज., भारतीय सामाजिक संरचना आणि सामाजिक समस्या, पिंपळापुरे प्रकाशन ॲण्ड कंपनी, नागपूर.

५७.शिंदे सुभाष गंगाराम, लोखंडे अजयकुमार प्रल्हाद, समकालीन जग १९४५—२०००, सेठ प्रकाशन, प्रथम आवृत्ती, जानेवारी, २००६.

५८.सप्तर्षी प्रवीण, जगदाळे उत्तमराव, मानवी भूगोल, डायमंड पब्लिकेशन, पुणे, ऑगस्ट २००६.

५९.सोमण दा. कृ., आपले सण — आपले उत्सव, कॉन्सेप्ट बुक्स, पुणे, मे २००७.

६०.हरवंदे गीता, पेण, ग्रंथाली ज्ञानयज्ञ प्रकाशन, पुणे, जानेवारी २००६.

❖ **English Books**

1. Gumma V. N. , The Impact of Globalization on small-scale Industries, Regal Publications, New Delhi, 2009.
2. Jauhiri B.M. (Ed.), Economic Liberalization and globalization, Common Wealth Publishers, New Delhi, 1996.
3. Mishra S. K., Puri V. K., Development Issue Of Indian Economy, Himalaya publishing House, Mumbai, 2005.
4. Patel J. F. , Kakade V. B. , ‘World Economic Environment, Phadke Prakashan, Kolhapur, 2002.
5. Singh B. N. P. (Ed), Economic Liberalization in India, Asia Publishing House, New Delhi, 1995.

❖ **Journals and Newspapers :**

1. Adiseshiah Malcom S., Globalization of the Economy, Indian Association of Social Science Institution (IASSI), Vol 11, no.1, July-Spt 1992.
2. Awasthi Dvendra, Globalisation of the Indian Economy : Strategies and constraints, Indian Economic Journal, 28-30, Dec, 1992.
3. Kurien C. T., Indian Economic Reforms in the context of Emerging Global Economy, Economic and Political Weekly, 10th April 1993.
4. Mody Russi, Globalization Efforts with Accent in Export, The Economic Times, 21 April , 1992.

## ❖ साप्ताहिके/ मासिके —

१. अग्रसेन, रौप्य महोत्सवी विशेषांक, मुंबई, मार्च—एप्रिल २००९.

२. आगरी दर्पण, अधिवेश विशेषांक, समर्थ प्रिटिंग प्रेस, १९९७.

३. आगरी दर्पण, समर्थ प्रिटिंग प्रेस, एप्रिल २००६.

४. मासिक आगरी दर्पण, जे. डी. तांडेल, मुंबई, मार्च— एप्रिल २०११.

५. मासिक आगरी दर्पण, जे. डी. तांडेल, मुंबई, मार्च— एप्रिल २०१२.

६. आजचा तटरक्षक, ठाणे, नोव्हेंबर २००९ ते मे २०१०.

७. दर्याचा राजा, मुंबई, २००९.

८. दर्यावर्दी, मुंबई, एप्रिल २००९ ते मे २०१०.

९. दर्यासारंग, तिसरे कोकण मराठी साहित्य संमेलन, अलिबाग, १२ मे ते १४ मे, १९९५.

१०. परिवर्तनाचा वाटसरु, अभय कांता, पुणे, फेब्रुवारी २०११, एप्रिल २०१२.

११. भारतीय इतिहास आणि संस्कृती, वि. गो. खोबरेकर, जुलै १९९२, मुंबई.

१२. योजना, माहिती आणि प्रसारण मंत्रालय भारत सरकार नवी दिल्ली, मराठी अंक, नवी मुंबई, फेब्रुवारी, २००१.

१३. योजना, माहिती आणि प्रसारण मंत्रालय भारत सरकार नवी दिल्ली, मराठी अंक, नवी मुंबई, मे, २००१.

१४. योजना, माहिती आणि प्रसारण मंत्रालय भारत सरकार नवी दिल्ली, मराठी अंक, नवी मुंबई, डिसेंबर २००१

१५. योजना, माहिती आणि प्रसारण मंत्रालय भारत सरकार नवी दिल्ली, मराठी अंक, नवी मुंबई, डिसेंबर २००८.

१६.लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचलनालय, महाराष्ट्र शासन, मार्च २००४ ते २०१०.

१७. विवेक, आगरी विशेषांक, हिंदुस्तान प्रकाशन संस्था मुंबई, मार्च २००३.

१८. विवेक, हिंदुस्तान प्रकाशन संस्था, मुंबई, १७ मे २००९

१९. विवेक, घरकुल विशेषांक, हिंदुस्तान प्रकाशन संस्था, मुंबई, २५ मार्च २०१२

२०. शिक्षण संक्रमण, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे, २०१०

२१. सागरशक्ती, मुंबई, एप्रिल २०११.

२२. ज्ञान जगत, ग्लोबल टिचर्स इंटरडिसीप्लीनरी रीसर्च असोसिएशन, नागपूर, २००८.

## वृत्तपत्रे —

१. दै. कृषीवल, पेझारी, शनिवार, ६ ऑगस्ट १९८८.

२. दै. कृषीवल, अलिबाग, २२ जानेवारी २०१३.

३. दै. कृषीवल, अलिबाग, १० एप्रिल २०१३.

४. दै. कृषीवल, अलिबाग, मंगळवार, २७ ऑगस्ट २०१३.

५. दै. लोकसत्ता, मुंबई, २८ जूलै २००२.

६. दै. सकाळ, मुंबई, शनिवार २३ जुलै २०११.

७. दै. सकाळ, मुंबई, बुधवार १७ ऑक्टोबर २०११.

८. दै. सामना, मुंबई, रविवार, १५ जुलै २००७.

९. दै. सामना, मुंबई, रविवार २६ ऑगस्ट २००७.

## websites

1.amodpatil.blogspot.in accessed on 20-01-2014

2.www.agri samaj.com accessed on 01-005-2012

3.www.alibag.gov.in accessed on 15-07-2012

4.www.bsnl.org accessed on 20-05-2013

5.www.fisheries.dept accessed on 08-04-2013

6.www.fishsite.com accessed on 10-04-2013

7.www.kolisamaj.com accessed on 01-05-2012

8.www.raigad.nic.in accessed on 15-07-2012

# परिशिष्टे

# अनुक्रमणिका

१. आगळे हितबोध पत्रिका — १९०६

२. शब्दसूची

३. प्रश्नावली

अ. आर्थिक बदल

ब. शैक्षणिक बदल

क. सामाजिक बदल

४. प्रश्नावली भरुन देणाऱ्यांची प्रातिनिधिक नावे

५. मुलाखतीची प्रश्नावली

६. मुलाखत देणाऱ्यांची प्रातिनिधिक नावे

७. आगरी आणि कोळी समाजाचे आधिक्य

असणाऱ्या गावांची नावे

८. पारंपरिक आगरी गीते

९. पारंपरिक कोळी गीते

१०. छायाचित्रे

# आगळे हितबोध पत्रिका

# १९०६

आगळे हितबोध

[१ ले] चैत्र-शके १८२९ [अंक १ ला.

# सभा पहिली.

## आगळेज्ञातीची पहिली परिषद

(कल्याण ता. ४ नोव्हेंबर सन १९०६ रविवार)

कुलाबा व ठाणें जिल्ह्यांतील बहुतेक लहान मोठया गांवीं फार प्राचीन काळापासून आगळेज्ञातीची वस्ती सर्वत्र पसरली आहे. ज्ञातीचा मूळचा धंदा शेतकी, बागाईत व मीठ पिकविणें असा आहे. तरी या ज्ञातींत अलीकडे बरेच लोक सुशिक्षीत झाल्यामुळें ग्रंथकार, इंजिनीअर, सर्व्हेअर, 'ड्राफ्टमन' डाक्टर, क्लार्क, कंपाझिटर, मेस्त्री, कॉन्ट्रॅक्टर, फीटर, लोहार, सुतार वगैरे अनेक प्रकारच्या धंद्यांत बरेच लोक प्रवीण झाले आहेत. तथापि निरनिराळ्या स्थळीं सुशिक्षित व पुढारी लोक कोणकोण व कोठें आहेत, याची माहिती होण्याचें साधन नसल्यामुळें एकमेकांच्या ओळखी व परिचय होत नाहीं हें निराळें सांगावयास नको. या कारणानें निरनिराळ्या ठिकाणचे लोक एकत्र मिळाल्यानें परस्परांच्या अनायासें ओळखी होतील व आपल्या ज्ञातींत ज्या

कांहीं अनिष्ट चालीरीति असतील त्यांची सुधारणा करतां यावी या हेतूनें तालुके भिवंडी पैकीं मुक्काम कोन येथील रा० हरी सडू म्हात्रे नामक एका ज्ञातीहितचिंतक गृहस्थानें गेल्या अश्विन म. त्यांत ठाणें व कुलाबा जिल्ह्यांतील निरनिराळया ठिकाणच्या त्यांस माहित असलेल्या गृहस्थांकडे आमंत्रणपत्रिका पाठविल्या व त्यांत "तारीख ४ नोव्हेंबर सन १९०६ रविवार रोजीं मुक्काम कल्याण येथें विठ्ठलवाडीच्या देवळांत आगरीज्ञातीची एक जाहीर सभा भरणार आहे सबब त्या सभेस सर्व ठिकाणच्या ज्ञातबांधवांनीं यावें" अशी विनंती केली होती. त्याप्रमाणें सदर भिवंडी, इगतपुरी, पाणजू, शहापूर, वसई, बदलापूर, नेरळ, कल्याण, मुंबई, पनवेल पेण, अलीबाग, हाशीवरें, रांजणखार, वगैरे सुमारें ३०।३५ तालुक्यांतील ७०।७५ गांवचे बरेच पुढारी गृहस्थ सदर सभेस मुद्दाम आले होते. या सभेस मुंबईतील रा० शिवराम वामनजी पाटील, रा० मंगळराव रामजी म्हात्रे, रा० गोविंद मोरो धर्ळेकर, शंकरराव बापुजी साळवी, अनंतराव माणिकजी पाटील, रा० नथुजी चवरकर पाटील, रा० विठ्ठलराव महादेव पाटणे फर्स्टक्लास इंजीनीअर, देवजी रामजी विरले, रा० लक्ष्मणराव सारंगीवाले, बाळोबा नथुजी गायंद, वगैरे बरीच पुढारी मंडळी मुद्दाम कल्याण येथें सभेस गेली होती. सभेस मंडळी एक हजारावर जमली होती. सभेच्या कामास दुपारीं दोन वाजतां सुरवात झाली. प्रथम बदलापुरचे परशुरामजी भोपी यांनी "आजच्या सभेचें अध्यक्षस्थान लोकप्रिय रा. मंगळराव रामजी म्हात्रे यांनीं स्वीकारावें" अशी सूचना सभेपुढें आणली. परंतु रा० मंगळराव रामजी म्हात्रे म्हणाले कीं, "आजच्या सभेंत मजपेक्षां अधिक वयोवृद्ध व अनुभविक असे दुसरे बरेच सद्‌गृहस्थ हजर आहेत

३-ए३ (५)

सबब त्यांपैकीं एखाद्यास व मुख्यत्वेंकरून, रा. गोविंद मोरोबा कार्लेकर अगर तुकाराम धर्माजी मोकळ यांपैकीं कोणा एकास अध्यक्ष नेमल्यास ठीक पडेल." यावरून रा. हरी सदु म्हात्रे यांनीं "आजच्या सभेनें अध्यक्षस्थान रा. गोविंद मोरोबा कार्लेकर यांनीं स्वीकारावें" अशी सूचना केली व तिला साईचे पदू पाटील यांनी अनुमोदन दिल्यावर रा. गोविंद मोरोबा कार्लेकर हे अध्यक्षस्थानीं विराजमान झाले. नंतर रा. हरि सदू म्हात्रे यांनीं आजची सभा भरविण्याचें कारण सांगून आगळे ज्ञातीची स्थिति, तिजमधील कित्येक अनिष्टकारक चाली रीति, त्या सुधारण्याची आवश्यकता, ज्ञातीच्या माहितीचें एखादें पुस्तक छापण्याची आवश्यकता इत्यादि गोष्टींचें मार्मिक रीतीनें वर्णन केल्यावर रा. परशुरामजी मोपी यांनींही ज्ञातीतील कित्येक वाईट चालीरीतींचें विवेचन करून त्या सुधारण्याविषयीं उत्तम बोध केला. नंतर साईचे पदू पाटील यांनीं आगळे ज्ञातीची उत्पत्ती ययाती राजापासून अर्थात् क्षत्रीयकुलोत्पन्न असून पूर्वीचे व अद्यापही कित्येक ठिकाणचे आगळे लोक शुद्ध सोंवळ्यानें वहिवाट करीत असतात. पण अलीकडे बऱ्याच ठिकाणचे लोक आपली मूळची स्थिति विसरून मद्यमांसाहारादि धर्मबाह्य आचारविचार करूं लागले आहेत, हें ठीक नाहीं. मद्यपानादि अनिष्ट चाली बंद करून शिक्षणप्रसार ज्ञातींत अवश्य केला पाहिजे, वगैरे अनेक विषयांवर फारच मुद्देसूद भाषण केलें. नंतर रांजणखारचे रामजी नावजी म्हात्रे यांनी झालेली एकंदर भाषणें ज्ञातीच्या फारच हिताचीं असल्यानें प्रत्येक ज्ञातीगृहस्थानें या गोष्टीचा अवश्य विचार करून त्या प्रमाणें आपल्या ज्ञातींत सुधारणा केलीच पाहिजे. असा मोठ्या उत्साहानें व आवेशानें बोध केला. नंतर रा. मंगळराव रामजी म्हात्रे

यांनी आपल्या ज्ञातींत अद्याप बऱ्याच ठिकाणीं विद्याप्रसार मुळींच नसल्याकारणानें त्यापासून कसे कसे वाईट परिणाम होतात हें सांगून आपल्या ज्ञातींत आपल्या मुलांस फुकट शिक्षण मिळण्याकरितां ठिकठिकाणच्या सुशिक्षित ज्ञातीगृहस्थांनीं आपापल्या गांवीं शाळा काढून फुकट शिक्षण देण्याचा क्रम सुरू करावा. तसेंच मद्यपानाचा प्रघात, अवश्य बंद करावा असें कळकळीचें भाषण केलें; नंतर रा. पदू पाटील यांनीं आपल्या ज्ञातीला लाभ व उपयोग या निमित्त सरकाराकडे [illegible] कोणकोणत्या मागण्या करावयाच्या, त्यांचें टांचण वाचल्यावर शेवटीं अध्यक्ष गोविंद मोरोबा कार्लेकर यांनीं झालेल्या एकंदर भाषणावर योग्य टीका करून अशा प्रकारची परिषद वर्षांतून निदान २–३ वेळा तरी निरनिराळ्या ठिकाणीं भरत गेल्यास कसकशा सुधारणा झाल्या पाहिजेत याचा विचार करण्यास ठीक पडेल वगैरे भाषण करून आलेल्या सर्व मंडळीचे आभार मानल्यावर दुसरी सभा ता. १८ नोव्हेंबर सन १९०६ रविवार रोजीं मुक्काम ठाणें येथें कोपूरतळ्यावर भरण्याचें ठरलें. नंतर आलेल्या मंडळींस पानसुपारी, चहा झाल्यावर सभेचें काम आटोपलें.

---

## सभा दुसरी.

# आगळेज्ञातीची दुसरी परिषद.

(ठाणे, ता. १८ नोव्हेंबर सन १९०६ रविवार)

वरील कल्याण येथील परिषदेंत ठरल्याप्रमाणें ता. १८ नवंबर १९०६ रोजीं ठाणें येथें कोपुरतळ्यावर आगळेज्ञातीची

पूर्वीपेक्षां अधिक मोठी सभा भरली होती. या सभेस ठाणें व कुलाबा जिल्ह्यांतील शाहपूर, कल्याण, बदलापूर, अलिबाग व मुंबई वगैरे निरनिराळ्या ठिकाणाहून दीड हजारांवर ज्ञातिगृहस्थ जमले होते. सभेचें काम १ वाजतां सुरुं झालें, मुंबईकरही मंडळी तेथें गेली होती. मु० पाणजू ता॰ वसई येथील मुकुंदराव धर्मनशेट यांस अध्यक्ष नेमिलें. मु० कोन येथील रा. रा. हरी सदु म्हात्रे यांनी निबंध वाचून ज्ञातीचा सार्वजनिक फंड व लग्नकार्यांतील काटकसर या विषयांवर मुद्देसूद भाषण करून दोन ठराव सभे पुढें मांडून ते सर्वानुमतें पास करण्यांत आले. ज्ञातींत मद्यपान करूं नये अशाबद्दलचे नियम करून त्यावर मंडळीच्या सह्या घेण्यांत आल्या. लक्ष्मण तुकाराम पाटील. मु. करंजें, विठुजीराव पिसाळ, मु. नांदुळ, लक्ष्मण गोविंद पाटील, मु. वाघरान, ह्या मंडळींनीं मद्यपान निषेध, ज्ञातीची सुधारणा व शिक्षणप्रसार, ह्या विषयांवर मुद्देसूद भाषणें केलीं. रा. रा. गोविंद मोरोबा कार्लेकर यांनीं अशाच तऱ्हेनें ज्ञातीच्या सभा भरविण्याची अवश्यकता व त्यापासून होणारे फायदे, व त्यायोगें वाढणारें ऐक्य इत्यादिकांवर उत्तम कळकळीचें भाषण केलें. रा. रा. शिवराम वामनजी पाटील यांनीं सभेंत पास झालेले ठराव स्वतःच्या खर्चानें छापून ज्ञातबांधवास पाठविण्याचें उदार बुद्धीने कबूल केलें। रा. रा. विठु नाना म्हात्रें यांनीं सार्वजनिक फंडास १० दहा रुपये दिले. व इतरांनींही आपलीं नांवे देऊन नंतर पाठवून देण्याविषयी अभिवचन दिलें. त्यानंतर सभेचें काम आटोपलें.

या सभे संबंधी सर्व खर्च व व्यवस्था बाळखुपचे रा. नारायण सदू म्हात्रे पाटील यांनी उत्तम प्रकारें ठेविली हें त्यांस मोठें भूषण आहे.

सभा तिसरी

# आगळेज्ञातीची जाहीर सभा

(भायंदर-घोडदेव ता. २ दिसेंबर सन १९०६ रविवार.)

ता. २ दिसेंबर सन १९०६ रवीवार रोजीं दुपारीं दोन वाजतां बी० बी० सी. आय. रेल्वेच्या भायंदर स्टेशननजीक घोडदेव येथें भायंदर व बोरवली टप्याच्या १४ गांवच्या आगळेज्ञातीची एक सभा पाणजूचे रा. मकुंद धर्मन भोईर यांनीं मुद्दाम बोलाविली होती. त्यावरून त्या पट्टींतील सुमारें चार पांचशें मंडळी सभेस हजर झाली होती. तिकडील मंडळीस बोध करण्याकरीतां मुक्काम पाणजू येथील रा० मकुंदराव धर्मन भोईर यांनीं मुंबईकरांस मुद्दाम बोलाविलें असल्यामुळें मुंबईहून रा० गोविंद मोरोबा काळेकर, रा० नथुजी महादेव चवरकर पाटील, बाळोबा नथुजी गावंड व शिवडीहून रा० शिवराम वामनजी पाटील हे मुद्दाम सभेस गेले होते.

प्रथम रा० शिवराम वामनजी पाटील यांनीं आजच्या सभेचें अध्यक्षस्थान रा० गोविंद मोरोबा काळेकर यांनीं स्वीकारावें अशी सुचना केली व तिला सर्वांनीं अनुमोदन दिलें. त्यावरून रा० गोविंद मोरोबा काळेकर यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारीलें. नंतर प्रथम रा० बाळोबा नथुजी गावंड यांनीं कल्याण व ठाणें येथील दोन सभांची दीनबंधुंत आलेली हकीकत सर्व मंडळीस वाचून दाखवून त्या सभेंत झालेल्या नियमाप्रमाणें सर्वांनीं वागावें असा मंडळींस कळकळीचा बोध केला; नंतर शिवडीचे रा० शिवराम वामनजी पाटील यांनीं आगळेज्ञातीची माहिती

लोकांची पूर्वीची व हल्लींची स्थीति, त्यांच्यांतील कांहीं वाईट चालीरिती यांची माहिती, लोकांत एकीची आवश्यकता व तिज-पासून होणारे फायदे, मद्यपानापासून शरीरावर कसकसे वाईट परीणाम होतात त्याची डाक्तरी शोधाप्रमाणें फारच सुबोधदार माहिती या पुढें एकंदर ज्ञातबांधवांनीं मद्यपान, व्यभीचार अधीक बायका करणें, जुगार, तंटे इत्यादी दुर्व्यसनांचा त्याग करून सर्वांनीं मित्रभावानें वागावें व पूर्वी दोन सभांत वागणुकी-विषयीं ठरलेल्या नियमांत आणखी जास्त सुधारणा केलेले नियम, इत्यादी बाबतींविषयीं फारच मार्मिकतेनें शोधपूर्वक लिहिलेला असा एक बोधपर निबंध मुद्दाम लिहून आणलेला होता तो सर्व मंडळीस वाचून दाखविल्यावर त्याप्रमाणें सर्व ज्ञातबंधूनीं वागावें असा फारच कळकळीचा बोध केला. नंतर नवघर पाखाडीचे रा. धारू सोवार पाटील यांनीं बोरवली टप्याच्या १४ गांवांतील मंडळीच्या वागणुकीविषयीं फारच चांगले नियम लिहून आणले होते, ते त्यांनीं सर्वांस वाचून दाख-विले. नंतर यावर सर्व ज्ञातबंधूनीं मद्यपान सोडावें, शिक्षणाचा प्रसार करावा व वरील व्यसनापासून दूर रहावें, असे ठराव सभेपुढें मांडल्यावर त्याप्रमाणें वागण्याविषयीं सर्वांची मंजुरी मिळविली. रा. बाळोबा गांवड व नथुजी भरकर पाटील यांनीं मंडळीस सांगितलें कीं, सर्वांनीं आज टाळ्या वाजवून झालेल्या ठरावा प्रमाणें वागण्याविषयीं मंजुरी दिली आहे तरी ती येथल्या पुरतीच न समजतां ईश्वरास भिवून सर्वसाक्षी ईश्वर सर्वांस पहात आहे हें सर्वांनीं पूर्णपणें लक्षांत ठेवून त्याप्रमाणें सर्वांनी वागावें असा बोध केला. शेवटीं अध्यक्ष रा. गोविंद मोरोबा कार्लेकर यांनीं वरील एकंदर बाबतींविषयीं मंडळीस पुनः बोध करून त्याप्रमाणें

सर्वांनी वागावें आणि अशा जातीच्या जाहीरसभा वर्षांतून निदान ३।४ वेळ भरविल्यास निरनिराळ्या ठिकाणच्या ज्ञातबांधवांच्या आनायासें ओळखी होऊन, सर्वांत ऐक्य व प्रेमभाव उत्पन्न होईल व आपल्या ज्ञातींत कसकशा सुधारणा झाल्या पाहिजेत याचा विचार करण्यास सांपडेल असें सांगितलें. नंतर सर्व मंडळीस चहा, पानसुपारी झाल्यावर सभेचें काम आटोपलें.

या सभेची सर्व व्यवस्था पाणजूचे रा. मुकुंदराव धर्मन मोयीर ह्यांनीं स्वतः मेहनत घेऊन उत्तम प्रकारें ठेविली हें त्यांस मोठें भूषण आहे ते चांगले सधन व समंजस असल्यामुळें यापुढें ज्ञातीच्या हितासाठीं मनापासून मदत करतील अशी सर्व ज्ञातीस मोठी आशा आहे. व त्याप्रमाणें ते करतील यांत संशय नाहीं.

---

सभा चवथी

# आगळेज्ञातीची जाहीर सभा

## (भिवंडी-आवळपारा ता. २३ दिसेंबर १९०६ रविवार)

कल्याण स्टेशनाहून भिवंडीच्या रस्त्यानें सुमारें ९ कोसांवर मुक्काम आवळापारा येथें तारीख २३ दिसेंबर सन १९०६ रविवार रोजीं तिकडील ज्ञातीगृहस्थांस बोध करण्याकरीतां रा. बाळा बाऊ पाटील यांनीं पुष्कळ मेहनत व खटपट करून तिकडील आगळे ज्ञातीची एक जाहीरसभा मुद्दाम बोलाविली होती व त्यावेळीं तेथील लोकांस बोध करण्या करितां मुंबईतर्फे शिवडी येथील रा. शिवराम वामनजी पाटील यांस मुद्दाम आगाऊ आमंत्रण असल्यामुळें ते मुद्दाम त्या सभेस गेले होते. सभेस सुमारें १०० वर मंडळी

जमली होती प्रथम रा. बाळा धाऊ पाटील यांनीं आजच्या सभेचें अध्यक्षस्थान रा. शिवराम वामनजी पाटील यांनी स्वीकारावे अशी सुचना केली पण रा. शिवरामजी म्हणाले मजपेक्षां अधीक पोक्त व वयोवृद्ध असा एखादा इकडील गृहस्थ अध्यक्ष नेमावा असें माझें मत आहे. यावरून मिरडीकडील रा. गणेश बाळकृष्ण चौधरी या पोक्त गृहस्थास अध्यक्ष नेमिलें. नंतर रा. दूदू हरी पाटेल हे म्हणाले कीं या भागांतील कांहीं ज्ञातीगृहस्थ ज्ञात सुधारणेकरितां कायम झालेले ठराव पाळण्याची हयगय करितात सबब त्यांस उपदेश करण्याकरीतां आजची ही सभा मुद्दाम बोलाविली आहे. नंतर रा. बाळा धाऊ पाटील यांनीं हिंदुधर्ममताप्रमाणें मद्याची उत्पत्ति व त्यामुळें राक्षसादिकांत कलह होऊन कसकसे अनर्थ घडले याचें चांगल्या चटकदार रीतिनें वर्णन करून जर सांप्रत आपणातही तसे कलह लागून संसार व्यवहाराचा व कुटंबाचा नाश करून घेणें नसेल तर प्रत्येकानें मद्यपान अवश्य सोडावें असा कळकळीनें बोध केला. नंतर रा. शिवराम वामनजी पाटील यांनीं मद्यपानापासून होणारे अनेक तोटे व त्यापासून पिणारांच्या शरीरावर, लोकांवर व देशावर घडणारे वाईट परिणाम यांचें चांगलेंच चित्र तेथील लोकांच्या मनावर ठसविलें व जातीनें पसंत केलेल्या ठरावांच्या प्रती ( ज्या शिवरामजी हे स्वखर्चानें छापून सर्व ठिकाणच्या ज्ञातीगृहस्थांस पाठवित आहेत,) त्या तेथील मंडळीस वांटून ते ठराव करण्याची कारणें व त्यापासून होणारे फायदे सभेस समजावून दिले व मंडळीनें ते ठराव पसंत केल्यावर त्यावर सर्वांच्या सह्या घेण्यांत आल्या..

नंतर सर्व मंडळींस भोजनपानसूपारी झाल्यावर सभेचें काम आटपलें.

या सभेसाठीं रा. शिवराम वामनजी पाटील यांनीं भिवंडीहून येथ-पर्यंत जाण्याचा बराच त्रास सोसला व मंडळीस उपदेश करण्याची वरीच मेहनत घेतली हें त्यास मोठे भूषण आहे. ज्ञातीच्या सुधारणे करितां स्वतः खर्च व कष्ट सोसून मेहनत घेण्यांत हे नेहमीं तत्पर असतात. हें त्यांचें उदाहरण पाहून तरी मुंबईंतील सधन व सुखी लोक ज्ञातसुधारणेचें काम मनांवर घेतील काय? वरील सर्व मंडळीस बोलावण्याची व भोजन वगैरे खर्चाची सर्व खटपट रा. बाळा धाऊ पाटील यांनीं केली होती असें समजतें व तसें अस ल्यास तेही स्तुतीस पात्र आहेत यांत संशय नाहीं.

---

## सभा पांचवी.

# आगळेज्ञातीची तिसरी मोठी परिषद

## (वासींद—भातसई ता. १७ मार्च १९०७ रविवार)

वरील आर्वळापारा येथें रा. रा. बाळा धाऊजी पाटील यांनी पुढील तिसरी परिषद् शहापुराकडे भरवावी म्हणजे तिची सर्व व्यवस्था आपण मोठ्या खुशीनें ठेवूं अशी इच्छा दर्शविली होती. त्याप्रमाणें त्यांनीं निरनिराळ्या ठिकाणच्या सुमारें चाळीस पुढारी गृहस्थांस नांवें सभेस येण्याबद्दल पत्रेंही पाठविलीं होतीं पण अशानें काळ-जीपूर्वक मंडळी जमणार नाहीं असें परिषदेच्या पुढाऱ्यांस वाटून तत्संबंधी आमंत्रणचिठ्या छापून सर्वत्र पाठविण्याची योजना केली त्याप्रमाणें जी. आय. पी. रेलवेच्या नाशीक लाईनीवरील वासींद स्टेशनानजीक मुक्काम भातसई येथें अधिक चैत्र शु. ३ शके १८२९ ता. १७ मार्च सन १९०७ रविवार रोजीं आगळे ज्ञातीची मोठी

परिषद् भरली होती. तेव्हां तेथें सदर्हू परिषदेला मुंबई, शिवडी, माटुंगा, कुरला, ठाणें कल्याण, भिवंडी, कर्जत, शहापूर, इगतपुरी, नाशिक, येवलें, अहमदनगर, उरण, पेण, पनवेल, माथेरें. करंजे, शाहाबाग, हाशिवरें, वासी, वापरान, मांडवे, झिराट, अलीबाग, वगैरे शेंकडों गांवची मिळून सुमारें तीन हजारांवर मंडळी जमली होती. निरनिराळ्या ठिकाणच्या एकाच ज्ञातीचा एवढा मोठा समुदाय कोठें क्वचितच जमला असेल. परिषदे करितां शिवडीहून आपल्या वडिलांसह रा. रा. शिवराम वामनजी पाटील तसेंच रा. रा. काशिनाथ नारायणजी वगैरे मंडळी आणि मुंबईकरांच्या तर्फेनें रा. रा. मंगळराव रामजी म्हात्रे, गोविंद मोरोबा काळेकर, नथुजी चवरकर. बाळोबा नथुजी गावंड, लक्ष्मणराव सारंगीवाले, कमळोजी सांबटकर, भाऊ भास्करजी व रामचंद्र नारायण म्हात्रे, मसनाजी शेट, आनंतराव व चिंतामण सेरमकर, गोविंदराव पाटील, देवजी रामजी, विठ्ठलराव घाटगे, गोविंद बुधाजी वगैरे बरीच मंडळी गेली होती सभेच्या कामास दुपारीं दोन वाजतां सुरवात झाली. अध्यक्ष स्थानीं रा. रा. काशिनाथ नारायणजी शिवडीकर यांची योजना झाल्यावर रा. रा. शिवराम वामनजी पाटील ह्यांनी सदर परिषद् भरविण्याचा उद्देश सर्वांस कळवून, आगळें ज्ञातीची योग्यता व उद्योग यांचें दिग्दर्शन केलें. नंतर आपल्या ज्ञातीचे बरेच लोक सतत उद्योगी असतांही ते गरीब स्थितींत असतात ह्याचें मुख्य कारण मद्यपान व लग्नकार्यांतील फाजील खर्च व शिक्षणाचा अभाव हेंच होय असें सांगून मद्यपानाच्या योगानें शरीरावर कसे कसे आपाय घडतात त्याचें उत्तम रीतीनें विवेचन केलें नंतर मद्याची निंद्यता, त्याचा दुष्ट पराक्रम, त्यायोगें होणारी संसाराची हानि इत्यादी गोष्टींचें सुमारें दोन तासपर्यंत मुद्देसूद, जोरदार

भाषण करून त्यांनी विवेचन केलें पुढें आतां यापुढें तरी ज्ञातबंधूंनीं मद्यपान न करितां सर्व दुर्व्यसनांपासून दूर रहावें शिक्षणप्रसार करावा, फाजील खर्च करूं नये वगैरे अनेक बाबींच्या संबंधीं मोठ्या कळकळीचा उपदेश केला आणि कायम झालेले ठराव ( हे ठराव या अंकांत पुढें छापिलें आहेत ) वाचून त्या ठरावांच्या प्रती मंडळीस वांटल्या व त्यांच्या सह्या घेतल्या नंतर रा. रा. गोविंद मोरोबा कार्लेकर, लक्ष्मण तुकाराम पाटील, रामजी नावजी म्हात्रे, हरि सोमा मुकादम वगैरे मंडळींचीं ज्ञातीची प्राचीन माहिती, तिची योग्यता, मद्यपाननिषेध, शिक्षणप्रसार, ज्ञातीच्या सुधारणेचे उपाय इत्यादि विषयांवर मोठ्या कळकळीचीं, मुद्देसूद, जोरदार भाषणें झाल्यावर सर्व मंडळीनें यापुढें मद्यपान करावयाचें नाहीं असा निश्चय केला. त्या वेळचा मंडळीचा आवेश, उत्साह व कळकळ पाहून वनवेलतर्फे त्या ज्ञातबंधूंची सुधारणा करावी या हेतूनें अशीच एक परिषद् आपल्या नावडे गांवीं भरावी म्हणजे तिची व्यवस्था व खर्च आपण करूं अशी इच्छा नावाड्याचे प्रसिद्ध लोकप्रिय रा. रा. काळूशी हालुजी पाटील नावडेकर ह्यांनीं भर सभेंत जाहीर केली आणि त्यावरून पुढें सुमारें एक महिन्यानें नावडें येथें एक मोठी परिषद् भरवावी असा मंडळीचा विचार झाला.

इतकें काम झाल्यावर जमलेल्या सर्व मंडळीस रा. रा. बाळा धाऊ पाटील यांनीं भोजन घातलें. नंतर रात्रीं आठ वाजतां रा. रा. शिवराम वामनजी पाटील ह्यांनीं मंडळीच्या करमणुकीसाठीं मुद्दाम आणलेला आपला मॅजिक लँटर्नचा खेळ मंडळीस दाखविण्याची सुरुवात केली त्यामध्यें फारच मनोवेधक व हास्यकारक असे गमतीचे देखावे बरेच असून शिवाय दारूबाज लोकांच्या हाल


अपेष्टा व फटफजीती; दारूच्या योगानें काळीज, फुप्फुस व जठराग्नि यांवर अनिष्ट परिणाम घडून शरीरावर कसकसे अपाय होतात यां संबंधाही बरेच देखावे होते आणि ते दाखवीत असतां रा. रा. शिवरामजी पाटील हे मधून मधून मद्यपान न करण्याविषयीं बोधपर भाषण आणि उपदेश करीत होते. अशारीतीनें रात्री बारा वाजेपर्यंत हारमोनियम व तबल्याच्या ठेक्यावर खेळाचें काम चालल्यावर रा. रा. बाळ्या धाऊ पाटील ह्यांनीं सर्व मंडळीस पान सुपारी व अत्तरगुलाब वाटल्यावर समारंभ आटोपला.

सदर्हू परिषदेचे वेळीं आलेल्या सर्व मंडळींची योग्य बरदास्त ठेवून सुग्रास भोजन घालण्याकरितां रा.रा. बाळ्या धाऊ पाटील यांनीं बराच खर्च आणि मेहनत केली. तसेंच रा. रा. शिवराम वामनजी पाटील ह्यांनीं सुमारें पंधरा दिवसपर्यंत सारखी मेहनत करून शिवाय परिषद्प्रीत्यर्थ बराच खर्च केला आणि यापुढेंही ते ज्ञातीच्या सुधारणेकरिता मेहनत घेण्यास तयार असून त्यांचे वडील रा. रा. वामनजी पाटील हेही त्यांस अनुकूल आहेत याबद्दल त्यांचे सर्व ज्ञातीवर महदुपकार होत आहेत. यांचे उभयतांखेरीज रा. रा. मंगळराव रामजी म्हात्रे व नथुजी महादेव धुवरकर यांनीं आमंत्रणचिठ्या छापण्याचा खर्च केला; रा. रा. नारायण हरी म्हात्रे ह्यांनीं स्वतःची किटसन लाईटची बत्ती परिषदेच्यावेळीं लावण्यास पाठविली आणि गोविंदराव पाटील यांनीं हार्मोनियमची पेटी आणविली आणि चिंतामण सेरमकर यांनीं खेळ होईपर्यंत हार्मोनियम उत्तम प्रकारें वाजविण्याची तसदी घेतली आणि देवजी रामजी विरळे ह्यांनीं आपला फोनोग्राफ परिषदेंत आणला होता, अशा अनेक बाबतींचे संबंधानें वरील मंडळीनें परिषदेच्या कार्यास हातभार लाविला त्याबद्दल त्यांचे आणि जमलेल्या सर्व मंडळीचे आभार मानीले पाहीजेत.

---

ठाणें येथील परीषदेंत कायम झालेले

# ज्ञातीच्या वहिवाटीचे ठराव.



समस्त शुद्ध आगळे ज्ञात गंगाकाशी प्रांत उत्तर कोंकण जिल्हे—मुंबई, ठाणा, कुलाबा, नाशिक असे एकमत होऊन खालीं लिहिल्याप्रमाणें ठराव पसंत करून कायम केले आहेत, त्याविरूद्ध कोणीही वागूं नये; विरुद्ध वागणारानें पंचवीस रुपये पर्यंत रुपये जातगंगेच्या फंडांत द्यावे लागतील व त्यास गुन्हा केल्यापासून रुपये देई पर्यंत अपंगत ठेविलें जाईल.

## लग्नाच्या खर्चाचे ठराव.

१। साखरपुडा सव्वा रुपया.

२० मुलीच्या बापास घेणें असल्यास तांदुळासुद्धां वीस रुपये.

५ जातीस पांच रुपये.

५ सावर्धन पांच रुपये.

८॥ नवरीस वस्त्रें साडे आठ रुपये.
३० दागिने(देज घेतलें असल्यास रु. तीस.
२। ब्राह्मणास दक्षणा सव्वादोन रुपये .
( मुलाकडुन १॥ रुपया व मुली
कडून ।।।० )
१॥ जातगंगेस ( मुलाकडून एक रुपया
व मुलीकडून.॥.
।।।० पाटलांचे बैठकी बद्दल बारा आणे.
पाटाचे खर्चाचे ठराव.
१० पुर्वीचे घरच्या वारसास पूर्वी देज
दिलें असल्यास दहा रुपये.
१० नवरे मुलीस घेणें असल्यास दहा रु.
५ जातीस पांच रुपये.
५॥ नवरीस वस्त्रें साडेपांच रुपये.
२५ दागिने देज घेतलें असल्यास पंचवीस रु.
१। ब्राह्मणास दक्षणा सव्वा रुपया.
१ जातगंगेस

( २ ) कोणाही जातगृहस्थानें दारू किंवा ताडी पिऊं नये व जुगार खेळूं नये. आमंत्रण असल्या खेरीज कोणी कोणाचे घरीं कार्यी प्रयोजनीं जाऊं नये. नुसतें आमंत्रण असल्यास एकाच मनुष्यानें जावें. सर्व मंडळीस बोलाविलें असल्यास सर्वांनीं जावें या

विरुद्ध वागणुकीचा कोणी कोणावर पुरावा करून दि-
ल्यास गुन्हेगारास व्रर दर्शविलेली सजा केली जाईल
व पुरावा देणारास पांच रुपये बक्षीस दिलें जाईल.

(३) व्यभिचार करण्याची आपले जातींत सक्त मनाई
आहे. व्यभिचार करणारास जातींतून अपंगत ठेविलें
जाईल व त्याबद्दल पुरावा करून देणारास दहा रुप
ये पर्यंत बक्षीस दिलें जाईल.

( ४ ) कोणाही जातगृहस्थानें एकी पेक्षां अधिक
बायका करूं नये. लग्न होऊन बरींच वर्षे मूलबाळ
होत नसल्यास किंवा बायको हमेशा आजारी असल्या-
स जातीस तसें कळवून जातीच्या हुकमानें दुसरी
बायको करावी. विनाकारण एकीपेक्षां अधिक बाय-
का करणारास गुन्हेगार ठरवून पंचवीस रुपयांवर
रुपये जातीचे फंडांत द्यावे लागतील.

(५) वयांत आलेली नवरा असलेली स्त्री कोणीही
आपले कडे दहा दिवसां पेक्षां अधिक दिवस ठेऊं
नये, तीस नवऱ्याकडे पोंचती करावी व ती वाई ऐक
त नसल्यास जातीस कळवावें. कोणाची स्त्री किंवा
मुलगी वाईट चालीची निघाल्यास किंवा ती कोठें
निघून गेल्यास तिच्या बद्दल बातमी त्यांनीं जातीस
दिलीच पाहिजे. हा नियम मोडणारास पंचवीस
रुपयांवर रुपये जातीचे फंडांत द्यावे लागतील.

# मासिक पुस्तकाची आवश्यकता आणि त्याचा हेतु व स्वरूप.

प्रिय ज्ञातबांधवहो, ठाणे व कुलाबा जिल्ह्यांतील बहुतेक लहान मोठ्या गांवीं प्राचीनकाळापासून आपल्या ज्ञातीची वस्ती सर्वत्र पसरली आहे. तरी सर्व लोक आपापल्या उद्योगांत गुंतले असल्यामुळें आपणांत सभ्य व सुशिक्षित, उद्योगी व कामदार, लोक कोठें कोण कोण आहेत, हें समजण्याचें व सर्वांच्या एकत्र भेटी होऊन परस्परांच्या ओळखी व परिचय होण्याचें साधन आपणांत मुळींच नाहीं. तसेंच आपणांतील बऱ्याच ठिकाणच्या लोकांत विद्येची गोडी व शिक्षणप्रसार नसल्याकारणानें आपणांत कित्येक अपायकारक चालीरीति व दुर्व्यसनें हीं बऱ्याच काळापासून जडलीं गेल्यामुळें आपले लोक रात्रंदिवस काबाडकष्ट करीत असतांही बहुतेक लोक गरीब स्थितींतच राहून, कित्येक लोकांस तर वेळेवर पोटभर अन्न देखील मिळण्याची अडचण पडते. तरी अलीकडे आपणांतील कांहीं सुशिक्षित व सभ्य लोकांच्या लक्षांत आपल्या ज्ञातीची दैनावस्था येऊन ते ज्ञातीची सुधारणा करण्याच्या खटपटीस लागले आहेत, हें ज्ञातीच्या उदयाचें सुचिन्हच समजलें पाहिजे.

सांप्रत आपल्या एकंदर ज्ञातीची सुधारणा करून ती सुखी व ज्ञानी करावी असें बहुतेक लोकांस वाटूं लागलें आहे. सबब मी सर्व ज्ञातबांधवांस असें कळवितों कीं, जर

सुज्ञांस ज्ञातीची सुधारणा करून त्यांस सुमार्गास लावणें असेल तर दहा पांच सभा भरवून तेथें केवळ तोंडानें लोकांस बोध केल्यानें ज्ञातीची सुधारणा होणार नाहीं. जर खालीं लिहिल्याप्रमाणें उद्योग चालू होईल तर मात्र ज्ञातीची लौकरच चांगली सुधारणा होईल यांत संशय नाहीं. व जर आपण सर्व ज्ञातबांधव उदारमनानें ज्ञात्याभिमान व ज्ञातीची कळकळ बाळगून या परोपकाराचे कामीं शक्त्यनुसार मदत कराल तर मी पुढें लिहिल्याप्रमाणें ज्ञातीची सेवा करण्यास तयार आहें.

ज्ञातीची सुधारणा करण्यास कसकसा उद्योग केला पाहिजे.

१ प्रथम ज्ञातीला विद्या व नीतीज्ञानाचा बोध करून देणारें एक लहानसें मासिकपुस्तक दरमहा छापून त्याचा सर्व ठिकाणच्या ज्ञातबांधवांत प्रसार केला पाहिजे. सबब असें एक पुस्तक दरमहा तयार करून छापण्यासही मी तयार आहें. व तसें करून आपल्या पुढें लिहिल्याप्रमाणें ज्ञातहिताचीं कामें चालू झालीं पाहिजेत.

२ ठाणे व कुलाबा जिल्ह्यांतील लहान मोठ्या गांवीं फिरून गांवोंगांव लोकांच्या जाहिरसभा भरवून मद्यपान व इतर दुर्व्यसनांपासून होणारे तोटे, विद्या व शिक्षणप्रसाराच्या योगानें होणारे लाभ, आपणांतील वाईट चालीरीति व त्या सुधारण्याचे उपाय, इत्यादि महत्वाच्या गोष्टींविषयीं लोकांस उपदेश केला पाहिजे.

३ ज्या ज्या गांवीं ज्ञातीच्या मुलांस विद्या शिकण्याची सोय नसेल त्या त्या ठिकाणीं तिकडील लोकांचे विचारानें व मदतीनें शाळेची सोय करून होतां होईल तो आपल्या ज्ञातींतील

लोकांस व शाळेंत मुलें शिकविण्याच्या कामावर नेमावें.

वरप्रमाणें उद्योग करून शिवाय या मासिकपुस्तकांत पुढें लिहिल्याप्रमाणें विषय सवडी प्रमाणें छापले जातील:

१ आपल्या जातीच्या प्राचीन स्थिती, वहिवाटी व वागणुकी-संबंधी निरनिराळ्या ठिकाणांहून जुने लेख, ताम्रपट, शिलालेख, सनदा व वृद्धमंडळीकडून मिळेल ती माहिती या पुस्तकांत छापली जाईल.

२ निरनिराळ्या शहरांत, गांवांत व खेड्यांत राहणाऱ्या आपल्या जातीच्या लोकांची हल्लींची स्थिति, वहिवाट व वागणूक कशी आहे, ठिकठिकाणचे गांवकऱ्यांनी आपापल्या पट्टींतील जातीच्या सोई व वहिवाटीकरितां कसकशा सोई व नियम केले आहेत त्यासंबंधी मिळेल ती माहिती छापावयाची; व आपणांतील निरनिराळ्या ठिकाणच्या श्रीमान, उदार व परोपकारी जातीगृहस्थांनीं जातीच्या सोईसाठीं अगर सार्वजनिक उपयोगासाठीं देवळें, धर्मशाळा, विहीरी वगैरे बांधल्या असतील त्यांची मिळेल ती माहिती नांवपत्त्यासह छापावयाची.

३ मुंबई, ठाणे, कल्याण, नाशिक, पेण, पनवेल, उरण, अलिबाग, रेवदंडा, नागोठणे, हपसाण अशा मोठमोठ्या प्रसिध्द गांवांपासून आपली जात राहत असेल अशा अनेक लहान मोठ्या गांवीं जाण्यायेण्यास त्या त्या ठिकाणाहून कोणकोणत्या बाजूनें कसकसे रस्ते व सोई आहेत व किती किती अंतर आहे, याची मिळेल तितकी माहिती द्यावयाची; म्हणजे त्यायोगें त्या त्या ठिकाणी जाण्यायेण्याची योग्य माहिती जातबंधूस होईल.

४ वरप्रमाणें मंडळी कोण कोणत्या गांवीं फिरून जातीच्या हितासाठीं कोणतीं कशीं कामें केलीं व लोकांची कशी मदत मिळाली त्याची माहिती या पुस्तकांत वेळोवेळीं छापली जाईल.

५ जातींतील शिकलेल्या लोकांत लिहिण्यावाचण्याची व भाषण करण्याची सवय वाढावी म्हणून ठिकठिकाणच्या सुशिक्षित जातीगृहस्थांकडून अनेक विषयांवर निबंध व लेख लिहून मागून ते त्यांच्या नांवासह या पुस्तकांत वेळोवेळीं छापावयाचे.

६ आपल्या जातींतील पूर्वीच्या व हल्लींच्या लोकमान्य प्रसिध्द, थोर, उदार व परोपकारी अशा जातीगृहस्थांचीं जीवन चरित्रें मिळतील ती छापावयाचीं; तसेंच आपल्या जातींत होणारे लग्नप्रयोजनादि; समारंभ, सभा, बैठकी व इतर उलाढाली होतील त्यासंबंधी कोणी माहिती लिहून पाठविल्यास तीही या पुस्तकांत सवडीप्रमाणें छापली जाईल.

वर प्रमाणें शुद्ध जातीसंबंधी खासगी बाबतीखेरीज पुढें लिहिलेले सार्वजनीक उपयोगाचे इतर विषयही या पुस्तकांत सवडीप्रमाणें दिले जातील.

७ निरनिराळीं तीर्थक्षेत्रें व यात्रांचीं वर्णनें, साधुसंतादि सत्पुरुषांचीं प्रेमळ व बोधपर चरित्रें, पुराणग्रंथ व इतिहासां-

तील मनोरंजक बोधपर कथा व गोष्टी, मननास व पठणास उप-योगी अशी साधुसंतांची पदें, अभंगादि केवळ व बोधपर कविता, मनोरंजक व बोधपर गोष्टी, नाटकें, फार्स, कहाण्या, चुटके तसेच कुटुंबांत अवश्य लागणाऱ्या सर्व साधारण रोगांवर खात्रीलायक, गुणकारी असे साधे व सोपे औषधीउपाय सृष्टि-चमत्कार, जगातील नवीन शोध, व उपयुक्त माहीती व्यवहारां-तील सुखदुःखांच्या अनेक गोष्टींसंबंधी उपयुक्त सल्ला मसलती इत्यादि महात्वाचे अनेक विषयही सवडीप्रमाणें या पुस्तकांत छापले जातील.

वरील हकीगतीवरून हें "आगळे हितबोध" पुस्तक किती महत्वाचें व जरूरीचें असून तें प्रत्येक ज्ञातबंधुस किती उपयोगी पडेल हें निराळें सांगण्याची जरूरी नाहीं.

ठाणे, कल्याण व भायंदर येथें झालेल्या जातीच्या सभा व तेथें ज्ञात सुधारणेविषयीं लोकांची दिसून आलेली कळकळ पाहून वरप्रमाणे उद्योग चालवून जातसेवा करावी अशी माझे मनांत प्रबळ इच्छा उत्पन्न झाली आहे. पण वरील काम शांत व रिकामपणाचें असून त्याला चांगलें द्रव्य सहाय्य असलें पाहिजे. पण माझी स्थिति परतंत्र असल्यामुळें आपणांतील श्रीमान, थोर, उदार व परोपकारी गृहस्थ स्वतः व हस्तें परहस्तें उदारपणे मदत करतील, तर "दसकी लकडी एकका बोजा, असें होऊन हे जातहिताचें कार्य सहज चालू शकेल.

सांप्रत आपल्या ज्ञातींत सुधारणेची चळवळ सर्वत्र सुरू झाली आहे. अशावेळी ज्या अर्थी आपण याच ज्ञातींत जन्मास येऊन ज्यात आहों त्या अर्थी पूर्वीपासून या ज्ञातीशीं आपला कांहींतरी ऋणानुबंध असला पाहिजे. व आपल्या हातून कांहींतरी ज्ञात-हित व्हावें असा ईश्वरी संकेत असावा व तें ज्ञातहिताचें कार्य केल्याखेरीज ज्ञातीच्या ऋणांतून आपण मुक्त होणार नाहीं असा प्रत्येकानें आपले मनांत विचार करून, प्रत्येक ज्ञातबंधूनें या देशहिताच्या कार्यास शक्त्यनुसार होईल ती मदत हस्तें परहस्तें अवश्य करावी, अशी सर्व ज्ञातबंधूंस विनंती आहे. व या विनंतीस मान देऊन वरील कार्याच्या मदतीसाठी शक्त्य-नुसार मदत करणें असेल ती करावी. म्हणजे ज्ञात-हिताविषयीं आपण आपलें कर्तव्य बजाविलें असें होऊन, त्यायोगें ज्ञातीवर उपकार केल्यासारखेंही होईल. म्हणजे असा यानें "एक पंथ दोकाज" साधणार आहे. म्हणून प्रत्येक ज्ञात-बंधूनें ज्ञातहिताची अशी ही आलेली अमोलिक संधी व्यर्थ घा-लवूं नये.

या मासिक पुस्तकाचा प्रत्येक अंक रॉयल १२ पेजी २४ पानांचा (शिवाय रंगीत कव्हर) असा निघेल या एक वर्षाच्या १२ अंकांची किंमत फक्त १। (सवा) रुपया पडेल. तेव्हां १२ अंकांचें सुमारें ३०० पानाचें पुस्तक फक्त १। रुपयांत मिळेल. तरी याच्या महत्वाच्यामानानें वर्षांत ज्ञातहितासाठीं केवळ १। रुपया देणें कांहीं अधीक नाहीं. व तो दिल्यानें ज्ञात-हिताच्या कार्यास मदत केल्यासारखें होऊन, वर्षपर्यंत बरमहा एक उपयुक्त पुस्तकही मोबदला मिळत जाईल. सबब प्रत्येक ज्ञातबंधूनें या मासीकपुस्तकाचा अवश्य वर्गणीदार व्हावें. ज्या

लोकांच्या हातीं हा अंक जाईल त्यांनीं आपल्या व शेजारपाजारच्या गांवीं या पुस्तकाची माहिती लोकांस सांगून मिळतील तितके वर्गणीदार जमवावे व त्यांनीं एक महिन्याचे आंत आपआपल्या पट्टींतील गांवात एकंदर किती वर्गणीदार झाले आहेत त्यांची यादी वर्गणीसह आमचेकडे खालील पत्त्यावर लौकर पाठवावी म्हणजे पुढील अंक त्यांजकडे पाठविले जातील.

वर्गणी खेरीज ज्या थोर, श्रीमान व उदार गृहस्थांस या कामीं मदत करणें असेल त्यांनींही शक्त्यनुसार जी मदत करणें ती करावी. म्हणजे त्यांच्या आंकड्यासह त्यांचीं नांवें या पुस्तकांत उदार आश्रयदात्यांच्या यादींत छापलीं जातील.

यासंबंधी सर्व प्रकारचा पत्रव्यवहार करणें तो आमचें नांवें खालील पत्त्यावर स्पष्ट व सुवाच्य अक्षरांनीं करावा. प्रत्येकाने आपलें नांव, गांव, पोष्ट, तालुका व जिल्हा स्पष्ट लिहावा.

ज्ञातीचा हितचिंतक.

**गोविंद मोरोबा कार्लेकर.**

पत्ता:—दुर्गादेवीनजीक भंडारवाडा कापडगल्लींत मशीदीसमोरील घर, पोष्ट गिरगांव—मुंबई.

## ज्ञातिबंधूंस सूचना.

१ या अंकांत १६-१७-१८ या पानांवर जे "ज्ञातीच्या वहिवाटीचे ठराव" दिले आहेत, ते व एकंदर समांत झाले कामें ज्यां सद्गृहस्थांस मान्य झालीं असतील त्यांनीं आपली नांवें (पत्त्यासह) आम्हांकडे लिहून कळवावीं. तसेंच गांवगांवच्या पाटील लोकांनीं आपापल्या गांवच्या नावासह आपलीं नावें कळविल्यास तीं सवडीप्रमाणें या पुस्तकांत छापण्यांत येतील.

२ पायगांव, हाशिवरें, वाशी व नायडें येथील समांच्या हकीगती पुढील अंकीं देऊं. तसेंच डा० शिवराम वामनजी पाटील यांचा दारु वरील निबंध व कोनेचे रा० हरी सदु म्हात्रे यांचा आगळेज्ञातीच्या माहितीचा लेख. हे पुढील अंकापासून छापण्याची सुरवात केली जाईल.

३ या मासिकपुस्तकाच्या खर्चासाठीं ज्या उदार सद्गृहस्थांनी मदतदाखल पैसे भरले आहेत, त्यांची पोंच पुढील अंकीं देऊं. आंकडे भरून ज्यांनीं अद्याप पैसे दिले नाहींत त्यांनी ते आतां तावडतोब देण्याची मेहरबानी करावी.

४ ज्ञातबांधवांस या मासिकपुस्तकांत छापण्यासाठीं कांहीं मजकूर पाठविणें असेल, तर तो कागदाच्या एका बाजूस स्पष्ट व सुवाच्य बाळबोध अक्षरांनीं लिहून पाठवावा. म्हणजे सार्वजनिक उपयोगाचा असल्यास सवडीप्रमाणें छापिला जाईल.

आगळे हितबोधकर्ते,

पत्ता:-दुर्गादेवीनजीक कापडगल्ली, मुंबई

# शब्दसूची

- अहिरी — लग्नकार्यात मांगल्याचे प्रतिक म्हणून वापरण्यात येणारी मातीची मडकी.
- आगर — नारळ, पोफळी, भात, भाजीपाला, फुले अथवा मीठ पिकविण्याची जागा.
- आडवे पातळ — नऊवारी साडी.
- आहेरपट्टी लिहिणे — लग्नात दिला जाणारा आहेर लिहिण्यास बसणे.
- कान चिंबळणी करणे — कान पिळणे.
- केज — यात्रेत आगरी समाजाकडे तांदळाचे उत्पादन जास्त असल्याने तांदुळ, कण्या किंवा तांदळाचे खाद्यपदार्थ (गोटया, घावणं, आंबोळी, पापड, फेण्या इ.) यांच्या बदल्यात कोळी समाजाकडून सुकी मच्छी किंवा ओली मच्छी घेणे.
- कांडा — शेताचा बांध
- खाना करणे — सर्वांनी वर्गणी गोळा करुन विशेषत: पुरुषांनी मटण शिजवणे.
- खोंडा — लोकरीची त्रिकोणी काळी घोंगडी.
- गटारी — आषाढी अमावस्या.
- गाठे — विशिष्ट पध्दतीचे कानातले
- गावटाकणी करणे —
- घाऱ्या — वडे (तांदूळ, गहू, डाळी यापासून बनविलेला पदार्थ).
- चून — घाऱ्यांसाठी लागणारे तांदूळ.
- चून मळणे / चून सारणे / चून रासणे — घाऱ्यांसाठी लागणारे पीठ मळणे.
- डोहरे — कच्च्या मातीच्या विहरी
- दिडक्या — रूपये — पैसे
- तांबेरा — लग्नप्रसंगी घराच्या भिंतींवर उठविलेले लाल रंगाचे हाताचे ठसे.

- तेलवान पाडणे – वर/वधू यांच्या मस्तकावर छिद्र पाडलेले नागवेलीचे पान धरून त्यावरून तेलाच्या वाटीत बुडविलेले नागवेलीचे पान फिरविणे.
- देज – वर पक्षाकडून वधुला दिला जाणारा ऐवज.
- धवलारीण – लग्न विधिचे पौराहित्य करणारी स्त्री.
- धान – भात
- पाट लावणे – विधवेचा पुनर्विवाह करणे.
- पाटा उजवणे/ पुजणे – पाट्याचे पुजन करणे.
- पोपटी – वालाच्या शेंगा विशिष्ट पद्धतीने भाजून खाणे.
- पोला – कुजविलेल्या /आंबविलेल्या तांदळाच्या पिठापासून बनविलेले घावण.
- फडकी – लुगडे किंवा साडीवर परिधान करावयाची पांढरी ओढणी.
- मवा बसणे – लग्नप्रसंगी नवरदेवाची विधीयुक्त केलेली केसदाढी.
- मुहूर्ते – मुहूर्त करणारे जोडपे.
- रोटी– भाकरी
- ववसा – मुलीला सुपात माहेरून सासरी दिली जाणारी गोड पदार्थांनी भरलेली ओटी.
- वाना वाटणे – पानावर सुवासिनीनां वडे, पापडयांचे दान करणे/वाण देणे.
- हावलूबाय – होळी.
- न्हाव घालणे – अंघोळ घालणे.
- हंदा – ७ ते ८ लोक एकत्र येवून गटाने काम करणे
- दुखवटा – दुख:ला वाटुन घेण्यासाठी आर्थिक अथवा तत्सम वस्तुंची देवाण घेवाण करणे.
- जाग घालणे– अचानक झालेल्या मृत्युचे कारण समजण्यासाठी किंवा इच्छापूर्तीसाठी मृत व्यक्तीच्या आत्म्याचे आवाहन करणे.
- हाक मारणे – मृत व्यक्तिच्या घरी चहापानास जाणे.

## प्रश्नावली

### (आर्थिक बदल)

अ) वैयक्तिक प्रश्न / माहिती

१. नाव :...............................................
२. पत्ता:...............................................
३. वय: ........ लिंग — स्त्री/पुरूष
४. शिक्षण...........
५. जात— उपजात
६. सध्या करत असलेला व्यवसाय/नोकरी अनुभव...........
७. कुटुंब पद्धती— संयुक्त/ विभक्त कुटुंबातील सदस्य संख्या........
८. मासिक उत्पन्न—५०००पेक्षा कमी /१०,००० पेक्षा कमी /१०,०००पेक्षा जास्त

---

ब) योग्य उत्तरासमोर (√) अशी खूण करा.

| अ.क्र. | प्रश्न | होय | नही |
|---|---|---|---|
| १ | माझा पारंपरिक व्यवसाय शेती /मासेमारी आहे. | | |
| २ | मी करीत असलेला व्यवसाय वडीलोपार्जित आहे. | | |
| ३ | सेझ प्रकरणाचा फायदा प्रत्येक शेतकऱ्याला होईल. | | |
| ४ | माझ्या मते परंपरागत चालत आलेला व्यवसाय नवीन नोकरीपेक्षा योग्य आहे. | | |
| ५ | शेती विकणे सद्यस्थितीत आत्यंतिक गरजेचे आहे | | |
| ६ | माझ्या मते भविष्यकाळात बचत करणे खूप गरजेचे आहे. | | |
| ७ | मी माझी व माझ्या मुलांची पॉलीसी काढली आहे. | | |
| ८ | स्त्रियांनी घराच्या आर्थिक हातभारास मदत करण्यास काहिही हरकत नाही. | | |
| ९ | व्यवसायात फायदा व्हावा यासाठी मी सतत प्रयत्नशील असतो. | | |
| १० | माझ्या मते लग्न, पुजा, सण, उत्सव यासाठी होणार खर्च पूर्वीच्या तुलनेत आता जास्त आहे. | | |
| ११ | माझ्या मते नोकरीपेक्षा व्यवसायातून अधिक पैसा कमवू शकतो. | | |
| १२ | आर्थिक सुबत्तेमुळे समाजाची प्रगती होण्यास मदत होते. | | |
| १३ | माझ्या मते समाजाचा आर्थिक स्तर वाढविण्यासाठी स्वत: आर्थिक दृष्टया सुबत्त असणे आवश्यक आहे. . | | |
| १४ | जागतिकीकरणामुळे व्यवसाय वृद्धी होण्यास मदत झाली. | | |
| १५ | इतर समाजाशी तुल्यबळ होण्यासाठी आर्थिक वृद्धी गरजेची आहे. | | |

# प्रश्नावली

## (शैक्षणिक बदल)

अ) वैयक्तिक प्रश्न / माहिती

१. नाव :...............................................
२. पत्ता:...............................................
३. वय: ........ लिंग — स्त्री/पुरूष
४. शिक्षण...........
५. जात— उपजात
६. सध्या करत असलेला व्यवसाय/नोकरी अनुभव...........
७. कुटुंब पद्धती— संयुक्त/ विभक्त कुटुंबातील सदस्य संख्या........
८मासिक उत्पन्न— ५००० पेक्षा कमी /१०,००० पेक्षा कमी /१०,०००पेक्षा जास्त

---

ब) योग्य उत्तरासमोर (√) अशी खूण करा.

| अ.क्र. | प्रश्न | होय | नही |
|---|---|---|---|
| १ | समाजामध्ये स्वत:चे स्थान निर्माण करण्यासाठी शिक्षण पैशापेक्षा अधिक महत्त्वाचे आहे. | | |
| २ | उच्च शिक्षण घेऊन परंपरागत व्यवसाय टाळणे आजच्या काळात योग्य आहे असे मला वाटते. | | |
| ३ | इतर समाजाच्या तुलनेत माझ्या समाजातील मुले अधिक शिक्षण घेतात. | | |
| ४ | माझ्या मते मुलींच्या शिक्षणाने समाज विकासास वेग येईल. | | |
| ५ | स्त्रियांनी उच्चशिक्षणासाठी बाहेर जाण्यास हरकत नाही असे मला वाटते. | | |
| ६ | शैक्षणिक बदल हा समाजबदलाचा पायाभूत घटक आहे. | | |
| ७ | पूर्वीच्या तुलनेत सद्यस्थितीत माझ्या समाजातील शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे. | | |
| ८ | समाजातील शिक्षणाचे प्रमाण वाढल्याने आर्थिक क्षेत्र बदलण्यास मदत मिळते. | | |
| ९ | शैक्षणिक विकासामुळे समाजातील मागासलेपण दूर होण्यास मदत झाली. | | |
| १० | पूर्वीच्या तुलनेत सद्यस्थितीत माझ्या समाजातील शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे. | | |

# प्रश्नावली

## (सामाजिक बदल)

अ) वैयक्तिक प्रश्न / माहिती

१. नाव :.............................................
२. पत्ता:...............................................
३. वय: ........ लिंग — स्त्री/पुरूष
४. शिक्षण...........
५. जात— उपजात
६. सध्या करत असलेला व्यवसाय/नोकरी अनुभव...........
७. कुटुंब पद्धती— संयुक्त/ विभक्त कुटुंबातील सदस्य संख्या........
८मासिक उत्पन्न— ५००० पेक्षा कमी /१०,०००पेक्षा कमी /१०,००० पेक्षा जास्त

---

ब) योग्य उत्तरासमोर (√)अशी खूण करा.

| अ.क्र. | प्रश्न | होय | नाही |
|---|---|---|---|
| १ | मला माझ्या घरात स्वतंत्र स्थान आहे. | | |
| २ | पारंपरिक सण व उत्सव साजरे करण्यास आवडते. | | |
| ३ | पारंपरिक रूढी / परंपरा जतन करणे योग्य आहे. | | |
| ४ | माझ्या मते गेल्या २० वर्षापासून माझ्या समाजात बरेच बदल झाले आहेत. | | |
| ५ | दळणवळणाच्या वाढत्या सोयींमुळे माझे जीवन गतीमान बनले आहे. | | |
| ६ | इलेक्ट्रॉनिक्स् साधने वापरल्याने वेळेची बचत होते. | | |
| ७ | माझ्या मते पुरूषांप्रमाणे स्त्रीलाही घरात बरोबरीचे स्थान असावे. | | |
| ८ | माझ्या आहारामध्ये शक्यतो पारंपरिक पदार्थांचाच समावेश असतो. | | |
| ९ | मी माझ्या बोलीभाषेचा वापर व्यवहारात करतो. | | |
| १० | मला माझी बोलीभाषा चांगली बोलता येते. | | |
| ११ | समाजातील बदलानुरूप माझ्या पालकांनी त्यांच्या विचारसरणीत बदल करावा असे मला वाटते. | | |
| १२ | समाजबदल म्हणजे पेहरावात बदल यास मी सहमत आहे. | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १३ | परप्रांतीय/इतर समाजाचे अनुकरण आमच्याकडे लग्नविधीत केले जातत. | | |
| १४ | सद्यस्थितीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर अपरिहार्य वाटतो. | | |
| १५ | समाज मंदिरामध्ये जाणे हे माझ्या समाजात अनिवार्य आहे. | | |
| १६ | समाज विकासाठी सामाजिक संघटना महत्त्वाची भूमीका बजावतात. | | |
| १७ | जागतिकीकरणामुळे राहणीमानाचा दर्जा सुधारला असे मला वाटते. | | |
| १८ | माझ्या मते इतर समाजाच्या तुलनेत माझा समाज कमी प्रगत आहे | | |

## प्रश्नावली भरून देणाऱ्यांची प्रातिनिधिक नावे

१. निळकंठ कमळा केमकर
नोकरी, मु. थळबाजार.

२. रामचंद्र सारवरकर
नोकरी, मु. अलिबाग.

३. अंकुश नारायण वरसोलकर
नोकरी, मु. अलिबाग.

४. रंजिता निळकंठ वरसोलकर
प्राथमिक शिक्षिका, मु. थळ.

५. मानकूबाई बामा कोळी
कोळीण, मु. रेवस.

६. मंगेश कमळा केमकर
व्यावसायिक, मु. थळबाजार.

७. संदीप बापू सारंग
नोकरी, मु. अलिबाग.

८. सत्यवती अनंता कोळी
गृहिणी, मु. रेवस.

९. नवनाथ दशरथ कोळी
मच्छीमार, मु. रेवस.

१०. चंद्रकांत सखाराम वरसोलकर
नोकरी, मु. अलिबाग.

११. चंद्रभागा हरिश्चंद्र कोळी
मजूर, मु. बोडणी.

१२. धनंजय पाटील
उपसंरपच, मु. शहाबाज.

१३. आर. के. पाटील
माध्यमिक शिक्षक, मु.कुर्डूस.

१४. सुधिर थळे
रा.जि.प. सदस्य, मु शहापूर.

१५. तुळसाबाई पाटील
सदस्य,ग्रा. पं. आंबेपूर, मु.पेझारी.

१६. पोसूबाई हरिभाऊ म्हात्रे
गृहीणी, मु. कमळपाडा.

१७. शशीकांत पाटील
अध्यक्ष, ग्राम तंटामुक्ती
अभियान, मु. धामणपाडा.

१८. सुर्यकांत नरहरी पाटील
निवृत्त विस्तार अधिकारी,
मु. शहाबाज.

१९. सुनिता गजानन पाटील
सदस्य, महिला नाच मंडळ,
मु. शहाबाज.

२०. नामदेव धर्मा दौरकर
अध्यक्ष, इतर मागास वर्गिय संघ
तालुका कॉग्रेस समिती नवी मुंबई
महापे, नवी मुंबई.

२१. लिलाबाई नामदेव जुईकर

निवृत्त मुख्याध्यापिका, मु. वाघोडे.

२२. राजन मारुती पाटील

नोकरी, मु. ताडवागळे.

२३. सुलभा बाळकृष्ण म्हात्रे

वकिल, मु. अलिबाग.

२४. सु. ना. कुलकर्णी

प्रशासकीय अधिकारी, पी.एन.पी. शैक्षणिक संस्था, मु. अलिबाग.

२५. आत्माराम हरी थळे

स्वातंन्त्र्यसैनिक, मु. खोपणे.

२६. जयश्री किसन ठाकूर

केंद्रप्रमुख, रेवस केंद्र, मु. अलिबाग.

२७. विश्वनाथ नारायण पाटील

निवृत्त विस्तार अधिकारी, मु. चरी.

२८. नामदेव बाळाराम जाधव

निवृत्त प्राथमिक शिक्षक, राज्य पुरस्कार प्राप्त, मु. पेझारी.

२९. शांताबाई आत्माराम थळे

गृहिणी, मु. खोपणे.

३०. वर्षा जितेंद्र ठाकूर

फुल विक्रेती, मु. कोपर.

३१. सरोज पाटील

विद्यार्थी, मु. नारंगी.

३२. सईंद्रा मधुकर पाटील

अध्यक्ष, आदर्श महिला मंडळ, मु. शहाबाज.

३३. मनोज आत्माराम थळे

प्राथमिक शिक्षक, तालुका पुरस्कार प्राप्त, मु. पेझारी.

३४. दिनेश कृष्णा पाटील

प्राध्यापक, पी.एन.पी. कॉलेज, मु. अलिबाग.

३५. मालती मधुकर पाटील

हंदाप्रमुख, मु. चौकीचा पाडा.

३६. पुष्पा गजानन पाटील

भाजी विक्रेती, मु. रांजणखार.

३७. सुरेखा सुर्यकांत पाटील

अध्यक्ष, महिला बचत गट, मु. वाघविरा.

३८. मनोज मधुकर पाटील

नोकरी, मु. शहाबाज.

# मुलाखतीची प्रश्नावली

## अ) वैयक्तिक प्रश्न / माहिती

१. नाव :..............................................
२. पत्ता:...............................................
३. वय: ........ लिंग — स्त्री/पुरूष
४. शिक्षण...........
५. जात— उपजात
६. सध्या करत असलेला व्यवसाय/नोकरी अनुभव...........
७. कुटुंब पद्धती— संयुक्त/ विभक्त कुटुंबातील सदस्य संख्या........
८.मासिक उत्पन्न— ५००० पेक्षा कमी /१०,०००पेक्षा कमी/१०,००० पेक्षा जास्त

---

१. मागील २० वर्षात तुमच्या समाजात काही बदल झालेत का ?

२. तुमच्या समाजातील लोकांचे वास्तव्य अलिबाग तालुक्यात कुठे आहे ?

३. या समाजात काही उपप्रकार आहेत का ? असल्यास कोणते ?

४. या उपप्रकारातील कोणते लोक अलिबागमध्ये प्रामुख्याने आढळतात ?

५. तुमच्या समाज विकासासाठी कोणकोणत्या व्यक्ती कार्यरत आहेत ?

६. जागतिकीकरणाचा या समाजावर पडलेला प्रभाव सांगा ?

७. जागतिकीकरण व सामाजिक—आर्थिक बदल यांचा काही सहसंबध या समाजाप्रती सांगता येईल का?

८. या समाजाचा पारंपारिक व्यवसाय कोणता ?

९. जागतिकीकरणाचा या समाजातील पारंपरिक व्यवसायावर कोणता प्रभाव पडला ?

१०.शैक्षणिक व आर्थिक प्रकारचे बदल घडून येण्यास जागतिकीकरण कसे कारणीभूत ठरले ?

११. पारंपरिक व्यवसायापासून लांब गेल्यामुळे या समाजावर कोणते प्रतिकूल परिणाम झालेत ?

१२.गेल्या २० वर्षातील या समाजातील सामाजिक बदल सांगा ?

१३.या बदलामागिल जागतिकीकरणाची भूमीका स्पष्ट करा.

१४.या समाजात बोली भाषेत बदल झाला का ? कशामुळे ?

१५.तुमच्या समाजाची विशिष्ट प्रकारची संस्कृती आहे का? त्या संस्कृतीवर बाह्यगोष्टींचे संक्रमण होते का ?

१६.पारंपरिक व्यवसाय टिकण्यासाठी /वाढण्यासाठी शासनाकडून काही मदत मिळते का ?

कोणत्या प्रकारची ?

१७. तुमच्या समाजासाठी कार्य करणाऱ्या संघटना आहेत का ?त्यांचे कार्य कसे चालते ?

१८.आजच्या पिढीचा कल नोकरी अथवा व्यवसाय या पैकी काय करण्याकडे आहे ? का ?

१९.गेल्या तीन पिढयांचा विचार करता विशेषत्वाने झालेले बदल नमुद करा.

२०.भविष्यात येथे येणारे प्रकल्प तुमच्या समाजासाठी उपयोगी आहेत का ?

२१.आजच्या विज्ञान युगाचा /तंत्रज्ञानाचा उपयोग तुमच्या व्यवसायासाठी /नोकरीसाठी कसा होतो?

२२.तुमच्या मते सद्यस्थितीत शेती विकणे कितपत गरजेचे आहे? का?

२३.तुमची जमीन किती होती ? किती विकली ? विकण्याचे कारण? आलेल्या पैशाचे काय केले?

## मुलाखत देणाऱ्यांची प्रातिनिधिक नावे

१. जगदीश गणपत हिलम
मु. चिंचवली, नोकरी.

२. प्रविण जनार्दन म्हात्रे
मु. रांजणखार, व्यवसाय.

३. सुरज चंद्रकांत पाटील
मु. शहाबाज, नोकरी.

४. मनोहर नामदेव जुईकर
मु. शहाबाज, नोकरी.

५. निलीमा मनोहर जुईकर
मु. बांधण, ग्रामसेविका.

६. सुनंदा सदानंद मोडखरकर
मु. कामार्ले, प्राथमिक शिक्षक.

७. महेंद्र रामचंद्र म्हात्रे
मु. अलिबाग, सेवानिवृत्त अधिकारी.

८. आशिष गंगाधर पाटील
मु. लेभी, प्राध्यापक.

९. जनार्दन अनंत पाटील
मु. पांडवादेवी, ग्रामपंचायत सदस्य.

१०. सुरेश सदानंद गावंड
मु. सुतारपाडा, व्यवसाय.

११. देवेंद्र किशोर पाटील
मु. पोलीस लाईन,अलिबाग, नोकरी.

१२. सुनिल काशिनाथ पाटील
मु. खिडकी, शेती.

१३. रोहीदास रामदास सालावकर
मु. नवेदर बेली, नोकरी.

१४. गौऱ्या हासू कटोर
मु. बोडणी, नोकरी.

१५. जयेश पाटील
मु. भाल, ग्रामसेवक.

१६. ज्ञानेश्वर साळावकर
मु. बेलपाडा, विस्तार अधिकारी.

१७. सुयोग आंग्रे
मु. अलिबाग, उपसंपादक.

१८. सागर पाटील
मु. रेवस, फुल व्यवसाय.

१९. हेमंत गंगाधर पाटील
मु. कमळपाडा, नोकरी.

२०. नरेंद्र नारायण पाटील
मु. दिवलांग, अध्यक्ष विनायक
क्रीडा मंडळ.

## आगरी आणि कोळी समाजाचे आधिक्य असणारी व सर्वेक्षणासाठी निवडलेली गावे

| आगरी गावे | कोळी गावे |
|---|---|
| १. कुर्डुस | १. रेवस |
| २. शहाबाज | २. बोडणी |
| ३. पोयनाड | ३. थळ |
| ४. पेझारी | ४. नवगांव |
| ५. कोपर | ५. नांदाईचापाडा |
| ६. कुसुंबळे | ६. आक्षी |
| ७. चरी | ७. वरसोली |
| ८. मानकुळे | ८. थेरोंडा |
| ९. धेंरड | ९. थळेपाडा |
| १०. रांजणखार | |
| ११. नारंगी | |
| १२. हाशिवरे | |
| १३. वाघ्रण | |
| १४. लोणघर | |
| १५. पेढांबे | |
| १६. नवखार | |

# पारंपरिक आगरी गीते

## नमन

नमिला गणपती, नमिली धरतरी,
देव नमिल चांदसुर्य, देव नमिलं म्हसोबा,
देव नमिल शंकर, माता नमिली मरूबाय,
देव नमिल मारूती, देव नमिल दत्ताजी,
नमिल नमिल तेहेतिस कोटी देव

हलद कुकू लावूनीया कस्तुरीचा टिला लल्लाटी रेखियला
होशील जन्मा सावितरी आयोपण देवाशी मागीशी
यो काय तुमचा आयोपण गो
यो काय कपालीचा कुकू
टिला रेखित आशा बाये
होशील जन्मा सावितरी..........

मंदानी दोन पार रातं वनी मोरांनी टाहू केला
दारी पकसा पकसा अरवला
तो नांद परला परला मालनी बायचे कानी
तव ती मालीन उठोन जागी झाली
तव त्या मालनींन घांटू गुरलं केलं
पेटवील्या तांबियाच्या चुली
हंडाले ठेवीयला हंडाल पानी तापविलं
गंगाले पानी उपसील दारचे शिलवरी नेलं
तव त्या माल्यानी आंघोल केली

कंबरे लावियली धोतराचं जोरु
अंगी घातिली गजनी कचोली

तव त्या मालनीनं देवपुजा केली
तव त्या मालनीनं भोजन रांदिले
आंब्या मोहराचा भात वेलची लवूंगाची साक
वर हिंगाची फोरनी

तव ती भोजने कारली सुवरनाची ताटा
तव तो माली चालता नं झाला

सौ. सुमन पाटील —पेझारी

## गणपती गीत

गणराया गणपती गणराया गणपती
नाचत आल गणपती नाचतं आलं
गणपती केशर कत्सुरी लल्लाटी
पायी घागुऱ्या वाजती
नाचत आल गणपती
गल्या तुलशीच्या माला
अंगी शेंदुराची उटी
नाचत आलं गणपती नाचत आलं गणपती
गणराया गणपती गणराया गणपती

बंबे हिरं झलालती
मस्तकी मुकुट शोभतं
कानी कुंडला शोभतं
हाती मोदकाची वाटी
नाचत आलं गणपती नाचत आलं गणपती
गणराया गणपती गणराया गणपती

## लग्नगीत

न्हाहिली धुतली तेजूबाय करसाने बैसली
हात जोरीत गणपती देवाला
इच्छा मागितं हिचीया कुकवाला
कधी येती रे ज्ञानेश्वर मामाची पातलं
नवरी तेजू बायला लगना नेती.
भरल्या लगुनाच्या वेला
नवरी कापे थराथरा
नवरीचा मामा येती धीर धरा

श्रीमती गंगुबाई पाटील — दिवलांग

## नवरात्र गीत

सरवानू सरला काय भादवा निघाला
अश्वीनची नये दिसाला आंबा बसली नवरत्ना
बसली नवरत्ना मला बंधु आलं न्यायाला
पलंगी पहुचता माझीया मामोजी
बंधु आलं न्यायाला मला रजा दया जावाला
मजवर काय पुसतस माझे गुनाचे गुनवंते
गुनाचे गुनवंते तू सदानो भाग्यवंते
मानसी ओवलत माझी या आईजी
बंधु आल न्यायाला मला रजा द्या न्यायाला
मजवर कार पुसतस माझे गुनाचे गुनवंते
गुनाचे गुनवंते तू सदानो भाग्यवंत
इटी दांडू खेलतयं या माझे या भावजी
बंधु आलं न्यायाला मला रजा दया जायाला

मजवर काय पुसतस माझे गुनाचे गुनवंते
गुनाचे गुनवंते तू सदानो भाग्यवंते
पलंगी पहुलखी माझी या ईश्वरा
बंधु आलं न्यायाला मला रजा दया जायाला
मजवर कार पुसतस माझे गुनाचे गुनवंते
गुनाचे गुनवंते तू जा तुझे घरा

सौ. शांता जुईकर—शहाबाज

## गौरी गीत

धुप जल धुपारती कापूर जले ज्योती
अवचित लक्ष्मी आली तुमचे घरा
उठा उठा सहदेव पाटील धुपारती करा
आली तर येउ दे सन्मानू करा
धुप जल धुपारती कापूर जले ज्योती

उठा उठा कमलाकर पाटील धुपारती करा
अवचीत लक्ष्मी आली तुमच्या घरा
आली तर येऊ दे सन्मानू करा
धुप जल धुपारती कापूर जले ज्योती

उठा उठा भानुदास पाटील धुपारती करा
अवचीत लक्ष्मी आली तुमच्या घरा
आली तर येऊ दे सन्मानू करा
धुप जल धुपारती कापूर जले ज्योती

सौ. मंदा जुईकर — शहाबाज

# पारंपरिक कोळी गीते

## बायांची गाणी

पहिलोनी बाया आल्या पाणेरवाटेला, पाणेरवाटेला.
दुसरोनी बाया आल्या दगर धोंडयाला, दगर धोंडयाला.
तिसरोनी बाया आल्या करवंदी जाल्याला, करवंदी जाल्याला.
चौथोनी बाया आल्या चौथ्या चांदाला, चौथ्या चांदाला.
पाचवोनी बाया आल्या पाच पांडवाना, पाचा पांडवाना.
सहावोनी बाया आल्या सावल्या ईठठ्ला, सावल्या ईठठ्ला.
सातवोनी बाया आल्या रामचंद्राला, रामचंद्राला.
आठवोनी बाया आल्या नवनाथांना, नवनाथांना.
नवोनी बाया आल्या किस्ना बाळाला, किस्ना बाळाला.
दहावोनी बाया आल्या दाही दिशांना, दाही दिशांना.

आखमल मखमल फुलांची येनी ....
नख–यावाली मना सोरुन जेली
जेली ती जेली जिंज्यात गं
टोलवायाच्या नादात
आखमल मखमल फुलांची येनी ......
नख–यावाली मना सोरुन जेली
जेली ती जेली जिंज्यात गं
मोटारवाल्याच्या नादात
आखमल मखमल फुलाची गेणी ......
नख–यावाली मना सोरुन जेली
जेली ती जेली जिंज्यात गं

सायकल वाल्याच्या नादात गं
आखमल मखमल फुलांची येनी ......
नख—यावाली मना सोरुन जेली
जेली ती जेली जिंज्यात गं
बंगल्यावाल्याच्या नादात गं
आखमल मखमल फुलांची येनी ......

सौ. यशोदा थळे —थळ

## साखरपुडा

परडी मध्ये नाग डूले नाग किती छान गं,
सीमा तुझी सासू आली कर नमस्कार गं,
रागाने नको करू प्रेमाने कर गं,
सासूच्या वटी मध्ये गनतनाचे जोर गं,
सीमा जपून वापर गं,
परडी मध्ये नाग डूले नाग किती छान गं,
सीमा तुझा सासरा आला कर नमस्कार गं,
रागाने नको करू प्रेमाने कर गं ,
सासऱ्याच्या खिश्यामध्ये पैजनाचे जोर गं
पैजनाचे जोर जरा जपून वापर गं,
सीमा तुझी ननन आली कर नमस्कार गं,
रागाने नको करू प्रेमाने कर गं,
नननच्या वटीमध्ये बांगऱ्यांचे जोर गं,
दिराच्या खिश्यामध्ये कानातल्यांचे जोर गं,
कानातल्याचे जोड सीमा जपून वापर गं,
सीमा तुझा नवरा आला त्याला कर नमस्कार गं,
नवऱ्याच्या हातामध्ये जोरव्याचे जोर गं,
जोरव्यांचे जोर सीमा जरा जपून वापर गं,

## गणपतीचे गीत

शंकरदेव बोलू लागला गो

न तू जावू तूज्या माहेराला गा

घेईन तुला सोन्याचा सुपू गा

ते घेवून जा तू ववश्याला गो

पारबती रूसून बसली

शंकरदेव बोलू लागले गो

मी आनीन तुला सोन्याचा सुपू गो

पारबती बोलू लागली

नको मना सोन्याचा सुपू गो

पायजेल मला कांबीचा सुपू गो

शंकरदेव बोलू लागले

आनीन तुला सोन्याचा नारोल गो

पारबती बोलू लागली

नको मना सोन्याचा नारोल गो

शंकरदेव बोलू लागले

मी आनीन तुला ंसोन्याचा पानू आनी सुपारी गो

नको मना सोन्याचा पानू आनी सुपारी गो

पाहिजेल मना झाराचा पान आनी फोपलीची सुपारी गो

शंकरदेव बोलू लागला घेईन मी सोन्याचा केला

पारबती बोलू लागली गो

नको मना सोन्याचा केला गो

पायजेल मना केलीचा केला गो

शंकरदेव बोलू लागले

न तू जावू तूज्या माहेराला गो

पारबती बोलू लागली गो

जाईन मी माझ्या माहेरा गो

शंकरदेव बोलू लागले गो

न जावू तूज्या माहेरान गो

पारबती रागाने रानात गेली गो

तिने लावला झाराला फासू गो

शंकरदेव ररु लागले गो

शंकरदेव रानात गेले गो

शंकरदेव बसले झाराखली गो

शंकरदेवाने वर बगितले गो

पारबती ने फासू लावला गो

शंकरदेवाने फासू सोरवला गो

पारबती ला शंकरदेवाने कैलासात आणले गो

शंकरदेव बोलू लागले गो

जा तू ववश्याला तूझ्या माहेरी गो

पारबती हासू लागली गो

पारबती बोलू लागली जाते मी माझ्या माहेरी गो

श्रीमती किसनी नाखवा —थळ

# छायाचित्रे